

Late Dr. Bhau Mandavkar




ISSN 2349-9370
Vol. 3 Issue 1
Oct. 2016
Regular Issue
Impact Factor
2016 – 4.43
www.sjifactor.com


# Research Journal of India

(Peer Reviewed Multi-Disciplinary Annual National Research Journal)




Dr. Bhau Mandavkar Research Centre
INDIRA MAHAVIDYALAYA
KALAMB, DISTT. YAVATMAL, MAHARASHTRA 445401 (India)

Impact Factor 2016 – 4.43 ISSN 2349-9370

# RESEARCH JOURNAL OF INDIA

Peer Reviewed Annual National Research Journal for Multi-Disciplinary Studies

Volume 3 Issue 1
October 2016
Regular Issue

**Chief Editor**
**Dr. Pavan Mandavkar**
Principal, Indira Mahavidyalaya
Chairman, Research Centre

**Associate Editor**
**Dr. Veera Mandavkar**
Director, Research Centre
Indira Mahavidyalaya, Kalamb

**---- Editorial Board ----**

**Dr. Martand Khupse**
**Prof. N.R. Thawale**
**Dr. G.P. Urkunde**
**Prof. S.Y. Lakhadive**
**Prof. A.G. Dondal**
**Prof. D.S. Patil**
**Prof. R.T. Ade**
**Dr. B.V. Rothod**
**Prof. R.M. Wath**
**Prof. N.V. Narule**
**Prof. M.P. Rakhunde**

## Invited Guest Editors

1. **Vikram Raje,** 4, Alderman Willey Close, Wokingham – RG41 2AQ, Berkshire, UK
2. **Vishal Dahalkar,** 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
3. **Dr. Anita Gupte Patil,** Auckland, New Zealand
4. **Ranjit Raje,** 201/83 Whiteman Street, Southbank, Melbourne, VIC-3006, Australia

## Advisory Board

**Sonali Dahalkar,** 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
**Prof. Dineshkumar Joshi,** Ex. Registrar, S.G.B. Amravati University, Amravati
**Dr. Santoh Thakre,** Ex. Dean, Faculty of Social Science, S.G.B. Amravati Uni., Amravati
**Dr. P.W. Kale,** Ex. Dean, Faculty of Commerce, S.G..B. Amravati University, Amravati
**Dr. R.A. Mishra,** Principal, Amolakchand Mahavidyalaya, Yavatmal
**Dr. U.V. Navalekar,** Principal, Abasaheb Parvekar Mahvidyalaya, Yavatmal
**Dr. J.M. Chatur,** Principal, Smt. Nankibai Wadhwani Kala Mahavidyalaya, Yavatmal
**Dr. Anil Gajbhiye,** Ex. Principal, Govt. college Sardarpur, Dist. Dhar, M.P.
**Dr. Shashikant Sawant,** Ex. H.O.D., Marathi, Vikram Vishwavidyalaya, Ujjain, M.P.

**Publisher : Dr. Mrs. Veera Mandavkar,** Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401(India)
E mail – **researchjournalofindia@gmail.com** Alternate mail id – **marathipradhyapak@gmail.com**
Telephone: 07201-226147, 226129 Telefax, Mob. Chief Editor: 9422867658 Director 9403014885
Website: **www.indiramahavidyalaya.com** **www.researchjournal.net.in**

**Printer: Seva Prakashan,** Vijay Colony, Rukmini Nagar, Amravati, Maharashtra 444 606
**Cover Page Design & Computer Work : Dr. Pavan Mandavkar**

**Subscription for hard copy for one year Rs. 500/-**

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| | Guidelines for Authors | Editorial Board | 3 |
| | From the Bench of Editor | Dr. Pavan Mandavkar | 4 |
| 1 | प्राचीन मराठी साहित्यातील संतांचे आत्मनिवेदनपर उद्‌गार | प्रा. नेमीचंद एफ. चव्हाण | 5 |
| 2 | आधुनिक मुस्लिम मराठी कविता | प्रा.डॉ. शामराव गायकवाड | 9 |
| 3 | माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा लघुउद्योगांसाठी होणाऱ्या उपयोगाचे अध्ययन | प्रा. सौ. सी.एम. खंडारे | 14 |
| 4 | READING HABITS AMONG TEACHERS IN COLLEGES | Dr. Vibhavari B. Hate | 17 |
| 5 | Side chain bromonation of 1-(4-substituted-1-hydroxynaphthalen-2-yl)ethanone by N-brobosuccinamide in PEG 400 solvent medium under Microwave Irradiation | Dasharath M. Chavhan[1] Shrikant S. Patil[2] | 24 |
| 6 | बाबुराव बागूल यांची कविता | प्रा.डॉ. अविनाश श. धोबे | 30 |
| 7 | महानुभवांच्या बहुभाषिक साहित्याची पार्श्वभूमी | प्रा.डॉ. वैशाली भालसिंग | 33 |
| 8 | नवकथेचे मानकरी : गंगाधर गाडगीळ | प्रा. डॉ. आर. एम. केदार | 38 |
| 9 | महात्मा फुल्यांची आदर्श समाजरचना | प्रा. दिलीप घोनमोडे<br>प्रा. डॉ. विजय रैवतकर | 42 |
| 10 | संत तुकाराम यांचे स्त्रीविषयक विचार | डॉ. विशाखा वंजारी | 47 |
| 11 | महाराष्ट्र फळबाग लागवड शेती | प्राचार्य डॉ. विजय एच. नागरे | 53 |
| 12 | नव काव्य : बा. सी. मर्ढेकर संदर्भीय | प्रा. अमोल विठठल नगराळे | 57 |
| 13 | विशुद्ध भावभक्तीची प्रेरणा – महदंबेचे धवळे | प्रा. डॉ. माधुरी म. पाटील | 60 |
| 14 | A Comparative Study of Achievement Motivation and Emotional Intelligence among Jr. College Students | Mr. Santosh k. Doifode | 62 |
| 15 | भारतीय संसदीय लोकशाहीत विरोधी पक्षाची भूमिका | प्रा. डी.एस. पाटील | 66 |
| 16 | भाषाप्रभू पु .भा. भावे | प्रा. रा. तु. आदे | 70 |
| 17 | Exile and self alienation in Anita Desai's Bye Bye Black Bird | Prof. Prashant S. Jawade | 73 |
| 18 | बदलत्या जीवनमानाचा वेध घेणारी महानगरीय कविता | डॉ. नरसिंग कदम | 75 |
| 19 | कवी नामदेव ढसाळांची कविता : एक विद्रोह | प्रा. रेखा व्ही. इंगोले | 79 |
| 20 | माहिती तंत्रज्ञान आणि मराठी भाषा | प्रा. नरेश कृ. महाजन | 83 |
| 21 | यशवंतराव चव्हाण यांनी रेखाटलेली व्यक्तिचित्रे | प्रा. डॉ. ममता इंगोले (महल्ले) | 86 |
| 22 | आदिवासी कवितेतील स्त्री चित्रण | प्रा. नितीन जगदिश टेकाम | 92 |
| 23 | ऐतिहासिक शहर पाटलीपुत्र | प्रा. एन. आर. ठवळे | 96 |

# Guidelines for Authors

Research Journal of India is a Peer Reviewed Annual National Research Journal for Multi-disciplinary studies of various faculties.

Vision and Mission of Research Journal is to provide momentum to research in the all areas like analytical, competitive, survey, contemporary issues and quality control.

**Call for Research Paper**

1. Paper on all subjects and areas will be accepted in English, Hindi or Marathi.
2. Paper should be **A 4** size with 1.25 inch margin on each side.
3. No header & footer should be given.
4. Text should be in **Times New Roman** type with font size **11** in English and **Krutidev 50** type with **14** font size for Hindi/Marathi and should be computed in MS word only. PDF files will not be accepted.
5. Font size for Title of Paper 22 bold for English and 26 bold for Hindi/Marathi, Name of Author in 12 bold for English, 16 bold for Hindi/Marathi, address in 11 for English, 14 bold for Hindi/Marathi & Subtitles in 14 bold for English and 18 bold for Hindi/Marathi. For Marathi and Hindi articles Krutidev 50 font should be tatally bold for all matter.
6. Spacing should be **single**. Alignment for paper & headings should be justified & centered for title of paper & name of writer with address.
7. The first page should consist of title, name(s) of author(s) with designation, department or college with full address, contact numbers and mail id at the centre below title.
8. Introduction, review of literature, background of study, methodology, objectives, purpose, hypothesis, significance, findings and discussion, analysis, conclusion, recommendations may be given wherever required.
9. References list should be alphabetized at the end of research paper.
10. Tables & figures should be cited in the text in consecutive numerical order. Each figure should have concise and informative caption.
11. Maximum limit is 2500 words or 5 pages. Abstract should be up to 150 words followed by 4-5 key words. Paper exceeding 5 pages will be charged Rs. 100 per additional page. Only abstract or paper less than 3 pages or without references will not be accepted.
12. Authors have to send research paper by e mail at: **marathipradhyapak@gmail.com**

11\. Editorial Board's Decision will be final.

13\. The copyright of all accepted papers will vest with **Research Journal of India.**

14\. International Guidelines for writing of research paper are to be strictly followed.

15\. Date of Publishing is 1rst October each year and papers will be accepted up to 1rst Sept..

16\. Fees to publish research paper for a single author is Rs. 700/- & Rs. 900/- for more than one author to be deposited in A/c No. – 60175373000 of Bank of Maharashtra, Azad Maidan Road, Yavatmal, IFSC code - MAHB0000047 in favour of **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre.**

❖❖❖

(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)

# From the Bench of Editor

The renowned scientist Mr. Ramesh Raskar, founder of the Camera Culture research group at the MIT Media Lab and associate professor of media arts and sciences at MIT, is the recipient of the 2016 $500,000Lemelson-MIT Prize. Mr. Raskar is the co-inventor of radical imaging solutions including femtophotography, an ultra-fast imaging system that can see around corners; low-cost eye-care solutions for the developing world; and a camera that allows users to read pages of a book without opening the cover. Mr. Raskar seeks to catalyze change on a massive scale by launching platforms that empower inventors to create solutions to improve lives globally.

Mr. Raskar has dedicated his career to linking the best of the academic and entrepreneurial worlds with young engineers, igniting a passion for impact inventing. He is a pioneer in the fields of imaging, computer vision and machine learning and his novel imaging platforms offer an understanding of the world that far exceeds human ability.

In 2012, Raskar co-created femtophotography, an advanced form of photography allowing cameras to see around corners. The technology, currently in development for commercialization, uses ultrafast imaging to capture light at 1 trillion frames per second, allowing the camera to create slow motion videos of light in motion. Raskar and his team have received significant funding from sponsors including the U.S. Defense Advanced Research Projects Agency (DARPA), the National Science Foundation, and MIT to further develop the idea of using "scattered light imaging" to see around corners.

Potential future applications include: avoiding car collisions at blind spots; detecting survivors in fire and rescue situations; and performing endoscopy and medical imaging to eliminate the need of an X-ray. Raskar is continuing this research to make the seemingly impossible possible — from reading a book without opening the cover to capturing images of out-of-sight objects using sound waves.

Raskar is the co-founder of EyeNetra, an inexpensive, disruptive eye-care platform that spun out of Media Lab research. EyeNetra enables on-demand eye testing in remote locations via a hand-held technology that snaps onto a mobile device. When looking into the binocular the user is provided with interactive cues to rapidly calculate a prescription for eyeglasses. The technology was created to eliminate the need for expensive diagnostic tools in the developing world; the young company has performed eye-tests for hundreds of thousands of subjects and is currently active in the U.S., Brazil, and India.

Mr. Raskar's team has also worked on many areas of preventable blindness, low vision, and diagnostics at MIT. In 2013, he and his colleagues launched LVP-MITRA in Hyderabad, India, a center where hundreds of young inventors have been co-inventing next generation screening, diagnostic, and therapeutic tools for eye-care.

Mr. Raskar is also the founder of the Emerging Worlds initiative, a year-round effort focused on solving some of the world's most pressing problems and impacting billions worldwide. This initiative links corporate members, government organizations, educational institutes, and venture partners. This methodology was recently used at the Kumbhathon sandbox for innovations at Kumbh Mela, a gathering of 30 million people, and at the Digital Impact Square, a multi-million-dollar living lab and open co-innovation center. Raskar has mentored several teams that span crowd-steering via use of cell tower data to display heat maps of crowd movements, stations to test vital statistics using portable instruments, and an analytics-based system to detect impending epidemic outbreaks in real-time.

This issue of **'Research Journal of India'** is a salute to Professor Ramesh Raskar.

- **Dr. Pavan Mandavkar & Board of Editors**

❖❖❖

# प्राचीन मराठी साहित्यातील संतांचे आत्मनिवेदनपर उद्‌गार

प्रा. नेमीचंद एफ. चव्हाण
मराठी विभाग
सु.ना. कला, विज्ञान व उ.खे. वाणिज्य महाविद्यालय
अकोला, भ्रमणध्वनी ९४२३१३४२६८

मराठीतील आत्मचरित्र किंवा आत्मकथन ह्या वाङ्‌मयप्रकाराने इंग्रजी वाङ्‌मयापासून प्रेरणा घेऊन आपले स्वतंत्र रूप धारण केले असे म्हटल्या जाते; परंतु प्राचीन मराठी साहित्यात किंवा संत वाङ्‌मयात आत्मचरित्र या वाङ्‌मयप्रकाराचे मूलस्रोत मोठ्या प्रमाणात दिसून येते. संत नामदेव, संत जनाबाई, संत चोखामेळा, संत तुकाराम, संत बहिणाबाई, यांचे निवडक अभंग, शिवकाळ आणि पेशवेकाळातील उपलब्ध असलेले पत्रवाङ्‌मय हे सुद्धा आत्मचरित्रात्मक वाङ्‌मयाचे महत्त्वाचे अंग असल्याचे दिसते. प्राचीन काळातील या संतांनी जाणीवपूर्वक आत्मचरित्रे लिहिली नाहीत, प्रसंग विशेषी प्रकट झालेले ते त्रोटक आत्मचरित्रपर उद्‌गार आहेत. संतांच्या या त्रोटक आत्मचरित्रात्मक उद्‌गारांचा या संशोधनपर लेखात आढावा घेण्यात आला आहे.

## लीळाचरित्र 'एकाक'

लीळाचरित्र 'एकाक' हे चरित्र की आत्मचरित्र? याबद्दल मराठी अभ्यासकांमध्ये मतभेद दिसून येते. महानुभाव संप्रदायाचे आद्य प्रवर्तक चक्रधरस्वामी यांनी कोणताही ग्रंथ लिहिलेला नाही. म्हाइंभटरचित लीळाचरित्रातील 'एकाकाचा' अभ्यास केल्यानंतर असे जाणवते की, जणू 'एकाक' म्हणजे चक्रधरांनी मोकळेपणाने सांगितलेले आपले आत्मवृत्तच आहे. चक्रधराच्या आयुष्यातील एकाक भाग म्हणजे गुजराथेतील भरवसचा वृत्तान्त व तेथून अळजपूरच्या मार्गाने रिद्धपूरला आल्यापासून ते प्रतिष्ठान येथे नागांबिकेची भेट होईपर्यंतचा काळ. या काळातील चक्रधरांचे जीवनचरित्र कोणलाच माहीत नव्हते. पुढे त्यांना शिष्यगण लाभल्यानंतर प्रसंगानुरूप त्यांनी ह्या काळातील लीळा आपल्या शिष्यांना सांगितल्या. त्या शिष्यगणांमध्ये म्हाइंभट सुद्धा होते. चक्रधरांच्या चरित्रविषयक लीळा त्यांनीही चक्रधराकडून ऐकलेल्या असतात. शिवाय आपल्या गुरूबंधूकडून त्यांनी जास्तीच्या लीळा संकलित केल्या. एकप्रकारे म्हाइंभटांने चक्रधरस्वामीच्या जीवनवृतान्ताचे शब्दांकन केल्यासारखे आहे. म्हणजेच लीळाचरित्र 'एकाकाचे' स्वरूप हे शब्दांकित आत्मचरित्रासारखेच आहे. म्हणूनच भालचंद्र सोहनी एकाकाला 'हदयस्पर्शी आत्मचरित्र' म्हणतात. तर प्रसिद्ध साहित्यिक राम शेवाळकर म्हणतात — ''लीळाचरित्राचा एकाक हे श्री चक्रधरांचे आत्मचरित्रच झाले आहे. व मराठी आत्मकथेचा बाराव्या शतकातील आरंभ म्हणून त्यांचा आपल्याला अभिमानाने उल्लेख करता येतो.''

## संत ज्ञानेश्वर

संताचे स्फुट प्रासंगिक आत्मचरित्रपर उद्‌गार अभंगातून (पद्यात्मक) व्यक्त झाले आहे. संत ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी), हरिपाठ, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, व अभंगादी रचना अशी असामान्य ग्रंथसंपदा वयाच्या २१ व्या वर्षी निर्माण केली. सामान्यत: साहित्यिकांचे लौकिक जीवन, खाजगी अनुभव, समज—गैरसमज यांचे दर्शन त्यांच्या वाङ्‌मयातून घडत असते; परंतु ज्ञानेश्वर याला अपवाद आहे. अभंग हा काव्यप्रकार खरे तर आत्मनिष्ठ अभिव्यक्तीसाठी संतांनी वापरला आहे. अनेक संतांनी वैयक्तिक जीवनातील असंख्य सुखदु:खाची गाणी अभंगाद्वारे गायिली; परंतु ज्ञानेश्वरांच्या समग्र वाङ्‌मयात त्यांच्या लौकिक जीवनाबद्दल एकही उद्‌गार आपल्याला सापडत नाही. पण त्यांच्या पारलौकिक जीवनाचे सुसंगत आणि स्पष्ट चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. त्यांनी मी, मज, मिया, माझा, माझे, माझीया, आमांते आदी शब्दांद्वारे आत्मभाव व्यक्त केल्याचे दिसते. म्हणूनच ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभावाला गो.वि. करंदीकर 'आध्यात्मिक आत्मचरित्र' म्हणतात.

## संत नामदेव

'समाधी' व 'तीर्थावळी' तील अभंगातून स्वत:च्या जीवनाविषयी बोलणारे संत नामदेव हे पहिले वारकरी संत आहेत. स्वजीवनाविषयी शक्य तेवढे मौन पाळणे ज्या काळात रूढ होते त्या काळात संत नामदेव प्रांजळपणे स्वत:विषयी अभंगातून सांगताना दिसतात.

''शिंपीयाचे कुळी जन्म मज झाला। परि हेतू गुंतला सदाशिवी।।

रात्रीमाजी शिवी दिवसामाजी शिवी। आराणुक जीवी नाही माझ्या।।''

शिंपीयाच्या कुळी जन्म झाल्यामुळे रात्रंदिवस शिवणकाम, त्यातच विठ्ठलाचा नाद, त्यामुळे संसारात दुर्लक्ष, विठ्ठलाच्या भक्तीमुळे कामात लक्ष लागत नाही याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. शिवाय नामदेवांच्या विठठलभक्तीचा आई गोणाईने कठोर शब्दात निषेध केला. आपल्या आईची चीड त्यांनी पुढील प्रमाणे व्यक्त केली आहे –

''गोणाई म्हणे नाम्या सोडी देवपिसे। बरविसी कैसें घर बळे।।
तुजसरिसी लेकरे वर्तताती कैसी। तू मज झालासी कुळक्षम।।''

संत नामदेवाच्या पत्नी राजाईनेसुध्दा नवऱ्याचे विठ्ठलवेड बघून खरडपटटी काढलेली आहे –

''लावोनि लंगोटी झालेती गोसावी। आमुची ठेवाठेवी कोण करी।।
धडची कांटिये घातले हे कैसे। बळेचि आपणां पिसे लावियेले।।
तुमचिये गती लेकरे नेणती। कोण चालविती घराचार।।''

संत नामदेवांनी अशा अनेक अभंगाव्दारे आपली जीवन कहाणी सांगितलेली आहे. म्हणूनच डॉ. शं. गो. तुळपुळे संत नामदेवांना 'मराठी भाषेतील आद्य आत्मचरित्रकार' मानतात. तर ल.रा. नासिराबादकर ''हे अभंग मराठी कवितेतील आत्माविष्काराची पहिली प्रसादचिन्हे आहेत'' असे म्हणतात.

## संत जनाबाई

संत जनाबाईच्या ३४० अभंगाची नोंद नामदेवाच्या गाथेमध्ये आहे. संत जनाबाईच्या निवडक अभंगामधून तिचे जीवनचरित्र आपल्यासमोर उभे राहते. संत नामदेवांच्या घराच्या मंडळीचा सहवास लाभल्यामुळे जनाबाईचे संपूर्ण जीवन बदलून जाते. संत नामदेवांनीच तिला संत पदवीपर्यंत आणून पोहोचवले, याची जाणीव जनाबाईना आहे. म्हणूनच त्या स्वतःची नाममुद्रा 'नामयाची दासी जनी' अशा ठेवतात.

''नामदेवाचे घरी। चौदा जण स्मरती हरी।।
चौघे पूत्र चौघी सुना। नित्य स्मरती नारायणा।।
आणिक माय बाप पाही। नामदेव राजाबाई।।
आऊबाई लेकी निंबाबाई बहिणी। पंधरावी ती दासी जनी।।''

संत नामदेवाच्या घरातील मंडळीसोबत विठ्ठलांच्या भक्तीत दंग झाल्यानंतर जेव्हा पांडुरंगाच्या देवळात जाण्याची वेळ येते तेंव्हा त्या सर्वांना विठ्ठलांच्या पुढयात जागा मिळते, पण हिन यातीचे म्हणून आपल्याला मात्र महाव्दाराच्या पायरीशी थांबविले जाते, याचे तिला दुःख वाटते. याविषयीची खंत आणि उपेक्षेतून येणाऱ्या विषादाचा एक सूर जनाबाईच्या अभंगातून येतो.

''राजाई गोणाई। अखंडित तुझे पायी।।
मज ठेवियले व्दारी। नीच म्हणोनि बाहेरी।।''

म्हणूनच ती संतापाने विठ्ठलाला शिव्या देते.

''अरे विठ्या विठ्या। मूळ मायेच्या कारट्या।।''

विठ्ठलाच्या गळयातील पदक चोरीला जाते, आणि ते जनाबाईनेच चोरले असा तिच्यावर आळ येतो. तेंव्हा बडवे तिला मारहाण करतात. आणि ''अगे शिंपयाचे जनी। नेले पदक दे आणुनि।'' अशी अवहेलना करतात. यातून तिच्या उपेक्षित जीवनाचे दर्शन घडते. शिवाय जनाबाई नामदेवांकडे जी घरकामे करीत, जसे – झाटलोट, शेण आणने, गोवऱ्या थापणे, सडा सारवण करणे वै. हया साऱ्या अंगणातील कामावरून तत्कालीन काळातील मोलकरणीचे, दासीचे स्थान कसे उपेक्षित होते, हेच स्पष्ट होते. संत जनाबाईला उपेक्षेचे, हीनतेचे जे जीवन जगावे लागले याची माहिती त्यांच्या आत्मचरित्रात्मक अभंगातून दिसते.

## संत चोखामेळा

संत चोखोबानी विठ्ठलवर्णन, पंढरीवर्णनाशिवाय, संत नामदेव, संत जनाबाई, संत ज्ञानेश्वरांवर काही अभंग रचले आहेत; परंतु चोखोबांच्या व्यक्तिमत्त्वाचे खरेखुरे दर्शन घडते ते त्यांनी सामाजिक उपेक्षेचे दुःख ज्या अभंगातून मांडले आहे त्यातून. वैयक्तिक जीवनासोबतच त्यांच्या अभंगातून सामाजिक जीवनावर प्रकाश पडतो म्हणूनच त्यांचे आत्मचरित्रपर अभंग उत्कट होताना दिसतात. त्यांच्या या आत्मनिष्ठपर अभंगातून एक प्रकारे त्या काळातील असंख्य उपेक्षितांची मनोव्यथाच व्यक्त होताना दिसते.

कृष्णनिंदा घडली म्हणून हीन जातीत जन्म लाभला असे चोखोबांना वाटते. हीन जातीत जन्मल्यामुळे त्या काळातील जातीव्यवस्थेमुळे अस्पृश्यतेचे चटके सोसावे लागले यांची खंत त्यांना आहे. ''दूर दूर हो जा अवघे म्हणती'' किंवा ''एका न मिळे कोरान्न मागतांचि'' असे ते म्हणतात. सभोवताली चोर, व्यभिचारी, दुर्व्यसनी, भ्रष्ट दुवर्तनी, मांसाहारी लोकांचा संग असल्यामुळे ''म्हणोनि शीण त्याचा होत आहे'' असे चोखोबांना वाटते.

पांडुरंगाने प्रत्यक्ष दर्शन दिल्यानंतर स्वत:च्या कंठातील वैजयंती माळ चोखोबाच्या गळ्यात विठ्ठलानी घातली. तो हार बघून बडव्याने ''विठोबाचा हार तुझ्याकंठी कसा आला?'' असा चोरीचा आळ घालून बेदम मारहाण केली. हे सर्व घटनाप्रसंग त्यांच्या अभंगात चित्रित झालेले आहे.

## संत कर्ममेळा

संत कर्ममेळा हा संत चोखामेळा व संत सोयराबाईचा एकुलता एक मुलगा. कर्ममेळा यांच्या अभंगाची संख्या फार कमी असल्यामुळे त्यांचे लौकिक अनुभव पूर्णपणे येत नाही; परंतु जातिभेदाबद्दलचे त्यांचे विचार, त्याविषयीचा त्याने दाखवलेला बंडखोरपणा यामुळे त्यांच्या अभंगातून दलित साहित्याचे लक्षण सर्वप्रथम आढळते, ''जन्म गेले उष्टे खाता। लाज न ये तुमचे चित्ता।।'' कर्ममेळ्याला आपल्या जातीच्या अस्पृश्यतेची चांगली जाणीव आहे. म्हणूनच ते रागाने विठ्ठलाला ''कासया जन्म दिला मला। म्हणे चोखियाचा कर्ममेळा।।'' असा प्रश्न करतात. अन्यायाने पिचून न जाता खवळून उठलेला कर्ममेळा प्रत्यक्ष विठ्ठलास प्रश्न करतो आणि प्रचलित रुढी विरुद्ध तक्रार किंवा खंत बाळगण्याऐवजी तो थेट विठ्ठलाला 'तुला लाज कशी वाटत नाही' अशी फिर्याद नोंदवतो, व मला जन्म का दिला? असे दु:ख तो उद्वेगातून प्रकट करतो.

## संत तुकाराम

संत तुकारामांच्या सबंध गाथेलाच आत्मानुभव आणि आत्मोद्धाराचे भावोत्कट रूप प्राप्त झाले आहे. त्यांच्या लौकिक आणि पारलौकिक जीवनाची कहाणी आपल्याला त्यांच्या गाथेत मोठ्या प्रमाणात आढळते. बाबाजी चैतन्यांचा गुरूपदेश, गुरूमंत्र, गुरूपरंपरा, यातिहीनता, यातीचा अभिमान, संसारातील संघर्ष, आई–वडील, पत्नी, भाऊ, मुलं याबद्दलची मते, दुष्काळ, सगेसोयऱ्यांची वर्तणूक, यातना, असहायता, व्यवसायातील हानी, कवित्वस्फूर्ती, साधकावस्था, सिद्धावस्था, मनाची तगमग, व्याकुळता, अधिरता, आत्मघाताचा विचार, गावातील वेदाभिमान्याकडून होणारा छळ, जलदिव्य, छ. शिवाजी सोबतचे संबंध, एकांतवासातील ध्यानधारणा अशा अनेक लौकिक आणि पारलौकिक अनुभवांचा अविष्कार त्यांनी अभंगातून केलेला आहे. तुकोबांच्या अभंगगाथेत सर्वत्र 'तुका म्हणे' ही आत्ममुद्रा आपल्याला दिसते. ही आत्ममुद्राच त्यांच्या अभंगाना आत्मचरित्राचे रूप प्रदान करते. म्हणूनच तुकोबांची अभंगगाथा ही मराठी वाङ्मयातील पहिले सुसूत्र व स्वलिखित आत्मचरित्र ठरते.

तुकोबांचे काही निवडक आत्मचरित्रपर अभंग पुढीलप्रमाणे –

१) ''संवसारे जालो अतिदु:खे दु:खी। माय बापे सेखी क्रमिलिया।।
दुष्काळ आटिले द्रव्य नेला मान। स्त्री एकी अन्न अन्न करिता मेली।।
२) ''पंढरीची वारी आहे माझे घरी। आणिक न करी तीर्थव्रत।।''
३) ''आता काय खावे कोणीकडे जावे। गावात रहावे कोण्या बळे।।''
४) सोईरे धाईरे दिल्या घेतल्याचे। अंत हे काळीचे नाही कोणी।।
सख्या गोत्रबहिणी सुखाचे संगती। मोकलुनी देती अंतकाळी।।''
५) ''कर्कशेसंगती। दु:ख उदंड फजिती।।''
६) ''काय देह घालूं करवती कर्मरी। टाकूया भितरी अग्नीमाजी।।''
७) ''माझे लेखी देव मेला। असो त्याला असेल।।''
८) ''करिसी की न करिसी माझा अंगिकार। हा मज विचार पडिला देवा।।''
९) बहुता दिसांची आजि झाली भेटी। झाली होती तुटी काळगती।।''

जिवंत आत्मनिवेदन करणारे असे शेकडो अभंग तुकोबांच्या अभंगगाथेमध्ये विखुरलेले आपल्याला दिसेल.

## संत बहिणाबाई

संत बहिणाबाईच्या आत्मचरित्राला प्राचीन मराठीतील आत्मचरित्रपर वाङ्मयात विशेष असे स्थान आहे. बहिणाबाईचा जन्म शके १५५१ चा आहे. त्या ७१ वर्ष जगल्या; परंतु त्यांनी आपली आत्मकथा १८–१९ वर्षापर्यंत म्हणजेच तुकोबांचे दर्शन होईपर्यंतच सांगितली आहे. बहिणाबाईनी आपले हे आत्मनिवेदन अत्यंत

सहज, सरळ आणि प्रांजळभाषेत केलेले असून ''देवगांव माझे माहेर साजणी'' अशी एखाद्या सखीशी हितगूज करावी, त्याप्रमाणे आपली अद्‌भुत जीवनकहाणी मोकळ्या मनाने सांगितलेली आहे. बहिणाबाई तीन वर्षाच्या असतानाच एका प्रौढ कर्मठ बिजवराशी तिचे लग्न होते. आपल्या पतीचा परिचय करून देताना त्या म्हणतात – ''द्वितीय संबंधी वरूषा तिसाचा। नोवरा भाग्याचा ज्ञानवंत।।'' लग्नानंतर चारच वर्षांनी तिच्या पित्यावर गंडातर येते आणि त्यातून सुटण्यासाठी जावयांच्या सूचनेने परागंदा होण्याची पाळी येते. सासर–माहेर पाठीशी घेऊन ही आठ वर्षाची मुलगी घराबाहेर पडते. भिक्षा मागत मागत प्रवरासंगम – शिखर शिंगणापूर – पंढरपूर अशी भटकंती करत ही मंडळी कोल्हापूरला येतात. कोल्हापूरला जयरामस्वामींनी तिच्या मस्तकी वरदहस्त ठेवला. परपुरूषाने स्पर्श केला म्हणून बहिणाबाईचे पती तिच्यावर संतापतात. पुढे जयराम स्वामींमुळेच तुकोबाच्या दर्शनाची ओढ बहिणाबाईना लागते. परंतु तुकारामासारख्या शूद्राला गुरू करावे हे बहिणाबाईच्या नवऱ्याला आवडत नाही. 'गोसाविण' म्हणून बहिणाबाईला समाजात मान मिळत असल्यामुळे नवऱ्याचा अहमपणा दुखावतो. त्यामुळे ''न पाहे मी मुख सर्वथा इयेचे। हीनत्व आमुचे कोण फेडी।।'' असे म्हणत तीन महिन्याची गर्भवती असलेल्या बहिणाबाईला सोडण्याचा विचार करतात. पुढे नवऱ्याला व्याधीने ग्रासले असताना ''भ्रताराची सेवा तो चि आम्हा देव। भ्रतार स्वयंमेव परब्रह्म।।'' मानून बहिणाबाई नवऱ्याची निष्ठेने सेवा करतात. पत्नीच्या सेवाभावामुळे नवऱ्याला पश्चाताप होऊन मनपरिवर्तन होते आणि तेच स्वत: बहिणाबाईला तुकोबांच्या दर्शनासाठी घेऊन जातात. संत तुकारामांच्या दर्शनाने ''आनंदली सृष्टी अंतरंग'' अशी स्थिती बहिणाबाई अनुभवतात. अशाप्रकारे आपल्या अंतरीचा ज्ञानदिवा मालवू न देता वयाच्या १८ व्या वर्षी तुकोबासारख्या महामानवाच्या कृपेला पात्र होऊन आपले जीवन सफल बनवितात.

## कचेश्वरांची 'आदि'

कचेश्वर ब्रह्मे हे बहिणाबाईप्रमाणेच तुकोबांचे शिष्य परंतु त्यांना तुकोबांचा बोध अप्रत्यक्षरीत्या प्राप्त झाला होता. त्यांचा जन्म इ.स. १६४० नंतर झालेला असल्यामुळे तुकोबांच्या निर्वाणावेळी ते दहा वर्षाचे होते. चाकणच्या सुप्रसिद्ध ब्रह्मे घरण्यात त्याचा जन्म झाला. कचेश्वरांनी आपली धावती आत्मकहाणी १११ ओव्यांच्या 'आदि' मध्ये ग्रंथित केलेली आहे. 'आदि' म्हणजे पूर्ववृत्त. कचेश्वरांचे हे 'आदि' नामक आत्मवृत्त त्यांच्या जीवनाचा प्रारंभकाळ व्यापणारे आहे. आपल्यातील दुर्गुणांबद्दल बरीचशी माहिती त्यांनी सांगितली आहे. काम, क्रोध, लोभ यांसारख्या मानवी विकारांनी ग्रासलेले मन, ईश्वराविषयी असलेली अनास्था, ब्राह्मणांना छळणे यांसारखे अवगुण त्यांनी प्रांजळपणे कबुल केले आहे. लहापणापासूनच असलेले भगवद् भक्तीचे वेड, पण वैदिक असलेल्या वडिलांचा विरोध, कर्मठ ब्राह्मणांची बहिष्कृत करण्याची धमकी, पुढे स्वप्नांत तुकोबांचे दर्शन व काव्यस्फूर्ती अशी आत्मचरित्रात्मक माहिती विस्तृत प्रमाणात 'आदि' मध्ये आलेली आहे म्हणूनच अ. ना. देशपांडे म्हणतात – ''वाङ्‌मयाच्या दृष्टीने कचेश्वरांचे १११ ओवीचे आत्मचरित्र अतिशय गोड असून ते तत्कालीन सामाजिक व धार्मिक स्थितीवर उत्तम प्रकाश टाकणारे आहे''

अशाप्रकारे प्राचीन मराठी साहित्यात 'आत्मचरित्र' या वाङ्‌मयप्रकाराचे मूलस्रोत मोठ्या प्रमाणात दिसून येते. 'आत्मविष्कार' करणे हे साहित्याचे प्रयोजन या संताचे नव्हते. केवळ प्रसंगविशेषी प्रकट झालेले ते त्रोटक आत्मचरित्रपर उद्‌गार आहेत. तरीही ह्या त्रोटक आत्मचरित्रपर उद्‌गारातून त्या त्या संतांची जीवनकहाणी त्यांचे सामाजिक जीवन यांच्यावर प्रकाश पडलेला आहे.

## संदर्भ ग्रंथ


१) 'निवडक मराठी आत्मकथा' – संपा. राम शेवाळकर, साहित्य अकादमी, दिल्ली, प्र. आ. १९९४.

२) 'संताच्या आत्मकथा' – रा. चि. ढेरे, पुष्पक प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९८९.

३) 'प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास' – भाग पाचवा – अ. ना. देशपांडे, व्हिनस प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९२.

४) 'तुकाराम : व्यक्तित्व आणि कवित्व' – डॉ. किशोर सानप, प्रा. मनोज तायडे, लोकवाङ्‌मय गृह, मुंबई, पाचवी आवृत्ती जुलै २००४.


❖❖❖

# आधुनिक मुस्लिम मराठी कविता

**प्रा.डॉ. शामराव गायकवाड**
पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
पिंपरी, पुणे 18 भ्रमणध्वनी 9922554861

मुस्लिम मराठी काव्याचा इतिहास मुस्लिम संतांच्या रचनेपासून सांगता येईल. परंतु आधुनिक मुस्लिम मराठी साहित्याचे भावविश्व वेगवेगळ्या प्रेरणेने प्रेरीत झालेले आहेत. त्यामुळे जाणिवेच्या कक्षा भिन्न स्वरूपाच्या आहेत. मुस्लिम कवींनी रचलेले साहित्य हा निकष लावल्यानंतर मात्र हा इतिहास पूर्वीपासून सांगता येईल. शाहिरी वाङ्मयात अजूनही लेखन होत आहे. आजच्या आधुनिक कालखंडात शाहिरी लेखन करणाऱ्या खानदेशातील दादू पिंजारी, इंचलकरंजीचे गुलाब नदाफ, सोलापूरचे बापू पटेल, अमीन शेख, शेख जैनूचाँद, बी.के. मोमीन, रमजान बागणीकर इत्यादी शाहिरांची नावे सांगता येतील.

1980 नंतर वेगळ्या जाणिवेने प्रवाहीत झालेल्या आधुनिक मुस्लिम मराठी साहित्यातील कथा, कादंबरी, कविता, नाटक, आत्मचरित्र, वैचारिक लेखन, ललित लेखन इत्यादी वाङ्मय प्रकारातून लेखन होत आहे. या सर्व वाङ्मय प्रकारात सगळ्यात जास्त लेखन कविता वाङ्मयाचे होत आहे. कविता या साहित्य प्रकाराचा विशेष म्हणजे सहज, उत्फूर्त असा हा प्रकार आहे. कमी वेळात व कमीत कमी शब्दात व्यापक आशयविश्व कवेत घेण्याची क्षमता या साहित्य प्रकारात असते. म्हणून 1980 नंतर भावनिक कोंडमारा व्यक्त करण्यासाठी मुस्लिम मराठी लेखकांनी या साहित्य प्रकाराचा जास्तीत जास्त वापर केल्याचे दिसून येईल. अवघ्या वीस पंचवीस वर्षाच्या काळात महाराष्ट्रातील मुस्लिम मराठी कवींची संख्या 80 पर्यंत गेलेली आहे.[1] या साहित्याचे वर्गीकरण प्रा.फक्रुद्दिन बेन्नूर यांनी तीन प्रकारे केलेले आहे. 1. मराठी गझल 2. मुक्त छंद 3. अनुकरणात्मक काव्य या प्रकारातून प्रामुख्याने मुस्लिम कवींनी लेखन केलेले आहे. या सर्व कवींनी लिहिलेल्या काव्यसंग्रहांची नावे व स्वरूप खालील प्रमाणे आहे.

1950 नंतर शाहीर अमर शेख यांनी 'अमरगीत', 'कलश', 'धरतीमाता', 'उंचतान उंच माथा' इत्यादी गीतसंग्रह व काव्यसंग्रह प्रकाशित केले आहे. त्यांच्या कवितेवर कम्युनिस्ट विचारसरणीचा पगडा आहे. सामाजिक अन्यायाविषयी चीड, दलितांचा कैवार व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील महत्त्वाचे योगदान इत्यादी त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये आहेत. कोकणातील गझलकार व कवी बद्दिउज्जमान खावर यांचे 'गझलात रंग माझा' व 'हा छंद गझलांचा' इत्यादी दोन गझलसंग्रह प्रसिद्ध आहेत. सामाजिक व सांस्कृतिक वास्तवाचे भान त्यांच्या गझलांमधून दिसून येते. तंत्राच्या दृष्टीने त्याच्या गझला शास्त्रशुद्ध आहेत.

त्याचबरोबर ए.के. शेख, इलाही जमादार, मुबारक शेख इत्यादी आघाडीच्या गझलकारांची नावे याबाबतीत उल्लेख करणे आवश्यक आहे. ए.के. शेख यांचे आतापर्यंत 'ओंजळ', 'जुलूस माझा', 'मोरपीस' व 'गुलदस्ता'(संपा.) इत्यादी काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. रोजच्या धावपळीच्या जगण्यातील सुखदुःखाचे चिंतन शेख यांच्या कवितेतून आले आहे. त्यांच्या कवितेतून व गझलांतून गेयतेला महत्त्वाचे स्थान आहे. गझलांबद्दल त्यांना राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झालेला आहे. कवी इलाही जमादार यांच्या गझला 1990 च्या दशकातील मुस्लिम समाजजीवनातील कोंडीचा सुंदर अविष्कार करतात. 'हुंदका, माझा तसा बंदिस्त आहे, आसवांना लाभलेली शिस्त आहे.' अशा या गझलांतून सामाजिक आशयाच्या जाणिवा स्पष्ट होतात. कवी इलाही जमादार यांनी आतापर्यंत 'जखमा अशा सुगंधी', 'भावनांची वादळे', 'वाटसरू', 'दोहे इलाईचे' इत्यादी काव्यसंग्रह व गझलसंग्रह प्रसिद्ध केले आहेत. इलाही जमादार यांनी मराठी गझलांमध्ये स्वतःचा वेगळा ठसा उमटविला आहे. या काळातील महत्त्वाचे गझलकार म्हणजे सोलापूरचे मुबारक शेख होय. मुबारक शेख यांनी 'पायरव', 'सत्यमेव जयते' इत्यादी काव्यसंग्रह 'काट्यांचे ऋण' गझलसंग्रह व 'टिल्लूपिल्लू' हा बालकवितासग्रह इत्यादी साहित्य प्रकाशित केले आहे. सामाजिक वास्तवाचे भान त्यांच्या कवितेतून व गझलांतून दिसून येते. डॉ. आंबेडकर व हमीद दलवाई यांच्या विचारांची

पकड त्यांच्या साहित्यातून स्पष्ट होते. मुस्लिम जाणिवेतून लेखन करीत असतानाही तटस्थपणे सामाजिक व राजकीय जीवनावर मुबारक शेख यांनी कवितेतून भाष्य केले आहे.

गझल व कविता या दोनही प्रकारांच्या बाबतीत डॉ. अजीज नदाफ यांचे कार्य महत्त्वाचे आहे. डॉ. नदाफ यांनी 'वेदना', 'हा छंद गझलांचा', 'मानवी गीत', 'छत्रपती' इत्यादी कविता व गझलसंग्रह प्रकाशित करून इतर साहित्य प्रकारांबरोबरच याही क्षेत्रात महत्त्वाची भर टाकली आहे. 'वेदना' या काव्यसंग्रहातून मुस्लिम समाज जीवनाचे चित्रण दिसून येत नाही. परंतु सामाजिक जाणिवेचा स्पर्श त्यांच्या कवितांना आहे. दलित जीवनाच्या वेदना त्यातून स्पष्ट झाल्या आहेत. 'मानवी' हे त्यांचे खंडकाव्य आहे.

मनमाडचे कवी खलील मोमीन यांचे 'निरालय' व 'अक्षराई' इत्यादी दोन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'निरालय' या काव्यसंग्रहातून बुद्धिप्रामाण्यवादी व तर्कशुध्द मांडणी मोमीन यांनी केली आहे. कोणत्याही एका धर्मात न अडकता माणसाची वेदना नसणारे धर्मग्रंथ हवेतच कशाला असा त्यांना प्रश्न पडतो. कवी खालील मोमीन यांच्या कवितेविषयी डॉ. प्रेमला अल्लडवाड लिहितात, ''मुस्लिम मराठी कविता या वास्तवनिष्ठ असल्या तरी काही प्रमाणात का होईना रोमॅंटिसिझम वेगवेगळ्या स्वरूपात आविष्कृत होताना दिसतो. खलील मोमीन सारखे कवी निसर्ग आणि प्रेम यांच्या विषयी अत्यंत हळूवार भावनांच्या उत्कट कविता लिहितात. या कवितांचे नाते बोरकर, ग्रेस, आरती प्रभू यांच्या कवितांशी असल्याचे दिसते.'' कवी मोमीन यांच्या कवितेवर बोरकर, ग्रेस, आरती प्रभू यांचा प्रभाव आहे असे डॉ. अल्लडवाड यांनी म्हटले आहे. तर खलील मोमीन यांच्या विषयी प्रा. रामलीला पवार लिहितात, ''खलील मोमीन यांचे निरालय (1982) व अक्षराई (1994) हे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. खलील मोमीन हे सौंदर्यवादी कवी आहेत. कवितेची निर्मिती प्रक्रिया त्यांनी आपल्या कवितेतून उलगडून दाखविली आहे. कवीची निर्मिती पूर्वीची भावावस्था निर्मितीच्या प्रक्रियेशी निगडित असते. कवी काव्यनिर्मितीच्या वेळी अनुभवाशी तादाम्य पावतो.........''[3] खलील मोमीन हे असे प्रयोगशील कवी आहेत. त्यांच्या 'अक्षराई' मधील कविता स्वतःच्या वेगळ्याच मुक्तछंदात्मक शैलीतून मांडलेल्या आहेत. मानवी अस्तितत्त्वाच्या अस्वस्थतेतून त्यांच्या कविता साकार झालेल्या आहेत.

मलिका अमर शेख यांच्या 'वाळूचा प्रियकर', 'महानगर', देहऋतू', 'माणूसपणाचं भिंग बदलल्यावर', इत्यादी कवितासंग्रह प्रकाशित आहेत. स्त्रीच्या आत्मभानाचे चित्रण त्यांच्या कवितेतून व्यक्त झालेले आहे. या संग्रहातील कवितांचे सुद्धा सांगता येईल. प्रा.डॉ. नसीम पठाण यांच्या 'गोंदण' या काव्यसंग्रहातील कविता हळुवार अशा भावविश्वाचे दर्शन घडवितात.

प्रा.फ.म. शहाजिंदे हे मुस्लिम मराठी साहित्यातील महत्त्वाचे नाव आहे. फ.म. शहाजिंदे यांचे 'निधर्मी', 'आदम', 'ग्वाही', 'शेतकरी', 'मराठवाड्यातील कविता' (संपा.) इत्यादी काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. 'निधर्मी' या काव्यसंग्रहातील कविता भोगलेल्या मनाच्या वेदना उपरोधिकपणे व्यक्त होतात. समाजवास्तवाचे आत्मचिंतन त्यांच्या काव्यातून पाहायला मिळते. वास्तवजीवनातील अनेक दाहक चटके सहन करूनही त्यांच्या कवितेतील मन सामाजिक बांधिलकीपासून लांब जात नाही. प्रा. फकरूद्दीन बेन्नूर हे प्रा. शहाजिंदे यांच्याविषयी लिहितात, ''उलट शहाजिंदे हे पूर्णपणे 'मराठी मुसलमान' असून त्यांचा धर्म, ईदची नमाज आणि खुदब्यापुरताच असून ते सर्वार्थाने ग्रामीण मराठवाड्याचा अंश आहेत. ते पूर्णपणे मराठी असताना केवळ त्यांचा धर्म इस्लाम आहे. म्हणून त्यांच्याकडे जे सतत संशयाने आणि उपेक्षेने पाहिले गेले त्या सर्व घटकांच्या संकलित परिणामातून त्यांची कविता उभी राहिली आहे.''[4] यावरून शहाजिंदे यांचे त्या परिघाशी व कवितेशी असलेले एकरूपत्त्व लक्षात येते.

'आदम' मधील कवितांमधून संयमी आणि सामंजस अशा भूमिकेतून धार्मिक प्रश्न सोडवता येतो. अशा स्वरूपाचे आशयसूत्र सुरुवातीच्या कवितांतून पाहायला मिळते. यामध्ये अनेक विषय कवींनी हाताळलेले आहे. 'ग्वाही' या काव्यसंग्रहात सामाजिक आशयाच्या कवितांचा समावेश आहे. 'शेतकरी' या काव्यसंग्रहात मराठवाडी बोलीतील मुक्त काव्याचा नमुना पाहायला मिळतो. 'मराठवाड्यातील कविता' हा संपादित काव्यसंग्रह आहे. फ.म. शहाजिंदे यांच्या कवितेविषयी प्रा. रामलीला पवार लिहितात, ''मुस्लिम मराठी साहित्याचे पीतामह म्हणून ओळखले जाणारे फ.म. शहाजिंदे यांचे ....... हे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. फ.म. शहाजिंदे दुःख ही कवितेतून

समर्थपणे व्यक्त केले आहे. त्यानी आपल्या अस्तित्वालाच आव्हान देणारी कविता लिहिली आहे. समाजात जात महत्त्वाची आहे. जातीची, धर्माची चौकशी अनेक ठिकाणी होत राहते, सामाजिक सलोख्याचे संबंध जातीधर्मापलिकडे जात नाहीत. याचा प्रत्यय शहाजिंदे यांच्या कवितेतून येतो...... ........''[5] समाजातील धर्म व जातीच्या चौकटीतील मानसिकतेवर फ.म. शहाजिंदे यांनी आपल्या कवितेतून समर्थमणे भाष्य केले आहे.

'अजान', 'कुंपणातील हुंदके', 'मुसलमन' इत्यादी काव्यसंग्रह लिहून मुस्लिम मराठी काव्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे न्या. एहतेश्याम देशमुख यांचे नाव महत्त्वाचे आहे. 'अजान' या काव्यसंग्रहातून मुस्लिमांच्या वेदना न्या. देशमुख यांनी परखडपणे मांडली आहे. त्यांतील कविता तलाक पीडित मुस्लिम स्त्रियांच्या वेदनांना व्यासपीठ मिळवून देतात. त्यांच्या कवितेचे विश्लेषण करताना प्रा. रामलीला पवार लिहितात, ''एहतेशाम यांचे 'अजान' ......... असे तीन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. मुस्लिमांच्या समाजातील व्यथा–वेदना, अवहेलना, चीड, दुःख यांचे चित्रण ही कविता करते. समाजात घडणाऱ्या दंगली असो की आतंकवादी हल्ले मुस्लिमांना जबाबदार धरले जाते. त्यामुळे कवीला 'मुसलमान' हा बदनाम झालाय असे वाटते. भारताच्या फाळणीला मुस्लिमांना जबाबदार धरले जाते ही खंतही कवी व्यक्त करतो. ...... ''[6] 'कुंपणातील हुंदके' व 'मुसलमान' इत्यादी काव्यसंग्रहातून हिंदू मुस्लिमांच्या गैरसमजातून निर्माण झालेले प्रश्न, मुस्लिम समाजावरील हिंदूंचा गद्दारीचा कलंक, जातीय दंगली, सामाजिक, धार्मिक अशा चिंतनसूत्रातून त्यांच्या कविता साकार झालेल्या आहेत. परंतु त्यांच्या या विचारसूत्राला भावनिकतेचा स्पर्श असल्याने काही कवितांच्या बाबतीत तटस्थता दिसून येत नाही.

विदर्भातील मुस्लिम कवी जावेद कुरेशी यांच्या कविता वास्तव जीवनाचा वेध घेणाऱ्या आहेत. त्यांच्या 'बएत' व 'मुहाजिर' या काव्यसंग्रहातून त्यांच्या क्रांतिकारी विचारांची जाणीव होते. जावेद कुरेशी यांच्या कवितेविषयी श्री फारूक मदारी लिहितात, ''जावेद कुरेशी यांच्या कवितेने मनाची व्यथाच आपल्या कवितेतून विद्रोहात्मकरितीने मांडल्या आहेत. त्यांच्या बएत, मुहाजिर, हे गांधी कश्यातच राम नाही या कवितासंग्रहांनी मराठी मुस्लिम माणसांच्या व्यथाच मांडल्या आहेत. कवीची आपल्या कवितेतून मुस्लिम माणसांचे दारिद्रय, उपरेपणा, घूसमट, संवेदनाहीन माणूस, बेरोजगारी, दंगलीतून उद्ध्वस्त होणारी घरटे, बाबरी मज्जिदीवर समर्पक भाष्य इत्यादी अंगाने त्यांची कविता बहरते. त्यांच्या कवितेनी एक वेगळीच प्रतिमा सृष्टी अविष्कृत केली आहे. त्यांच्या प्रत्येक शब्दातून माणूस व त्याला छळणारी माणसे यावरच ते वास्तवरूपी कविता लिहितात. मुस्लिम दख्खनी भाषेचा वापर ते चपखलपणे करतात. त्यांच्या कविता फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा चालविते असे वाटते. त्यांच्या कवितेने मुस्लिम मराठी कवितेचे दालन समृध्द केले आहे.''[7] जावेद कुरेशी यांच्या 'बएत' या कवितासंग्रहामध्ये तळागाळातील मुस्लिम समाजाचे प्रश्न त्यांनी मांडलेले आहे. आंबेडकरी प्रेरणा त्यांच्या काव्यातून व्यक्त झालेली आहे.

त्याचप्रमाणे सय्यद अल्लाउद्दिन यांनी जात, धर्म, राष्ट्रीय एकात्मता, मानवी जीवनातील उदात्तता इत्यादी घटकांचा सामाजिक जाणिवेतून मांडणी कवितेतून केली आहे. 'झिंदाबाद–मुर्दाबाद', 'जमावबंदी' या नावावरून त्यांची सामाजिक कक्षा लक्षात येईल. सय्यद अल्लाउद्दिन यांनी हिंदू मुस्लिम दंगलीवरील भाष्य त्यांच्या कवितेतून केले आहे. अल्लाउद्दिन यांची कविता गरीबीचे दुःख मांडणारी व दशकांतील जातीयवादी संघर्षाचा विद्रोही भूमिकेतून समाचार घेणारी आहे.

आपल्या कवितेतून सामाजिक व्यथा–वेदना मांडणारे मराठवाड्यातील कवी डी.के. शेख यांनी 'प्रेमायण', 'प्रेमाटिका', 'पागल पोरांच्या भंकस कविता' 'काळीजकळ' इत्यादी कवितासंग्रह प्रकाशित केले आहेत. 'प्रेमायण' व 'प्रेमाटिका' या काव्यसंग्रहातील कविता प्रेमविषयक आहेत. तर 'पागल पोरांच्या भंकस कविता' या संग्रहातील कविता दलित कवितांच्या अनुकरणातून आलेल्या आहेत. त्यात प्रामुख्याने शिक्षण व सामाजिक उद्वेगाच्या कविता आहेत. तसेच मुबारक चंदुलाल तांबोळी यांच्या 'माझ्या गावची वेस', 'मला भावलेले तुकोबा', 'अवास्तव', इत्यादी काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत.

नागपूरच्या लेखिका डॉ. जुल्फी शेख यांच्या 'अक्षरवेध' व 'मी कोण?' इत्यादी काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. पाकिस्तान फाळणीचे खापर येथे राहिलेल्या गरीब मुस्लिमांवर फोडली जाते.

त्यामुळे त्यांच्या देशाप्रती असलेल्या एकनिष्ठतेविषयी संशय घेतला जातो व त्यांचे अस्तित्वही नाकारले जाते. याविषयी डॉ. जुल्फी शेख यांनी आपल्या कवितेतून भाष्य केले आहे. डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांनी 'धुयमाती', 'ऊठ आता गणपत', 'मिर्झा एक्स्प्रेस', इत्यादी कवितासंग्रह प्रकाशित केलेले आहेत. 'धुयमाती' मधील कविता हिंदू–मुस्लिम यांचा शोध घेणाऱ्या आहेत. 'ऊठ आता गणपत' या काव्यसंग्रहातील कविता शेतकऱ्यांच्या व्यथा–वेदना मांडणाऱ्या आहेत. तर 'मिर्झा एक्स्प्रेस' मध्ये हिंदू–मुस्लिम ऐक्य व देशप्रेमविषयक कविता इत्यादी आहेत. समाजप्रबोधनाच्या दृष्टीने या कविता महत्त्वाच्या आहेत. डॉ. रब्बानी शेख यांचे 'चाहूल' या नावाचे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे.

मुस्लिम महार' या आत्मकथनाचे लेखक इब्राहीम खान यांनी 'अस्तित्वरेषा', 'प्रस्फोट', 'युध्दखोरी', 'बहिणीच्या कविता' इत्यादी काव्यसंग्रह प्रसिद्ध केले आहेत. 'युद्धखोरी' या संग्रहामध्ये बुद्ध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व इस्लाम यांतील समतेतील समन्वय शोधण्याचा प्रयत्न केला आहे. 'प्रस्फोट', 'अस्तित्वरेषा', 'बहिणीच्या कविता' इत्यादीतून सामाजिक आशय मांडणाऱ्या आहेत. त्यांच्या कवितेवर दलित कविता व आंबेडकरी प्रेरणांचा प्रभाव दिसतो. शब्बीर मुलाणी यांच्या 'चावडी' व शब्बीर शेख यांच्या काव्यसंग्रहातील कविता सामाजिक जीवनाचा वेध घेणाऱ्या आहेत.

शिराज मुजावर यांचे 'पूर्णविराम' व 'संदर्भ' असे दोन काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. त्यांच्या या संग्रहातील सर्वसामान्यांच्या सामाजिक कविता आहेत. तर इकबाल मुकादम यांचे 'माझेगाव' व 'माणसातला माणूस' इत्यादी काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. या काव्यसंग्रहातून सामाजिक आशय असलेल्या कविता आहेत. सय्यद अहमद सय्यद चाँद यांचा 'का पेटलीत आता' या संगहातील कविता विद्रोहाच्या मार्गाने जाणाऱ्या आहेत. कवी बादशहा सय्यद यांच्या 'सुचल्या' या काव्यसंग्रहावर फुले आंबेडकरी साहित्याची छाप पडलेली आहे. उज्ज्वला कुरेशी (तुपसुंदरे) यांचे 'ब्रेन' हे स्वतंत्र व 'मुस्लिम मराठी कविता' हे संपादित, इत्यादी काव्यसंग्रह प्रकाशित आहेत.

इतबारखा पठाण यांनी 'तहान' या काव्यसंग्रहाच्या रूपाने मुस्लिम मराठी काव्यात महत्त्वाची भर घातली आहे. या संग्रहात त्यांनी निरनिराळे विषय हाताळलेले आहेत. मुस्लिम जीवनाचा ओसरता स्पर्श त्यांच्या काव्यातून दिसतो. मुंबईचे जहीर शेख यांचे 'नार्सिसस' हे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. सौ. रजिया सुलताना मोबीन अहमद यांचे 'प्रतिती', 'चांदण्याचे गुपीत' इत्यादी बालकाव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. बालकाव्यांच्या बाबतीत आणखी काही नावे सांगता येतील. प्रा. मुमताज रहिमतपुरे यांचा 'परीच्या राज्यात' शेख अय्युब यांचे 'गुड्डी', 'सास्तूर एक्स्प्रेस' व बाबा महमद अत्तार यांचे बालकाव्यसंग्रह इत्यादी लेखन बालकाव्याचे लेखन करीत आहेत. बालकाव्यसंग्रहाबरोबरच शेख अय्युब यांनी 'वरदान' व 'व्यसनमुक्ती' इत्यादी काव्यसंग्रहही प्रकाशित केले आहेत.

प्राचार्य डॉ.एस.एन. पठाण यांनी 'यामिनी', 'प्रलय' इत्यादी काव्यसंग्रह प्रकाशित केले आहेत. पटेल सय्यद जब्बार यांचे 'एकात्मता' हे काव्यसंग्रह व 'काव्यसाधना' या संग्रहात काही कवितांचा समावेश आहे. सौ. एच.ए. शेख यांचे 'रे मुशाफिरा', रफिक काझी यांचे 'अनामिका', मुजफ्फर सय्यद यांचा 'संदेश' मोहम्मद शकील जाफरी यांचे 'काव्यसंग्रह' महमद युसूफ सारंग यांचे 'विखुरलेले शब्द' व 'उजेडाच्या स्वागतासाठी बशीर बागवान यांचे 'सलाम अलैकम', अमन तांबोळी यांचे 'मृदगंध', बशीर अहमद याचे 'कोसला', शफी बोल्डेकर यांचे 'मिलाफ', ॲड. जमीर इलाही मोमीन यांचा 'कडूनिंबाचे घोट', हबीब भंडारे यांचा 'माळावरची पेरणी' इत्यादी प्रातिनिधिक स्वरूपाच्या काव्यसंग्रहांची नावेही मुस्लिम मराठी काव्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत.

वरील सर्व कवी व कवितांचा आढावा घेतल्यानंतर असे निश्चितपणे म्हणता येईल की, मुस्लिम मराठी साहित्यातील इतर वाङ्मयप्रकारांपेक्षा कवितेची कक्षा व्यापक आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हे साहित्यिक काव्यलेखन करीत आहेत. या सर्व कविंच्या काव्याचे स्वरूप सर्वसमावेशक अशा स्वरूपाचे आहे. हिंदू–मुस्लिम संघर्षाने प्रभावित झालेले मुस्लिम मन, समन्वयवादी भूमिका, मुस्लिम प्रबोधनाची चळवळ, मूलतत्त्ववाद्यांविषयी विद्रोही अशी भूमिका इत्यादी मुस्लिम प्रश्नांना स्पर्श करणाऱ्या कविता काही कवींच्या लेखनातून पाहायला मिळते. फुले आंबेडकरी प्रेरणेने प्रभावित झाल्यामुळे दलित साहित्याचा प्रभाव बहुतांश कवींच्या कवितांवर दिसून येतो. या सर्व कवींच्या कवितांना 1980 नंतरच्या नव्या जाणिवेची आस आहे. त्यामुळे

त्यांच्या कविता आधुनिक जीवनाच्या भूमिकेचे समर्थन करणारे आहेत. महमंद पैगंबर यांच्या मूल इस्लामच्या शांतीतत्त्वाचा पुरस्कार बहुतांश कवी करताना दिसतात. मुस्लिम मराठी साहित्यातील कविता हा प्रकार एक महत्त्वाचा प्रवाह म्हणून महत्त्वाचा आहे.

## संदर्भ सूची


1. प्रा. फकरूद्दीन बेन्नूर, मुस्लिम मराठी कविता (लेख), मुस्लिम मराठी साहित्यः परंपरा, स्वरूप आणि लेखकसूची, भूमी प्रकाशन, लातूर, प्र.आ. 2004, पृ. 131
2. डॉ. प्रेमला अल्लडवाड, मुस्लिम मराठी कविता (लेख), मुस्लिम साहित्यिकांचे मराठी साहित्याला योगदान, संपा. ताहेर एच. पठाण, प्रा. अर्चना सोनवणे, संकल्प प्रकाशन प्रा. लि., लातूर, प्र. आ. 1 फेब्रुवारी 2013, पृ. 51
3. प्रा. रामलीला पवार, मुस्लिम मराठी कविता (लेख), मुस्लिम साहित्यिकांचे मराठी साहित्याला योगदान, पृ. 55
4. प्रा. फकरूद्दीन बेन्नूर, मुस्लिम मराठी कविता (लेख), मुस्लिम मराठी साहित्यः परंपरा, स्वरूप आणि लेखकसूची, पृ. 137
5. प्रा. रामलीला पवार, मुस्लिम मराठी कविता (लेख), मुस्लिम साहित्यिकांचे मराठी साहित्याला योगदान, पृ. 54
6. प्रा. रामलीला पवार, मुस्लिम मराठी कविता (लेख), मुस्लिम साहित्यिकांचे मराठी साहित्याला योगदान, पृ. 55
7. श्री. फारूक मदारी, आधुनिक मुस्लिम मराठी कविता (लेख), मुस्लिम साहित्यिकांचे मराठी साहित्याला योगदान, पृ. 198


## संदर्भ ग्रथांची सूची


1. मुस्लिम मराठी साहित्यः परंपरा, स्वरूप आणि लेखकसूची – प्रा. फ.म. शहाजिंदे, भूमी प्रकाशन, लातूर
2. मुस्लिम मराठी साहित्य व समाज चिंतन, संपा. प्रा. नागोराव कुंभार, प्रबोधन प्रकाशन, लातूर
3. साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह, संपा. शरणकुमार लिंबाळे, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि., पुणे
4. जातक– दत्ता भगत गौरव ग्रथ– संपा. डॉ. प्रल्हाद वडेर, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद
5. मुस्लिम मराठी साहित्यः एक आकलन, महेबुब सय्यद, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले प्रकाशन, येवला, नाशिक
6. आदिवासी, मुस्लिम, ख्रिश्चन साहित्यमीमांसा– डॉ. श्रीपाल सबनीस, अनुबंध प्रकाशन, पुणे
7. मुसलमान मराठी संतकवी– रा.चि.ढेरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे
8. मुस्लिम साहित्यिकांचे मराठी साहित्याला योगदान– संपा. डॉ. ताहेर एच. पठाण, प्रा. अर्चना सोनवणे, संकल्प प्रकाशन प्रा. लि., लातूर


❖❖❖

# माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा लघुउद्योगांसाठी होणाऱ्या उपयोगाचे अध्ययन

**सहा. प्रा. सौ. सी. एम. खंडारे**
(गृहअर्थशास्त्र विभाग)
श्रीमती कोकीळाबाई गावंडे महिला महाविद्यालय, दर्यापूर
ता. दर्यापूर, जि. अमरावती
E mail: chandakhandare1@gmail.com **भ्रमणध्वनी 9404689717**

## प्रस्तावना

पूर्वी गावात बारा बलुतेदारी व्यवस्था होती. आता जमाना बदलला. बाराची जागा बाराशे, बारा हजार व्यवसायांनी घेतली. गराजांमध्ये वैविध्य आले. नवीन गोष्टींची आवश्यकता वाढली. नावीन्याचा शोध घेण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर वाढला. संगणकाच्या एका क्लिकवर माहितीचा खजिना उपलब्ध असल्याने त्याचा वापर करून आपल्याला व्यवसायातील त्रुटी भरून काढणे, नवीन माहिती मिळवून काही तंत्र पद्धती अमलात आणणे, वस्तूचा दर्जा उंचावणे, कमी किंमतीत जादा माल उतदन करणे अशा गोष्टी सर्वसामान्य उद्योजक करायला लागला. मार्गदर्शक तत्वांचा उपयोग वाढला आणि त्याबरोबर व्यवसायही. अशा या व्यवसायासाठी काही उत्तम योजना आखल्या गेल्या. लघु, लहान व मध्यम व्यवसाय (Micro, Smalll and medium enterprises, MSME) अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. वर्षानुवर्षे चालत आलेले पारंपारिक व्यवसाय आणि त्याबरोबर नवीन प्रगती तंत्रज्ञानावर आधरित व्यवसाय या सर्वांचा समावेश MSME मध्ये होतो. उदाहरणार्थ – जुने व्यवसाय – चांभार, कुंभार, विणकर, सराफ इ. आणि नवे व्यवसाय – आयटी, टेलिकॉम, KPO, BPO इत्यादी. असे व्यावसायिक खूप मोठ्या संख्येने असून त्यांची आर्थिक गरजही मोठी आहे. आपल्या देशाच्या प्रगतीमध्ये यांचा वाटा मोठा आहे.

पूर्वी लहान उद्योजकांना, SSI (Small Scale Industries) युनिट कर्ज देताना, हे लहान व्यावसायिक आहेत, हे मनात धरूनच त्यांच्याकडे बघितले जाई. सवलतीच्या कमी दरात (Subsidised interest rate) कर्जपुरवठा होई. तो लघुद्योजक ठराविक व्यवसाय पिढ्यान्‌पिढ्या त्याच पद्धतीने करत असे. त्याची मानसिकता बदलून मोठी स्वप्ने पाहायची तयारी नसायची. मोठी उडी घेताना लागणारे आर्थिक बळ त्यांच्याकडे नसायचे, हे जितके खरे, तितकेच त्यांच्या मानसिकतेचा विचारही कोता होता. या SME चा दर्जा वयाबरोबर उंचावण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले गेले आणि सध्या त्याने गती घेतली आहे.

MSME चा अभ्यास करून विविध योजना आखताना 2006 मध्ये MSMEDA कायदा (Micro, Small and Medium Enterprises Development Act 2006) केला गेला. त्यामध्ये पूर्वीची व्याख्या बदलून SME च्या मर्यादा विस्तृत केल्या गेल्या. त्यामुळे पूर्वीचा मध्यम उद्योजक लहान झाला. असे असले, तरी त्याला साहाय्य करून पुन्हा वर येण्यासाठी हा कायदा फायदेशीर ठरला. SSI साठी ठरवून दिलेले खस असे प्रॉडक्ट्स या जुन्या यादीतून सरकारने काढून घेतले. त्यामुळे छोट्या छोट्या फर्म्स्ना फायदा झाला. स्पर्धा वाढली, उत्पादनाचा दर्जा, संख्या (Volume) वाढली आणि व्यवसायवृद्धी करणे सोयीचे झाले. एखादा धंदा कधी कधी नीट चालत नाही. समस्या उद्‌भवतात; तेव्हा या उद्‌भवलेल्या परिस्थितीला कारणीभूत ठरलेल्या वेगवेगळ्या गोष्टींवर चर्चा, अभ्यास विचारविनिमय करून तोच व्यवसाय पुन्हा उभा करण्याचा प्रयत्न (Nursing of the sick unit) केला जातो. तसे शक्य होणार नसेल, भविष्यात समस्या उद्‌भवणार, असे जाणवले, तर मात्र त्या SME सेक्टर युनिटची ''एका वेळी कराराद्वारे योजना'' अंतर्गत – One time settlement scheme मार्फत संपूर्ण कर्जफेड एका वेळी करावयाची सवलत देण्यात येते. MSMED 2006 नुसार MSE ची व्याख्या बदलली आहे. यामध्ये उत्पादन करणारे, तसेच सेवा देणारे असे दोन भाग येतात.

1) **उत्पादन करणारे –**

- Micro Enterprise – लघु व्यवसाय – कारखाना व यंत्र सामग्री (plant and machinery) यामधील गुंतवणूक 25 लाख रुपयांपेक्षा कमी असल्यास त्यास micro enterprise म्हणतात.
- लहान व्यवसाय (Small enterprises) तीच गुंतवणूक 25 लाखांपेक्षा जास्त आणि 5 कोटी रूपयांपेक्षा कमी असल्यास त्यास लहान व्यवसाय (Small enterprises) म्हणतात.

2) **सेवावर्ती –**

- Micro Enterprise – लघुव्यवसाय – व्यवसायास आवश्यक असलेल्या वस्तू व अवजारे यांमधील गुंतवणूक जर 10 लाख रुपयापेक्षा जर कमी असेल, तर त्या सेवा देणाऱ्या व्यवसायाची गणना लघुव्यवसायात केली जाते.
- ही गुंतवणूक 10 लाखांपेक्षा अधिक; परंतु 2 कोटी रूपयांपेक्षा कमी असल्यास व्यवसाय लहान समजला जातो.

## ICT चा औद्योगिक उपयोग

1. ICT मुळे संपूर्ण उद्योगावर एका जागी बसून देखरेख ठेवणे, नियंत्रण ठेवणे तसेच कामाचे व्यवस्थापन करणे शक्य झाले आहे.
2. यंत्रमानवाचा उपयोग वेल्डिंग, पेंटीग करणे तसेच धोकादायक कामे करणे, वस्तू उचलणे यांसाठी केला जातो.

औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी जमा केलेल्या माहितीवर प्रक्रिया करून विश्लेषण करणे व उत्पादनाचा दर्जा उंचावण्याच्या दिशेने आयसीटी महत्वाची भूमिका बजावत आहे.

## ऑनलाईन व्यवसाय

काही वर्षापूर्वी एखाद्या गृहउद्योगाचं मार्केटिंग घरासमोर फलक किंवा घरोघरी पत्रक वाटणं इथपर्यंत मर्यादित होतं. परंतु आता स्वतंत्र व्यवसाय करणाऱ्या काही महिला ऑनलाईनच्या जगात सहज वावरताना दिसतात. त्याचबरोबरच घरबसल्या ऑनलाईन नोकरीचा पर्यायही अनेक महिलांना खुणावतो आहे. म्हणजे कुटुंबाच्या जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडणं आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणं, या दोन्ही गोष्टी साध्य होतात.

ऑनलाईन व्यवसायाचं महत्त्वही महिलांना पटू लागलं आहे. मोठमोठ्या कंपन्या महिलांना व्यवसायासाठी ऑनलाईन सुविधा पुरवण्यात पुढाकार घेत आहेत. गेल्या वर्षभरात महिला सदस्यांची संख्या तब्बल 71 टक्क्यांनी वाढल्याचे अलिबाबा डॉट कॉमचे कंट्री जनरल मॅनेजर संदीप देशपांडे सांगतात. अमेरिका, ऑस्ट्रेलिया यांसारख्या विकसित देशांमध्ये ऑनलाईन माध्यमांचा वापर करून व्यवसाय करणाऱ्या महिलांची संख्या 25 टक्क्यांहून अधिक आहे. तर व्हिएतनाम, मलेशिया या देशांमध्येही हे प्रमाण 20 टक्क्यांच्या जवळपास आहे. ई–बे इंडियावरही नोंदणी असणाऱ्यांपैकी 10 टक्के व्यावसायिक महिला आहेत. तर खरेदीदारांमध्ये 27 टक्क्यांहून अधिक महिला आहे.

अहमदाबादमध्ये सरबतं, शीतपेय, रोझ सिरप, सॉप्ट ड्रिंक्सचा व्यवसाय करणाऱ्या शानया मोदीचा व्यवसाय ऑनलाईन माध्यमांचा वापर केल्याने दुपटीहून अधिक वाढला आहे. अमेरिका, इंग्लंड, आखाती देशांमधून त्यांना ऑर्डर मिळू लागल्या आहेत. त्यामुळे केवळ ऑनलाईन माध्यमातून गेल्या वर्षभरात त्यांनी 2 कोटींची उलाढाल केली. दादरमध्ये राहणाऱ्या कॉम्प्युटर इंजिनिअर असलेल्या मोनिका छेडा यांनी नवऱ्याला कपड्यांच्या व्यवसायाला हातभार म्हणून भीतभीत ऑनलाईन माध्यमांचा वापर सुरू केला. या माध्यमाचा धोका, फसवणुकीच्या प्रकारांच्या चर्चा यामुळे त्यांच्या नवऱ्याने त्यांना यापासून दुर राहण्याचा सल्ला दिला होता. मात्र सावधगिरीने पाउल टाकत त्यांनी हा व्यवसाय सुरू ठेवला. एकेकाळी पार्ट टाईम सुरू असणाऱ्या व्यवसायाचे रुपांतर आता स्वतंत्र व्यवसायात झाले असून सहा सहकारी त्यांच्या मदतीला आहेत.

त्यांचे स्वतंत्र कार्यालयही आहे. दिवसभर ग्राहकांच्या शंका, त्यांचे प्रश्न यांचे समाधान करण्यात दिवस जातो, असे त्या सांगतात.

घरबसल्या विरंगुळा म्हणून हैदराबादी दागिने विकणाऱ्या सुनीती माथूर यांना त्यांच्या अमेरिकेत राहणाऱ्या मुलीने बेबसाइटच्या माध्यमातून विक्रीचा पर्याय शिकवला. त्यामुळे गल्लीपुरता मर्यादित असलेला त्यांचा व्यवसाय आज आसाम, राजस्थानपासून अमेरिकेपर्यंत पसरला आहे आणि 400 हून अधिक ऑनलाईन ग्राहक त्यांना या वेबसाईटने मिळवून दिले आहेत. एकूणच ऑनलाईन व्यवसाय किंवा नोकरी करण्यासाइी मनाला ठाम निश्चय, धोके स्वीकारण्याची क्षमता, योग्य आणि सुरक्षित ऑनलाईन माध्यमाची निवड या गोष्टी आवश्यक आहेत. त्या एकदा जमल्या की आपले विश्व आपोआप विस्तारत जाते.

## फायदे

ऑनलाईन व्यवसाय निर्माण करणे देखील अत्यंत आनंददायक आणि फायद्याचे आहे. आपण आपले स्वतःचे बॉस आहेत. आपण असं करून आणि घरातून ऑनलाईन व्यवसाय काम करून आपण आपल्या विमनामूल्य वेळ वाचवू शकता.

## क्लायंट बेस

- 40 टक्के खरेदी विक्री ही इंटरनेटच्या माध्यमातून केल्या जाते.
- 84 टक्के जगातील इंटरनेट वापरकर्ते हे ऑनलाईन शॉपिंगच्या माध्यमातून खरेदी करतात.
- 24 तास 7 दिवस जगभरातील ग्राहकांना आपले व्यवसाय शोधले जाऊ शकतात.
- उत्पादनाच्या पुरवठा आंतरराष्ट्रीय मालकीचा आणि globalize करणे अत्यंत सोपे आहे.
-

## लाभकारण

- कॉपेरेट कार्यालये आणि गृहनिर्माणमध्ये स्पर्धा न करता इंटरनेट लहान किंवा स्टार्टअप व्यवसाय वाढू आदर्श ठिकाण आहे.
- SMEs ऑनलाईन, 90 टक्के इंटरनेट व्यापार एक फायदेशीर ठिकाणी सापडतो.
- ऑनलाईन व्यवसाय निर्माण करणे देखील अत्यंत आनंददायक आणि फायद्याचे आहे. आपण आपले स्वतःचे बॉस आहेत, आपण असं करून आणि घरातून ऑनलाईन व्यवसाय काम करून आपण आपल्या विनामूल्य वेळ चालवू शकता.

## किंमत Reductions

- अनेक Tenants त्यांच्या स्वतःच्या homes पासून आपल्या ऑनलाईन व्यवसाय सुरू करतात.
- ऑनलाईन व्यवसायासाठी आरंभिक खर्च कमी आहेत.
- नफा वाढवण्यासाठी खूप फायद्याचे आणि खर्च आणि किमती कमी.

## संदर्भ –


1. http://www.google.com/intl/mr/services/sitemap.html
2. https://www.google.co.in/intl/mr/business/befound.html
3. http://maharashtratimes.indiatimes.com/
4. http://businessdiary.com.ph/mr/tag/make-money-online-selling-ebooks/
5. डॉ. कर्वे स्वाती 2008 – स्त्री विकासाची नवे क्षितिज, प्रतिमा प्रकाशन, पुणे


❖❖❖

# READING HABITS AMONG TEACHERS IN COLLEGES

Dr. Vibhavari B. Hate
Librarian
Karmavir Mahavidyalaya, Mul
E Mail: vibha.hate@rediffmail.com Mob. 9881189290

## Abstract

त्यामुळे महाराष्ट्राच्या चतु:सीमेत आणि मराठी भाषेच्या मर्यादेत राहून मराठी संस्कृतीचा अभ्यास करणे चुकीचे नसले तरी अपुरे ठरते. उत्तरेकडील आर्य-भारतीय आणि दक्षिणेकडील द्रवीड या दोन्हींशी मराठी संस्कृती साम्य दाखविते आणि या दोन्हीपासून स्वतंत्र ठेवणारे आपले वेगळे सत्त्वही प्रकट करते. महाराष्ट्राचे भौगोलिक, भाषिक आणि सांस्कृतिक स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांना विभागणाऱ्या सीमेलगत महाराष्ट्र वसलेला आहे. महाराष्ट्राची भाषा मराठी ही उत्तरेकडे प्रचलित असलेल्या आर्य-भारतीय भाषाकुळातील एक भाषा आहे. पंचद्रवीड म्हणून द्रवीड प्रांतात गणल्या गेलेल्या महाराष्ट्राचे सांस्कृतिक निकटत्त्व परंपरेने दक्षिणेशी आहे. या विशिष्ट परीस्थितीमुळे उत्तर भारतीय आणि दक्षिण भारतीय अशा दोन्ही प्रकारच्या संस्कृतीचे विशेष महाराष्ट्राच्या लोकजीवनात आढळतात. त्याचप्रमाणे मराठी संस्कृतीचे आदान-प्रदान उत्तरेस आणि दक्षिणेस दाखविता येते. येथे आपण महाराष्ट्र आणि भारत यांच्या सांस्कृतिक अनुबंधांचा महानुभाव पंथाच्या बहुभाषी वाङ्‌मयाच्या अनुषंगाने विचार करणार आहोत.

## २. सांस्कृतिक अभिसरणाचा धर्मपंथीय संदर्भ

निरनिराळ्या धर्मपंथांनी भारतातील प्रादेशिक संस्कृतींना एकमेकांशी जोडले आणि सांस्कृतिक अभिसरण गतिशील ठेवले. या संदर्भात धर्म व पंथ यांच्या प्रसाराविषयीचे भारतीय वास्तव पाहिले पाहिजे. ख्रिश्चन आणि इस्लाम या धर्मियांनी आपापल्या धर्माचा प्रसार कधी सेवेने, प्रेमाने तर कधी सक्तीने केला. परधर्मियाला स्वधर्मात घेणे, हे या दोन्ही धर्मामध्ये पारलौकिक पुण्याचे आणि ऐहिक पराक्रमाचे द्योतक मानले गेले. धर्मप्रसार हा मुद्दा हिंदुधर्मियांनी असा कळीचा कधी मानला नाही. (धार्मिक व ऐतिहासिक दृष्टीने 'हिंदुधर्म' हा शब्द वापरणे तितकेसे संयुक्तिक नाही. तथापि आज तोच प्रचलित असल्याने येथे वापरला आहे.) धर्मप्रचार, धर्मप्रसार, यावर भर देणे हिंदुधर्मियांना शक्य नव्हते. त्याचे कारण धार्मिक असण्यापेक्षा सामाजिक अधिक आहे. हिंदुसमाज हा जातिसमाज आहे. या जातिसमाजात व्यक्तीला जन्माने जात प्राप्त होते. जातीने विवाह व कुटुंबजीवन शक्य होते. उदारनिर्वाहासाठी जातपरंपरेचा व्यवसाय प्राप्त होतो. त्यानुसार त्या व्यक्तीचे आर्थिक उत्पन्न आणि सामाजिक प्रतिष्ठा नियत होतात. जातीच्या चौकटीतच हिंदूंचे व्यक्तिजीवन व सामाजिक जीवन शक्य होते. जात तर जन्मदत्त असते. ती बदलता येत नाही. दुसऱ्या जातीत जाता येत नाही. जन्माशिवाय इतर कशानेही जात प्राप्त होत नाही. साहजिकच परधर्मातून आलेल्या व्यक्तीला धर्म देता येईल पण जात कशी द्यायची? ते शक्य नसल्यामुळे हिंदुधर्मात नव्याने प्रवेश केलेल्या व्यक्तीचे जीवन अडचणीत येईल. त्यामुळे हिंदुधर्माचा प्रसार शक्य नव्हता.

जात ही बंद तोंडाची व्यवस्था आहे तर हिंदुधर्म ही मात्र खुल्या तोंडाची व्यवस्था आहे. ख्रिश्चन, इस्लाम यांची, एककेंद्री, एकजिनसी अशी घट्ट विणीची आहे. हिंदुधर्माची बांधणी बहुजिनसी, बहुकेंद्री आहे. विविध प्रकारचे

धर्ममते, सिध्दान्त, सूत्रे, तत्त्वे, निरनिराळ्या देवता व त्यांच्या उपासना आणि वेगवेगळ्या प्रकारचे आचारधर्म त्यांना त्यात सहजतेने सामावले जाते. अमुक केले तरच हिंदू किंवा अमुक केले नाही तर हिंदू राहणार नाही. अशी जवळजवळ कोणतीच बाब निर्विवादपणे सांगता येणार नाही. इतके या धर्माचे स्वरुप लवचिक आहे.

हिंदुधर्माने आपल्या समाजाला चहूबाजूंनी बांधून टाकले हे खरेच आहे. पण या काळोख्या जिण्याला जो मोकळ्या हवेचा झरोका होता तोही धर्म हाच होता. मध्ययुगीन जीवनात धर्म हेच स्वातंत्र्याचे एकुलते एक क्षेत्र होते. द्रोण उलथा ठेवावा की पालथा येथपासून ईश्वर मानावा की मानू नये येथेपर्यंतचे वाद होऊ शकत होते. ते धर्मक्षेत्रात इतर क्षेत्रात बांधले गेलेले व्यक्तीचे जीवन धर्मव्यवहारातच मोकळे होऊ शकत होते आणि म्हणून धर्माच्या कुशीतच येथे ज्ञानाची वाढ झाली. कलांना फुलोरा आला. या धर्मस्वातंत्र्याचा आविष्कार म्हणून धर्मपंथ आणि संप्रदाय यांच्याकडे पाहता येते. पंथ म्हणजे मार्ग, हा एक जीवनमार्गच असतो. जग आणि जगदीश यांच्या संदर्भात मानवी जीवनाचे स्वरुप आणि श्रेयस सांगणारा मार्ग असतो. त्यातील आचार विचारातून त्या पंथाची आपली अशी आदर्श जीवनसरणी निष्पन्न होते. तिला श्रेष्ठ सत्पुरुषांच्या निदिध्यासाच्या आणि तपस्येचा आधार असतो. आत्मोध्दार आणि लोकोध्दार यांचे कमी अधिक भान असते. त्यात परलौकिकाची जशी वेगळी प्रतीती असते. त्याप्रमाणे ऐहिकाचीही काही वेगळी मांडणी अभिप्रेत असते.

तिचा स्वीकार करुन त्याप्रमाणे आचरण करणाऱ्या व्यक्तींचा गट असेच धर्मसंप्रदायाचे स्वरुप असते. कोणत्याही धर्मसंप्रदायाचा स्वीकार करण्याचे हिंदुधर्माचे स्वातंत्र आहे. धर्म जन्माने प्राप्त होतो, पण पंथ मात्र स्वेच्छेने निवडता येतो. पंथभेदाचा कोणताही अडथळा किंवा त्याविषयीची श्रेष्ठ-कनिष्ठतेची भावना आपल्या समाजजीवनात येत नाही. त्यामुळे हिंदुधर्मी राहूनच आपल्या धारणेप्रमाणे धर्म पाळून कोणत्याही पंथाचा स्वीकार किंवा त्याग करणे शक्य होते. एका पंथातून दुसऱ्या पंथात जाणे ही भारतीय धर्मजीवनात सतत घडणारी क्रिया होती, याचा पडताळ लीळाचरित्र, स्मृतीस्थळ, वृध्दाचार, अन्वयस्थळे यासारख्या महानुभाव वाङ्‌मयातून येण्यासारखा आहे.

तेव्हा धर्मांतर शक्य नसले तरी पंथान्तर शक्य होत, मान्य होत. त्यामुळे पंथप्रसारासाठी प्रयत्न केले जात असत. त्या त्या संप्रदायाचा साधनामार्ग आणि त्याचे विवरण करणारे सहित्य यांच्या आधाराने वेगवेगळ्या पध्दतींनी लोकमानसाचे प्रबोधन केले जाई. त्यामुळे भारतीय धर्मसंप्रदायांना आपआपल्या प्रदेशाच्या आणि भाषेच्या मर्यादा ओलांडाव्या लागल्या. त्यातून सांस्कृतिक अभिसरणाला गती मिळाली हे महाराष्ट्र आणि दक्षिण यातील धर्मसंप्रदायांबाबतही पाहता येते. बसवेश्वरांचा वीरशैवसंप्रदाय, माध्वांचा द्वैती वैष्णवसंप्रदाय, माणिकप्रभूंचा सकलमतसंप्रदाय यांसारख्या दक्षिणेतील धर्मसंप्रदायंनी आपल्या रचनांनी मराठीला समृध्द केले. महाराष्ट्राप्रमाणेच दक्षिणेत निर्माण झालेले मध्ययुगीन मराठी वाङ्‌मय निरनिराळ्या धर्मसंप्रदायांच्या कुशीमध्ये निर्माण झाले. ज्ञानदेवांच्या परंपरेतील नाथजोगी, मुकुंदराजांशी अनुबंध असलेली मुडलगी मठाची स्वामी परंपरा, गाणगापूर आणि एकनाथ या दोन्ही परंपरातील दत्तोपासनेच्या धारा, श्रीचक्रधारांचा महानुभाव संप्रदाय आणि समर्थ रामदासांच्या समर्थ संप्रदाय यांनी येथील धर्मचिंतनाला समृध्द केले आणि साहित्याला जीवनरस पुरविला चैतन्यसंप्रदाय, आनंदसंप्रदाय, नागेशसंप्रदाय, यांच्याही साहित्याचे पाझर दक्षिणेत झुळझुळताना दिसतात. महाराष्ट्रामध्य सर्वात प्रभावी आणि मध्यवर्ती असलेल्या वारकरी पंथांची साहित्यनिर्मिती मात्र दक्षिणेत शोधूनच पहावी लागते. महानुभावांचा मात्र काही एक ठसा दक्षिणेवर दाखविता येतो.

## ३. महानुभाव पंथाची ओळख

महात्मा, अच्युत, परमार्ग, भटमार्ग, जयकृष्णी अशा वेगवगळ्या नावांनी पंथ ओळखला जातो. त्याचा आरंभ श्रीदत्तात्रेयापासून आहे. अशी महानुभावांची धारणा आहे. श्रीदत्त, श्रीकृष्ण, श्रीचांगदेव तथा श्रीचक्रपाणि राऊळ, श्रीगोविंदप्रभू आणि श्रीचक्रधर ह्या पंचकृष्णांना महानुभाव परमेश्वरी अवतार मानतात. ज्ञान आणि प्रेम यांनी ईश्वराजवळ जाता येते. जीव, देवता, प्रपंच यापेक्षा ईश्वर स्वतंत्र मानल्यामुळे महानुभाव हा द्वैती भक्तिपंथ ठरतो. तो हिंसारहित, संगरहित, प्रवृत्तिधर्मकर्मरहित असा संन्यासप्रधान व निवृत्तिप्रवण पंथ आहे.

महानुभाव पंथ ‘अनादि’ असला तरी त्याला तत्त्वचिंतनाची बैठक देऊन महाराष्ट्राच्या जनजीवनात प्रवाहित केले ते श्रीचक्रधरांनी (इ.स. १२१३ ते १२७४) त्यांनी चर्चा, निरुपण, सूत्रे व दृष्टांत यांच्या रूपाने मौखिक बोध केला. त्यांचे जीवन हाच एक संदेश होता. श्रीचक्रधरांच्या काळात महानुभाव पंथ आकार घेत होता. तो विचारसंवादावर निर्भर असणारा आणि मतपरिवर्तनावर भर देणारा पंथ होता. पंथाला संघटनाबध्द करण्याच्या बाबतीत श्रीचक्रधर उदासीन दिसतात. आपला उपदेश ग्रंथबध्द करण्याचा प्रयत्न ते करीत नाहीत. एखादी जागा निवडून मठाची स्थापना करीत नाहीत. त्यांनी ‘उत्तरापंथे गमन’ केल्यावर त्यांचे पट्टशिष्य आणि पंथाचे प्रथम आचार्य नागदेवाचार्य तथा भटोबास यांनी पंथाला सुसंघटित करण्याचा नियोजनबध्द प्रयत्न केला. त्यांनी मठाची उभारणी

केली. त्यातून मठ-महंत, आचार्य यांची परंपरा अस्तित्वात आली. 'मार्गा उपयोगा जाईल' म्हणजे पुढील काळात पंथीयांना उपयोग होईल या बुध्दीने श्रीचक्रधरांची सूत्रे, दृष्टांत, लीळा ग्रंथबध्द करण्यावर त्यांनी भर दिला. म्हाइंभट ('लीळाचरीत्र', 'गोविंदप्रभू चरित्र' इत्यादी) केशिराजबास ('सूत्रपाठ', 'दृष्टांतपाठ' इत्यादी) बाहदेवव्यास ('स्थानपोथी', 'पूजावसर', 'प्रसादसेवा' इत्यादी) यासारख्या पंडितांना नागदेवांनी मराठी लेखनास प्रवृत्त केले. पंथीय वाङ्:मय निर्मितीला चालना दिली. महानुभाव पंथाचे संघटन व व्यवस्थापन केले.

मराठीचे मानदंड ठरावेत असे ग्रंथ महानुभावांनी मराठीच्या आरंभकाळी निर्माण केले. वाङ्:मयप्रकारांच्या दृष्टीने महानुभाव वाङ्:मयातील विविधता थक्क करणारी आहे. महानुभावांचे वाङ्:मय संख्येने विपुल, प्रकारांनी विविध आणि गुणांनी समृध्द आहे. तथापि इ.स. १३५३ पासून हे वाङ्:मय सांकेतिक लिपित बध्द झाले. त्यामुळे महानुभावांच्या वाङ्:मयव्यवहार त्यांच्या अंतर्वर्तुळापुरताच मर्यादित झाला. थेट १८९९ ला त्यांच्या अस्तित्त्वाची चाहूल महाराष्ट्राला लागली. त्यामुळे या वाङ्:मयाचा प्रभाव महानुभावेतर वाङ्:मयावर दाखविता येत नाही. महानुभावांचा 'बंद' वाङ्:मयव्यवहार आणि त्याच्याशिवाय इतरांचा 'खुला' वाङ्:मयव्यवहार ही मध्ययुगीन मराठी वाङ्:मयव्यवहाराची एक वैशिष्ट्यपूर्ण स्थिती आहे.

## ४. महानुभाव पंथाचा भारतक्षेत्रीय प्रसार

अनन्यसाधारण ब्रह्मविद्याशास्त्र आणि समाजपरिवर्तनाची क्रांतिकारक भूमिका ही महानुभाव पंथाची दोन ठळक वैशिष्ट्ये आहेत. त्यांचे दर्शन आपणास श्रीचक्रधरांच्या विचारात आणि वर्तनात दिसते.

अखंड भ्रमणाला महानुभावपंथात महत्त्व आहे. श्रीचक्रधरांनी उत्तरेत जगन्नाथपुरीपासून दक्षिणेत वरंगळपर्यंत भारतभ्रमण केले होते. पंचकृष्णांच्या परमेश्वरी अवतारांच्या स्पर्शाने पवित्र झालेल्या ठिकाणाला 'स्थान' असे म्हणतात. ज्यांना परमेश्वराच्या सहवासाचा लाभ झालेला नाही. अशा असंन्निधानी भक्तांना 'स्थानदर्शन, स्थानवंदन' हे साधन सांगितले आहे. परमेश्वर पूजनीय आहे. त्यांचा ज्याच्याशी संबंध आला आहे ते स्थान वंदनीय आहे. 'हे (म्हणजे परमेश्वर) होते तेथ जाईजे' (सूत्रपाठ आचारमालिका १८५, १८६) म्हणजे जेथे स्वामी गेले होते तेथे जावे. या स्वामींच्या आदेशाप्रमाणे भक्तगण येत-जात असतात. स्थानाच्या ठिकाणी परमेश्वराने आपल्या मायाशक्तीचा व कृपाशक्तीचा प्रसन्नतापूर्वक निक्षेप केलेला असतो. त्यामुळे स्थानांच्या यात्रा करणे हे धर्मकर्तव्य ठरते. स्थान हे परमेश्वराच्या अव्यक्त कृपेचे व्यक्त प्रवेशद्वार आहे. असे म्हणून हंसराजदादा खामनीकर[२] यांनी एकट्या महाराष्ट्रातील अशा २३२६ स्थानांची नोंद केली आहे. जसजसा महानुभाव पंथाचा प्रसार महाराष्ट्राबाहेर आंध्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत असा होत गेला तस तसे परप्रांतीय महाराष्ट्रात येऊ लागले आणि महाराष्ट्रीयन प्रांतोप्रांती जाऊ लागले.

पंजाबात महानुभाव पंथाचा प्रसार सोळाव्या शतकाच्या सुमारास झाला. पंजाबातील सारंगकोटचे कृष्णराव किंवा काहनराज हे खत्री व्यापारी व्यापाराच्या निमित्ताने वऱ्हाडात आले. तेथे ते कवीश्वर आम्नायातील महंत माधेराजबुवांच्या संपर्कात आले आणि दीक्षा घेऊन कृष्णमुनी बनले. पेशावरजवळचा लालबदाक्ष गडावर श्रीचक्रधरांच्या दृष्टांतदर्शनाप्रमाणे ते पंजाबमध्ये राहून धर्मप्रसार करू लागले. त्यांचे रोहतासगढचे शिष्य विधिचंद्र शर्मा यांनी महानुभाव किंवा पंजाबी पध्दतीप्रमाणे जयकृष्णी पंथाचा प्रसार पेशावर, काबूल-कंदाहारपर्यंत केला. लाहोर, रावळपिंडी, अशा ठिकाणी महानुभाव मठ उभे राहिले. मराठी धर्मपंथाची हस्तलिखिते पोहोचली.

श्रीचक्रधरस्वामी रिधपूर, श्रीपर्वत, कांती, वरंगल असे भ्रमण करीत खिखिंदा पर्वताच्या परिसरातून पुन्हा रिधपूरला आले. आंध्र, तामिळनाडू, कर्नाटक या तीन प्रांतातील हा संचार होता यापूर्वी ते गुजरात, महाराष्ट्र असा प्रवास करीत आले होते. हे लक्षात घेतले तर पंचद्रवीडाचा यात्रिक असेल आपण श्रीचक्रधराचे यथार्थ वर्णन करु शकतो.

यथावकाश महानुभाव पंथाचा प्रसार दक्षिणेतही झाला, कर्नाटकातील विद्यानगर व अनागोंदी येथील राजघराण्यापासून त्याचा आरंभ झाला. विद्यानगरीचा राजा पहिला रामराय आणि याचा प्रधान भानुदेव यांने व त्यांच्यामुळे इतरांनी महानुभाव पंथांची दीक्षा घेतल्याचा उल्लेख यक्षदेव आम्नायाच्या 'वृध्दान्व्यात' येतो ही तेराव्या-चौदाव्या शतकातील गोष्ट आहे. वरंगळच्या गोपाळपंतांनी महाराष्ट्रात येऊन देईभटांकडून दीक्षा घेतली आणि चौदाव्या शतकापासून आंध्रमध्ये महानुभाव पंथाचा प्रसार सुरू झाला, असे देईभट पैठणकर आम्नायाच्या वृध्दाचारावरून म्हणता येते. भानुभट आणि गोपाळपंत परप्रांतीय आणि परभाषक होते. त्यामुळे श्रीचक्रधरांची आज्ञा (तेलंग देशा, कन्नडदेशा न वाचावे) न मोडता दक्षिणेत महानुभावांचा पंथप्रसार होत राहिला.

अन्वयस्थळे, वृध्दाचार, चरित्रअबाब, इतिहास प्रकरणे यासारखे महानुभावांचे इतिहासग्रंथ आहेत. त्यातून पंथाच्या या भारतक्षेत्रीय प्रसाराचे स्वच्छ चित्र डोळ्यांसमोर उभे राहते.

भारतासारख्या बहुभाषक राष्ट्रामध्ये ज्यांना आपल्या प्रांताच्या, प्रदेशाच्या सीमा ओलांडावयाच्या आहेत. त्यांना एकभाषक असणे अडचणीचे ठरते. त्यामुळे परभाषक यांना महानुभाव समजून घेणे आणि महानुभावांना इतरांना समजून देणे अवघडच होते. तथापि पुढे त्या त्या प्रदेशातील धर्मजिज्ञासूंनी महानुभाव पंथात प्रवेश केला. उदा. कृष्णमुनी आणि त्यांचे शिष्य विधिचंद्र शर्मा पंजाबी भाषक होते. गुर्जर शिवबास गुजराती भाषक होते. भानुमुनी विद्यानगरीचे असून कन्नडभाषक होते. दुसरे कमळाकर मुनी कोठी हे कन्नडभाषक लिंगायत होते. वरंगळनिवासी गोपाळपंत तेलुगूभाषक होते. वैद्य दत्तोबास हेही तेलुगूभाषक होते. बहुभाषकत्वाची ही परंपरा आजही महानुभावांमध्ये कायम आहे. त्यामुळे त्या त्या प्रदेशात पंथप्रसार करण्यातील भाषिक अडथळा नाहिसा झाला.
त्यातून निरनिराळ्या भाषा आणि वाङ्‌मय यांच्यात कसे आदानप्रदान सुरू झाले असेल हे जाणण्यासाठी महानुभावांची मराठी विषयीची भूमिका समजून घेणे योग्य ठरेल.

## ५. मराठीची विजयपताका फडकाविली

उदयकाळापासून मराठीने आपले वाङ्‌मयीन आणि भाषिक संबंध दूरपर्यंत वाढविले आहेत. 'कुवलयमाले' (इ.स. ७७८) पासून यशश्चद्रांच्या 'राजमती प्रबोध' पर्यंतच्या बौध्द, जैन, ग्रंथातून मराठीचे उल्लेख व उतारे सापडतात. आज उपलब्ध असलेल जुन्यातले जुने मराठी पद म्हणजे बुध्दवंदना आहे. मराठीच्या जयंतीचे अभिलेख कोरले ते जैनांनी-गोमटेश्वरांच्या चरणाजवल 'श्रवणवेळगोळाला' (इ.स.९८३ किंवा १११७) तामिळनाडूत मराठी शिकविण्याची सोय होती. असे इ.स. १२९० च्या मैलंगी शिलालेखावरून स्पष्ट होते. श्रीचक्रधरस्वामी आपली धर्मसूत्रे ज्या मराठीतून प्रतिपादन करीत होते. त्या मराठीचा प्रदेशाविस्तार असा महाराष्ट्राच्या सीमेबाहेर दाखविता येते.

श्रीचक्रधरस्वामी विविध भाषांचे जाणकार होते. ते जन्माने गुजराती होते. त्यामुळे गुजराती ही त्यांची मातृभाषा किंवा निजभाषा होती. त्यांनी उत्तर-दक्षिण भारतभ्रमण केले होते. त्यामुळे निरनिराळ्या भारतीय भाषा त्यांनी आत्मीयतेने जाणून घेतल्या असाव्यात, असा अंदाज करावयास जागा आहे. संस्कृत त्यांना 'सरळी' होती म्हणजे ते सहजतेने संस्कृत बोलत असत. 'ते मऱ्हाटी तरि अनावर बोलत असति' अशी त्यांची प्रसिध्दी होती. म्हणजे मराठी ते अस्खलितपणे बोलत असत. जन्माने गुजराती असलेल्या श्रीचक्रधरांनी महाराष्ट्राला आपली कर्मभूमी आणि मराठीला आपली धर्मभाषा मानले. संस्कृत ही देववाणी होती. सर्व लोकांना ती शिकणे-शिकविणे शक्य नव्हते आणि म्हणून मराठी ही जी लोकवाणी होती तिलाच चक्रधरांनी देववाणीची प्रतिष्ठा दिली.

हेच धोरण पंथाचे पहिले आचार्य नागदेवाचार्य यांनी कटाक्षाने संभाळले. केशिराजांनी विचारलेल्या संस्कृत प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले. 'तुमचा अस्मात् कस्मात मी नेणे माः मज श्रीचक्रधरे निरूपिली मऱ्हाटी : तियांचि पुसा' (स्मृतिस्थळ ६६) तुमचे अस्मात्-कस्मात् मी जाणत नाही. मला श्रीचक्रधरांनी ज्या मराठीत निरूपण केले तिच्यातच विचारा, असा त्यांचा आग्रह होता. संस्कृत वापरण्याची क्षमता असूनही त्यांनी माध्यम म्हणून संस्कृतचा वापर करण्याचे टाळले. केसोबासांनी 'उध्दहरण' सूत्रे संस्कृतमध्ये गुंफण्याची संमती मागितली, तेव्हा 'नको गा केशवदेया : येणे माझिया म्हातारीला नागवतील' (स्मृतिस्थळ १५) अशा शब्दात नागदेवाचार्यांनी त्यांना परावृत्त केले. संस्कृत हीच ज्ञानभाषा राहिली तर स्त्री-शूद्र ज्ञानापासून वंचित राहतील अशी त्यांना भिती होती.

त्यामुळे सर्व प्रकारचे शास्त्रीय व ललित वाङ्‌मय महानुभावांनी लिहिले ते मराठीतून त्यातही 'लीळाचरित्र', 'सूत्रपाठ', 'दृष्टांतपाठ' यासारखे धर्मग्रंथ मराठीत असल्यामुळे मराठीला धर्मभाषेची आणि देववाणीची प्रतिष्ठा प्राप्त झाली. 'सूत्रपाठ' हा 'वचनरुप परमेश्वर' असल्याने परप्रांतीय अनुयायांना मराठी जाणून घेणे आवश्यक ठरले. तो त्यांच्या धर्मसाधनेचा भाग बनला. त्यामुळे तमिळ, तेलुगू, गुजराती, हिंदी, पंजाबी अशा वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या महानुभाव अनुयायांना मराठीचा अभ्यास करावा लागला. धर्मभाषा म्हणून मराठीचा वापर करावा लागला. त्यांच्यासाठी महानुभाव मराठी ग्रंथाची हस्तलिखिते वरंगळापासून काबूल पर्यंत फैलावली. कोणत्याही भारतीय भाषेतील हस्तलिखिते साधारणतः त्या भाषेच्या प्रदेशमर्यादेतच सापडतात. याला अपवाद मराठी हस्तलिखितांचा आहे. मराठी हस्तलिखित कच्छपासून कटकपर्यंत आणि काश्मीरपासून कुंभकोणम् पर्यंत कोठेही सापडतात. त्यात महानुभाव महंताचा आणि वासनिकांचा वाटा मोठा आहे.

महाराष्ट्रातील स्थानदर्शनासाठी परप्रांतीय आणि परभाषिक वारंवार महाराष्ट्राच्या आणि मराठी जनजीवनाच्या संपर्कात येतात. त्याचप्रमाणे उत्तर-दक्षिणेतील महानुभाव मठ-मंदिरांना मराठी व वासनिक भेटी देतात. हा जो भिन्न भाषांचा परस्पर संपर्क घडला आहे. घडतो आहे. त्यांचा नेमका परिमाण काय होतो आहे? मराठीवर कोणता परिणाम होतो आहे? त्यांच्यातील आदान-प्रदानाचे नेमके स्वरूप काय आहे? हे सगळे प्रश्न संशोधकांना आव्हान करणारे आहे. दोन भिन्नभाषिक संशोधकांनी एकत्र येऊन काम करण्यासाठी हे विषय आहे.

## ६. बहुभाषिक साहित्यनिर्मिती

वेगवेगळ्या भाषा बोलणारे लोक जेव्हा एकमेकांत मिसळतात. तेव्हा भाषेबरोबर साहित्य आणि संस्कृती यांचीही रसमिसळ होते. महानुभावांच्या पंथप्रसाराबरोबर परभाषक परप्रांतियांनी जशी मराठी भाषा आत्मसात केली. तशी आपापल्या भाषेत पंथविषयक साहित्याची निर्मिती केली. महानुभावांच्या या भिन्नभाषक साहित्य निर्मितीची येथे केवळ नोंद करणे शक्य आहे.

मराठीचा पुरस्कार करणाऱ्या महानुभाव पंडितांना संस्कृतचे अनिवार आकर्षण होते. 'षटशास्त्रपारंगत' म्हाईंभट, संस्कृत 'सरळी' असलेले केसोबास, 'काव्यालापकलापकेलिकुशल' कवीश्वर भास्करभट्ट, बोरीकर, 'शब्दार्थशास्त्रज्ञ' आनेराज अशा किती तरी पंडितांनी संस्कृत रचना केलेली आहे. केसोबसांचे 'रत्नमालास्त्रोत', आनेराजबासांचा 'लक्षणरत्नाकर' आणि अनेक पंडितांची स्त्रोते, पूजावसर अशी विपूल विविध प्रकारची संस्कृत रचना महानुभावांनी केलेली आहे. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरूक्त इत्यादीचा उज्वल आदर्श समोर ठेवून महानुभाव पंडितांनी श्रीचक्रधरांना श्री श्रुतिवचनांवरील भाष्य, महाभाष्यांची रचना केली. वार्तिक, वैयायिक, मीमांसक, वैय्याकरणी आणि साहित्य शास्त्रज्ञ यांची परंपरा जोपासली. श्रीमद् भागवतगीतेवरील त्यांनी संस्कृत रचना केली.

इंग्रजीमध्येही परदेशी अभ्यासकांनी मौलिक काम केले आहे. इआन रिसाइड यांनी परिश्रमपूर्वक महानुभाव वाङ्‌मयाची सूची सिध्द केली आहे. ॲन फेल्ड हाऊस यांनी **'सूत्रपाठ'**, **'डीड्स ऑफ गॉड इन ऋध्दिपूर'** हे गोविंदप्रभूचरित्र ही दोन महत्वाची संपादने इंग्रजीत केली आहे. त्यांच्या प्रस्तावना अत्यंत विचारप्रवर्तक असून पंथीय विचारांवर नवा प्रकाश टाकणाऱ्या आहे. श्री. जाधव यांनी समग्र लीळाचरित्र या महाग्रंथाचे सुबोध इंग्रजी भाषांतर केले आहे. महानुभाव ग्रंथांची भाषांतरे चिकित्सक संपादने आणि विचारचर्चा असे इंग्रजीतील महानुभाव वाङ्‌मयाचे स्वरूप आहे.

याप्रकारे सर्वात जास्त लेखन हिंदी भाषेत आहेत. हिंदी भाषेत महानुभाव पंथीयांची अनेक नियतकालिके चालविले जातात. शास्त्रीय व ललित अशी दोन्ही प्रकारची लेखने आहेत. विशेषतः श्रीचक्रधरांच्या तत्त्वविचारांची मांडणी आणि स्पष्टीकरण करणारे लेखन दर्जेदार आहे. हिंदीतील ललित साहित्याचे स्वरुपही तितकेच दर्जेदार आहे. आपण नमुन्यादाखल हिंदीतील श्रेष्ठ लेखक सुभाष नरुला याच्या लेखनाचा विचार करू नरूला यांनी लीळाचरित्राचे साररूप हिंदीमध्ये केले.

त्यांनी महानुभाव आचार्य आणि साध्वी यांच्यावर अप्रतिम चरित्रात्मक कादंबरी लेखन केले आहे. 'अभय चरण', 'अरविंद चरण' मधून श्रीचक्रधरांचे आकाशगामी व्यक्तीमत्व पकडण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'आचार्य नागदेव', 'सत्यदर्शी महदाइसा', 'सरल संत अबाईसा' व त्यांच्या कादंबऱ्या अध्यात्ममार्गावरील वाटचालीचे मानवी पातळीवर चित्रण करतात. 'महामहिम माहिमभट' ही त्यांची सर्वोत्कृष्ट कादंबरी आहे. विद्वत्तेच्या अहंकारात गुरफटलेल्या पंडितापासून निरहंकारी, भक्तापर्यंतची त्यांची वाटचाल ते रंगवितात. त्याच्या मानाने विविध तरंग त्यांनी मनोविश्लेषणासह रंगविले आहे. सुभाष नरुला यांनी उभी केलेली चरित्रचित्रे नव्या अर्थाने उजळलेली आहे.

पंजाबी मध्ये असे किती तरी साहित्य लिहिले गेले असेल. पंजाबी, गुजराती, कन्नड, तेलुगू भाषांमधून मराठी ग्रंथांची भाषांतरे, संपादने, तत्वचिंतन, ललितसाहित्य, अशी विपुल पंथीय रचना आहे.

या रचनेचा मराठी अभ्यासकांना पुरेसा परिचय नाही. संशोधकांसाठी महानुभावांची भिन्नभाषिक साहित्यनिर्मिती हे मोठे क्षेत्र आहे. त्या त्या प्रांतीय भाषेतील पंथसंबंध साहित्याची प्रथम सूची केली पाहिजे. त्यांचे वर्गीकरण केले पाहिजे. त्यातील विचारांची चिकित्सा करुन त्यातील नवतेचा शोध घ्यावा लागेल. त्यातील ललित साहित्याचे आकलन, आस्वाद आणि मूल्यमापन करावे लागेल. अशा रीतीने अभ्यास त्या त्या प्रांतातील स्थानिक महानुभाव पंडितांच्या सहकार्यानेच करणे शक्य आहे.

अशा सर्व बहुभाषिक साहित्यनिर्मितीच्या एकत्रित अभ्यासातून महानुभावांच्या प्रज्ञा आणि प्रतिभेचा धाडोंळा घेता येईल. भारतीय साहित्यातील महानुभावांचे योगदान स्पष्ट करता येईल.

## संदर्भ व टीपा

१) अशोक केळकर, "भारतातील भाषिक विविधता आणि भाषिक सत्व" : समाज प्रबोधन पत्रिका, जुऑस २००१ पृ. १४१.

२) हंसराज खामनीकट, "पंचावतार चरणांकित स्थानदर्शन" महानुभाव साहित्यदर्शन प्रकाशन, माळवडगाव, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर. तिसरी आवृत्ती. २००३ (प. आ. १९८८) पृ. १७-२०.

❖❖❖

# नवकथेचे मानकरी : गंगाधर गाडगीळ

प्रा. डॉ. आर. एम. केदार
डॉ. गो. खे. महाविद्यालय,
गाडेगाव (तेल्हारा)

मराठी नवकथाकारांमध्ये ज्यांचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते ते गंगाधर गाडगीळ होत. एखादी व्यक्ती किंवा एखादा प्रसंग याच्या मुळाशी जाऊन त्याचे विश्लेषण करण्याचे व त्यातील संगती शोधण्याचे त्यांचे कसब वाखाणण्याजोगे आहे. एखादा अनुभव घेण्याची व ती मांडण्याची त्यांची पद्धत मोठी वैशिष्ट्यपूर्ण आहे. आपले अनुभव ते त्यांच्या खास अशा निवेदन शैलीत सांगतात. गंगाधर गाडगीळांनी कथेच्या क्षेत्रात केलेल्या वेगवेगळ्या प्रयोगामुळेच त्यांना नवकथाकार म्हणून मान्यता मिळाली आहे.

त्यांच्या 'मानसचित्रे' पासून 'पाळणा' या कथासंग्रहातील कथांचा अभ्यास केला तर असे दिसून येते की गाडगीळांनी मराठी कथेला नवी दृष्टी दिली व नवे क्षेत्र उपलब्ध करून दिले. त्यांनी आपल्या कथांमधून मध्यमवर्गीय पांढरपेशा माणसांचे विश्व, त्यांच्या आशाआकांक्षा, त्यांची स्वप्ने चित्रीत केली. याशिवाय माणसामाणसातील संबंध, माणसाचे निसर्गाशी असलेले नाते, नियती इत्यादी मूलभूत प्रश्नाबद्दलची जाणीव व्यक्त केली. माणसाला भोगाव्या लागणाऱ्या दु:खामागे किंवा त्याच्या वर्तनामागे काय कारण असावे याचा ते विचार करताना दिसतात. माणूस, माणसाचे मन हाच त्यांच्या कथांचा विषय आहे. त्यांच्या मते माणसाच्या मनात परस्परविरुद्ध प्रवृत्ती मुळातच असतात. माणूस जसा नियतीच्या हातचे खेळणे असतो तसा तो वासनाचक्रात सापडला की अगतिक होतो. माणसाला अगतिक करणारी प्रबळ शक्ती म्हणजे त्यांच्या अंतर्मनात दडलेल्या कामप्रेरणा होत. कामसुख लाभले की माणसाला जीवन अर्थपूर्ण वाटते. पण हाच ध्यास माणसाच्या जीविताचा पार चोळामोळा करून टाकतो. गाडगीळांच्या 'उंट आणि लंबक' या कथेत याचेचे चित्रण आले आहे. या कथेतील कृष्णाबाईने आपल्या पतीला शरीरसुख भरभरून दिलेले असते. त्या स्वत:ही तृप्त असतात. पण अकस्मात कृष्णाबाईचे जीवन कामप्रेरणेच्या आगीत होरपळून जाते. त्यामुळे त्यांना आपल्यातच दुसरी कुणी कृष्णाबाई निर्माण झाली आहे आणि ती आपल्या व्यक्तिमत्वाचा ताबा घेते आहे असे वाटायला लागते. म्हणूनच मग ती अविनाशसारख्या तरुणाला सर्वस्व अर्पण करायला तयार होते. अविनाशच्या मिठीत स्वर्गीय सुख असल्याचा भास त्यांना होतो आणि ते सुख भोगण्यातच जीवनाचे सार्थक आहे असे कृष्णाबाईला वाटते. वासना ह्या मानवी मनात उंटासारख्या हलकेच प्रवेश करतात आणि माणसाला उद्ध्वस्त करून टाकतात. वाचनाचक्रात माणूस असहाय्य होतो आणि मग या वासनांचा माणूस दास होतो. 'ज्वाला' मधील वेणू सुध्दा वैधव्याच्या ज्वाळात होरपळत राहते. तिच्या व्यक्तिमत्त्वाचा ताबा या वासना अगदी सहज घेतात आणि मग तिचे अस्तित्वच संपते.

गाडगीळांच्या मते माणूस मूलत: एकाकी आहे. जे वाट्याला आले ते एकटेपणाने भोगले पाहिजे असे त्याला वाटते. या जीवनात आपल्या भोवताली माणसाची गर्दी असूनही माणूस एकटेपणाच्या आगीत जळत असतो. गाडगीळांचे कथाविश्व एकाकी जीवन जगणाऱ्या माणसांनी गजबजलेले आहे. उदा. 'मृत्यूचे संजीवन' मधील वेणू, 'एकटा' मधील माधव, 'अखेरचे सांगणे' मधील जानकीबाई, 'थकवा' मधील अन्नपूर्णा, 'निकामी बस' मधील तात्या, 'लक्तरे' मधील सुधाताई इत्यादी कितीतरी उदाहरणे देता येतील. गाडगीळांच्या मते आयुष्य हा साप–शिड्यांचा खेळ आहे. या खेळात भीतीचे अनेक वळवळणारे साप! अज्ञात भवितव्याच्या हाती माणूस म्हणजे खेळणे! माणूस रंगवितांना त्यांच्या लक्षात येते की, क्षुद्र जीवन जगणारी ही सारी माणसे किडलेली आहेत. ती सारी अर्थहीन जीवन जगत असतात. त्यांना असे वाटते की माणसाचे जीवन म्हणजे फरशीवर सांडलेले पाणी. ज्या मध्यम वर्गात ते वाढले त्या मध्यम वर्गाची स्वप्ने, त्यांची घमेंड, त्यांची जगण्याची केविलवाणी धडपड त्यांनी साक्षात अनुभवली होती. त्यामुळेच त्यांना मध्यमवर्गाचे भेदक चित्रण करता आले. त्यांच्या मते संस्कृती म्हणजे स्वास्थ्यपूर्ण समाजाच्या जीवनावर आलेला फेस आहे आणि आखीव जीवन जगणारा, प्रोफेसर देशपांडे हा त्या फेसातला एक बुडबुडा आहे हे 'गाळ आणि फेस' या कथेतून ते मांडण्याचा प्रयत्न करतात. तर 'प्रलय' या कथेतील नायकाला जातीय दंग्यात सारे काही वाहून गेल्याचा प्रत्यय आपल्याला येतो.

गाडगीळांच्या कथेबद्दल म.ना. अदवंत म्हणतात, ''गंगाधर गाडगीळ हे नवकथेचे दुसरे मानकरी आहेत. त्यांची कथा वादाचा विषय बनली आहे. 'अनाकलनीय मनोविश्लेषण', 'विकृत मनोवृत्तीचे चित्रण' इत्यादी अनेक आक्षेप मुख्यत: गाडगीळांच्या लघुकथेवर आधारलेले असतात. 'उंट आणि लंबक' ही त्यांची लघुकथा मोठ्या वादाचा विषय बनली होती. पण गाडगीळ यांची कथा समजावून घेण्यास त्यांचे बहुविध व व्यापक व्यक्तिमत्व समजावून घ्यावयास हवे. त्यांच्या खेळकर लेखशैलीबरोबर त्यांच्या काव्यात्म शैलीचा विचार करावयास हवा. आत्यंतिक भावनोत्कटतेबरोबर आत्यंतिक कल्पनाविलासही त्यांच्या लघुकथांतून आढळतो. मनोविश्लेषणाचे सूक्ष्म चित्रण करतांना अंत:करणात अनेकवेळा आढळून येणारी विसंगती त्यांच्या नजरेतून सुटत नाही हे पण विसरून चालावयाचे नाही. त्यामुळे त्यांच्या लघुकथात विलक्षण विविधता निर्माण झाली आहे. पती–पत्नीच्या संसारातील चहाच्या पेल्यातील वादळाचे अत्यंत खेळकर व विनोदी रीतीने चित्रण करणारे गाडगीळ ज्यांच्या डोळ्यादेखत हत्याकांड चाललेले आहे, अशा निर्वासितांचे चित्रण अत्यंत हळुवारपणे रंगवतील. बकुळेसारख्या वेश्येच्या अंत:करणातील भावनांचे पापुद्रे उलगडून दाखविताना आपणापेक्षा वयाने कमी असणाऱ्या तरुणाविषयी आसक्ती मनात असणाऱ्या प्रोढेचे मनोविकारही त्यांच्या दृष्टीतून निसटणार नाहीत. त्यामुळे जीवनातील अनेकविध व्यक्ती व अनेकविध प्रसंग पाहताना त्यांच्या मुळाशी जाऊन त्याचे विश्लेषण करण्याची, अत्यंत आकर्षक शैलीत त्यांना शब्दरूप देण्याची त्यांची हातोडी मोठी मोहक आहे.''[१] अदवंत यांचे हे मत पटण्यासारखे आहे. कारण निवेदन शैलीत तपशिलाची आवड हा गाडगीळांच्या कथेचा एक महत्त्वाचा विशेष आहे. कोणतेही वर्णन करताना ते तो तपशील इतक्या सूक्ष्मपणाने व मोजक्या शब्दात आपल्यासमोर ठेवतात की, त्यामुळे त्यांच्या निरीक्षणशक्तीचे कौतुक वाटते.

गंगाधर गाडगीळ यांना नवकथाकारांमध्ये मानाचे स्थान आहे. कारण त्यांनी मराठी कथेला बंधनातून मुक्त करून आजवर कथेत न आलेल्या गोष्टी आणून मराठी कथेत वेगळेपणा आणला. मानवी मनात दडलेल्या विविध प्रवृत्तीचे दर्शन त्यांच्या कथेतून घडते. मानवी मनात दडलेल्या विविध प्रवृत्तीचे दर्शन त्यांच्या कथेतून घडते. त्यांच्या 'विळखा', 'उंट आणि लंबक', 'चोरटी पावले' या कथेतून मानवाच्या अंतर्मनात दडलेल्या कामवासनेचे चित्रण आले आहे. कधी ते मानवी भावभावनांचे चित्रण करणाऱ्या 'तलावातले चांदणे', 'चक्र', यासारख्या कथा लिहितात तर कधी 'काजवा', 'मृत्यूचे संजीवन' यासारख्या दुर्बोध कथाही लिहितात. आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतही त्यांनी वेगवेगळे प्रयोग केलेले आहेत.

डॉ. रा. गो. चवरे म्हणतात, ''मानवाच्या बाह्य हालचालीपेक्षा त्यांच्या अंतर्गत मनोव्यापाराला अधिक महत्त्व देऊन, त्यांच्याच चित्रणात ते अधिक रमतात. त्यांच्या कथेत कधी महत्त्वपूर्ण घटनांना क्षुल्लक लेखले जाते, तर कधी क्षुल्लक घटनांना अधिक प्राधान्य दिले जाते. येथे घटना गौण आहे. मानवी स्वभावातील विसंगतीच्या मागे सुसंगती शोधण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. मानवी व्यक्तिमत्त्व हेच मुळात अनेक पदरी असते. त्यांची परिणती व्यक्तींच्या प्रत्यक्ष कृतीत होते. यातूनच गुंतागुंत निर्माण होऊन सामान्य वाचक संभ्रमात पडतो. तसेच त्यांच्या कथानकाच्या बाबतीत होते. त्यांच्या कथेला कथानक नसते हा त्यांच्यावर घेण्यात येणाऱ्या आक्षेपांपैकीच एक आक्षेप. मुक्त संज्ञाप्रवाहाच्या आविष्कारातून गाडगीळांनी कथाबंधच्या सुघटीताला तडा दिला. मानवी सर्वंकष वासना, स्वार्थ, स्वच्या वर्तुळातील मानवाचे सततचे गरगरणे यांच्या स्वतंत्र आकलनाचा वेध येथे अधिक समृद्ध होतो. मानवी व्यक्तिमत्त्वाचा शोध व बोध सूक्ष्म व व्यापक पातळीवर वृध्दिंगत होत जातो. त्याच्या अभिव्यक्तीत त्यांनी विविध प्रयोगाच्या परी पुढे आणल्या.''[२] गाडगीळांच्या कथा अभ्यासल्यावर डॉ. चवरे यांचे हे मत योग्यच आहे याची खात्री पटते. गाडगीळाच्या कथेबद्दलचे प्रा. दि.के. बेडेकर यांचेही मत विचारात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, ''मानवी जीवनातील विसंगतीचा–विकृतीचा ते कडवट उपहास करतात. म्हणून तर त्यांच्या कथांतून अर्थहीन, विकल, एकाकी, वैफल्यग्रस्त माणूस दिसतो. 'मानव हा एक जन्तू आहे' असे वाक्य त्यांच्या 'चक्र' कथेत आढळते. 'भिरभिरे' मध्ये मांडलेल्या वेदांताचा उगम मानवाला जंतू मानण्याचा तुच्छ भावनेत आहे''[३] म्हणजेच बेडकरांनाही गाडगीळांच्या कथेतील वैफल्यग्रस्त माणूस स्पष्टपणे जाणवला.

गाडगीळांच्या कथेतील माणसे अर्थहीन जीवन जगत असतात. 'सुरस आणि चमत्कारीक' या कथेत ते लिहितात, ''हातांनी कष्ट करायचे आणि पोटाची खळगी भरायची, स्त्रीला भोगायचे आणि वंश वाढवायचा, उद्या खोटा ठरणारा अनुभव आज साठवायचा आणि बाशी स्वप्ने हृदयाशी कवटाळायची आणि अखेर मातीत मिळून जायचे.'' त्यांच्या या कथेवर भाष्य करतांना भालचंद्र फडके म्हणतात, ''माणसांचे जीवन फरशीवर सांडलेले पाणी जसे ओहोळाचे फाटे फुटून कुठेतरी वाहत जाते आणि अखेर सुकते तसे असते. अशा दिशाहीन,

भविष्यहीन, निष्क्रिय, पराक्रमशून्य जीवन जगणाऱ्यांची 'व्यर्थता' ते कथेतून चित्रित करतात.''[४] गाडगीळांच्या कथेवरील भालचंद्र फडके यांचे भाष्य लक्षात घेण्यासारखे आहे.

गाडगीळांच्या कथेतील मानवी जीवनाबद्दलच आपले मत व्यक्त करतांना प्रा. वा. ल. कुलकर्णी म्हणतात, ''लघुकथा ह्या वाङ्मयप्रकाराच्या ठिकाणी असलेली जीवनदर्शनाच्या प्रसुप्त शक्तींची खरी कल्पना गाडगीळांच्या कथेने मराठी वाचकांस व मराठी लेखकास आणून दिली.''[५] म्हणजेच जीवनदर्शनाची शक्ती कथा या वाङ्मयप्रकारातही आहे ही बाब गंगाधर गाडगीळांनी आपल्या कथेतून दाखवून दिली. गाडगीळ जेव्हा कथालेखन करायला लागले होते तेव्हा काही विशिष्ट अनुभवच कथांमधून व्यक्त होत होते. त्यावेळेस गाडगीळांनी कथेला बंधमुक्त करून तिला नवजीवन देण्याचे कार्य केले.

गंगाधर गाडगीळांना 'मराठी नवकथेचे शिल्पकार' का मानावे याचे कारण स्पष्ट करतांना डॉ. कल्याणी दिवेकर म्हणतात, ''कथा या वाङ्:मयप्रकारातील अनेक शक्यता त्यांनी कथांमधून पडताळून पाहिल्या. आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनी कथेला 'मोकळी' करण्याचे श्रेय गाडगीळांना द्यायला हवे.''[६] यावरून गाडगीळांच्या कथेतील वैविध्य लक्षात यावे.

गाडगीळ ''आशय आणि अभिव्यक्तीचे सतत नवेनवे प्रयोग बेडरपणे करून वाचकांना स्तिमित करीत असतात. कथानकांचा ठरीव सांगाडा तर आपल्या कथेतून त्यांनी केव्हाच झुगारून दिला आहे. अनेक वेळा यांना रूढार्थाने कथा म्हणता येईल काय अशी शंका येण्याइतके 'गोष्टी' चे जोखड त्यांनी दूर केले आहे. विशिष्ट भाववृत्ती संक्रांत करणे हेच त्यांच्या कथेचे प्रयोजन दिसते. 'बिनचेहऱ्याची संध्याकाळ' यात रूढार्थाने कसली गोष्ट आहे? एक भाववृत्ती त्यांनी त्यातून साकार केली आहे. 'माणूस—परी—कासव' सारखी रूपक कथा सांगतांना नियती, मानवाची जगण्याची इच्छा आणि मानव यातील तिरंगा सामना ते रंगवितील. 'किडलेली माणसे' यात अनुभव सांगण्याच्या निराळयाच पध्दतीचा त्यांनी वापर केला आहे. 'पावसाळी हवा', 'वर्षा' इत्यादी कथा त्यांच्या प्रयोगशिलतेची साक्ष देतील. 'सत्यकथे'च्या दिवाळी अंकात (१९५५) प्रसिद्ध झालेली त्यांची 'काजवा' ही कथा त्यांच्या प्रतिभेच्या बेडर साहसीपणाची साक्ष देते. तंत्राच्या दृष्टीने अनिर्बंध आणि विमुक्त अशा या कथेत अफाट जीवनाचे व विक्राळ मरणाचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या या प्रयोगांच्या बेडर साहसीपणामुळे व जीवनाचा अनुभव घेण्याच्या त्यांच्या प्रतिभेच्या सामर्थ्यामुळे नवकथाकारांत गंगाधर गाडगीळ यांचेच नाव मानाने घेतले जाते.''[७] हे म.ना. अदवंत यांचे मत लक्षणीय आहे.

एकूणच गंगाधर गाडगीळांच्या कथा मोठया वैशिष्टपूर्ण आहेत. त्यांच्या कथेची मांडणी, अनुभव घेण्याची पध्दत, प्रयोगशिलता व मनोविश्लेषण या साऱ्याच बाबतीत त्यांची कथा वैशिष्टपूर्ण ठरते. मानवी मनातील कामवासनायुक्त विकृतीचे चित्रण करणे हा त्यांच्या आवडीचा विषय आहे. बरेचदा दडपल्या गेलेल्या भावभावनांचे चित्रण जसे त्यांच्या कथेत येते तसेच मानवी जीवनातील दारिद्रय, नीती कल्पना, रूढ समजुती याचेही चित्रण त्यांच्या कथेत येते. गाडगीळांच्या 'वारा भरलेला शिड', 'किडलेली माणसे', 'दुबळा' इत्यादी कथा वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

## निष्कर्ष

- गंगाधर गाडगीळांनी कथेच्या क्षेत्रात केलेल्या वेगवेगळ्या प्रयोगामुळेच त्यांना नवकथाकार म्हणून मान्यता मिळाली.
- त्यांनी मनाठी कथेला बंधनातून मुक्त करून आजवर कथेत न आलेल्या गोष्टी आणून मराठी कथेत वेगळेपणा आणला.
- विशिष्ट भाववृत्ती संक्रात करणे हेच त्यांच्या कथेचे प्रयोजन होते.
- त्यांच्या कथेतून मुख्यत्वे मध्यम वर्गाचे दर्शन घडते.
- मानवी मनातील कामवासनायुक्त विकृतीचे चित्रण करणे हा त्यांच्या आवडीचा विषय आहे.
- त्यांनी आपल्या कथेतून अफाट जीवनाचे व विक्राळ मरणाचे दर्शन घडविले आहे.
- गाडगीळांनी कथेला बंधमुक्त करून तिला नवजीवन देण्याचे कार्य केले.
- आत्यंतिक कल्पनाविलास त्यांच्या कथांमधून आढळतो.
- मानवी जीवनातील विसंगतीचा, विकृतीचा ते कडवट उपहास करतात.

## संदर्भ


१ म. ना. अदवंत – मराठी कथासाहित्य एक आलेख, निहारा प्रकाशन, पुणे, १९९३, पृ. २५.

२ डॉ. रा. गो. चवरे – मराठी कथा : प्रवृत्ती आणि प्रवाह, मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती, १९९५, पृ. ५७.

३ प्रा. दि. के. बेडकर – साहित्य, निर्मिती व समीक्षा, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, १९५४, पृ. १२६.

४ भालचंद्र फडके – सहा कथाकार (प्रस्तावना), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००२, पृ. २१.

५ प्रा. वा. ल. कुलकर्णी – वाङ्:मयीन दृष्टी आणि दृष्टिकोन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६७, पृ. ४७.

६ डॉ. शैलेश त्रिभुवन (संपादक) – मराठी कथा : चर्चा आणि चिकित्सा, मधील डॉ. कल्याणी दिवेकर यांचा लेख, पायल पब्लिकेशन, पुणे, २००६, पृ. १७.

७ म. ना. अदवंत – प्रदक्षिणा–खंड १ ला, कथावाड्.मय, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९३, पृ. १६९–१७०.


❖❖❖

# महात्मा फुल्यांची आदर्श समाजरचना

प्रा. दिलीप घोनमोडे
प्रा. डॉ. विजय रैवतकर
महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली

एक समाजसुधारक, एक कवी, नाटककार, आधुनिक मराठी साहित्याचे जनक, शूद्रातिशूद्रांचे कैवारी अशा अनेक विशेषणांनी महात्मा जोतीराव फुले यांची ओळख समस्त महाराष्ट्राला आहे. महात्मा फुल्यांनी येथील जुन्या समाजव्यवस्थेविरुद्ध विद्रोह केला, असे म्हणण्यापेक्षा येथील प्रतिकुल परिस्थितीनेच महात्मा फुल्यांना निर्माण केले. असे म्हणणे योग्य ठरेल.

## विचारधारेचा जन्म

१८१८ ला पुण्याच्या शनिवारवाड्यावर ब्रिटिशांचा युनियन जैक फडकला. इंग्रजी भाषेचे आगमन झाले. १८२७ ला महात्मा फुल्यांचा जन्म झाला. मेकॉलेच्या शैक्षणिक सुधारणा होण्याआधी १८१३ पासून ईस्ट इंडिया कंपनीने काही इंग्रजी शाळा काढणे सुरू केले होते. याच वेळी धर्माच्या ठेकेदारांकडून परांजपे नावाच्या मित्राच्या लग्नात महात्मा फुल्यांचा अपमान झाला. अज्ञानी शेतकऱ्यांची सरंजामदार, शेठ, सावकारांकडून केली जाणारी लूट, स्त्रियांवरील होणारा अत्याचार, सनातन्यांकडून अंधरूढी परंपरांचे कठोरपणे पालन हे केवळ धर्माच्या नावाने आणि ईश्वराच्या नावाने चालवले जाई. याला प्रतिकार करणे त्या काळी सोपे नव्हते, हजारो वर्षांपासून पिढयानपिढयांची परावलंबीपणाची मानसिकता बदलने सोपे नव्हते. अमेरिका ब्रिटिशांकडून लागलेले शोध, विदेशी ग्रंथाचे भारतात आगमन, थामस पेनचा राईटस आफ मॅन, निग्रोंचा उठाव, मार्क्सचा दास कॅपिटल, रेल्वे, तारायंत्रे, पोष्ट खाते, छापखाने, वीज इत्यादी जग बदलणाऱ्या अमेरिकन, इंग्लंडच्या शोधाचे भारतात झालेले आगमन, इंग्रजी राजवटीबरोबर इंग्रजी वृत्तपत्रे, नियतकालिके महाराष्ट्रात येऊ लागली. दिग्दर्शन, समाचार दर्पण इत्यादी वृत्तपत्रे इंग्रजीचे अनुकरणाने महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर निघू लागली. आणि पाश्चात्य विद्येने संस्कारित होऊन नव्या पिढीत कर्तृत्वमान माणसे तयार झाली. परशुराम गोडबोले, जगन्नाथ शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग इत्यादी भारतात विविधय वृत्तपत्र व नियतकालिके आणि संघटनांच्या माध्यमातून प्रबोधनास सुरूवात केली. बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' पत्र सुरू केले आणि महाराष्ट्रात नवे युग निर्माण करण्याचा प्रयत्न केला. १८४९–५० मध्ये दादोबा पांडुरंग तर्खडकर यांच्या प्रेरणेने 'मानवधर्मसभे'ची स्थापना झाली आणि त्यांनी सभेचे उद्देश जाहीर केले.

१. ईश्वर एक व तोच पूज्य आहे.
२. प्रत्येक मनुष्यास विचार करण्याचे स्वातंत्र्स आहे.
३. नित्य नैमित्तिक कर्मे विवेकास अनुसरून करावी.
४. साऱ्या मानवाची एकच जात आहे.
५. योग्य ज्ञान प्रत्येकास मिळाले पाहिजे.

महात्मा फुले आधुनिक शोधाने, विचाराने प्रभावित होणे स्वाभाविक होते. याबरोबरच वेगवेगळ्या धर्माच्या प्रसाराने आणि त्या धर्मातील समतामूल्यांचा प्रभाव महात्मा फुल्यांवर होता. यातूनच त्यांनी ख्रिस्ती व मुसलमान धर्माबद्दल सहानुभूती व्यक्त केली.महात्मा फुल्यांची विचारधारा तयार होण्यासाठी इंग्रजी शिक्षणाचे आगमन, नव्या सुधारणा, विविध धर्माचे भारताशी येणारे संबंध, नवे शोध, निग्रोंचा संघर्ष, मार्क्सची विचारधारा, मानवाधिकार, थॉमस पेनचा विचार यांचा प्रभाव व भारतीय वर्णव्यवस्थावादी पराकोटीची विषमतावादी, मनुवादी प्रथा, रूढी यांसारख्या बाबी त्यांची विचारधारा तयार होण्यास कारण ठरल्या. ''इंग्रजी विद्येमुळे आपण कोठे कमी पडतो, आपणात काय उणिवा आहेत आणि इंग्रज कसे श्रेष्ठ आहेत. याची जाणीव एतद्देशियांना झाली. परंतु त्याबरोबरच आपले हक्क कोणते हेही त्यांना कळू लागले.''[१] ख्रिस्ती धर्मातील आकर्षण तत्कालीन नवशिक्षितांना होतेच. परंतु आपल्या प्रचलित धर्मातील दोष दूर करून ख्रिश्चन धर्मातील स्वीकार्य बाबी आत्मसात करण्याचे नवशिक्षितांनी ठरविले. आणि त्या नवशिक्षितांत महात्मा फुले अग्रगण्य आहेत. यातून पुढे नवधर्म निर्माण करण्याची इच्छा सुद्धा अनेकांच्या मनात निर्माण झाली.

## मूळरहिवाशी आणि विदेशी ओळख

सर्वांना इंग्रजी शिक्षणातून जगाचा परिचय करून देणारे इंग्रज शत्रू नसून येथील मूळ रहिवाशांचे खरे शत्रू इराणी आर्य आहेत. स्त्रीशूद्रातिशूद्र यांना 'गुलामगिरीतून' मुक्त करण्यासाठी गुलाम कोण आणि कसे याचा महात्मा फुले गुलामगिरी या ग्रंथाच्या अर्पणपत्रिकेतूनच निर्देश करतात, ''युनायटेड स्टेट्स मधील सदाचारी लोकांनी गुलामास दास्यत्वापासून मुक्त करण्याच्या कार्यात औदार्य, निरपेक्षता व परोपकारबुद्धी दाखविली. वास्तव त्यांच्या सन्मानार्थ हे लहानसे पुस्तक यास परम प्रीतिने नजर करतो, आणि माझे देशबांधव त्यांचा या स्तुत्य कृत्याचा कित्ता आपले शूद्र बांधवास ब्राम्हणांच्या दास्यत्वातून मुक्त करण्याच्या कामात घेतील अशी आशा बाळगतो.''[२] यावरून अमेरिकेतील निग्रो प्रमाणेच भारतातील शूद्र हे ब्राम्हणांचे गुलाम आहेत. म्हणजे गुलामांचे आर्य ब्राम्हण हे शत्रू आहेत. हे शत्रू का आहेत याचे उत्तर सुद्धा महात्मा फुले गुलामगिरीच्या प्रस्तावनेतच देतात. ''या देशात भट लोकांचं राज्य होऊन सुमारे तीन हजार वर्षापूर्वीचा काळ लोटून गेला असावा, असे अनुमान होते. ते लोक परकीय देशातून येऊन या देशातील मूळचे राहणारे लोकांस जिंकून त्या सर्वांस त्यांना आपले दास केले व त्यास अनेक तऱ्हेची क्रूर शासने दिली. पुढे काही काळानंतर या लोकास या गोष्टीचे विस्मरण झालेसे पाहून भट लोकांनी परकीय देशातून या देशातील मूळचे लोकांस जिंकून दास केल्याचे मूळीच छपवून ठेविले.''[३] या विधानावरून येथील शूद्रांचे भट ब्राम्हण हे शत्रू आहे; ते या देशातील नाहीत, परदेशी आहेत; आणि त्यांनी येथील मूळ रहिवासी असलेल्या लोकांना गुलाम केले. म्हणून भट ब्राम्हण शूद्रांचे व अतिशूद्रांचेही शत्रू आहेत. असा निर्णय महात्मा फुले देऊन, या परकीय शत्रूंपासून मुक्ती मिळविण्याच्या जागृतीसाठी 'गुलामगिरी' सारखा ग्रंथ लिहितात व शूद्रातिशूद्रांना संघर्षासाठी शत्रूचा परिचय करून देतात. या शूद्रातिशूद्रांसोबत त्यांनी स्त्रियांचा सुद्धा समावेश केला.

## शूद्र कोण व कसे?

''आर्यांनी क्षत्रिया रनात जिंकिले। त्यांना दास केले। पिढीजादा
मत्सराने दासा म्हणाले ते शूद्र। अप्रभ्रंश शूद्र। त्याचा झाला''

(महात्मा फुले समग्र वाङ्मय, पाचवी आवृत्ती, पृ. ५५७)

हे शूद्र ब्राम्हण कोण याचे उत्तर देताना महात्मा फुले म्हणतात, ''वास्तविक विचाराअंती असे ठरते की, ब्राम्हण लोक हे समुद्राचे पलीकडेस जो इराण देश आहे, त्या देशातील मूळचे राहणारे होत. पूर्वी त्यास इराणी किंवा आर्य लोक म्हणत असत असे कित्येक ग्रंथकारांनी त्यांच्याच ग्रंथावरून सिद्ध केले आहे. प्रथम त्या आर्य लोकांनी मोठमोठया टोळया करून या देशात येऊन अनेक स्वाऱ्या केल्या व येथील राजांच्या मुलुखात वारंवार हल्ले करून मोठा धिंगाणा केला. पुढे वामनाचे मागून आर्य लोकांचा ब्रम्हा या नावाचा अधिकारी आला. त्याचा स्वभाव फार हट्टी होता. त्याने आपल्या कारकीर्दीत येथील आमच्या मूळ पूर्वजास जिंकून आपले दास केले; व त्याने आपले लोक आणि हे दास या उभयतांमध्ये हमेशा भेद राहावे म्हणून अनेक तऱ्हेचे नेम बांधिले. हया सर्व कृत्यावरून ब्रम्हा मेल्यानंतर आर्य लोकांच्या मूळच्या नावाचा आपोआप लोप होऊन त्याचे नाव ब्राम्हण पडले.''[४]ऋग्वेदामध्ये प्रथम तीनच वर्ण आहेत. आर्यांनी मूळ रहिवाशांना जिंकल्यानंतर ऋग्वेद लिहिला आणि त्याला कालांतराने पुरूषसुक्त नावाचे परिशिष्ट जोडून चौथ्या वर्णाची म्हणजे हरलेल्या मूळ रहिवाशांची शूद्र म्हणून गणना केली. नंतर मागाहून मनूसारखे अधिकारी आले आणि त्यांनी ब्रम्हा विषयी अनेक तऱ्हेच्या नवीन कल्पित गोष्टी रचल्या व त्या गोष्टी ईश्वरानेच निर्माण केल्या असा दासांच्या मनावर ठसा उमटावा म्हणून शेषशाईचे गारूड (शेषाच्या मस्तकावर पृथ्वी) रचले. आणि तत्संबंधाने सर्व ग्रंथाचे लेखन बनविले. यामध्ये महात्मा फुले यांच्या मतानुसार ब्राम्हण हेच आर्य होत. ते इराणी आहेत. त्यांनी एतद्देशीय लोकांना मानसिक गुलामित ठेवण्यासाठी *'कल्पनेचे देव कोरीले उदंड। रचिले पाखांड ग्रंथोग्रंथी।'* महात्मा फुल्यांचे हे आर्यासंबंधी विचार खोटे तर्कट म्हणता येत नाही. बहुतेक सर्वच संशोधकांनी आर्य विदेशी आहेत असे सिद्ध केले. लोकमान्य टिळकांनी तर 'आर्टीक्ट होमइन वेदाज' हा ग्रंथ लिहून आर्याचे निवासस्थान उत्तर धृवावर होते हे सिद्ध केले. त्यामुळेच महात्मा फुल्यांचा आर्य विदेशित्वाच्या सिद्धांतास बळकटी मिळते.

आपल्या 'अखंडादी' रचनेतून सुद्धा महात्मा फुले हेच मत मांडतात आणि आर्यांच्या आक्रमणापूर्वी येथील मूळ रहिवाशी कोण होते सांगतात. छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा त्यांनी १८६९ ला लिहिला. त्यात प्रस्तावनेत महात्मा फुले लिहितात, अती जुनाट यवनी व ग्रंड डफ, मॅरी वगैरे इंग्रज लोकांच्या बहुतेक लेखी आधारावरून ''कुणबी, माळी, माहार, मांग वगैरे पाताळी घातलेल्या क्षेत्र्यांच्या उपयोगी हा पवाडा पडावा असा माझा हेतू आहे.''[५] म्हणजेच कुणबी, माळी, माहार, मांग इत्यादी लोक हे मूळ येथील क्षेत्रपती म्हणजे

क्षेत्रिय होते. हे क्षेत्रपती म्हणजेच क्षेत्रिय होत. शेतकरी होत. हेच सांप्रत ''शेतकरी म्हटले म्हणजे त्याचे तीन भेद आहेत. शुद्ध शेतकरी अथवा कुणबी, माळी व धनगर. आता हे तीन भेद होण्याची कारणे पाहिली असता मूळचे जे लोक शुद्ध शेतकीवर आपला निर्वाह करू लागले, ते कुळवाडी अथवा कुणबी, जे लोक आपले शेतकीचे काम सांभाळून बागायती करू लागले ते माळी. व जे दोन्हीही करून मेंढरे, बकरी वगैरेचे कळप बाळगू लागले, ते धनगर. असे निराळ्या कामावरून प्रथम हे भेद उपस्थित झाले असावेत.''[६] आणि कुणबी, माळी, धनगर पूर्वी एकाच शूद्र शेतकरी जातीचे असावेत असे महात्मा फुले म्हणतात. यापैकी आर्यांचा वर्चस्व निमूटपणे मान्य करणारे शूद्र (तेली, माळी, कुणबी इत्यादी) ज्यांनी आर्यांचा प्रतिकार केला आणि हरले ते अतिशूद्र (महार, मांग, चांभार इत्यादी) व जे आर्यांच्या अत्याचाराने डोंगरा पहाडात, वनात जाऊन लपले, ते आदिवासी. अशी विभागणी सुद्धा महात्मा फुल्यांच्या साहित्यात मिळते. म्हणूनच महात्मा जोतीराव फुलेच्या मतानुसार आदिवासी शूद्र अतिशूद्र एकाच वंशाचे आहेत. या शूद्रातिशूद्रांना राजर्षी शाहू महाराज व महर्षी वि.रा. शिंदे यांनी 'बहुजन' (बहुसंख्यांक) म्हटले. या बहुजनात लोकशाही मूल्ये बुद्ध आणि बळीराजा काळापासून होती, असे महात्मा फुले व आंबेडकरांचे सुद्धा मत आहे. बहुजन समाजाची आर्थिक व सामाजिक पिळवणूक अभिजन (उच्चवर्णीय) वर्ग करतो. बहुजन विरूद्ध अभिजन हा संघर्ष महात्मा फुल्यांनी प्रथम सुरू केला आणि बहुजनांचा नायक बळीराजा हा शेतकरी किंवा क्षेत्रपती तर अभिजनांचा नायक परशुराम आणि वामन हा सत्तासंघर्ष सांगितला. यावरून महात्मा फुल्यांचे तत्कालीन विरोधक विष्णुशास्त्री चिपळुणकर हे अभिजनांचे प्रतिनिधी ठरतात.

## बळीराजा नायक

या शूद्रातिशूद्रांचा नायक बळीराजा होता. त्याची राजेशाही समतामूलक व लोकशाहीमूलक अशी असते. वामन नावाच्या कुलंग्याने कपटाने त्यास मारले. पुढे या बळीराजाच्या राजभूमीस महात्मा फुले 'बळीस्थान' असे संबोधतात. आणि आर्यांनी उद्ध्वस्त केलेले बळीस्थान परत मिळविण्यासाठी शूद्रातिशूद्रांना एका विचाराखाली आणण्याचा प्रयत्न करतात. बळीस्थानाची जिंकलेली सत्ता आपल्या हातात ठेवण्यासाठी कायद्याची व न्यायाची एक मतलबी चौकट आर्यांनी बनविली, ती मनुस्मृतीद्वारे. मनुस्मृती म्हणजे अभिजनांची शासनव्यवस्था होय. स्त्रिया शूद्र अतिशूद्र यांना निर्मिकाने बहाल केलेले सर्व हक्क व स्वातंत्र्य मनुस्मृतीने नाकारले. आणि ब्राम्हणांनी स्वत:साठी विशेष सवलती व देणग्यांचे कुरण मुक्त ठेवणारे विशेष हक्क राखून ठेवले. शूद्रातिशूद्रांना मानसिक गुलाम करण्याचे असे कपट कपटी आर्यांनी यशस्वी केले. या आर्यांच्या शासनातून मुक्त होण्यासाठी महात्मा फुले शूद्रातिशूद्रांना जागृत करतात. याविरूद्ध ब्रिटिश महाराणीकडे प्रश्न मांडून ब्राम्हणशाहीतून मुक्त होण्याचा मार्ग शोधतात.

सत्ता तुझी राणीबाई। हिंदुस्थानी जागृत नाही।
जिकडे तिकडे ब्राम्हणशाही। डोळे उघडून पाही।।

या ब्राम्हणशाहीचा नि:पात करण्यासाठी महात्मा फुले काही मार्ग शूद्रांना सूचवितात –

## ब्राम्हणशाही (मनुवाद) विरोध

महात्मा फुले यांनी ब्राम्हणशाहीची निश्चित व्याख्या केलेली नाही; परंतु ब्राम्हणाने स्वीकारलेली व्यवस्था ही ब्राम्हणशाही होय. गुलामगिरी या ग्रंथात आर्य द्विज आणि मनु यांनी निर्माण केलेली विषमतावादी व्यवस्था होय, असा निष्कर्ष निघतो. महात्मा फुल्यांनी अज्ञाना बरोबरच शेतकऱ्यांच्या शोषनास ब्राम्हणशाहीला जबाबदार मानले. धार्मिक अनुष्ठानापासून आर्थिक शेतसाऱ्यापर्यंत ब्राम्हण आपलीच तुंबडी भरतो. ब्राम्हणांनी वर्णव्यवस्थेवर आधारित समाजरचना निर्माण करून ती शेतकऱ्यांवर लादली. त्यामुळे कुणबी व शेतकऱ्यां अंतर्गत जातीव्यवस्था निर्माण होऊन रोटीबेटी बंद झाली. शेतकऱ्यांची एकता भंग झाली. ब्राम्हणशाहीने नव्या तऱ्हेचे देव दैत्य निर्माण करून त्यांची भीती दाखवून शेतकऱ्यांना नवग्रहाची भीती दाखविली. त्यांना लाचार व भयग्रस्त केले. महात्मा फुल्यांनी गुलामगिरी हा ग्रंथ ही शेतकऱ्यांच्या मुक्तीसाठी लिहिला.

''माळया कुणब्या बोध करूनी रात्री पोथ्या वाचिती।
भलतीच थाप देती। चिंध्यावर दक्षिणा घेती उघड नाडिती।।''[७]

त्यांच्या पिळवणुकीचे अनेक प्रकार आहेत, असे प्रा. ओटी व चौसाळकर सांगतात.

१. भट भिक्षुकीतून धार्मिक पिळवणूक उदा. अनुष्ठान, ऋतुशांती, वास्तुशांती इत्यादी
२. ब्रिटिश प्रशासनात असलेल्या भाऊबंद कारकुनांकडून पिळवणूक
३. व्याज बट्यातून सावकारी पिळवणूक
४. डोईजड शेतसारा व ब्रिटिश मालाच्या विक्रीतून होणारी दलाली

अशी विषमतावादी व शोषणाभिमुख व्यवस्था म्हणजे ब्राम्हणशाही होय, असे महात्मा फुले यांना वाटते.

## सत्तेअभावी मानसिक गुलामी

शूद्रातिशूद्रांना सत्तेचे कुठलेही पाठबळ नाही. बळीराजाच्या काळात त्यांना लोकशाही होती. त्यामुळे सुख समाधान होते. बळीराजाच्या हत्येनंतर वर्णव्यवस्थेमुळे शेतकऱ्यांचे सर्वाधिकार हिसकावले गेले. व शेतकरी शूद्र होऊन देशोधडीला लागला. असे महात्मा फुले म्हणतात.

वर्णव्यवस्थेच्या ओझ्याखाली हजारो वर्ष दबल्यामुळे शूद्रातिशूद्रांना शिक्षणाबद्दल विसर पडला. व शिक्षण घेणे म्हणजे पाप करणे ही भावना त्यांच्यात निर्माण झाली. आजही शेतकऱ्यांनी शिकून काय करायचे असा प्रश्न शेतकरी विचारतात. तेव्हाही त्यामागे नीचपणाची हीच मानसिक गुलामी कार्यप्रवण असते, असे म्हटले पाहिजे. आपला कुणीच कैवारी नाही ही नैराश्याची भावना शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली. याला कारण हजारो वर्षांच्या गुलामीचे जगणे हेच आहे.

## उपाय योजना

शूद्रातिशूद्र सत्तेअभावी, अधिकारा अभावी व स्वातंत्र्या अभावी असे रसातळाला पोचले. एवढेच महात्मा फुले सांगून थांबलेले नाहीत तर त्यांच्या मुक्तीच्या उपाययोजना सुद्धा त्यांनी आपल्या ग्रंथातून सांगितल्या.

## ज्ञान संपादन करणे

या सर्व क्षेत्रात शेतकऱ्यांचे, शूद्रांचे शोषण होते; परंतु आपले कसे शोषण होते. याची थोडीशीही कल्पना शेतकऱ्यांना नाही याचे कारण म्हणजे अज्ञान हे आहे.

"ब्राम्हणाचे वेद मैदानी आणाना। वाचून दावा ना। सर्व जगा।।"

आपल्या 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथाची सुरुवातच 'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतिविना गती गेली, गतीविना वित्त गेले, इतके सगळे अनर्थ अविद्येने केले' हे शेतकऱ्यांच्याच मुक्तिसाठी नव्हे का? कारण क्षेत्रपती, शेतकरी म्हणजेच माळी, कुणबी, तेली इत्यादी शूद्र जाती होत. या सर्वांनी ज्ञान घेतल्याशिवाय ब्राम्हण व ब्राम्हणशाहीतून मुक्ती नाही. कारण अज्ञानामुळे या शुद्रांना आपण गुलाम आहोत. याची सुद्धा जाणीव होत नाही. ब्राम्हण, सरंजामदार व शेट सावकार या शेतकऱ्यांना कर्ज देतात. कर्जाच्या मोबदल्यात खोटे कर्ज खाते लिहून शेतकऱ्यांना देशोधडीला लावतात.

## इंग्रजांचे शत्रूत्व नको

"अंत्यजांनो तुम्ही उपकार स्मरा। पोटी गच्च धरा। इंग्लिशास
आर्यहितासाठी त्या नॅशनल सभा। शूद्रादिका शोभा। कैसी राहे
गोऱ्या लोका घ्यावे। सभेमध्ये जावे। हाणून पाडावे। ब्रम्हकुट"[८]

महात्मा फुल्यांनी इंग्रजांचे शूद्रातिशूद्रांवर अनंत उपकार आहेत. ते म्हणजे आपल्याला त्यांनी शिक्षणाची दारे मोकळी करून शिक्षण दिले. ज्ञानी बनविण्याचे कार्य केले. म्हणून शूद्रांनी इंग्रजांचे उपकार मानलेच पाहिजे आणि इंग्रजी शासनाविरुद्ध बंडखोरी करू नये आणि जे कोणी इंग्रजी शासनाविरुद्ध बंडखोरी करतील अशा मंगल पांडे, तात्या टोपे इत्यादी लोकांना सहकार्य करू नये असे म्हटले. यामुळे महात्मा फुल्यांना इंग्रज धार्जिणे, रेवरण्ड ख्रिस्ती झालेले अशी दूषणे पुण्याच्या चिपळूणकर कंपूने केली; तरीही मात्र महात्मा फुल्यांनी इंग्रजांविरूद्ध काही राजकीय बोलल्याचे त्यांच्या साहित्यातून स्पष्ट होत नाही. महात्मा फुल्यांनी ब्रिटिश सत्तेचे आणखी दुसऱ्या कारणासाठी समर्थन केले. ते म्हणजे हजारो वर्ष वैदिकांची, पेशव्यांची सत्ता भारतात होती. तेव्हा पेशव्यांनी शूद्रातिशूद्रांचे अतोनात शोषण केलेले होते. पांडे, फडके इत्यादी लोकांची बंडखोरी यशस्वी होऊन भारताला स्वातंत्र्य मिळाले; तर पुन्हा भारतात पेशवेशाही निर्माण होईल. इंग्रजी सत्तेत शूद्र थोडा मुक्तीचा श्वास घेत आहेत. ती मुक्ती पुन्हा ब्राम्हणशाहीच्या रूपाने भारतात निर्माण होईल. पुन्हा शूद्रांवर गुलामी येईल. असा संशय पांडे, फडके इत्यादी बंडखोरांच्या कारवाहयावर होता. म्हणून या तथाकथित उठावदारांची समर्थने शूद्रादी शेतकऱ्यांनी करू नये, असे महात्मा फुल्यांना वाटते. महात्मा फुल्यांनी देशद्रोही, इंग्रजाळलेले अशा प्रकारच्या टिका सहन केल्या, परंतु बंडखोरांचे समर्थन केले नाही. ब्रिटिश सत्तेच्या काळात मात्र सरकारी सगळी पदे ब्राम्हण बळकावून बसले होते.

## आदर्श नवी व्यवस्था

धर्म राज्य भेद मानवा नसावे। सत्याने वागावे ईशासाठी।।
ख्रिस्त महंमद। मांग ब्राम्हणासी। धरावे पोटाशी बंधुपरी।।

निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक। भांडणे अनेक कशासाठी।।

वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थेवर आधारित उच्चनीचता नष्ट करण्यासाठी महात्मा फुले शूद्रातीशूद्रांच्या मुक्तीची नवी व्यवस्था सांगतात. या नव्या व्यवस्थेत धर्माची बनवेगिरी नसावी. आपल्या परिश्रमाने सर्वांनी सर्व वस्तूंचा उपभोग घ्यावा. सर्वांनी बहिण भावंडांप्रमाणे वागावे आणि या सर्वांनी स्वत:स एकाच निर्मिकाचे वंशज मानावे, अशी महात्मा फुले यांची व्यवस्था होती.

## विश्वकुटुंब

वरील समतामूलक व्यवस्थेव्यतिरिक्त प्रत्येक कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला धर्म स्वातंत्र्य असावे. ''कोणत्याही कुटुंबातील एका मानव स्त्रीने बौद्ध धर्मी पुस्तक वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास तिने तो धर्म स्वीकारावा व त्याच कुटुंबातील तिच्या पतीने जुना व नवा करार वाचून त्याच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास तिने ख्रिस्ती व्हावे... कन्येने कुराण वाचून पाहिजे असल्यास तिने महंमदी धर्मी व्हावे... आणि पुत्राने सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक वाचून सत्यधर्मी व्हावे.''[९] जोतीबांच्या विश्वकुटुंब वादाचा 'सार्वजनिक सत्यधर्म' हा जाहीरनामा होय हा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केलेला गौरव सार्थ आहे.

## स्वातंत्र्य

महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म ही नवी व्यवस्था निर्माण केली. आणि त्यात द्वेषभावनारहित स्वातंत्र्य दिले. प्रत्येक व्यक्तीने निर्मिकाला दिलेला जन्म सर्वांसाठी सारखा समजून प्रत्येक वस्तूंचा उपभोग घेण्यास समान स्वातंत्र्य असले पाहिजे असे महात्मा फुले यांना वाटते.

## श्रमिक शेतकऱ्यांचे राज्य

जुन्या जीर्ण विषमतावादी रचनेला बदलून श्रमिकांचे राज्य आणण्याचे स्वप्न महात्मा फुले यांचे आहे. या श्रमिकांच्या सत्तेत सर्वांसाठी शिक्षण, सर्वांसाठी नोकरभरती व सर्वांसाठी शेतीविकास असेल. अशा प्रकारच्या व्यवस्थेला महात्मा फुलेंच्या स्वप्नातील आदर्श राज्य म्हटले पाहिजे. या आदर्श राज्यात शूद्रातिशूद्रांना सक्तीचे प्राथमिक शिक्षण असेल. शेतकऱ्यांमधील मुलांना शिकवून नवा शिक्षक वर्ग तयार करावा जेणेकरून शूद्र शेतकऱ्यांना ब्राम्हण शिक्षकावर अवलंबून राहावे लागणार नाही. शिक्षण केवळ नोकरी मिळविण्यासाठी नसून ते व्यवसायाभिमुख असायला पाहिजे. सर्व जातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सरकारी नोकऱ्या मिळाव्या अशी व्यवस्था तयार करण्याचे महात्मा फुल्यांचे स्वप्न होते.

## सारांश

एकूणच महात्मा फुलेंनी सांगितल्याप्रमाणे आर्य ब्राम्हण हे विदेशी आहेत. आपल्या आक्रमणकारी कृतीने त्यांनी येथील मूळ रहिवाशांना जिंकून दास केले. त्यांना शिक्षण बंदी केली आणि ही व्यवस्था देवाने केली, असे खोटे मत बिंबविण्यासाठी धर्मग्रंथ निर्माण करून कायमचे गुलाम केले. त्यांचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक सर्व प्रकारचे शोषण केले. ही व्यवस्था बदलायची असेल तर शेतकरी शूद्रातिशूद्र यांची एकजूट करून निर्मिकाच्या इच्छेप्रमाणे विश्वकुटुंब पध्दतीने आदर्श समाज उभारले पाहिजे. हीच शूद्रातिशूद्रांच्या गुलामी मुक्तीची आदर्श रचना असेल.

## संदर्भ

१. डॉ. सदानंद मोरे, शोधाच्या नव्या वाटा, पृ. ३७.
२. महात्मा फुले समग्र वाङ्मय, संपा. य. दि. फडके, पाचवी आवृत्ती, पृ. ११६.
३. तत्रैव, पृ. १२९.
४. तत्रैव, पृ. १४३.
५. तत्रैव, पृ. ४१.
६. उ. नि. शोधाच्या नव्या वाटा, पृ. ३७.
७. तत्रैव, पृ. ८५.
८. तत्रैव, पृ. ९६.
९. उ. नि. महात्मा फुले समग्र वाङ्मय सार्वजनिक सत्यधर्म, पृ. ५०४.

❖❖❖

# संत तुकाराम यांचे स्त्रीविषयक विचार

डॉ. विशाखा वंजारी
मराठी विभाग प्रमुख
महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली
ई. मेल– viswanjari@gmail.com भ्रमणध्वनी ९४२१७३०८६४

महाराष्ट्राला श्रेष्ठ अशा संत, महात्मे व समाजसुधारकांची पार्श्वभूमी व परंपरा लाभली आहे. अगदी संत ज्ञानेश्वरापासून तर रामदासादी संतद्वयांनी आपली आध्यात्मिक, धार्मिक व सामाजिक भूमिका मांडताना क्रांतिकारक वैचारिक प्रबोधनाचे कार्य केल्याचे दिसते. सामाजिक जीवनाच्या व त्यातून उद्‌भवलेल्या समस्यांच्या संदर्भात या संतद्वयांनी समाजाला कालानुरूप मौलिक असे मार्गदर्शन केले. त्यांच्या या मौलिक मार्गदर्शन व कार्यामुळेच महाराष्ट्रातील जनमाणसांची नैतिक परंपरा व येथील संस्कृती बऱ्याच अंशी जपली गेली असल्याचे म्हणावे लागते. यादृष्टीने विचार करता संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे विचार व कार्य सुद्धा तेवढेच महत्त्वाचे ठरतात.

## संत तुकारामकालीन परिस्थिती व त्यांचे कार्य

संत तुकाराम कालीन परिस्थिती ही रूढी–परंपराग्रस्त होती. रूढी–परंपरा ह्या सामाजिक जीवनाचे नियंत्रण व जीवन सुस्थिर करण्याचे प्रभावी साधन असल्या, तरी तत्कालीन काही रूढी–परंपरा मात्र समाजाला अत्यंत घातकही होत्या. संत तुकाराम कालीन अशाच काही जीवघेण्या रूढी–परंपरांनी व कर्मठांच्या कडक बंधनांनी समाजजीवन त्रस्त झाले होते. अशा या धर्मग्लानीच्या काळात संत तुकारामानी समाजातील पाखंडावर टीकेचे प्रहार करून, समाजात खऱ्या मानवधर्माची गुढी उभारण्याचे महत् कार्य केले.जाती–धर्म भेदापासून निर्माण झालेली उच्चनीचतेची भावना जपली गेल्याने भेदाभेद सुरू होऊन, समाजाचे सांस्कृतिक व सामाजिक पर्यावरण आजारग्रस्त झाले होते. अशावेळी ''बुडती हे जन न देखवे डोळा'' असा भाव प्रकट करीत समाजकंटकांचे निर्दालन करण्याकरिता संत तुकारामाने हातात हरिनामाचे बाण घेऊन सामाजिक समतेचा स्वीकार, पुकार नि पुरस्कार केला. त्यांनी आपल्या अभंग, भजन व कीर्तनांतून राजकीय, धार्मिक व सामाजिक बाबींवर प्रकर्षाने प्रकाश टाकला. त्यांनी समाजातील सर्व स्तराच्या जनमाणसांचा विचार करून समाजप्रबोधनाचे कार्य करताना खऱ्या लोकशिक्षकाची भूमिका बजावली. या भूमिकेत त्यांनी स्त्री व स्त्रीसुधारणा विषयक विचारांनाही तेवढेच महत्त्वाचे स्थान दिले.

## स्त्री–पुरुष समानतेचा विचार

परंपरागतआपल्या समाजात स्त्रियांना 'चूल आणि मूल' ह्या संकुचित क्षेत्रात संपुष्टात ठेवल्या गेले असले, तरी कुटुंबाप्रती मात्र ती महत्त्वपूर्ण अशी भूमिका पार पाडत आलेली आहे. जरी आज स्त्री–पुरुषांना समान हक्क, समान संधी व समान दर्जा प्राप्त झाला असला, तरी आपल्या सामाजिक जीवनात मात्र स्त्रीला नेहमीच पुरुषापेक्षा कनिष्ठ समजून त्यानुसार तिला वागविण्याची प्रवृत्ती होती. तिला केवळ एक भोगवस्तू किंवा गुलाम समजून समाज बंधनात जखडून ठेवण्याचा प्रयत्न केला. अशा समाजाला संत तुकाराम विचारतात –

''काय देवे देवता भिन्न केल्या? ऋषि पत्न्या नव्हत्या सांभाळिल्या?
काय महिलात साध्वी नाही झाल्या? पहा पुराणी मागच्या''

स्त्रियांनी वेद लिहिले, त्या नाना विद्या कलांमध्ये प्रवीण झाल्या, प्रसंगी युद्धात उतरल्या; तेव्हा अशा वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या स्त्रीजातीला समाजाने बंदिस्त करू नये, तिची अवहेलना करू नये. तर याउलट तिला पुरुषासहसमानतेने गौरवाचे स्थान द्यावे. पुरुषांप्रमाणेच तिचाही सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने प्रयत्न कले जावेत हे सांगताना तुकाराम महाराज म्हणतात –

''समाजी जो पुरूषासि आदर। तैसाचि महिलांशी असावा व्यवहार
किंबहुना अधिक त्यांचा विचार। झाला पाहिजे समाजी''

वास्तवत: ती पुरुषाची गुलाम नसून सहधर्मचारिणी आहे. तेव्हा उभयतांनी जीवन कंठतांना परस्परांच्या सुखदु:खाचे वाटेकरी होऊन, समानतेने वावरणे नितांत गरजेचे असल्याचे संत तुकाराम सांगतात.

त्यांनी समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी व्यक्तीतील गुणांना महत्त्व देऊन, गुणांनुसार कर्मविभाजनाचा सिद्धांत सांगितला. भेदाभेद हा अमंगळ भ्रम आहे. असे सांगतांना त्यांनीपरोपरीने सामाजिक समतेचा उद्घोष केला.

## स्त्रियांचे पारमार्थिक कार्यातील स्थान

संत तुकाराम महाराजांनी जन्मावरून प्राप्त होणारा श्रेष्ठकनिष्ठपणा घालविण्यास गुणाधिष्ठित समाजरचनेचा आग्रह धरला. म्हणूनच तर ''अंतरी निर्मळ, वाचेसा रसाळ। त्यांचे गळां माळ, असो नसो'' असे संत तुकाराम म्हणतात. त्यांनी भक्तीचा मार्ग सर्वांससमान अधिकाराने उपलब्ध करून दिला. स्त्रीशूद्रादी ब्राम्हणांना भक्तीचे द्वार सदैव खुले असल्याचे सांगितले. धर्माच्या कल्पनेत स्त्री जरी जगन्माता असली, तरी तिला कोणत्याही धार्मिक विधीचे अनुकरण करण्याचा अधिकार नव्हता. तेव्हा ''सकळासी येथे आहे अधिकार। कलियुगी उद्धार हरिच्या नामे'', असे त्यांनी सांगितले. एवढेच नव्हे तर –

''ब्राम्हण क्षत्रिय वैश्य शूद्र। चांडाळाहि अधिकार।
बाळे नारी नर। आदिकरूनि वेश्याही''

ह्या अभंगातून त्याचा स्पष्ट उच्चार करताना, समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा विकृत दृष्टिकोन व रूढ समजुती बदलण्याचा क्रांतीकारी प्रयत्नही केला. हीच क्रांती लिंगभेदनिरसन करण्यास आणि विशेषत: पुरूषवर्गाकडून स्वत:च्या उच्छृंखल वृत्तीच्या परिमार्जनार्थ स्त्रीजातीची विटंबना करण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्यास व स्त्री समाजास पारमार्थिक जीवनात समानतेचे स्थान देण्यास कारण ठरली. एवढेच नव्हे तर पुरूषांप्रमाणे स्त्रियांच्याही संघटना असाव्यात. त्यांचे मेळावे भरावेत व त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा असे विचारही त्यांनी व्यक्त केले.

## स्त्रीविषयक रूढी–प्रथा–परंपरांवर टीका

महाराष्ट्रातील संत परंपरेने समाजातील कुजलेल्या कल्पनांचा नेहमीच विध्वंस करून अनिष्ट चालीरीतींना व वाईट रूढी–प्रथांना कालोचित वळण लावण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच संबंधातील संत तुकारामांचा हा प्रयत्न म्हणजे फार मोठे समाजकार्यच होय म्हणावे लागेल. त्यांनी व्रत वैकल्ये, अंधश्रद्धा, विवाह पद्धती, हुंडा पद्धती, विधवा विवाह यासारख्या बाबींवर घणाघाती प्रहार करून समाजोपदेश केला.

## स्त्रीत्वाची महती व गौरव

संत तुकाराम स्वत: संसारी पुरुष असल्याने, त्यांनी प्रापंचिक जीवनाच्या दृष्टीने स्त्रीचे महत्त्वाचे स्थान मान्य केले. मात्र तिचा हव्यास बाळगणे त्यांनी निषेध मानला. वास्तवत: तुकारामांविषयी बऱ्याचदा म्हटल्या जाते की, त्यांनी स्त्री जातीची निंदा केली आहे; परंतु स्त्रीला 'माऊली'चा मान देणारे संत तुकाराम आपणास विसरून चालता येत नाही. त्यांचे काही अभंग हे स्त्री निंदा विषयक भासत असले, तरी त्यांचे स्वरूप हे तसे नसून ते अभंगस्त्रीच्या अनासक्तीविषयी उपदेश करणारे आहेत. ते स्त्रीच्या पतिव्रता स्त्री व माता अशा दोन भूमिका मांडतांना, त्या संबंधी म्हणतात–

''तुका म्हणे मायबापे। अवघे देवचि स्वरूप''

आणि

''तुका म्हणे पतिव्रता। तिची देवावरी सत्ता''

स्त्री ही देखील पुरुषाप्रमाणेच समाज जीवनातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण घटक असून, तिलादेखील पुरुषाप्रमाणेच स्वतंत्र अस्तित्व व एक वेगळे व्यक्तित्व आहे. म्हणून तिचा गौरव केला जावा. कारण–

''जिच्या हाती पाळण्याची दोरी। तीच जगाते उद्धारी
ऐसी वर्णिली मातेची थोरी। शेकडो गुरूहूनिही
मातेच्या स्वभावे पुत्राची घडण। त्यास उज्जल ठेवी तिचे वर्तन
स्त्रीच्या तेजावरीच पुरूषाचे मोठेपण। ऐसे आहे''

## समाज शुद्धीकरण

संत तुकाराम महाराज म्हणतात,प्रत्येक त्या परस्त्रीविषयी मनुष्याच्या मनात नेहमीच शुद्ध भाव असला पाहिजे.तिलाआपल्या माते समान मानून, तिचा आदर केला पाहिजे. मात्र जात्याच मनुष्य स्वभाव विषय

वासनेच्या आहारी जाऊन, शेवटी आपला अध:पात करून घेतो. परस्त्री पाहिली की, त्याला कामरूपी पिशाच्च पछाडून टाकतो. हे समाजधारणेच्या आणि समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने विघातक आहे. म्हणूनच तुकाराम महाराज समाजातील पुरूषांना उपदेश करतात की —

''परद्रव्य परनारीचा अभिळास। तेथोनिया ऱ्हास सर्व भाग्या।।''

परनारीची अभिलाषा टाळून मनुष्याने सदाचार संपन्न राहावे. स्त्रीलंपटता सोडून देऊन उत्तम व्यवहार केल्यास, आपला संसार सुखाचा होऊ शकतो. तेव्हा ''पराविया नारी रखुमाई समान। हे गेले नेमून ठायीचेंचि।'' किंवा ''परस्त्रीया सदा बहिणीमाया'' म्हणत स्त्रियांकडे पाहण्याच्या विकृत दृष्टिकोणाला आपल्या तत्वविचाराने संत तुकाराम महाराज तिलांजली देतात. एवढेच नव्हे तर स्त्रियांनी सुद्धा पुरूषांना नादी लावण्याचे दुष्कृत्य करून नये, याचीही ते जाणीव करून देतात.

## शुद्ध चारित्र्य संपन्नता

संत तुकारामांच्या मते, स्त्रीने पतिव्रता धर्माने चालावे, आपले शील सांभाळण्याचा परोपरीने प्रयत्न करावा, धर्म कार्यात पतीला अनुकूल असेचवागावे, गृहकृत्ये नीट करावीत व आपली कुटुंबे नेमाणे सांभाळावित, तुळशीची व गाईची नित्य पूजा करावी, पाहुण्यांचे अगत्य करावे, मुलाबाळांना योग्य संगोपन करून हरीभजनाचे वळण लावावे. इतकेच नव्हे तर कुलवती स्त्रीने आपले चारित्र्य शुद्ध राखण्यासाठी प्रसंगी प्राणही द्यावा. आपले शीलभ्रष्ट होऊ देऊ नये. त्यांनी ''पतिव्रते जैसे भ्रतार प्रमाण'' या तत्वानुसार सतीचे मुख्य व्रत म्हणजे पातिव्रत्य व्रत प्रामुख्याने पाळावे.

त्याचप्रमाणे सात्विक, सुशील स्त्रीने भ्रष्ट स्त्रीच्या संपर्कात जाऊ नये. कारण अशा स्त्री मुळे ती सुद्धा आचारभ्रष्ट होऊ शकते. आणि नंतर एकदा डागाळलेल्यालक्ष कोटीच्या सोन्याला जसे भाव मिळत नाही. अगदी तसेच या स्त्री संदर्भातही घडते. तेव्हा ''तुका म्हणे मना पाहिजे अंकुश। नित्य नवा दिस जागृतीचा'', या तत्परतेने अहोरात्र मनावर जागता पहारा ठेवला, तरच अंत:प्रामाण्य हितकारक ठरू शकेल असा ते उपदेश करतात. कारण त्यांनी स्त्री—पुरूषांचे नैतिक चारित्र्य शुद्ध असल्याशिवाय कोणत्याही संसाराची, कुटुंबाची व पर्यायाने समाजाची प्रगती होऊ शकत नाही.हे तत्कालीन समाजाची अध:पतित अवस्था पाहून जाणले होते.

## स्वाधिकाराचा सुयोग्य वापर

स्त्रीविषयक आपले विचार व्यक्त करतांना संत तुकारामांनी स्त्री स्वभावाचे काही गमतीदार नमुने सांगितले आहेत. एक सासू पंढरपुरास जायला असता तिचे मन घरातच घुटमळत असल्याने, ती वेशीवरून वापस येते. आणि आपल्या सुनेला काही उपदेश करते. यावरून वृद्धापकाळी देखील स्त्रियांना संसाराची आसक्ती सुटत नसल्याचे ते मोठ्या मार्मिकतेन पटवून देतात.

तर दुसरीकडे कोणी एक सून आपल्या कुटुंबातील सासू, जावा, दीर, नणंदांसंदर्भात नवऱ्याजवळ कुरकुर करून, शेवटी त्याला स्पष्ट सांगायला लागते की, ''वेगळे निघता संसार करीन। नाही तरी प्राण देते आता।''. अशा सासरच्या लोकांविरूद्ध नवऱ्याचे मन कलुषित करून कुटुंबातून विरक्त व्हायला सांगणाऱ्या जहाबाज स्त्रीचे चित्र रेखाटले आहे. मात्र अशा बायकोच्या आहारी जाऊन, तिच्या तालावर नाचणाऱ्या, स्वत:ची बुद्धी गहाण टाकून बायकोच्या आधीन झालेल्या नवऱ्यावर प्रखर टीका करतांना संत तुकाराम महाराज म्हणतात —

''तुका म्हणे केला रांडेने गाढव। मनासवे धाव घेतलीसे।''

खरे तर संसारात प्रत्येकांनी आपल्या अधिकार व पदाचा सुयोग्य वापर करणे गरजेचे असते. अन्यथा त्यांच्या दुरुपयोगाने नाती व संसार नासतात, हा उपदेश संत तुकारामांना याद्वारा द्यायचा आहे. यावरून त्यांचे कौटुंबिक जीवनाचे व नात्यांचे निरीक्षण अतिशय सूक्ष्म असल्याची जाणीव व्हायला लागते.

## व्यवहारदक्षता व कर्तव्यदक्षता

एक मूर्ख स्त्री आपल्या शेजारणीशी भांडून तिच्या रागाने आपले घर उघडे टाकून तशीच चालती झाली. तिच्या पश्चात तिच्या घरात कुत्री शिरली. एका अमंगळ स्त्रीने तिच्या लुगड्यात अतिशय उवा झाल्यामुळे त्या रागाच्या भरात तिने आपले लुगडेच फाडून टाकले. त्यामुळे सर्व लोकांनी तिला नागवे पाहिले. एका कानडी स्त्रीने एका मराठी भाषिक पुरुषाशी विवाह केला. मात्र भाषा भिन्नतेमुळे त्यांचे एकाचे बोलणे दुसऱ्यास कळत नव्हते. अशी परस्पर विसंगत जोडी असल्यास सुखाऐवजी दु:खच पदरी पडते. यावरून मानवी जीवनात विसंगती, विकृती व विषमता कशी पदोपदी संचार करीत आहे. त्यामुळे मंगल असलेले मानवी मन व जीवन

कसे अमंगल होत आहे, याची जाणीव तुकाराम महाराज करून देतात. तेव्हा व्यवहारदक्ष नसलेल्या अशा व्यक्तींवर संत तुकाराम आपल्या अभंग व कीर्तनात विनोद करून कर्तव्यदक्षतेची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करतात.

त्याचप्रमाणे त्यांच्या विचारात विधवा स्त्रियांविषयी सहानुभूती व आदराची भावना असल्याचेही दिसते. पतिनिधनानंतर अशा विधवा स्त्रियांनी अगदी साधेपणाने जीवन जगावे, असे त्यांना वाटते.म्हणूनच शृंगार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अशा विधवांची ''कां गे नट नटवा। दिमाख हा कोणा दावा।'' अशा शब्दात चांगलीच कानउघाडणी करतात. पुढे तर ते त्या विधवा बाईला उद्देशून विचारतात की, ''कुंकवाची ठेवाठेवी। बोडकादेवी कशाला।''.म्हणजेच एकीकडे त्यांनी विधवा विवाहाचा आवर्जून पुरस्कार केला असला, तरी प्रसंगी अनुचित प्रसंगी समाज हिताच्या दृष्टीने त्यांना व्यवहारदक्षतेची व कर्तव्यदक्षतेची जाणीव करून द्यायलाही ते विसरत नाहीत.

## लौकिक घटनांतून अलौकिकाचा बोध

स्वत:च्या पोटचा गोळा या भावनेने आई आपल्या अपत्याचे संगोपन करते. आपल्याच रक्तामासांचा एक जीव म्हणून तादात्म्यतेने त्याच्यावर मायेची पाखर घालते. मुलाचा आईच्या प्रेमावर निसर्गत:च हक्क असतो. त्या स्नेहसंबंधात उपकाराचा किंवा मेहरबानीचा प्रश्न उद्भवत नाही. आणि म्हणूनच त्या स्नेहसंबंधाशी परोपरीने प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न केला जातो.मात्र त्या स्नेहसंबंधांशी दुराव्याची वेळ येते तेव्हा आत्मशोध सुरू होतो.

''कन्या सासुरासी जाये। मागे परतोनी पाहे'' किंवा

''चुकलिया माये। बाळ वेळोवेळा पाहे''

नवविवाहित वधू सासरी जायला निघाली असता, माहेराच्या वियोगाच्या व्यथेने तिचे मन थरारून जाते. आता माहेरचे जीवन व तेथले हसते खेळते आयुष्य संपले असून,आता सासरची जबाबदारी अंगावर पडणार आहे.तेव्हा या विचारांनी तिच्या जीवाची घालमेल होऊ लागले. त्यामुळे माहेर सोडतांना तिची पाऊले अडखळतात, नजर वारंवार मागे वळते. माहेराची तीव्र आसक्ती तिच्या मनात जागृत होते. त्याचप्रमाणे यात्रेच्या गर्दीत आईपासून दूरावलेले, हरवलेले मूल जसे भिरभिरत्या नजरेने फक्त आईलाच शोधते. अगदी तशीच अवस्था परमेश्वराच्या ओढीने आपल्या जीवाची सुद्धा होते.जीवनातल्या अशा साध्या पण हृदयस्पर्शी अनुभवांनी तुकाराम महाराज हया लौकिक अनुभूतीतूनच नकळत अलौकिक अनुभूतीचा बोध करून देतात. स्वानुभवातून लौकिक – अलौकिकाची सांगड घालतांना कदाचित तुकाराम महाराजांना समाजोद्धाराच्या दृष्टीने नैतिकतेला धार्मिकतेची जोड देण्याची गरज भासली असावी. म्हणूनच त्यांनी आपल्या अभंग व कीर्तनांतून लौकिक घटनांतून अलौकिकाचा बोध देण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसते.

## अंधश्रद्धेविषयी प्रबोधन

कामनापूर्तीसाठी लोक विशेषत: स्त्रिया विविध देवदेवतांना नवस बोलणे, ग्रामदेवतांच्या संतुष्टीसाठी अघोरी उपाय करणे, नवस फेडणे यासारखी कृत्ये करतात. तेव्हा तुकाराम महाराज अशा अधम मार्गाने जाणाऱ्या सामान्यांना परखड शब्दात खडसावताना म्हणतात–

''करीति बेटे उसणवारी। यमपूरी भोगावया।।
सेंदराचे दैवत केल। नवस बोले तयासी।।''

एक मूर्ख स्त्री दगडाला शेंदूर फासून त्याला देव समजायला लागते. मग त्यापुढे 'मला मुलंबाळं होऊ दे' यासारखे नवस बोलते. अशी ही मनोकामना व नवसाची विकृती सुंदर जीवनाला कुरूप करणारी आहे. म्हणूनच यावर संत तुकाराम महाराज ''नवसे कन्यापुत्र होती। तरि कां करणे लागे पती।।'', असा प्रश्न विचारतात.

त्याचप्रमाणे ग्रामीण – आदिम परिसरात आजही बुवाबाजी, भगत, मांत्रिक तांत्रिक यांची चलती असल्याचे दिसते. भविष्य सांगणाऱ्या नि शकुनाचा कौल देणाऱ्या या ढोंगी जटाधाऱ्यांचा भाबडया लोकांवर विशेषत: स्त्रियांवर एवढा प्रभाव आहे की, या पिडाग्रस्त मंडळी डोळेझाकपणे त्यांच्या म्हणण्यानुसार वागायला लागतात. अशा प्रवृत्तीच्या लोकांचा तुकाराममहाराज धिक्कार करतात. कारण ही मंडळी –

''डोई वाढवूनि केश। भूते आणिती अंगास।।१।।''

''मेळवूनि नरनारी। शकुन सांगती नानापरी।।२।।''

यामुळे समाजात अंधश्रद्धेची प्रवृत्ती बोकाळून, समाजाचे केवळ नुकसानच होत असल्याची जाणीव तुकाराम महाराज प्रखर शब्दात समाज घटकांना करून देतात.

## संसारिकांना उपदेश

संत तुकाराम महाराजांनी स्वत:च्या आयुष्यावरून प्रपंच आणि परमार्थाची उचित अशी सांगड घालता येऊ शकत असल्याचे दाखवून दिले. मात्र याकरिता ''गृहस्थ आश्रम साधिला निर्मळ। गृहिणी सुशील पाहिजे''. कारण त्या सुशील गृहिणीच्या साहचर्यानेच निर्मल संसार साधता येवू शकतो. वाटसरू जसा रात्री वस्तीला असतो आणि पहाट होताच निघून जातो, तशी संसारिकाची वृत्ती आणि निवृत्ती असावी. अनासक्तीनेच मनुष्य संसारातून परमार्थ साधू शकतो. त्यासाठी त्याला तीर्थाटन, व्रतवैकल्य, दानधर्म, पूजाअर्चा असे बाहय सोपस्कार करण्याची अजिबात गरज नाही. उलट संसारात सदाचार आणि नीतीने वागले आणि फावल्या वेळात ईश्वराची भक्ती केली, तरी मनुष्य जन्माचे सार्थक होईल. ''जोडोनिया धन। उत्तम वेव्हारे। उदास विचारे। वेच करी'', असाच मनुष्य उत्तम गती पावतो आणि उत्तम जीवनाचा उपभोग घेतो. जो परोपकारी, भूतदया, पशूंचे पालन, शांती आणि संयमाने जगात वावरतो त्याला वैराग्याच्या बळाचे परमपद प्राप्त होते. परस्त्री माते समान मानणे, परनिंदा न करणे, परधनाची अभिलाषा न बाळगणे, सत्य वचन बोलणे, नीती आणि सदाचाराची वागणूक ठेवणे आदी नियमांचे पालन करून संसार केल्यास त्याला आपोआपच ईश्वर प्राप्ती होते. त्याच्या अंगी ईश्वर वास करतो. म्हणूनच –

''जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले।।
तोचि साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा।।'',

अशी माणसाची साधी, सरळ व सोपी व्याख्या तुकाराम महाराजांनी केली आहे. संसारी माणूस मग ती स्त्री असो वा पुरुष या व्याख्येत बसण्यासाठी त्यांना फक्त आत्मस्वरूपाची ओळख करून घेणे आवश्यक असल्याचे तुकाराम महाराज सांगतात.

तात्पर्य, याद्वारा ''सुखे असो संसारी। मग जवळीच हरी'', असा साधा सोपा धर्मविधी तुकाराम महाराज संसारिकांना सांगतांना दिसतात.

## कटु सत्याचा स्वीकार

समीक्षक व कथेकऱ्यांनी संत तुकाराम महाराजांची दुसरी पत्नी जिजाबाई ही कज्जाक, भांडखोर, दुष्ट, त्रास देणारी असल्याचे म्हटले असले, तरी तिनेच तुकोबांच्या प्रपंच आणि परमार्थाच्या कार्यात सहकार्यही केले, हे विसरता येत नाही. म्हणूनच कदाचित तुकाराम महाराजांनी आपल्या पत्नीविषयीचे व आपल्या आयुष्यातील घडामोळींचे कटु सत्य तेवढयाच सहजतेन स्वीकारून घेतले. हीच सहजता सर्वांमाजी असणे गरजेचे असल्याचे त्यांना वाटे.

''जयाचिये द्वारी। तुळशी वृंदावन।। नाही ते स्मशान। गृह जाणा।।

अंगणातील तुळशी वृंदावन हे एक हिंदुत्वाचे जसे लक्षण आहे, तसेच ते घरातील गृहिणीच्या भावभक्तिचेही कारण आहे. तुळस ही पर्यावरण शुद्ध राखणारी आरोग्यदायी वनस्पती असल्याने, तिचे महात्म्य वाढविण्यास धार्मिक अवगुंठण दिले गेले आहे.म्हणूनच हे सत्य गृहिणींनी स्वीकारण्याचा उपदेश ते देतात.

यासोबतच त्यांनी –

''नाही निर्मळ जीवन। काय करील साबण।।
नपुंसका पुरूषासी। काय करील बाईल त्यासी।।
वांझे न होती लेकूरें। काय करावे भ्रतारे।।''

यासारख्या ओळींमधून पाणी जर स्वच्छ नसेल तर त्या वस्त्राला साबण स्वच्छ करू शकत नाही. नपुंसक नवऱ्यापुढे बायकोने काय करावे? किंवा वांझ स्त्रीला मुले होत नाही म्हणून पतीने काय करावे? हे प्रश्न उपस्थित करून, अशावेळी केवळ सत्य स्वीकाराचीच भूमिका महत्वाची असल्याचे ते सांगतात.कधी तर भुकेच्या वणव्यात करूणा, वात्सल्य, बंधुभाव यांसारख्या उदात्त भावना सुद्धा जळून खाक होतात. आणि भाकरीच्या तुकडयासाठी पोटची मुलं देखील विकण्यास आईबाप उद्युक्त होतात. यासारख्या बाबी ते आपल्या अभंगातून सांगताना जीवनातील कटू सत्याचा स्वीकार तेवढयाच सहजतेने करण्याचा संदेश सर्वांना देतात.

## समारोप

मराठी सारस्वताचे दालन समृद्ध करण्यात संत साहित्याचे फार मोठे योगदान आहे. येथील संतांचे साहित्य हे महाराष्ट्राचे संचित असून आपल्या संस्कृतीचा अनमोल असा ठेवा आहे. समकालीन समाजाच्या

धर्मजीवनाला वळण लावण्यासाठी येथील संतांनी आपली वाणी भजन, कीर्तन, प्रवचनांतून व्यक्त केली आणि अभंगाद्वारे लोकवाणीच्या आविष्काराद्वारे लोकसंवाद साधला. संत तुकाराम महाराज सुद्धा यांपैकी एक होत.

तुकाराम महाराज हे वारकरी संप्रदायातील एक निष्ठावंत व लोकप्रिय संत साहित्यिक होत. ते एक थोर संत असण्यासोबतच प्रतिभावान व युगप्रवर्तक कवी, समाजोद्धारणासाठी अहोरात्रझटणारे सुधारकही होते. त्यांनी लोक जागृतीचे, लोकप्रबोधनाचे व समाज प्रबोधनाचे कार्य करतांना लोकशिक्षकाची भूमिका बजावली. 'दया तिचे नाव। भूताचे पालन। आणिक निर्दलन कंटकाचे।' असे शब्दाचे शस्त्र घेऊन विविध स्वरूपासोबत निषेधाचीही भाषा त्याच उत्कटतेने त्यांनी प्रकट केली. त्यांची ही भाषा 'बुडणाऱ्या जनांच्या कळवळण्यास्तवच' सहजस्फूर्तीने आली. या आत्यंतिक प्रेमातूनच सामाजिक विषमतेवर प्रहार करून त्यांनी सामाजिक समरसता निर्माण करण्याचा प्रयत्नही केला.

तुकाराम महाराजांचे जीवन, त्यांचे धार्मिक आणि सामाजिक कार्य, त्यांची जीवननिष्ठा, त्यांचा समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, त्यांच्या वाणीतील प्रखरता, धारदारपणा, प्रतिकार करण्याची जिद्द, भक्तीचा उमाळा, मानव्याप्रतीची कमालीची करूणा, आत्मशुध्दी आणि अद्वैताचे नेमके विवरण, सदाचार आणि नीतीची पाठराखण, संसार आणि परमार्थाची घातलेली उत्तम सांगड, नैतिकता – व्यवहारदक्षता – कर्तव्यदक्षता यांची जाण, स्त्रीशूद्रादी विषयीची कळकळ, समाजात निर्माण झालेल्या परिस्थितीचे परिमार्जण करण्याची तळमळ इत्यादी बाबी लक्षात घेता तुकाराम महाराजाांची भूमिका ही  निश्चितच धर्मसुधारक आणि समाजसुधारकाची होती यात तिळमात्र शंका उरत नाही. त्यातही तत्कालीन समाजाची स्त्रीविषयक भूमिका ही केवळ 'चूल आणि मूल' पूर्ती संकुचित असतांना, त्यांच्या स्वातंत्र्याचा उद्घोष करून प्रसंगी त्यांना नीतिपाठ देण्याचे कार्य महनीय ठरते.

## निष्कर्ष

१) संत तुकाराम महाराजांच्या कार्यावरूनत्यांना मराठी माणसाचा, संस्कृतीचा व मराठी मनाचा मानबिंदू मानावा लागतो.

२) संत तुकाराम महाराजांनी महाराष्ट्रात वेळोवेळी घडलेल्या धार्मिक, सामाजिक व राजकीय स्थित्यंतरांप्रसंगी समाजाला सर्व स्तरावर स्थैर्य व बळकटी देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

३) निपचित पडलेल्या परंपराग्रस्त व रूढीप्रिय समाजमनाला त्यांनी आपल्या विचारांची उब देत कर्मश्रेष्ठत्वाचा विचार समाजमनात रुजविण्याचा प्रयत्न केला.

४) त्यांनी स्त्री–पुरुष समानतेच्या भूमिकेतून सामाजिक समतेचा स्वीकार, पुकार नि पुरस्कार केला.

५) तुकाराम महाराजांनी तत्कालीन समाजात ज्या गैरसमजुती आणि दूराचार होते. त्यांच्यावर टीकाटिप्पणी करून स्माजाला निखळ आणि शुद्धाचरणाची शिकवण दिली.

६) लोकजीवनातील शाश्वत मूल्ये त्यांच्या विचारांतून व काव्यातून व्यक्त झाली आहेत.

७) समाज घडणीत स्त्रीची महत्वाची भूमिका असल्याचे लक्षात घेऊन, त्यांनी तिला बंधनाच्या चौकटी बाहेर आणण्याच्या प्रयत्न केला. तिच्यातील आत्मभाण जागृत करण्याचा प्रयत्न केला.

## संदर्भ ग्रंथ

१) प्रा. डॉ. राम घोडे, 'संत तुकाराम – संत तुकडोजी : तुलनात्मक दर्शन', राजीव प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९८३.

२) डॉ. किशोर सानप, प्रा. मनोज तायडे, 'तुकाराम : व्यक्तित्व आणि कवित्व', लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, सातवी आवृत्ती, २०१०.

३) निर्मलकुमार फडकुले (संपा.), 'गं. बा. सरदार यांचे निवडक लेख', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण आवृत्ती, १९९७.

४) डॉ. शरयू तायवाडे, डॉ. राजेंद्र वाटाणे, डॉ. कोमल ठाकरे (संपा.),' युगप्रवर्तक संत : तुकाराम – रामदास', विजय प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २०१०

५) राजा मंगळवेढेकर, 'लोकात्मा तुकाराम', ज्योत्स्ना प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण १९९३.

❖❖❖

# महाराष्ट्र फळबाग लागवड शेती

प्राचार्य डॉ. विजय एच. नागरे
नारायणराव नागरे महाविद्यालय,
दुसरबिड, ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा
E-mail : vhndusarbid@gmail.com Mob.No. 9823311684

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. देशातील एकूण लोकसंख्येच्या जवळपास ५६ टक्के लोकसंख्या आजही प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रूपाने शेती व शेतीशी संबंधित रोजगारावर अवलंबून आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करणारे क्षेत्र आहे. शेती क्षेत्रास भारतीय अर्थव्यवस्थेत अनण्य साधारण असे महत्त्व प्राप्त झालेले आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये शेती श्रेत्राचा चांगला विकास झालेला आहे. महाराष्ट्रात औद्योगिकरणाच्या विकासाच्या वेगाबरोबर कृषी क्षेत्राकडे सुरुवातीपासून लक्ष राहिलेले आहे. भौगोलिक श्रेत्र व लोकसंख्या या दोन्ही दृष्टीने महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. देशातील एकूण लोकसंख्येच्या ९.४ टक्के लोकसंख्या महाराष्ट्रामध्ये वास्तव्यास आहे. तसेच राज्यातील एकूण लोकसंख्येचे ५७.६ टक्के लोक खेड्यामध्ये वास्तव्यास असून या जनतेचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन हे कृषि क्षेत्राशी निगडित व्यवसाय आहे.

महाराष्ट्रातील कोरडवाहू जवळपास शेतीचे प्रमाण ८० टक्के पेक्षा आधिक आहे. राज्यातील जवळपास ३५ टक्के भौगोलिक क्षेत्र आणि ५० टक्के शेतीक्षेत्र अवर्षण वण भागात आहे. शिवाय जवळपास ३८ टक्के ग्रामीण लोक अवर्षणग्रस्त भागात राहते. अशा कृषीक्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लाखो शेतकऱ्यांच्या शेती पद्धतीत परिवर्तन घडवून आणण्यासाठी मा. शरद पवार यांनी आठव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात १९९०—९१ पासून राज्यात पूर्ण अनुदान तत्त्वावर फळबाग लागवडीचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सुरू केला आहे. राज्यात कृषी हवामानाची विविधता, शेतीविषयक पर्यावरणाचा प्रश्न, शेतकऱ्यांना त्यांच्या शेतावरच पूर्णवेळ रोजगार उपलब्ध करणे, पडीक जमिनीचा विकास घडवून आणणे, उच्च मूल्यांकित पीकरचना निर्माण करणे, शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून देणे या व्यापक दृष्टिकोनातून हा कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे.
आज फलोत्पादनातील एक अग्रेसर राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख झाली आहे. राज्यात पिकणारी विविध फळे जागतिक बाजारपेठेत आपले स्थान निर्माण करीत आहेत. विशेषतः द्राक्षे, संत्रा, डाळिंब, केळी आणि कोकणात मोठ्या प्रमाणात पिकणाऱ्या हापूस व केसर आंब्याला जागतिक बाजारपेठेत मोठी मागणी आहे. फलोत्पादन क्षेत्रातील भरीव कामगिरीमुळे राज्यातील फळपिकांची बाहेरच्या देशामध्ये मोठ्या प्रमाणावर निर्यात होत आहे. ज्या शेतकऱ्यांनी फळबागा लावलेल्या आहे. त्या शेतकऱ्यांना फळबागापासून उत्पादन मिळू लागले आहे. एवढेच नाहीतर या सर्व प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारली आहे. तसेच पर्यावरण संतुलन राखण्यास देखील मोठी मदत होत आहे.

तक्ता : १.१ महाराष्ट्रातील फळबाग लागवड क्षेत्र सन १९९०—९१ ते २००७—०८

| वर्ष | लागवड क्षेत्र (हेक्टर) | लाभार्थी (संख्या) |
|---|---|---|
| १९९०—९१ | ८४३३३ | ११३८८१ |
| १९९१—९२ | ११२२६९ | १५९९७६ |
| १९९२—९३ | ११२३४५ | १४७२२१ |
| १९९३—९४ | १०३२४५ | १३५६३५ |
| १९९४—९५ | ७९८३८ | १०४९३६ |
| १९९५—९६ | १०२१२२ | १२७२८७ |
| १९९६—९७ | १०१४४७ | १२७७७८ |
| १९९७—९८ | ८२१४४ | १०८५४९ |

| | | |
|---|---|---|
| १९९८–९९ | ७१९९७ | ९७५७५ |
| १९९९–२००० | ६५१२० | ९१५०९ |
| २०००–२००१ | ५५७२० | ७४४८३ |
| २००१–२००२ | ४३५२० | ६३५७४ |
| २००२–२००३ | ३४१५० | ५३५४० |
| २००३–२००४ | ३३१५० | ४६७४१ |
| २००४–२००५ | ४३१५१ | ५७४१३ |
| २००५–२००६ | ६०४९० | ८६५३७ |
| २००६–२००७ | ६९७८० | ९७४३६ |
| २००७–२००८ | ७६६२६ | १११३४१ |
| एकूण | १३३१४४७ | १८०५४१२ |

स्त्रोत : कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

महाराष्ट्र राज्यात फळबाग लागवड १३३१४४७ हेक्टर क्षेत्रावर विविध फळपिकांची लागवड करण्यात आलेली आहे. राज्यात फळबाग लागवडीचे क्षेत्र एकूण पिकाच्या खालील क्षेत्राच्या ६ टक्के आहे. तसेच राज्यात फळबाग लागवडीचे लाभार्थी शेतकरी वाढले असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होईल.

## महाराष्ट्रातील फळबाग लागवडी खालील विभागनिहाय क्षेत्र

महाराष्ट्र राज्याची राजकीय व प्रशासकीय आधारावर सर्वसाधारण पाच विभागात विभागणी केली जाते. यामध्ये कोकण, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ या विभागाचा समावेश होतो. कोकण विभागात ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधूदुर्ग तर उत्तर महाराष्ट्रात नाशिक, धूळे, नंदुरबार व जळगांव या जिल्ह्यांचा समावेश होतो. पुणे विभागांतर्गत नगर, ुणे, सोलापूर, सातारा, सांगली आणि कोल्हापूर हे जिल्हे येतात. मराठवाडा विभागात औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी व हिंगोली तर विदर्भात बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर या जिल्ह्यांचा समावेश होतो.

तक्ता १.२ : महाराष्ट्रातील फळबाग लागवड विभागानिहाय क्षेत्र

| वर्ष/विभाग | कोकण | उत्तर महाराष्ट्र | पश्चिम महाराष्ट्र | मराठवाडा | विदर्भ |
|---|---|---|---|---|---|
| १९९०–९१ | १००३७ | ६४८६ | २०८०५ | ३११६१ | १५८४४ |
| १९९१–९२ | १९७५३ | १०८१६ | ३०५०७ | २३७६० | २७४३३ |
| १९९२–९३ | २२५३९ | १२०२० | २५९३४ | २७५०९ | २४३४३ |
| १९९३–९४ | २४६१९ | १०६३६ | २७६२४ | १९४७५ | २०८९१ |
| १९९४–९५ | २०४८४ | ९०२२ | १७७९८ | १३९६७ | १८५६७ |
| १९९५–९६ | २३०५० | ६५२७ | २९३१६ | १७३४८ | २५८८१ |
| १९९६–९७ | २५४५८ | ७२८० | ३०१६७ | १७२६८ | २१२७४ |
| १९९७–९८ | २३३०५ | ८४८७ | २३९५८ | १३३०२ | १३०९२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९९८–९९ | २२१८३ | ८१९४ | १५४८० | १५६८२ | १०४५८ |
| १९९९–२००० | २३१९४ | ३९२० | १३४६९ | ११०२७ | १०५१० |
| २०००–२००१ | २६११६ | ३७५८ | ८४५३ | ८६६३ | ८७३० |
| २००१–२००२ | १६६२९ | ४२९१ | ७५५८ | ८३९४ | ६६४८ |
| २००२–२००३ | ११११९ | ४८०५ | ५९२९ | ६८९७ | ५४०० |
| २००३–२००४ | ९३६२ | ५२८१ | ४५४० | ७९७९ | ५९८८ |
| २००४–२००५ | १०५११ | ६४५४ | ९९६१ | १०७९०.४० | ५४३४.५० |
| २००५–२००६ | १०२८४ | ७५४७ | १४६११ | २०५४० | ७५०८ |
| २००६–२००७ | ८४५३ | ७४११ | १४१३७ | २७१५८ | १२६२१ |
| २००७–२००८ | ८९३९ | ८५९० | १३८७० | २७८३३ | १७३९४ |
| एकूण | ३१९०३५ | १३१५२५ | ३१४११७ | ३०८७५३.४० | २५८०१६.५० |

स्त्रोत : कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

महाराष्ट्रातील फळबाग लागवडीच्या क्षेत्राची विभागानिहाय तुलना केली असून त्यांची आकडेवारी हेक्टरमध्ये दिली आहे. वरील आकडेवारी वरुन सर्वाधिक फळबाग लागवड कोकण विभागात झालेली आहे. त्यानंतर मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र विभागात फळबाग लागवड झाल्याचे दिसून येते. तसेच उत्तर महाराष्ट्र व विदर्भ या दोन विभागात फळबाग लागवड कमी आहे. परंतू येणा–या काळामध्ये या दोन्ही विभागात फळबाग लागवड जास्तीत जास्त करू शकतो.

## महाराष्ट्रातील फळपिकांची फळबाग लागवड

महाराष्ट्राची जी फळबाग लागवड करण्यात आलेली आहे त्यामध्ये कोरडवाहू फळपिके व बागायती फळपिके अशा दोन प्रकारच्या फळपिकांचा समावेश करण्यात आला आहे. बागायती फळपिकांमध्ये नारळ, संत्री, मोसंबी, चिकू, डाळिंब, पेरु, लिची, अंजीर, लिंबू, कोकम व चारोळी इ. फळपिकांची लागवड झालेली झालेली आहे. तसेच कोरडवाहू फळपिकांमध्ये आंबा, काजू, बोर, सीताफळ, आवळा, चिंच, फणस, जांभूळ, कवठ आणि रामफळ इ. स्वरूपाच्या फळबाग विकसित करण्यात आल्या आहे. तरी राज्यात फळपिकनिहाय किती लागवड झालेली आहे. तरी राज्यात फळपिक निहाय किती लागवड झालेली आहे हे खालील तक्ता १.३ च्या आधारे दर्शविले आहे.

| फळपिक | क्षेत्र (हेक्टर) | फळपिक | क्षेत्र (हेक्टर) | फळपिक | क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|
| आंबा | ४६३७८४ | आवळा | २०२९० | मोसंबी | ११५४८९ |
| नारळ | २५१८३ | कोकम | २७५ | डाळींब | ११४६२९ |
| संत्री | १२६५३९ | लिंबू | ३५४२७ | सिताफळ | ४१०५९ |
| पेरु | २९०९८ | सुपारी | ५७९ | अंजीर | २७५५ |
| बोर | ७३४९१ | जत्रोका | ८५ | फणस | १३६० |
| चिंच | २१३९५ | काजू | १५९९८४ | कवठ | २४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जांभूळ | ७५९ | चिकु | ७२८७२ | इतर | ११५३५ |

स्त्रोत : कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

महाराष्ट्रामध्ये विविध फळपिकांच्या लागवड क्षेत्रामध्ये सर्वाधिक क्षेत्र आंबा पिकाचे असून सर्वात कमी क्षेत्र फळबाग लागवड कवठ या फळपिकांचे दिसून येते. राज्यातील फळपिक क्षेत्रामध्ये प्रामुख्याने आंबा, काजू, संत्री, मोसंबी, डाळिंब, बोर व चिकु या प्रमुख फळपिकाची लागवड मोठया प्रमाणात झालेली दिसून येते. याप्रमुख फळपिकांची लागवड राज्यातील एकूण फळपिक लागवडीच्या ८५ टक्के एवढी आहे आणि १५ टक्के इतर सर्व फळबाग पिकांची लागवड क्षेत्र आहे.

## सारांश

राज्यात फळबाग लागवड क्षेत्रांचा अभ्यासावरून राज्यात फळबाग शेती मोठ्या प्रमाणात दिसून येते. फळबाग शेतकरी उत्पादनात वाढ घडवून आणू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांना श्रम कमी करावे लागतील. फळबाग शेतीमुळे रोजगार उपलब्ध होईल. शेतीवर आधारित उदयोगधंद्यात वाढ होईल. फळपिकांची निर्यात वाढेल आणि त्यामधुन रोजगार निर्माण होईल. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक आणि सामाजिक चित्र बदलेल. जेणेरकरून फळबाग लागवड केल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था संपन्नतेकडे झुकू शकेल अशी अनुकुल परिस्थिती निर्माण होईल.

## निष्कर्ष

१) महाराष्ट्राचा आर्थिक विकास – एक चिंतन – डॉ.बी.आर. गायकवाड.
२) भारतीय शेती – डॉ.सारंग.
३) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था – डॉ.कुरूलकर.
४) कृषि अर्थशास्त्र – डॉ.विलास खंदारे.
५) फळबाग लागवडीची मुलतत्त्वे आणि कार्यपद्धती – वाय.सी.एम.यु.

❖❖❖

# नव काव्य : बा. सी. मर्ढेकर संदर्भीय

प्रा. अमोल विठठल नगराळे
महिला कला महाविद्यालय, बेटावद
ता. शिंदखेडा, जि. धुळे ४२५४०३
E Mail: amolnagarale88@gmail.com भ्रमणध्वनी ९४०४७४२३०७

## प्रस्तावना

मराठी कवितेचे प्राचीन, अर्वाचीन व नवकाव्य असे विभाग पाडले जातात, हे विभाग कालवाचक आहेत. तितकेच ते गुणवाचक देखील आहेत. या विभागांवरुन बदलत्या काळाचे दर्शन घडते. ललित नव साहित्याच्या संदर्भात मर्ढेकरी शैलीची व आशयाची कविता, गाडगीळ, चित्रे आणि जी.ए. कूलकर्णी यांची कथा तसेच तेंडूलकर, खानोलकर आणि एल.कुंचवार यांची नाटके यात आल्याने ४० ते ४५ वर्षातील साहित्याला नवसाहित्य असे म्हटले जाते. जीवनातील नवप्रवृत्तीचा ताण सर्वप्रथम अभिव्यक्त झाला तो मराठी कवितेतून नव्या युगातील नव्या प्रवृत्तीचे प्रभावी प्रकटीकरण सर्वप्रथम केशवसुतांच्या कवितेत झाले. नव्या युगातील दाहक जाणिवांचा दोष प्रथम जाणवला तो त्यांच्याच कवितेतून हीच परंपरा १९४५ नंतर बा.सी. मर्ढेकर यांनी जोपासली. म्हणून त्यांना नव काव्याचे उद्गाते किंवा दुसरे केशवसूत असे म्हटले जाते.

बा.सी. मर्ढेकरांची नवकवितेची व्याख्या सर्वकालीन आहे. ''काव्यातील नवीनता म्हणजे नवीन भावनिक समानता '' असे मर्ढेकरांनी म्हटले आहे. मराठी नवकवितेचे चिन्ह मर्ढेकरपूर्व कालखंडात आढळते. पण या नवकाव्याचा स्फोटक अविष्कार झाला तो मर्ढेकरांच्या कविता 'सत्यकथा', 'अभिरुची' यांसारख्या नियतकालिकांमधून ही नवकविता प्रसिद्ध झाली. मर्ढेकराना नवकवी म्हणून मान्यता मिळाली ती त्यांच्या ''काही कविता'' (१९४७) या काव्यसंग्रहामुळेच ते नवकवी म्हणून ओळखले जाऊ लागले. संकुचित अनुभूती विश्वाकडून व्यापक अनुभूती विश्वाकडे झेपवण्याची मर्ढेकरांची क्षमता असाधारण स्वरूपाची होती. प्रचंड विश्व व्यापार आणि या विश्वातील मानवाचे स्थान हा मर्ढेकरांचा चिंतनाचा विषय होता. एकूणच भारतीय जनजीवनातील प्रत्येकाला येणारी वैफल्यग्रस्त अनुभूति मर्ढेकरांच्या कवितेतून अभिव्यक्त झाली. १९४५ ते १९६० या कालखंडात निर्माण झालेली नव कविता मर्ढेकरांपासून सुरु झाली आणि सदानंद रेगे यांच्यापर्यंत येऊन पोचली. अर्थशून्यतेचा अनुभव देणारी मर्ढेकराची कविता ही नवकाव्याची एक बाजू झाली तर दुसऱ्या बाजूला विं दा. करंदीकर, वसंत बापट, मंगेश पाडगावकर, दिलीप चित्रे, शरदचंद्र मुक्तिबोध आणि सदानंद रेगे यांच्या कविता आहेत.

दुसऱ्या महायुद्धामुळे जी बिकटतेची व विफलतेची छाया संपूर्ण जगावर पडली. त्यातून 'मानवी मूल्य' धडाधड कोसळली आणि संपूर्ण समाजात अपप्रवृत्तींचा शिरकाव झाला. याचे अत्यंत कटू आणि प्रत्ययकारी चित्रण नवकवितेने दिले. देशाच्या फाळणीमुळे झालेल्या कत्तली, सीमाप्रदेशातील वाद, काश्मिरसाठी झालेली युद्धे, निर्वासितांच्या बेसुमार लोंढ्यामुळे निर्माण झालेले प्रश्न, महागाई, टंचाई, औद्योगिकीकरण, शहरीकरण, रोगराई, इ. समस्या तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संकटांनी निर्माण झालेली परिस्थिती आणि त्यातून सर्वसामान्य माणसांच्या जीवनाची होणारी होळी ही नवकवितेतून मांडली गेली. त्यातून चीड, वैफल्यग्रस्तता, आगतिकता, अर्थशून्यता, अस्थिरता, बकालपणा, साचेबंदपणा या सर्वच गोष्टींचे दर्शन नवकवितेतून झालेले दिसते.

उदा. १. बडवित टिऱ्या, पिपात मेले ओल्या उंदिर (बा.सी. मर्ढेकर)
२. विवस्त्र पांचाली (य.द.भावे)
३. माझ्या मना बन दगड (विं.दा. करंदीकर)
४. एक डोळा (वसंत बापट)

यांसारख्या काही कविता नवप्रवृत्तीच्या दिग्दर्शनासाठी, पाहण्यासाठी आहेत. केवळ आशयच नव्हे तर कवितेचा रचनाबंध देखील बदललेला दिसून येतो. या सर्व कवितांमधून नवप्रवृत्तीचे दाहक दर्शन घडते.

सात पिढ्यांनी माझ्या
उगवली अंडी पुरुषार्थाची
सोय केली प्रत्येकाने आपल्या पिंडदानाची

प्रत्येकाला असतो किमान एक तरी बाप
एवढे सोडले तर जग म्हणजे
निव्वळ थाप !

अशा ठाम निष्कर्षाला नवकविता पोहचली.

## नवकवितेची वैशिष्ट्ये

१. नवकविता मानवी मनावर आक्रमण करणाऱ्या विज्ञानाने प्रभावी झाली आहे.

२. नवकवितेला अस्तित्ववादी तत्त्वज्ञान जवळचे वाटते. यंत्रयुगात सामाजिक विषमतेमुळे नवकवी व्यथित झालेले दिसतात.

३. प्रयोगशीलता हा नवकाव्याचा आत्मा आहे. मर्ढेकर आणि करंदीकर यांनी कविता निर्मितीत केलेले तंत्रनिष्ठ प्रयोग या दृष्टीने उल्लेखनीय आहे.

४. पारंपारिक छंद वा वृत्ताचा या कवींनी फारसा वापर केला नाही. नवकवींच्या कवितेत मुक्त छंदाचे व मुक्त शैलीचे दर्शन घडते.

५. मानवी जीवनातील अगतिकता हा या नवकाव्याचा स्थायीभाव आहे.

६. आशयाबरोबरच काव्यभाषा व काव्यरूप या विषयांची जाणीव नवकवींनी बदलवली.

७. नवकविता ही बुद्धीनिष्ठ आहे. ही वैज्ञानिक युगाची स्वाभाविक परिणती आहे.

८. रसरशित सौंदर्य व अभंग युगाच्या पोलादी चौकटीमुळे नवकवी हताश होत असला तरी जीवनाच्या दुर्दम्य आशावादाचे चित्रण नवकवींनी केले.

## बा.सी. मर्ढेकर

अर्वाचीन मराठी साहित्यातील युगप्रवर्तक म्हणून बा.सी.मर्ढेकर ओळखले जातात. मराठी साहित्यात नवटिका व नवकविता यांचा प्रारंभ मर्ढेकरांनी केला. मर्ढेकरांचा जन्म सातारा जिल्ह्यातील मर्ढे या गावी झाला. त्यांचे कुटुंब परंपरेने रामदासी संप्रदायाचे होते. त्यांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पुण्यात झाले. १९२९ मध्ये ICS ची परिक्षा देण्यासाठी ते इंग्लंडला गेले. तेथील वास्तव्यात त्यांनी वाङ्मयीन चळवळीचा अभ्यास केला. १९३२ मध्ये भारतात परत आल्यानंतर त्यांनी मराठी साहित्य निर्मितीला सुरुवात केली. 'शिशिरागम' (१९३९), 'काही कविता' (१९४७), 'आणखी काही कविता' (१९५१) हे त्यांचे प्रकाशित काव्यसंग्रह आहेत. मर्ढेकरांचा पहिलाच काव्यसंग्रह 'शिशिरागम' या काव्यसंग्रहात रविकिरण मंडळाची विशेषत: माधव ज्युलियन यांची छाप दिसून येते. 'काही कविता' या काव्यसंग्रहात त्यांनी स्वतंत्र वृत्तीने कवितेची निर्मिती केली. या काव्यसंग्रहातील कविता वास्तवतेची प्रखर जाणिव करुन आहेत. या काव्यसंग्रहामुळे मराठी कविता प्रथमच जमिनीवर उतरली. या कालखंडात मराठी कवितेतील स्वप्नरंजन संपून वास्तव परिस्थितीशी समरस होणारी कविता निर्माण होत होती. नव कविता म्हणणे आधुनिक युगाची अटळता होती. महायुध्दानंतर बदलत्या सामाजिक परिस्थितीची डोळस पाहणी करणे ही मराठी कवितेची आंतरिक गरज होती. मर्ढेकरांच्या कवितेने हे नव युगाचे आव्हान घेतले आणि त्यांनी मराठी कवितेला आंतरराष्ट्रीय व अस्तित्ववादी वजन प्राप्त करून दिले.

नवकाव्याचा आशय अत्यंत आधुनिक होता. साम्राज्यवाद आणि भांडवलशाही याचे दुष्परिणाम त्यामुळे सामाजिक व वैयक्तिक जीवनात येणारे दैन्य आणि लाचारी. स्वार्थ आणि ढोंगी यंत्रयुगामुळे आलेली कृत्रिमता, अमानुषता यामुळे मानवी जीवनाची आणि माणुसकीची झालेली गंभीर हानी आपल्या कवितेतून अत्यंत संवेदनशीलपणे टिपली आहे. या घडामोडींवरील त्यांनी प्रतिक्रिया अत्यंत उपरोधाने, उपहासाने, तिरस्कराने आणि कारुण्याने व्यक्त केली आहे.

माझा अभंग माझी ओवी
नतद्रष्ट गाथा गोवी !

असे म्हणून त्यांनी जीवनाचे विदारक दर्शक घडविले. पिपात मेले ओले उंदिर, तु एक मुंगी मी एक मुंगी, गणपत वाणी, मानस पडली जरी खिंडारे यांसारख्या कवितेतून त्यांनी मानवी जीवनाचे विदारक दर्शन घडविले.

मर्ढेकरांनी एखाद्या विशिष्ट तत्त्वज्ञानाचा किंवा विचारवादाचा पुरस्कार करण्यासाठी कविता लिहिलेली नाही. मर्ढेकरांची कविता लिहिलेली नाही. मर्ढेकरांची कविता भावनांचे अभिव्यक्तीकरण करत नाही तर जीवनाच्या

मुलभूत प्रश्न चिंतनातून ती तापून सुलाखून निघालेली आहे. हृदयाचे काठिण्य आणि मनाचे आम्ल यांच्या संयोगातून एक तेजाब रसायन खदखदू लागते.

सटिक टिकणे मानवतेची
पुन्हा वाचली तरी अर्थ तोच
जगून थोडे अखेर मरणे
उघड झाप ती डोळ्यांचीच

या विदारक वास्तवतेची भेसूर जाणिव मर्ढेकरांना अस्तित्व चिंतनापाशी नेउन पोहचविते. त्यामुळे त्यांची कविता केवळ समकालीन वास्तवतेचे प्रतिबिंब नसते तर मानवी जीवनातील अर्थशुन्यता त्यातून प्रकट होते. जगण्याच्या आधीच हुकला पाढा नळीतले जग नळीच जगते अशा प्रकारच्या कवितांतून त्यांनी ही अर्थशून्यता प्रकट केली आहे.

१ सरणावरती सरण लागले
जिवंत आशा पडे आणि
२ जगायची पण सक्ती आहे
मरायची पण सक्ती आहे.

यांसारख्या ओळीमधून मानवी जीवनातील विसंगती अंतरनाते विरोध, त्यांच्या सर्व विषयांचे नाते काळोखाशी आहे. नैराश्याचे जुनाट दुखणे अभिव्यक्त करतांना त्यांनी मार्मिक शब्दयोजना आणि चिकित्सक पध्दत वापरली. जीवनाच्या अंतिम मूल्य दर्शनाच्या दृष्टीने निर्माण होणारी विफलता त्यांच्या लक्षात आली आहे. आणि म्हणूनच जीवनातील मुलभूत प्रश्नांना ते कवितेतून उत्कटपणे सामोरे जातात. मर्ढेकरांचा अनुभव व आपली नविन भाषा घेऊन आला. या नवकथाभाषेने प्रस्थापितांना फार मोठा धक्का दिला. भाषाशैलीबाबत मर्ढेकरांनी अनेक नवे प्रयोग केले. शब्दांना टराटर फाडण्याची भाषा त्यांनी केली. मर्ढेकरांच्या कवितेतील आशय त्यांच्या अनुभवातून वेगळा काढता येत नाही. मानवी भावनेला मर्ढेकरांनी शास्त्रकार्याची कसोटी लावली म्हणूनच त्यांची कविता बुध्दीप्रदान झाली आहे. भावुकता भावरेपणा आणि स्वप्नाळू वृत्ती यांना त्यांनी फाटा दिला आहे.

नवकवितेचे वैशिष्ट्य असलेल्या मुक्तछंदाचा वापर न करता ओवी, अभंग, पादाकुलक या छंदाचा वापर त्यांनी केला. करण मुक्तछंद आणि मानवता यातून निर्माण होणारी ध्येयवादी कविता पोकळ आहे असे मर्ढेकरांचे मत होते. आपल्या मनातील चीड व्यक्त करण्यासाठी पारंपारिक छंदच मर्ढेकरांना उपयुक्त वाटले. म्हणूनच विंदा करंदीकरांनी म्हटले आहे. ''संपूर्ण मराठी कवी परंपरेत मर्ढेकरांच्या खोलीचा कलात्मक साध्य असणारा कवी सापडणार नाही.'' गंगाधर गाडगीळ यांनी मर्ढेकरांना 'दुसरा केशवसुत' ही उपाधी दिली आहे. केशवसुतांप्रमाणेच मर्ढेकरांनी मराठी कवितेच्या स्वरूपात मुलभूत बदल केला. त्यामुळे त्यांच्या भाषाशैलीला सामर्थ्य प्राप्त झाले. कविता म्हणजे 'पांढऱ्यावरचे काळे' पण केशवसुत करफन दिले. मर्ढेकरांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचे महत्त्व त्यांच्या मृत्यूनंतरही जाणवत राहिले. मर्ढेकरपूर्व मराठी कविता १९ व्या शतकातच गुंतून पडली होती. मर्ढेकरांनी तिला २० व्या शतकात आणून सोडले.

## संदर्भ

१. मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र आणि काव्य – डॉ. विजयकुमार इंगळे
२. वाङ्मयीन महात्मता – बा.सी. मर्ढेकर – १९४१
३. मर्ढेकरांची कविता : सांस्कृतिक समीक्षा – के. र. शिरवाडकर – राजहंस प्रकाशन
४. सौंदर्य आणि साहित्य – बा.सी. मर्ढेकर – १९५५
५. मर्ढेकरांची कविता : स्वरूप आणि संदर्भ – विजया राजाध्यक्ष – मौज प्रकाशन

❖❖❖

# विशुद्ध भावभक्तीची प्रेरणा – महदंबेचे धवळे

प्रा. डॉ. माधुरी म. पाटील
मराठी विभाग प्रमुख
मधुकरराव पवार कला महाविद्यालय,
मुर्तिजापूर, जि. अकोला
E Mail: drmadhuripatil67@gmail.com

प्राचीन मराठी वाङ्मय प्रवाहात महानुभाव पंथाचे साहित्य हे मराठी वाङ्मयाला बळकटी देणारे आहे. महानुभावांनी जसे आपले लेखन गद्यातून केले, तसेच पद्यातूनही केले आहे. ह्या गद्य व पद्यलेखन निर्मिती मागील प्रेरणा विशुद्ध भावभक्तीची होती. 'महदंबेचे धवळे' ही मराठीतील पहिली कविता कृष्णभक्तीच्या प्रेरणेतूनच जन्माला आली.

मराठी साहित्यातील आद्य स्त्री कवयित्री म्हणून मराठी शारदेच्या दरबारात स्थानापन्न होण्याचा मान महदंबेने मिळविला. महानुभाव पंथाचे आद्य आचार्य श्रीनागदेवाचार्यांची महदंबा ही बहीण अतिशय बुद्धिमान होती. ती चर्चेत भाग घेत असे व आपली जिज्ञासा शांत करीत असे. श्रीचक्रधरस्वामींनासुद्धा तिचा अभिमान वाटत असे ते तिचे कौतुक करीत असत. श्रीचक्रधरस्वामीच्या मृत्यूनंतर सर्व शिष्यमंडळी गोविंदप्रभूंच्या सन्निध्यात राहत होती. तेव्हा एका प्रसंगाच्या निमित्ताने तिला हे काव्य स्फुरले.

'धवळे' म्हणजे लग्नप्रसंगी गावयाची गाणी. गोविंदप्रभूंसाठी विरंगुळा म्हणून महदंबाने त्यांना बाशिंग बांधले, त्यांना हळद लावली, जेवणावळी पार पाडल्या. ह्या सर्वांचा आनंद त्यांना झाला. गोविंदप्रभूंच्या चेहऱ्यावर हसू आले. त्यांनी महदंबेला गाण्याचा आग्रह धरला, तेव्हा महदाईसा म्हणाली, 'काई गाओ जी?' त्यावर 'आवो कृष्ण रुक्मिणी गाए गाए म्हणे: तुरया थाट गाय म्हणे अशा आग्रहाने महदाइसेने गोविंदप्रभूंच्या आज्ञेवरुन जे गीत गायले तेच 'धवळे' म्हणून प्रसिद्ध झाले.

महानुभाव पंथातील ही पहिली कवयित्री. हिचे 'धवळे', 'ज्ञानेश्वरी' व 'मूर्तिप्रकाशा'पूर्वीच निर्माण झाले होते. या काव्यातील भाषेला लौकिक आणि अलौकिकाचा जबरदस्त घट्ट असा पदर आहे. या धवळ्यातून जिवंत बोलक्या मनाचे चित्र चित्रित होते. या काव्यातील भावसौंदर्यामुळे ते मनोरम झाले आहे. एका निरागस मनाचे नितळ सौंदर्य यात दिसून येते. आख्यानकाव्याचे सर्व विशेष धवळ्यांतून अभिव्यक्त झाले. मन:पूर्वकता आणि उत्स्फूर्तता ही कवी मनाची अभिव्यक्ती व कोवळीक धवळ्यातून प्रतीत होते. धवळ्यांची रचनाही मुक्तछंदात्मक आहे. ती साधी, गोड असून निवेदन स्त्री स्वभावाचे सहज मार्दव आहे. त्यामुळे 'धवळे' वाचकाला मोहून टाकतात. धवळ्यातून महदंबेच्या प्रतिभेचे मनोहर दर्शन घडते. मराठी सारस्वतात 'धवळया'च्या निर्मितीमुळे आद्य कवयित्रीचा मान महदंबेच्या रूपाने एक स्त्रीला मिळाला.

'धवळे' इ.स. १२८६ मध्ये रचल्या गेले. ह्यामध्ये पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग आहेत ह्या दोन्हींची संख्या १४८ आहे. धवळ्यातील भाषा अत्यंत साधी आहे. ह्या काव्यातील कृष्णरूपाचे तसेच विवाहातील सोहळ्यांचे वर्णन तिने अगदी तन्मयतेने केले आहे. ह्या काव्यातून यादवकालीन विवाह पद्धतीवर प्रकाश पडतो.

'मातृकी रुक्मिणी स्वयंवर' या नावाचे ११० अभंग महंदाइसेच्या नावावर आहे. ह्या व्यतिरिक्त 'गर्भकांड' हे उपदेशपर काव्य व स्फूट पदे इत्यादी प्रासंगिक रचना महदाइसेच्या नावावर आहे. 'धवळे' हे मराठीतील पहिले आख्यानकाव्य होय. मराठी आख्यानकाव्याची परंपरा प्राचीन व प्रदीर्घ आहे. प्राचीन भारतीय साहित्यातून या आख्यान काव्याचा ओघ मराठी वाङ्मयात आला आहे. तो महदंबेच्या 'धवळ्या'च्या रूपाने. तत्कालीन संस्कृत कवितेचे स्वरूप पाहता 'धवळ्या'चे खास वेगळेपण हे आशयात व अभिव्यक्तीत सहज जाणवते. श्रीकृष्ण हे परमदैवत असल्याने त्यांच्या अलौकिक लीळांचे गुणगान करुन आपली निष्ठा अनेक

कविकर्त्यांनी काव्यातून व्यक्त केलेली आहे. त्यातही विशेषत्वाने 'श्रीकृष्ण रुक्मिणी विवाह कथा' हा प्रसंग अनेकांच्या मनाला भावलेला दिसतो. या आख्यानकाव्याचे स्वरूप हे लोकगीतांशी जुळणारे आहे.

## निष्कर्ष

१. मराठीतील आद्य पद्य ग्रंथाचा मान जरी मुकुंदराजांच्या विवेकसिंधूकडे जात असेल तरी पण बाराव्या तेराव्या शतकातील निर्माण झालेल्या महानुभाव ग्रंथाच्या पद्य ग्रंथाचे अवलोकन केल्यास प्रकर्षाने असे जाणवते की, मराठी साहित्यातील आद्य कवयित्री म्हणून महदंबेला मान द्यावा लागेल. महानुभावांनी गद्य ह्या माध्यमाचा वापर करून पंथीय तत्त्वज्ञान सुलभ रीतीने व सूक्ष्मातील सूक्ष्म रीतीने वेगवेगळ्या गद्य ग्रंथाद्वारा मांडण्याचा प्रयत्न सर्वप्रथम महानुभावांनी केला असे निर्विवाद म्हणता येईल.

२. महानुभाव साहित्यात तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब पडलेले आहे. अंधश्रद्धा, लिंगभेद अनेक देवतांची उपासना यात तत्कालीन समाज गुंग झालेला होता. स्त्री शूद्रांना धर्मापासून वंचित केले होते. अशा या विघटित समाजाला सुसंघटित करण्याचे कार्य महानुभावपंथाने केले, जी त्या काळाची गरज होती.

३. प्राचीन भारतीय साहित्यातून या आख्यान काव्याचा ओघ मराठी वाङ्‌मयात आला आहे. तो महदंबेच्या 'धवळ्या'च्या रूपाने. तत्कालीन संस्कृत कवितेचे स्वरूप पाहता धवळ्या चे खास वेगळेपण हे आशयात व अभिव्यक्तीत सहज जाणवते.

४. विशुद्ध भावभक्तीची प्रेरणा – महदंबेचे धवळ्यातून दिसून येते.

५. महानुभाव साहित्य विशाल आहे. महानुभाव पद्य ग्रंथ सर्वकाव्य गुणांनी नटलेले दिसून येते.

## संदर्भ सूची


१. शेणोलीकर, ह. श्री., 'प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप', द्वि.आ. नोव्हेंबर १९६२, वा.ना. मोघे प्रकाशन, कोल्हापूर.

२. आवलगावकर रमेश, 'महानुभाव वाङ्मय' यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रा. आ. आक्टोबर ९८.

३. प्रा. मारवाडे, प्रा. सोलापुरे, 'मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (प्रारंभ ते १६००)', कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

४. देशपांडे कृ.पां., 'साती ग्रंथ : स्वरूप आणि समीक्षा', प्रकाशक म.ना. जोशी पब्लिकेशन्स ३१७, नारायण पेठ, पुणे.


❖❖❖

# A Comparative Study of Achievement Motivation and Emotional Intelligence among Jr. College Students

**Mr. Santosh k. Doifode**
Research Student, SGBAU, Amravati
E Mail: doifode.santosh@rediffmail.com

## Abstract

Achievement motivation and emotional intelligence plays vital role in education system. Generally achievement motivation means task oriented behavior which is very necessary to complete any type of work. Emotional Intelligence includes factors like a) knowing your emotions b) Managing Emotions\ c) Motivating oneself d) Recognising emotions in others e) Handling relationships.

In the present study researcher dealt with concept of of achievement motivation and emotional intelligence in case of Jr. college students. Here researcher got some findings those may be helpful to further research. Emotional intelligence also plays vital role to achieve desired goal. If we increase achievement motivation and emotional intelligence in an individual it will directly help to improve performance of an individual, so investigator choose this problem to check whether they are positively related or not, and to find out differences on the basis of gender. To find factors affecting achievement motivation and emotional intelligence, researcher selected this problem.

## Introduction

Education is one of the important facets of national life. It is the vital tool to attending economic independence and dominance, social stability, security, political integrity. Here researcher deal with such concepts those are important in education i.e. achievement motivation and emotional intelligence. Achievement motivation is important to complete any type of work, it means task oriented behavior of an individual's towards work, so if increase in achievement motivation means increase in performance of individuals. Emotional intelligence also plays vital role to achieve desired goal. If we increase achievement motivation and emotional intelligence in an individual it will diretly help to improve performance of an individual, so investigator choose this problem to check whether they are positively related or not, and to find out differences on the basis of gender. To find factors affecting achievement motivation and emotional intelligence, investigator selected this problem.

## Review of Literature

1) Daniel Goleman, the leading expert in this field, reported "IQ is only a minor predictor of success in life, while emotional and social skills are far better predictors of success and well being than academic intelligence".
2) Need for achievement is one of the first social motives to be studied in detail (Mcclelland 1953) and research in this field continuous today. Need for achievement is strong seek to become accomplished and to improve their task performance.

## METHODOLOGY

### Objectives

1) To study the role of gender differences in terms of n-Ach.

2) To study the role of gender differences in terms of emotional intelligence.
3) To study the correlations between achievement motivation and emotional intelligence of Jr. college students.

### Hypotheses

1) Achievement motiovation is higher in girls than boys.
2) Emotional intelligence is more in girls than boys.
3) N-Ach and emotional intelligence are positively correlated.

### Sample

The samples included in this study were 100 Jr. college students randomly selected form Aurangabad city Maharashtra State of India. The sample selected out of total sample 50% are girls and remaining are boys from equal proportion five Jr. colleges.

### Measurement Tool

1) Achievement Motivation Scale constructed by Pratibha Dev & Asha Mohan.
2) Emotional Intelligence Scale constructed by Upendhar Dhar & A. Hyde.

## Analysis and interpretation of the data

Researcher used psychological tests for data collection, out of the total five Jr. colleges student are selected. Total 100 students are selected from these colleges. Two psychological tests used for data collection namely achievement motivation and emotional intelligence. Researcher used statistical techniques like mean, standard deviation and ANOVA used to interpreted the data.

**Analysis of variance for N-Ach one way ANOVA :**

**I) Achievement versus gender.**

**Table No – 1.1**

| Source | DF | SS | MS | F | P |
|---|---|---|---|---|---|
| Gender | 01 | 4900 | 4900 | 6.11 | 0.015 |
| Error | 98 | 78624 | 802 | | |
| Total | 99 | 83524 | | | |

Above table shows that the relation between achievement motivation of females and males. Researcher used ANOVA and Mean to find out gender differences, in table -1.1, 'F' value is 6.11and it is significant at the level of 0.01 hence according to mentioned scores & ANOVA, it is proved that achievement motivation is more in females than males.

**Table No - 1.2**

| Level | N | Mean | S.D |
|---|---|---|---|
| F | 50 | 153.00 | 25.20 |
| M | 50 | 139.00 | 31.14 |

Table no – 2.2 show that means & standard deviations, mean value of females is 135.00 and in males that is 139.00. That is found significant differences, hence again if we compare both the means, mean value of females is much more than males.

**II) Emotional intelligence is more in females than males**.

**Table No - 1.3**

| Source | DF | SS | MS | F | P |
|---|---|---|---|---|---|
| Gender | 01 | 4900 | 4900 | 6.66 | 0.011 |
| Error | 98 | 72080 | 736 | | |
| Total | 99 | 76980 | | | |

Above table shows that the relation between intelligence of females and males. Researcher used ANOVA to find out gender differences. In table – 1.3, 'F' value is 6.66 and it is significant at the level of 0.011, henceaccording to mentioned scores & ANOVA, it is proved that emotional intelligence is more in females than males.

**Table No – 1.4**

| Level | N | Mean | S.D |
|---|---|---|---|
| F | 50 | 135.00 | 28.96 |
| M | 50 | 121.00 | 25.14 |

Table – 1.4 shows that means & standard deviations. Mean value of females is 135.00 and in males that is 121.00. That is found significant differences, hence again if we compare both the means, Mean value of females is much more than males.

**III) Achievement motivation and emotional intelligence are positively correlated**.

**Table No – 1.5**

| Source | DF | SS | MS | F | P |
|---|---|---|---|---|---|
| Gender | 01 | 16200 | 16200 | 19.98 | 0.00 |
| Error | 198 | 160504 | 811 | | |
| Total | 199 | 176704 | | | |

Above table shows that the relation between achievement motivation and emotional intelligence. In table – 1.5, 'F' value is 19.98; it means both these terms are positively correlated. Comparison found between means and standard deviation of emotional intelligence and achievement motivation, hence according to this value, we conclude that E.Q. and N-Ach is positively correlated.

**Table No – 1.6**

| Level | N | Mean | S.D |
|---|---|---|---|
| EQ | 100 | 128.00 | 027.89 |
| N-Ach | 100 | 146.00 | 29.05 |

## Statistics

1) Mean
2) Standard Deviation
3) ANOVA

## Conclusion

1) There is significant difference found in males and females in case of achievement motivation.
2) Females are more emotionally intelligence than males.
3) There is positive correlation found between achievement motivation and emotional intelligence in Jr. College students.

## References


1) Agrawal, J.C. (1972), 'Educational Research: An Introduction: New Delhi : R.K. printers.
2) Best, J. W. (1989), 'Research in Eduction', (Ed-7), New Delhi : Prentice Hall Publication.
3) Buch, M.B. (Ed) (1978-83), 'A Survey of Research In Education, ' Baroda : society for educational research and development.
4) Kundu, C.L. and Tutoo, D.N. (1988), 'Educational Psychological,' New Delhi :Prentice Hall Publication.
5) Morgan, C.T. Etal (1993), 'Introduction to Psychology,' (Ed-7), New Delhi : Tata McGraw Hill Publishing Company Limited.


❖❖❖

# भारतीय संसदीय लोकशाहीत विरोधी पक्षाची भूमिका

प्रा. डी.एस. पाटील
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी ९४०३०४७४७१

## प्रस्तावना

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारतीय घटना समितीने संसदीय लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला. संसदीय लोकशाही ही जबाबदार शासनपद्धती असते. कारण या शासनपद्धतीत शासन म्हणजे मंत्रीमंडळ आपल्या कार्यासाठी संसदेला जबाबदार असते. भारतात मंत्रीमंडळ लोकसभेला जबाबदार आहे. लोकसभेचा विश्वास असेपर्यंत मंत्रीमंडळ अधिकार पदावर राहते. लोकसभेने मंत्रीमंडळाविरुद्ध अविश्वास प्रस्ताव मंजूर केल्यास पंतप्रधानासहित संपूर्ण मंत्रीमंडळाला पायउतार व्हावे लागते. म्हणजेच ही मंत्रीमंडळाची संयुक्त जबाबदारी असते. अशा परिस्थितीत संसदेतील विरोधी पक्षाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. विरोधी पक्षाने सत्तारूढ पक्षाच्या कार्यातील त्रुटी अचूक ओळखून त्यावर प्रखर टीका करून सत्तारूढ पक्षाच्या नजरेत आणून देणे आवश्यक असते. सत्तारूढ पक्षाने चुकांची दुरुस्ती न केल्यास मंत्रीमंडळाविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आणणे हे विरोधी पक्षाचे कार्य आहे. परंतु हे कार्य विरोधी पक्षाने देशहित लक्षात घेऊन केले पाहिजे. पक्षहित किंवा स्वत:च्या स्वार्थासाठी करू नये अशी अपेक्षा असते. विरोधी पक्षाचे हे महत्त्व लक्षात घेवून विरोधी पक्षनेत्याला मंत्र्याचा दर्जा दिला जातो.

## लेकशाहीत राजकिय पक्षांची आवश्यकता

लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्षाला अनन्यसाधारण महत्त्व असते. लोकशाहीत सार्वत्रिक निवडणुकीच्या माध्यमातून कायदेमंडळ व कार्यकारी मंडळामध्ये लोकप्रतिनिधी निवडून पाठविले जातात. सरकार स्थापन करण्यासाठी कायदेमंडळात बहुमताची आवश्यकता असते. बहुमत मिळविण्यासाठी राजकीय पक्षांची आवश्यकता असते. दोन किंवा दोनपेक्षा जास्त राजकीय पक्षांची आवश्यकता असते. ज्या राजकीय पक्षाला बहुमत मिळते तो पक्ष सत्तारूढ होतो व सरकार स्थापन करतो तर बाकीचे पक्ष विरोधी पक्ष म्हणून कार्य करतात. संसदिय लोकशाहीमध्ये तर सरकार स्थापन करण्यासाठी राजकीय पक्षांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. संसदीय लोकशाहीमध्ये सरकार स्थापन करण्यासाठी बहुमताची आवश्यकता असते. हे बहुमत मिळविण्यासाठी राजकीय पक्षांची आवश्यकता असते. संसदीय लोकशाहीमध्ये राज्यकारभार करण्यासाठी सत्ताधरी पक्षामध्ये राजकीय एकजिनसीपणा असणे आवश्यक असतो. म्हणजे मंत्रीमंडळाचे सर्व सदस्य एकाच विचाराचे, असणे आवश्यक असते. त्यासाठी सर्व मंत्री एकाच पक्षातून घेतले जातात.

## लोकशाही विरोधी पक्षाची भूमिका

लेकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही ही अब्राहम लिंकन यांनी लोकशाहीची केलेली व्याख्या सर्वमान्य आहे. जगातील बहुतेक देशात लोकशाही हा शासन प्रकार अस्तित्वात आहे. लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. विरोधी पक्षाचे महत्त्वाचे कार्य म्हणजे सरकारच्या ध्येय धोरणावर टिका करून धोरणात बदल करण्यास भाग पाडणे. कधी कधी विरोधी पक्ष आपले विचार स्वीकारण्यास भाग पाडतो. विरोधी पक्षाच्या अस्तित्वामुळे सत्ताधारी पक्षाला लोकमतानुसार निर्णय घ्यावे लागतात. अन्यथा लोकमत आपल्याविरुद्ध गेल्यास निवडणुकीत आपला पराभव होईल ही भीती सत्तारूढ पक्षाला असते. विरोधी पक्ष सत्तारूढ पक्षाच्या धोरणातील चुका किती प्रभावीपणे जनतेसमोर आणतो. यावर सत्तारूढ पक्षाचा पराभव होतो. उदा. १९७७ मध्ये आणीबाणी विरुद्ध विरोधांनी प्रभावीपणे केलेला प्रचार कॉंग्रेस पक्षाच्या पराभवास कारणीभूत ठरला. १९९४ मध्ये भारतीय जनता पक्षाने आघाडी सरकारच्या भ्रष्टाचारी कारभाराचा केलेला प्रचार आघाडी सरकारच्या पराभवास कारणीभूत ठरला.

विरोधी पक्षाला लोकांमध्ये जाऊन लोकमत संघटित करण्याचे कार्य करावे लागते. लोकांचे प्रश्न समजून घेऊन विधिमंडळात प्रश्नोत्तराचा तास स्थगन प्रस्ताव, काम रोको प्रस्ताव, अविश्वास प्रस्ताव, अर्थसंकल्पीय चर्चा

इ. माध्यमातून शासनासमोर मांडण्याचे कार्य करावे लागते. तसेच विधिमंडळाबाहेर, व्यासपीठ, प्रसारमाध्यमांद्वारे हे कार्य करावे लागते. अशाप्रकारे जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य विरोधी पक्ष करीत असतो. विरोधी पक्ष नसेल तर जनतेचे प्रश्न सरकारसमोर मांडले जाणार नाहीत त्यामुळे जनतेमध्ये असंतोष निर्माण होईल व जनता सरकारविरुद्ध उठाव करेल, क्रांती करेल. विरोधी पक्षामुळे हे कार्य शांततामय व सनदशीर मार्गाने होते. विरोधी पक्ष एकप्रकारे लोकशाहीचा रक्षक आहे. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी लोकांना राजकीय, प्रश्न समस्यांची माहिती देणे, त्या समस्या सोडविण्यासाठी सरकारचे प्रयत्न सरकारचे अपयश इ. ची माहिती जनतेपर्यंत पोचविण्याचे कार्य विरोधी पक्ष करतो. म्हणजेच लोकांना राजकीय शिक्षण देण्याचे व राजकीयदृष्ट्या जागरूक करण्याचे कार्य विरोधी पक्ष करीत असतो. नागरिकांचे अधिकार किंवा राजकीय संस्थांवर आघात झाल्यास त्याला विरोध करण्याचे कार्य विरोधी पक्ष करतो.

## संसदीय लोकशाहीत विरोधी पक्षाची भूमिका

संसदीय लोकशाहीचा उदय इंग्लंडमध्ये झाला. त्यामुळे इंग्लंडला संसदीय लोकशाहीची जननी म्हणतात. विरोधी पक्ष सुद्धा सर्वप्रथम इंग्लंडमध्येच निर्माण झााला. राजाला संसदेमध्ये बहुमत होते पण विरोधी करणारा अल्पमतातील गट सुध्दा अस्तित्वात होता. त्यालाच विरोधी पक्ष म्हणून संबोधण्यात येऊ लागले. इंग्लंड मध्ये द्विपक्ष पद्धती आहे. बहुमत मिळविणारा पक्ष सरकार बनवितो व अल्पमतात असणारा पक्ष विरोधी पक्ष म्हणून कार्य करतो. संसदेची सभागृह बैठक व्यवस्थेनुसार दोन भागात विभागली जातात व सभापतीच्या उजव्या बाजुला सत्तारूढ पक्षाचे सदस्य तर डाव्या बाजूला विरोधी पक्षाच्या सदस्यांची बसण्याची व्यवस्था करण्यात येते. प्रत्येक पक्ष आपला नेता निवडतो. पंतप्रधान सत्ताधारी पक्षाचा नेता असतो. विरोधी पक्षसुद्धा आपला नेता निवडतो. दोन पेक्षा जास्त पक्ष असल्यास प्रत्येक पक्ष आपला नेता निवडतो. पण सभागृहातील सर्वात मोठ्या विरोधी पक्षाच्या नेत्याला विरोधी पक्षनेत्याचा दर्जा दिला जातो. हाऊस ऑफ कॉमन्समध्ये सत्तारूढ पक्षाची जशी संघटना असते तशीच विरोधी पक्षाचीसुद्धा संघटना असते. प्रधानमंत्री आपले मंत्रीमंडळ बनवितो, त्याचप्रमाणे विरोधी पक्षनेता आपले मंत्रीमंडळ बनवितो, त्याला छाया मंत्रीमंडळ म्हणतात. त्यातील प्रत्येक सदस्य त्या त्या खात्यातील मंत्र्याच्या कार्यावर लक्ष ठेवतो. इंग्लंडमधील विरोधी पक्ष आपली जबाबदारी ओळखून कार्य करतो. जनता संपर्क साधनांचा उपयोग करून, सरकारवर टीका करू, स्वतःच्या धोरणाचा पाठपुरावा करून विरोधी पक्ष अधिकारावर नसला तरी आपला प्रभाव पाडत असतो. विरोधी पक्ष जनतेचा अधिक विश्वासातील प्रतिनिधी म्हणून कार्य करतो व सत्तारूढ पक्षावर नियंत्रण प्रस्थापित करतो. सरकारी धोरणांवर लक्ष केंद्रीत करणे एवढेच त्याचे कार्य नसून प्रसंगी पर्याची शासन पुरविण्याचीही त्याची जबाबदारी आहे.

अमेरिकेत सुद्धा द्विपक्षपद्धती आहे; परंतु तेथे संसदीय शासन पद्धती नसून अध्यक्षीय शासनपद्धती आहे. अमेरिकेत कॉंग्रेसच्या प्रतिनिधी सभेत सत्तारूढ पक्षाच्या जेवढ्या समित्या असतात तेवढ्या समित्या विरोधी पक्ष तयार करतो आणि अमेरिकन प्रशासनाच्या योजना आणि कार्यासंबंधी आपले मत सरकारी समितीसमोर प्रकट करतात. त्याचप्रमाणे सरकार वेगवेगळ्या महत्त्वाच्या विषयावर व प्रश्नांवर सत्तारूढ पक्ष आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांच्या संयुक्त समित्यांची नेमणूक करते.

## भारतीय संसदिय लोकशाहीत विरोधी पक्षाची भूमिका

भारतात बहुपक्ष पद्धती आहे. मे १९५२ मध्ये पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. १८८५ मध्ये स्वराज्य प्राप्तीसाठी स्थापन झालेल्या राष्ट्रीय कॉंग्रेस चळवळीचे रूपांतर स्वातंत्र्यानंतर भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षात झाले. या पक्षालाच केंद्रात व घटक राज्यात बहुमत मिळून सत्ता प्राप्त झाली. प्रबळ विरोधी पक्षाच्या अभावामुळे जवळजवळ १९७८ पर्यंत कॉंग्रेस पक्षाचेच सरकार केंद्रामध्ये होते. १९७८ मध्ये सर्वप्रथम विरोधी पक्षाचे सरकार अस्तीत्वात आले पण ते फार काळ टिकले नाही. त्यानंतर १९८० ते १९८९ पर्यंत पुन्हा कॉंग्रेस सरकार सत्तेवर आले. १९८९ च्या निवडणुकीत १४ राजकीय पक्षांची आघाडी करून ४० सभासद संख्या असलेल्या जनता दलाचे नेते व्ही.पी. सिंग पंतप्रधान झाले. १९९१ मध्ये परत कॉंग्रेस सरकार सत्तेवर आले. १९९६ ते २००४ या काळात कॉंग्रेसतर सरकारे सत्तेवर होती. २००४ ते २०१४ च्या मध्यावती निवडणूकीत कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत नसल्यामुळे कॉंग्रेसच्याच नेतृत्वात संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार अस्तीत्वात आले. २०१४ च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे सरकार प्रचंड बहुमताने निवडून आले. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले.

भारतात सध्या सहा मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष राष्ट्रीय राजकारणात क्रियाशील आहेत. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, भारतीय जनता पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, बहुजन समाज पार्टी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष यांचा समावेश आहे. प्रादेशिक पक्षांची संख्या भरपूर आहे. या पक्षांचा प्रभाव स्थानिक राजकारणावर असून त्या त्या राज्यात त्यांना सत्ता प्राप्त होते. विधानसभेप्रमाणे लोकसभेच्या निवडणुकीवर या पक्षांचा प्रभाव असतो. त्यामुळे लोकसभेत कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळत नसल्याने सरकार स्थापनेसाठी अनेक प्रादेशिक पक्षांचे सहकार्य घेऊन समिश्र सरकारे स्थापन करावी लागतात अशा सरकारला आपल्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करता येत नाही. त्यांच्यावर सतत सत्तेत सहभागी प्रादेशिक पक्षांचा दबाव असतो. प्रादेशिक पक्षांच्या मनाप्रमाणे न लागल्यास असलेला पाठींबा काढून घेण्याची धमकी दिली जाते.

लोकसभेत सत्तारूढ पक्षाच्या खालोखाल ज्या पक्षाला किंवा आघाडीला सर्वात जास्त मते मिळाली असतील त्या पक्षाला विरोधी पक्ष म्हणून मान्यता दिली जाते. भारतात विरोधी पक्षाचा दर्जा प्राप्त करण्यासाठी लोकसभेच्या निवडणुकीत कमीत कमी १० टक्के जागा प्राप्त करणे आवश्यक आहे. परंतु २०१४ च्या निवडणुकीत एकाही पक्षाला एवढ्या जागा मिळाल्या नाहीत. त्यामुळे २०१४ ते २०१९ या कालावधीत विरोधी पक्षाचा दर्जा कोणत्याच पक्षाला नाही. त्यामुळे विरोधी पक्षनेत्याचे पद रिक्त आहे. संसदीय लोकशाहीसाठी ही गोष्ट घातक आहे. कारण विरोधी पक्ष सत्तारूढ पक्षाच्या हुकुमशाहीवर नियंत्रण प्रस्थापित करतो. सत्तारूढ पक्ष निवडणुकीला सामोरे जातांना जे धोरण व योजना जाहीर करतो त्याची प्रभावी पुर्तता करण्याचे कार्य करतो किंवा नाही यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी विरोधी पक्षाची असते. भारतात निवडणुकीला सामोरे जातांना पक्ष निरनिराळी अशक्य आश्वासने जनतेला देतात; परंतु त्यांची पुर्तता होऊ शकत नाही. गेल्या १५ वर्षातील संसदेतील विरोधी पक्षांच्या कामकाजाचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की सर्व विरोधी पक्ष सारखेच आहेत. कोणाचीच वर्तणूक विरोधी पक्षासारखी नाही. प्रश्नोत्तराच्या तासात मंत्रांची उलट तपासणी घेऊन त्यांना धारेवर धरण्याची तरतूद सदस्यांना फारशी महत्वाची वाटत नाही. तारांकित प्रश्नांपैकी १०—१५ टक्केच प्रश्नांना तोंडी उत्तरे दिली जातात. प्रश्नोत्तराच्या तासापैकी ४० टक्के वेळ अडथळे आणण्यामुळे वाचा जातो. विरोधी पक्षांनी मांडलेल्या मुद्याकडे सरकार फारसे लक्ष देत नाही. सरकार व विरोधी पक्ष यांच्या दरम्यान क्वचितच विधायक चर्चा होते त्यामुळे सभागृहाचे कामकाज रोखणे, घोषणाबाजी, मोर्चे, निदर्शने, सभागृहातून बहिर्गमन, सभापतीच्या आसनासमोर धाव घेणे, सत्ताधारी पक्षातील सदस्यांशी मारामारी करणे याकडे विरोधी पक्षांचा अधिक कल दिसतो. शिवाय प्रसारमाध्यमे अशा बाबींची अधिक दखल घेऊन त्याचे रसभरीत वर्णन करतात.

भारतात बहुपक्षपद्धती असूनही एका पक्षाचे प्राबल्य निर्माण झाले आहे. त्यामुळे भ्रष्टाचाराला वाव मिळतो. बोर्फोस तोफांच्या खरेदीचा विवाद संसदेत अनेक महिने गाजत राहिला त्याचा प्रभाव एवढा मोठा होता की भ्रष्टाचार या अर्थाने बोर्फोस हा शब्द रूढ झाला. अविश्वासाच्या ठरावापासून सरकारला वाचविण्यासाठी सत्ताधारी पक्षाने झारखंड मुक्ती मोर्चाच्या सदस्यांची मते विकत घेण्याचे प्रकरण, हर्षद मेहता घोटाळा, हवाला, टेलिकॉम घोटाळा, २ जी स्पेक्ट्रम घोटाळा, तहलका आणि अशा घोटाळ्यांमध्ये पंतप्रधानाचे नाव जोडले जाणे ही चिंतेची बाब आहे. राजकारणाचे गुन्हेगारीकरण झालेले आहे. जवळजवळ सर्वच पक्षात कमी अधिक संख्येत गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना तिकीट दिले जाते व ते निवडून सुध्दा येतात निवडणुकीत पैशांचे प्रलोभन, दारूचे प्रलोभन दिले जाते. भ्रष्टाचारी नेत्यांना क्लीन चीट दिली जाते, या सर्व गोष्टी संसदीय लोकशाहीसाठी घातक आहेत.

## समारोप

संसदीय शासनामध्ये सत्तारूढ पक्षावर नियंत्रण ठेवण्यासाठी, शासकीय धोरणातील दोषांवर टीका करण्यासाठी, जनतेचे प्रश्न संसदेमध्ये प्रभावीपणे मांडण्यासाठी, सरकारच्या धोरणांवर प्रभाव टाकण्यासाठी, भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी विरोधी पक्षाची आवश्यकता असते. फक्त टीका न करता सरकारच्या राष्ट्रीय हिताच्या कार्यात सहकार्य करण्याची भूमिका विरोधी पक्षाला करावी लागते. स्वीत्झर्लंडमध्ये सुध्दा बहुपक्ष पद्धती असून तेथील पक्ष राष्ट्रहिताच्या दृष्टीनेच कार्य करतात. विरोधी पक्षांनी विरोधी पक्ष म्हणून आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. इंग्लंडच्या धर्तीवर छाया मंत्रीमंडळ बनविण्यास शिकले पाहिजे व सरकारच्या प्रत्येक खात्यावर बारकाईने लक्ष देऊन जनहित व राष्ट्रहिताच्या दृष्टीने कार्य करण्यास बाध्य केले पाहिजे. विरोधी पक्षांनी , जातीय, धर्मिक, भाषिक अशा कोणत्याही हितसंबंधाचा विचार न करता राष्ट्रहिताचा विचार करणे संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक आहे.

## संदर्भग्रंथ

१) भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्नीपरीक्षा, लेखक – माधव गोडबोले, अनुवाद – सुजाता गोडबोले, राजहंस प्रकाशन, पुणे

२) तुलनात्मक शासन आणि राजकारण, प्रा. शेख हाशम, डॉ. जोगेंद्र गवई, विश्व पब्लिशर्स ॲंड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर

३) आधुनिक राजकीय विश्लेषण – वि.मा. बाचल, दि. का. गर्दे, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे

४) भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण – भा. ल. भोळे, पिंपळापुरे ॲंड कंपनी, नागपूर

५) भारतीय राजकारणाचे दिशाहीन स्वराज – डॉ. व्ही. एस. इंगळे, विश्वभारती रिसर्च सेंटर, लातूर

❖❖❖

# भाषाप्रभू पु .भा. भावे

प्रा. रा. तु. आदे
सहयोगी प्राध्यापक
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
E Mail: rajuade2512@mail.com भ्रमणध्वनी ९४०३०४७४७१

आधुनिक मराठी कथेमध्ये मानाचे पान मिळालेल्या पुरुषोत्तम भास्कर भावे यांनी नवकथेच्या प्रांतात उल्लेखनीय कामगिरी केली होती. नवकथेच्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ मानकऱ्यांत पु.भा. भावे यांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांची कथा नव्यात साजेल आणि जुन्यात नावाजेल अशा स्वरूपाची आहे. कादंबरी, ललित, व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णन, नाटके, चित्रपटकथाकार अशा अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे भावे कथाकार म्हणून सुप्रसिद्ध होते. '' ' लघुकथेचे पुरुषोत्तम' म्हटले जावे इतके सिद्धहस्त प्रौढपण त्यांच्या कथेने प्रकट केले आहे.'' त्यांची कथा रसिकांच्या पसंतीस उतरली होती. त्यांच्या एकूणच साहित्यिक कामगिरीचा गौरव मराठी रसिक, वाङ्मयप्रेमी,आणि साहित्यिकांनी अहमदनगर येथे मे १९६४ मध्ये भरलेल्या मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद बहाल करून तसेच पुणे येथे नोव्हेंबर १९७७ ला झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवडून केला. नामवंत वक्ते, निबंधकार म्हणूनही भावे ख्यातीप्राप्त ठरले होते. त्यांच्या प्रारंभीच्या निबंध लेखनातून त्यांचा हा वक्तृत्व गुण प्रगट झालेला आढळतो. नागपूरच्या 'सावधान' साप्ताहिकातून पु.भा.भावे यांचे ''बंगाल करपलेले कुसुम!'', ''सहदेवा, थोडा अग्नी आण !'' आणि ''आमच्या माँसाहेब इतक्या सुंदर असत्या तर'' आदि लेख प्रसिद्ध झाले आणि वाचकांच्या मनात अनेक प्रश्न उभे राहिले. त्यांच्या भावोत्कट लेखनातील भाषाप्रभुत्वाने सारे मराठी साहित्यक्षेत्र विस्मित व रोमांचित झाले.

भाव्यांनी कथा, कादंबरी, आणि नाटके लिहिली. त्यांचे हे मौलिक साहित्य आहे. त्यांच्या या साहित्य कृतींमुळे भाव्यांना मानसन्मान, प्रतिष्ठा व रसिकांच्या मनात स्थान मिळाले. तरीही भाव्यांचे नाव निघाल्याबरोबर आठवतात ते ' रक्त आणि अश्रू' या संग्रहातील त्यांचे वृत्तपत्रीय लेख ! त्या लेखांच्या शैलीबद्दल समीक्षक म्हणतात,'' काव्यात्मता ,ओजस्विता, भावनाशीलता,कारुण्य आणि नाटय श्शब्दांमधून मूर्तिमंत उभे करण्याची विलक्षण हातोटी आणि उद्गारात्मक व प्रश्नार्थक वाक्यांची चातुर्यपूर्ण योजना,यामुळे भाव्यांची लेखनशैली गतिमान होते. तिला एक प्रकारची लय प्राप्त होते. एक विलक्षण वेग आणि आवेग तिच्या ठिकाणी आविर्भूत होतो. वाचकांच्या अंत:करणाची तार झेडून त्यातून कंपने निर्माण करण्यात भावे अद्‌भुत कौशल्य प्रगट करताना आढळतात.'' हा अभिप्राय भाव्यांच्या लेखनशैलीवर व त्यातून प्रगट होणा—या भाषाप्रभुत्वावर पुरेपूर प्रकाश टाकणारा आहे. भाव्यांची ही लेखनशैली इतकी आगळी—वेगळी आहे की अन्य निबंधकारांना तिचे अनुकरण करता आले नाही. स्वत: भाव्यांनी त्या शैलीचा पुन्हा वापर केला नाही .

भाव्यांच्या लेखनशैलीवर राम गणेश गडकरी, शि.म.परांजपे, आणि अच्युतराव कोल्हटकर यांचा प्रभाव जाणवतो ते त्यांचे आदर्श होते. गडक—यांचे ' रिकामपणाची कामगिरी ' हे पुस्तक त्यांच्या अभ्यासक्रमात होते. त्याच्या अभ्यासासाठी भाव्यांनी गडक—यांची नाटके वाचून काढली. त्यांनी गडक—यांवर लिहिलेला एक लेख 'लोकराज्य' या पाक्षिकाच्या १९८५सालच्या गडकरी विशेषांकात ' गडक—यांची कल्पना अशी बहरून आली ' या शीर्षकानी प्रसिद्ध झाला आहे . त्यात भावे लिहितात ,''गडकऱ्यांच्या भाषेला एक नाद होता, लय होती, स्वत:चे असे सौंदर्य व सामर्थ्य होते. गडकऱ्यांनी केवळ मोठे शब्द वापरले नाहीत, त्या वाक्यांना लय दिली, नाद दिला, प्रमाण दिले व परिणाम दिला. मोठ्या शब्दांची केवळ उतरंड रचून मोठी शैली निर्माण होत नाही. देवल किर्लोस्करांसारखी सोपी भाषा वापरता येत नव्हती म्हणून गडकऱ्यांनी कठीण भाषा वापरली, हे मुळीच खरे नव्हे. गडकऱ्यांनी परिणामाच्या आणि रसोत्कर्षाच्या दृष्टीने ज्या ठिकाणी जशा भाषेची गरज आहे तशी भाषा ते अचूकपणे वापरीत.'' गडकऱ्यांच्या भाषाशैलीतील वैशिष्ट्ये भाव्यांच्या ललितलेखनालाही लागू पडतात.

कोणतीही साहित्यकृती ही शब्दांच्या माध्यमातून व्यक्त होत असते. लेखकाची जीवननिष्ठा, जीवनानुभव आणि विचार विकार हे भाषेद्वारेच व्यक्त होत असतात. लेखकाच्या घडणीमध्ये प्रारंभिक काळात त्याने केलेले वाचन ,त्याच्या मनावर झालेले शैलीकार लेखकाच्या भाषेचे संस्कार आणि स्वत: केलेला लेखनाचा अभ्यास या सर्वांचा संबंध त्याच्या भाषाशैलीशी व भाषाप्रभुत्वाशी निगडित असतो. भाषाप्रभुत्व म्हणजे लेखकाचे भाषा हवी तशी वाकविण्याचे सामर्थ्य त्याच्या मनाच्या कप्प्यामध्ये संग्रहित विशाल शब्दभांडार, आणि त्याची अनुभूती,

स्फूर्ती व भावाविष्कार उत्कटपणे अभिव्यक्त करणारी आशययुक्त, रसाश्रयी, अचूक शब्दावली यांचा समुच्चय म्हणजे भाषाप्रभुत्व. शब्दाचा वापर करताना नाद ,ताल आणि तोल सांभाळण्याचे कसब म्हणजेच भाषावैभव आणि त्याचा औचित्यपूर्ण आणि रस निर्मितीसाठी वापर करण्याचे कौशल्य म्हणजे भाषाप्रभुत्व, असे म्हणता येईल. लेखकाची लेखनशैली गद्य असो की काव्यात्म, तिच्यात स्वभावोक्ती असो की वक्रोक्ती ,तिच्यात लालित्य असो अथवा रौद्रता हे सारे गुण भाषेद्वारेच व्यक्त होतात. म्हणून भाषाप्रभुत्वाचा संबंध पोचतो लेखकाच्या शब्दसंग्रहाशी आणि अभिव्यक्ती कौशल्याशी !

शि.म. परांजपे, अच्युत बळवंत कोल्हटकर, वि.दा. सावरकर हे भाव्यांचे गुरू होते. 'रक्त आणि अश्रू' या लेखसंग्रहाच्या 'निर्देश' ह्या प्रास्ताविकात लिहितात, ''ह्या संग्रहातील कित्येक लेख लिहिताना कै. अच्युत बळवंत कोल्हटकर ह्यांच्या शैलीचा कमी अधिक प्रमाणात उपयोग केला आहे. एक विशिष्ट परिणाम घडवून आणण्याच्या दृष्टीने तो वाङ्मयप्रकार मला फार उपयुक्त वाटला.'' याच संग्रहातील लेख 'सहदेवा, थोडा अग्नी आण!', 'विमल तुला काय झाले?' यातील वक्रोक्ती आणि कारुण्य, तसेच त्यांची शैली ही 'काळ'कर्ते शि.म. परांजपे यांचे स्मरण करून देतात. ते सरळ वाचकांच्या अंत:करणाला हात घालतात. त्यांच्या शब्दयोजनेतील सौंदर्य आणि सामर्थ्य वाचकांच्या मनाला हलवून सोडतात. 'रक्त आणि अश्रू' या लेखसंग्रहाबद्दल वाङ्मयाचे इतिहासकार अ.ना. देशपांडे लिहितात, ''हा त्यांचा निबंधसंग्रह वाचता वाचता ज्याचे रक्त क्षणभर का होईना सळसळून उठणार नाही, ज्याच्या डोळ्यात निमिषमात्र का होईना अश्रूंची गर्दी होणार नाही असा सहृदय वाचक विरळाच!'

स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर हे भाव्यांचे वैचारिक गुरू. भाव्यांनी सावरकरांची हिंदुत्वनिष्ठा, स्वदेश प्रीती, निर्भयता आणि भाषाशुद्धी ही वैशिष्ट्ये स्वीकारली. सावरकरांची पल्लेदार वाक्यांची वक्तृत्वपूर्ण लेखनशैली जरी भाव्यांना अनुकरणीय वाटली नसली तरी भाव्यांच्या लेखनात चुकूनही अरबी फारसी शब्द येत नाहीत. ते बाजाराला हाट म्हणतील, दुकानाला विकान म्हणतील. 'ध्वनियंत्र' टेलिफोन, 'द्रव्याज्ञा' – मनिऑर्डर, हिमदुग्ध –आईसक्रीम, वायुमान– हवामान, गारकपाट– फ्रीज असे कितीतरी सावरकरी पद्धतीचे देशी शब्द त्यांच्या भाषावैशिष्ट्याची साक्ष पटवितात. मात्र, 'रक्त आणि अश्रू' या संग्रहातील लेखांमध्ये ही भाषाशुद्धीची जिद्द आढळत नाही.

भाव्यांच्या भाषाप्रभूत्वाचे स्वरूप समजून घेण्याच्या दृष्टीने त्यांच्या ''सहदेवा, थोडा अग्नी आण'' या लेखातील खालील उतारा पाहण्यासारखा आहे. सहदेवा, थोडा अग्नी आण! सहदेवा, थोडा अग्नी आण म्हणजे फासे फेकावयास उद्युक्त होणारे दोन्ही हातच जाळून टाकतो ! द्युताच्या या दासाने आज धर्माचा अतिक्रम केला आहे. इंद्रियनिग्रहशून्य क्रूरांकडून आज पांचाली ह्याच्यामुळेच अनन्वित पीडा पावली आहे. वयाने हा वडील आहे, आमचा नेता म्हणून हा ज्ञात आहे,शांतीशील म्हणून हा ख्यात आहे, दयाशील म्हणून हयाची कीर्ती आहे, अजातशत्रू म्हणून लोक याला ओळखतात आणि तरीही त्याचे पातकी हात प्रज्वलित अनलज्वालेवर दग्ध करून टाकण्याची अनिवार इच्छा मला होते. कारण हा वयाने ज्येष्ठ असला तरी बुद्धिभ्रष्ट आहे, आमचा नेता असला तरी व्यसनग्रस्त आहे.

ह्या उताऱ्यातून भीमाच्या मुखाने भावे बोलतात. धर्माच्या रूपातील महात्माजींवर क्रोधास्त्र सोडतात. वाक्यविन्यास त्यातील प्रास आणि आवर्जने यामुळे हा उतारा त्वेष उत्पन्न करणारा झाला आहे. त्यातील वक्रोक्तीमुळे त्याला आगळे सौंदर्य प्राप्त झाले आहे. गडकऱ्यांच्या भाषेचा आभास या उताऱ्यातून होतो. भावनेला शब्दांची औचित्यपूर्ण जोड मिळाल्यामुळे तो परिणामकारी झाला आहे. ''भाव्यांच्या भाषेचा जन्म त्यांच्या सकस भावनेच्या ओघातून झाला आहे'' असे जे श्री. गंगाधर गाडगीळ म्हणतात. त्याचा प्रत्ययही या उताऱ्यातून येतो.

निबंधाप्रमाणेच कथा, कादंबरी आणि नाटक या वाङ्मयप्रकारातूनही त्यांचे भाषासौष्ठव दृष्टोत्पत्तीस येतो. त्यांच्या कथेतील भाषाशैलीबद्दल कथाकार गंगाधर गाडगीळ म्हणतात, ''कदाचित हास्यास्पद वाटेल, पण भाव्यांची भाषाशैली फार परिणामकारक आहे हाच तिचा मला दोष वाटतो. त्यामुळे त्यांच्या कथेचे खरे गुण समजायला अडचण पडते.'' तर भाव्यांच्या कथेचे विहंगमावलोकन प्रस्तुत करताना डॉ. वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे म्हणतात, ''भावे हे थोर शब्दप्रभू होते. निर्गुण निराकाराला सगुण साकार करण्याची किमया त्यांच्या लेखणीत होती. जीवनातील भव्य दिव्याप्रमाणेच क्षुद्रपणाही ते प्रत्ययकारी सामर्थ्याने शब्दांकित करीत. डॉ. वऱ्हाडपांडे भाव्यांच्या भाषाशैलीविषयी म्हणतात, 'ध्यास,'मुक्ती' यासारख्या विराट आशयाला कवेत घेणाऱ्या कथातून त्यांची भाषाशैली आपले तेंजस्वी पंख पसरताना दिसते, तर तीच भाषाशैली 'स्वप्न' 'पत्र' यांच्यासारख्या नाजूक आशयाच्या कथा सांगताना मोरपिसा्ंच्या पायघड्यांवरून हळूवारपणे चालत जाताना आढळते. 'प्रतारणा', 'चौदा

मिनिटे' ह्यांसारख्या करुण अनुभवांच्या अभिव्यक्तीसाठी ती भावाकुलतेचे पांघरूण घेते तर 'आईस्क्रीम' सारख्या हास्यकारक अनुभवाचे आविष्करण करताना विलक्षण मिष्किल मुखवटा धारण करते.

कादंबरी लेखनाकडे भावे बऱ्याच उशीरा वळले. तोपर्यंत त्यांचा लेखनाभ्यास पूर्णतेच्या अवस्थेत आला होता. आशयाला अनुरूप व अनुकूल असा आकार देण्याची क्षमता त्यांच्या शब्दकळेला प्राप्त झाली होती. अशावेळी १९४९–५० साली 'अकुलिना' ही त्यांची पहिली कादंबरी प्रसिद्ध झाली. या पत्ररूप कादंबरीतील आत्मसमर्थनाचाच सूर धरून प्रगट होणारी मधूची पत्रे म्हणजे तर जिवंत सळसळणाऱ्या भाषेचे स्पृहणीय आलेख वाटतात.

नाटककार या नात्याने व्यावसायिकदृष्टया भाव्यांना फारसे यश मिळाले नसले तरी भाषा व संवाद लेखनातील त्यांचे वैशिष्ट्य त्यांच्या नाट्यसंहितांमधून प्रगट झाले आहे. 'स्वामिनी' आणि 'महाराणी पद्मिनी' या नाटकातून त्यांचे भाषाप्रभुत्व निदर्शनास येते. नाट्यसमीक्षकांनीही त्याला मान्यता दिली आहे. 'स्वामिनी' नाटकातून त्यांनी दीर्घ स्वगताची जुनी नाट्यपरंपरा पुनरुज्जीवित केली. त्यादृष्टीने याच नाटकातील खालील स्वगत लक्षात घेण्यासारखा आहे.

''काशी –––कसला आहे हा सुवास? कसला आहे? पावसाचा सुवास आहे का हा? की वाऱ्याचा आहे? का विजेच्या पेटत्या फुलांचा आहे, का ढगांच्या सावळ्या मंजिऱ्यांचा आहे ? का माझ्या मनाचा आहे हा सुगंध? कशाचा आहे? कशाचा आहे? काशी, कसं होणार गं तुझं? सुवासाच्या सृष्टीशी तुझा संबंध काय? सौंदर्याशी संबंध काय? सुखाशी संबंध काय? बोलण्याशी काय? गाण्याशी काय, हसण्याशी काय? मार आपलं मन काशी, मार आपलं मन! भाव्यांचे नाट्यसंवाद बऱ्याच ठिकाणी भाषणवजा, वक्तृत्वपूर्ण दिसतात. विशेषत: स्त्रीच्या पातिव्रत्याची, तिच्या थोरवीची महती निवेदन करण्याचा प्रसंग असेल तर भाव्यांच्या लेखणीला वेगळेच टोक येते. सारे ऐतिहासिक, पौराणिक दाखले देत कधी लालित्य तर कधी रौद्रता, कधी उदात्तता तर कधी कटुता ती प्रगट करते. विशेषत: भावनाविष्काराची तिची क्षमता विस्मित करणारी आहे. 'महाराणी पद्मिनी'त याचा पुरेपूर प्रत्यय येतो.

'अत्रे विरुद्ध आदेश' या भाव्यांच्या लेखसंग्रहाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. त्याचे कारण या पुस्तकात वर्णिलेली घटना ही मराठी वृत्तपत्रसृष्टीतील अभूतपूर्व घटना होती. ज्या आचार्य अत्रे यांना भलेभले पत्रकार आणि साहित्यिक शरण आले होते. त्यांना भाव्यांनी 'दे माय धरणी ठाय' करून सोडले. 'फाल्गुन' या टोपण नावाने उपरोधाचे अस्त्र वापरून आपला नागपुरी खाक्या दाखविला. ह्या वादाने 'आदेश आणि भावे' ही दोन्ही नावे महाराष्ट्राला सुपरिचित झाली. भाव्यांच्या अनोख्या भाषेचे दर्शन यामधून वाचकांना घडले. भाषाविष्काराचे असामान्य सामर्थ्य त्यांच्या भाषेत आहे. विष्णूशास्त्री चिपळूणकर, शि.म. परांजपे, अच्युतराव कोल्हटकर, रा.ग. गडकरी, स्वा. सावरकर यांच्या शैलीतील गुणपुंज एकवटून त्यांची समर्थ भाषाशैली निर्माण झाली आहे. ''शब्दांच्या ठिणग्या करून त्यांची पुन्हा फुलं करणारा यक्ष'' अशा शब्दात ग.वा. बेहरे यांनी त्यांची प्रशस्ती केली होती.

## संदर्भ सूची


१. पु .भा. भावे, गडकऱ्यांची कल्पना अशी बहरून आली, 'लोकराज्य : गडकरी विशेषांक' १९८५.

२. पु. भा. भावे, रक्त आणि अश्रू, १९४२

३. अ.ना. देशपांडे, आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग दोन, पुनर्मुद्रण, १९७९, व्हीनस प्रकाशन, पुणे प्रकाशक, स.कृ. पाध्ये , पृ. ५८५

४. पु.भा. भावे, रक्त आणि अश्रू, १९४२

५. गंगाधर गाडगीळ, खडक आणि पाणी, तृतीयावृत्ती, १९८५ पॉप्युलर प्रकाशन, पुणे पृ. १२७–१२८.

६. तत्रैव, गाडगीळ, पृ. १२९

७. वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे, पु.भा. भावे : साहित्यरूप आणि समीक्षा, द्वितीयावृत्ती, १९९०, मोरया प्रकाशन ,डोंबीवली प. प्रका. दिलीप महाजन पृ. २०३.

८. तत्रैव, वऱ्हाडपांडे , पृ. १८१ ते १८५

९. पु.भा. भावे, अकुलिना, १९५०

१०. पु.भा. भावे, महाराणी पद्मिनी, १९७१

११. पु.भा.भ ावे, स्वामिनी, १९५६.

१२. पु. भा. भावे, रक्त आणि अश्र', १९४२

१३. प्रभाकर मोने, 'शब्दप्रभू भावे,' वाङ्मय शोभा, जाने. १९९०


❖❖❖

# Exile and self alienation in Anita Desai's Bye Bye Black Bird

**Prof. Prashant S. Jawade**
Indira Mahavidyalaya Kalamb
Email-id:-bhaktijawade@gmail.com

## Abstract

Anita Desai has rightly presented the Indian culture and Indian people and she has good command on presenting the emotions like isolation, loneliness, immigration etc. Anita Desais third novel Bye Bye Black Bird published in 1971. Anita Desai portrays the immigrants who cannot attach with his cultural roots and trying to make new identity in foreign land. The theme of estrangement is also shown in the novel. She has mastery to depict the Indians who behaves Englishmen in England./ They suffered both psychologically and mentally Similarly loneliness is also pointed in Bye Bye Black Bird. In addition to that Anita Desai portrayed Indian nature , attitude culture civilization in her characters. The paper is focusing on exile, self alienation tortures experienced by the Indians in London in the novel Bye Bye Black Bird.

## Introduction & About novel

The theme of the novel is based o migration of Indian native people to England/foreign land for sake of education /Business etc. As the culture are different the clases of ideas, traditions customs are occurred. The novel also speaks about the inferior treatment and sometimes the people are marginalized also in the every moment of life in foreign land. The novel deal with the problems of Asian countries emigrants in the UK often faces racial discrimination.

The novel is published when India got freedom .Before that Indian people experienced the slavery, administration, and Discipline of British people in India. There is a great impact of British people on Indian who directly or indirectly came into contact with British similarly the western culture always attracts the native Indians .Anita Desai is modern English writer whose writing is different from other Indian writers in India. Her novels are working for the manifestation of socio-political elements in themes with East-West encounter. She put the cross cultural consciousness in characters. The cultural encounters are observed in Bye Bye Black Bird Sarah is neither interested in Indian music nor ready to cook and eat curry. She did not enjoy the pleasure in Indian jokes which Adit enjoys a lot .Dev proves misfit to England and somewhat discriminated in English society. Even Adit proves himself different in England. He hated in disciplines in India.

## Alienation and Exasperation in the Bye Bye Black Bird

The well qualified educated couple from India, Adit Sen his wife Sarah and his Bengali friend Dev. There are the major character existed in the novel. Dev is a student from Indian seeking for the admission into London School Of Economics for this purpose he arrived in London .He also wish after completion of learning he wanted to catch good/ remunerative job. Dev possessed a good knowledge of English literature and very much aware about England customs, traditions etc.

Adit Sen already settled in London got married with English wife Sarah totally modified himself like Britishers and often tries to prove himself not less than Britishers. He also has shown very superior from the other immigrants like Dev migrated from India. Dev migrated from India; he is always attached to Indian culture traditions customs etc. HE arrived in London for his academic purpose. His friend Adit wishes that Dev should adopt the British ways and attitude and manners as like British. On other hand Dev is very conscious

about Indianess, He has sense of consciousness about his motherland India. He always used to recite Sanskrit hymns and other literature which was gifted from Indian life.Adit is completely forgotten the Indian culture and other important things which he preserved from India. Even Adit does not visited the Victoria Albert Museum where Indian Moughal and Rajasthan miniatures are placed. The contrast between two characters are also observed in the novel .Dev has departed India and lived in England for the search of cultural identity and intellectual journey . he wanted to fulfill his vision which was dream of his eyes. Adit wanted that Britishers should accept him not as Indian but same from their country. He fully adopted all the essentials which are required to be Britishers.

## Regection from native country

With parallel to that Sarah a English girl married with Indian, this incident is not digested by Britishers Sarah suffered from insecurity and alienation in her own country and people in own society. Actually Sarah suffers from his identity by marrying an Indian. It is the reason for torture and taunts from her colleagues .She puts in dilemma that an English women or Indian wife but never fails to show both. From the characters of Adit and Dev it is observed that the same spirit and desire is observed in Indians to settle down in foreign land to fulfill the wish of better future expectations. So the land like England is dream for the Indian migrants. Adit and his wife Sarah both are suffers from cultural crisis and did lose their own identity in England Adit already divorced from India and Sarah is marginalized by British not accepted as British woman. The couple decided to leave London visit to India where the hope for sense of relief and escape from sense of alienation which she observed in her own country. Adit is victim of racial difference. He tries to bridge this gap but fails to attend it. He is representative of male dominated society well as representative of Indian people lived in London. Sarah becomes part of underestimation in her own society.

## Conclusion

The people students migrated from India for better education and highly remunerative / good paid jobs. They see the foreign land of opportunity and employments. Native people from India living in England/ foreign land they somewhat suppress the love for their own country even they forget their customs, heritage, rituals etc. Anita Desai depicted the Indian community migrated from India to foreign land. The racial problems face by the Indians, The inferior treatment to the Indians the term Black Dog is also used for the Indians. The partial forgetfulness which occurred in Indians .The negligence of Britishers who married with Indians they have not good respect from their own people they are alienated from their own homeland this insecurity feeling of abnormal atmosphere existed within them.

## References

Iyenger K. R. Shrinivasa- Indian writing in English
Prasad Amarnath: Critical responses to Indian fiction in English

❖❖❖

# बदलत्या जीवनमानाचा वेध घेणारी महानगरीय कविता

डॉ. नरसिंग कदम
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर
ई–मेल narsing.nk3@gmail.com भ्रमणध्वनी ९४२१३७११०१/९४०४७३१०१०

मराठी साहित्यक्षेत्रामध्ये साहित्याचे वेगवेगळे आयाम यायला लागले. सुरुवातीला पुराणकथांवर आधारित असलेले साहित्य नवीन पैलू धारण करू लागले. त्याला नवीन विचाराचे धुमारे फुटू लागले. ज्यावेळी साहित्य लिखित स्वरूपामध्ये आलेले नव्हते, तेव्हा हे सर्व विचार मौखिक पातळीवरून प्रकट होऊ लागले. लोकसाहित्याने हा ठेवा जपला, पुढील पिढीपर्यंत चालू ठेवला. पण शिलालेख, ताम्रपटाच्या माध्यमातून मराठी शब्दरचनेला सुरुवात झाली व मौखिकपणे चालणारा प्रवाह लिखित स्वरूप धारण करून स्थिरस्थावर होऊ लागला.

मौखिक पद्धतीने चालणाऱ्या प्रवाहामध्ये लोकगीताने खूप मोठ्या प्रमाणावर भर घातली. खरे तर कवितेचे मूळ बीज या लोकगीतामध्येच दिसून येते. संतांच्या काव्यनिर्मितीचा काळ हा मौखिक परंपरेचा काळ होता. परंपरेने चालत आलेली लोकगीते तत्कालीन समाजात रुढ होती. अभंग, भारुड, गवळण या रचनाप्रकारातून अध्यात्मिक आंदोलन उभे राहिले. भूपाळी, आरती, स्त्रोत्र, पाळणा व पद इथपर्यंत हा प्रवाह चालू राहिला. त्यानंतर कथाकाव्य, आख्यानकाव्य, चंपूकाव्य हा प्रवाह रूढ झाला. नंतर गण, गवळण, लावणी, पोवाडे, कटाव आणि फटका या प्रकारची काव्यरचना झाली.

१९६० च्या नंतर साहित्याचे नवे प्रवाह रूढ झाले. हे साहित्य रुढ होण्याचे कारण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दलितोद्धाराची भूमिका, महात्मा गांधीजींनी दिलेली 'खेड्याकडे चला' ही हाक आणि अण्णाभाऊ साठे, राजर्षी शाहू महाराजांनी केलेले सामाजिक कार्य होय. त्यामुळे शिक्षण सर्वसामान्यापर्यंत पोहोचले. सर्वसामान्य भागातील लोक वाचू–लिहू लागले. त्यामुळे आधुनिक मराठी साहित्यामध्ये नवीन प्रवाह उदयाला आला. काव्याचाही नवीन प्रवाह उदयाला आला. ज्या काव्यामध्ये वास्तवता होती. करमणुकप्रधान व कल्पनेच्या पातळीवरुन प्रकट होणाऱ्या साहित्याला आधुनिक साहित्याने वास्तवतेची जोड दिली. त्यातुनच दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य व महानगरीय साहित्य आदी साहित्य उदय पावले.

१९६० नंतरच्या कवितेमध्ये हे सर्व प्रवाह निर्माण झाले व अल्पावधीतच स्थिर झाले. ते साहित्य लोकप्रिय, प्रतिष्ठाप्राप्त पावले. प्रस्थापित–पारंपरिक मराठी साहित्यापेक्षा ह्या साहित्याची प्रकृती, प्रेरणा आणि प्रयोजन भिन्न आहे. त्यामुळे या साहित्याकडे कधी कौतुकाने तर कधी उदासीनतेने तर कधी उपहासाने पाहिले गेले. परंतु हळूहळू हे साहित्य आपले पाळेमुळे रोवू लागले, स्थिरस्थावर झाले.

त्यातलाच एक काव्य प्रकार म्हणजे महानगरीय साहित्य होय. महात्मा गांधीजींनी जरी 'खेड्याकडे चला' असे म्हटले असले तरी आज खेडे ओस पडत आहेत. प्रत्येकाची धाव शहराकडे आहे. त्यामुळे शहरे एवढे झपाट्याने वाढायला लागली की, काही शहराचे महानगरात रूपांतर झाले. सुखसुविधा, विकास, शिक्षण, उद्योगधंद्याच्या निमित्ताने सर्व लोक शहराकडे येऊ लागले. सुरुवातीला त्या शहरानेही सर्व काही दिले. पण पुन्हा अशी अवस्था बनली की तिथे पाण्यापासून, रस्त्यापासून ते गर्दीमुळे गुदमरणाऱ्या श्वासापर्यंत सर्व काही त्रासदायक बनले. कर्णकर्कश आवाज, उद्योगधंदयाचे धुराडे, वाहनामुळे होणारे प्रदुषण अशा एक वा अनेक समस्या निर्माण झाल्या.

शहरे झपाट्याने वाढली, भरपूर सुखसोयी जशा आल्या तशा अनेक समस्याही वाढल्या. मग महानगरे अनेक समस्यांच्या विळख्यात अडकली गेली. अनेक मजली इमारतीने शहरांचे सौंदर्यच घालवले. महानगरामध्ये मोठे रस्ते, रस्त्यावर मोठे दिवे, धावणाऱ्या गाडया, बाजारपेठ, रेल्वेलाईन यामुळे महानगरातील भौतिक वैभव वाढले. श्रीमंत लोक ऐश आरामामध्ये राहू लागले. पण दुसऱ्या बाजूला गरीब वर्गही अनेक समस्या घेऊन जीवन जगू लागला. अनेक ठिकाणी झोपडपट्ट्या, घाणीचे साम्राज्य, घाणीच्या ठिकाणची गरीबांची घरे, त्यामुळे होणारे रोग, कुठलीच सुविधा नसणाऱ्या झोपडपट्टया, जागोजाग असणारे कचऱ्याचे ढीग, बॉम्बस्फोट, दंगली, मारामारी, अपघात, चोरी, खून, मोर्चे, ट्रॅफिक, बंद, गोळीबार, गुंडगिरी आदींनी महानगर समस्याग्रस्त बनले. यामुळे महानगरातील जनजीवन विस्कळीत होऊ लागले. त्यातूनच दारिद्र्य, अव्यवस्था, अस्थिरता, बकालपणा,

अविश्वास, धावपळ, संवेदनहीनता अशा अनेक समस्यांनी डोके वर काढले. या सर्व गोष्टींचा वेध महानगरीय कवितेने घेतलेला आहे.

महानगरामधून राहणाऱ्या आणि महानगरीय जीवनाची जाणीव असलेल्या अनेक कवींनी आपल्या कवितांमधून महानगरातील भौतिक विकास आणि वैभवाबरोबरच बकालपणा, भेसळ, भ्रष्टाचार नि प्रदूषण, जीवनमानातील बदल, मूल्यऱ्हास आदींचा वेध घेतला. त्याचबरोबर लोकांचे अस्थिर, असुरक्षित बनत चाललेले जीवन, अनेक प्रकाराने शहरांची होणारी कोंडी, मानवापेक्षा वस्तूला आलेले महत्त्व, मोबाईल, टी.व्ही., कॉम्प्युटर, लॅपटॉप, इंटरनेट, फेसबुक, व्हॉट्सॲपला आलेले महत्त्व याचा वेधही घेतला आहे.

माणूस माहिती तंत्रज्ञानाशी जोडला गेल्यामुळे तो झपाट्याने होणाऱ्या विकासाला झुकते माप देत आहे. त्यामुळे माणसा—माणसातील अंतर वाढत आहे. मानवी जीवनमूल्य बदलल्यामुळे चांगल्या गोष्टींचा ऱ्हास झालेला आहे. जीवनामध्ये गुंतागुंत वाढत चालली आहे. समोर कोण कोणाला मारत आहे हे पाहूनही सोडवायला कोणी पुढे होताना दिसत नाही. रस्त्यावर अपघात झाला तर कोणी मदतीला जात नाही. एवढेच काय शेजारच्या घरामध्ये कोण राहतं याचीही ओळख नाही. एवढा माणूस आत्मकेंद्री बनला आहे. अशा सर्व बदलत्या जीवनशैलीची मांडणी महानगरीय कवींनी केलेली आहे. त्यामध्ये आवर्जून उल्लेख करण्यासारखे कवी म्हणजे नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, सतीश कळसेकर, अरुण काळे, मंगेश नारायण काळे, उत्तम कांबळे, श्रीधर तळवे, हेमंत दिवटे, मन्या जोशी, महेंद्र भवरे, सलील वाघ, वीरधवल परब, प्रज्ञा लोखंडे, मल्लिका अमरशेख आदी होत.

बदलत्या जीवनमानाचा महानगरीय कवितेने कसा वेध घेततेला आहे, ते काही कवितेच्या आधारे आपल्याला पाहता येईल. नारायण सुर्वे यांची 'पोस्टर' ही कविता पाहिल्यावर महानगरीय कार्यकर्त्यांचे जीवनविश्व कसे होते हे कळते. एका संवादातून नारायण सुर्वे महानगरीय जीवनातील धावपळ, काम करण्याची पद्धती, बोलण्यातून आलेली शब्दसंपदा व्यक्त करताना असे म्हणतात,

'चार घरांतील चौघेजण आम्ही
निघतो जेव्हा ...
म्हातारा काळोख खुरडत येतो तेव्हा....
'हणम्या रे ही शिडी घे,
मी खळ लावतो,
डकव वाचले जाईल अशा ठिकाणी'[१]

महानगरामध्ये प्रत्येक गोष्टीची जाहिरात करावी लागते. पोस्टर्स बनवावे लागतात, लोकांना नजरेत पडतील अशा ठिकाणी लावावे लागतात. हे लावतानाही अनेक समस्या आहेत. कारण ही पोस्टर कुठे लावावीत हाही प्रश्न निर्माण होतो. जिथे लावायला गेलं तिथे कोणीतरी बघतं, रागावतं पुढे जावं लागतं.

महानगरामध्ये जीवनशैली खूप वेगाने चालते. तिथली भाषापद्धतीही बदलली असते. नवनवीन शब्द रूढ होत जातात. त्या शब्दांचा वापरही सुर्वेंनी केलेला आहे. डकव, बोंब, कायकु, वांदा, डगला, बुढ्ढा, खडूस, कब्रिस्तान, चांद, गालीब, पकपक आदी शब्दांचाही वापर महानगरीय बदलत्या जीवनाची आठवण करून देते. महानगरीय जीवनपद्धती मांडताना कवी पुढे म्हणतो,

'इसल्या रे, कल मीटिंग चलेगी उधर
मरने दो ! अपने को साली आती है अब झोप
मर लेका ह्या शिडीवर
उचलून तिघेही नेऊ कब्रिस्तानपर'[२]

दुनिया फार पुढे गेलेली आहे. या दुनियेमध्ये कुणालाच कुणासाठी थांबायला वेळ नाही. महानगरातील प्रेम, प्रेमाचा प्रकार, प्रेयसीला वापरलेला 'मैना' हा शब्द आदी सर्व बदलत्या जीवनशैलीचे चित्रण आलेले आहे. तर महानगर विकासाकडे वाटचाल करत असले तरी त्यातील भयानकतेचा वेध अरुण काळे यांनी 'सायरनचे शहर' या कवितेमध्ये घेतला आहे. ते म्हणतात,

'अर्धशिशीसारखे सकाळी उठणारे
रात्री दोन घास निवांत खाणारे
मौजमजेत जगणारे हे शहर
काल इथं कली शिरला माण्सात

माय लेकरं एकमेकाला धरीनात.'[३]

एक काळ हे शहर खूप सुंदर होते. दोन घास खाऊन समाधानानं शांत झोपणारं, मौजमजा करणारं होतं. पण आज याला दृष्ट लागली आहे. सर्व काही बदलून गेलं आहे. या शहरामध्ये कलीयुगाचे वारे आलेले आहे. त्यामुळे कोण कोणाला ओळख दाखवायला तयार नाही. एवढेच काय मुलगा आईला व आई मुलालाही ओळखायला तयार नाही.

इथे आवाजाने तर डोके सुन्न करून टाकले आहे. सकाळपासून ते रात्रंभर कुठल्या ना कुठल्या कंपनीचे सायरन वाजतच राहतात. सर्व शांततेचा भंग केला त्याबद्दल काळे लिहितात,

'मुक्या मारातून शिणका उठाव्यात
तसे वाजतात सायरन
ॲम्बुलन्सचे, फायरब्रिगेडचे
पायलट गाड्यांचे आणि रातकिड्यांचे
चार पाळ्यांच्या भोंग्यांनी बांधलेले
शांतता व सुव्यवस्थेच्या परंपरेचे.'[४]

कष्ट केल्यानंतर माणसांना शांतता हवी आहे. पण महागनरातली शांतता नष्ट झाली आहे. इथे कशाचे ना कशाचे आवाज चालूच आहेत. एक क्षणही शांतता नाही आणि महानगराला, रस्त्याला, माणसांना उसंत नाही. कारखान्यामुळे अनेक पाळयांचे कामगार रस्त्याने जात आहेत. भोंगे वाजत आहेत. तर कधी बेवारस कुत्रेही भुंकत आहेत.

महानगरे माणसांनी प्रचंड भरलेली आहेत. सिटीबस असो, लोकल ट्रेन असो एखाद्या यात्रेचं रूप आलेलं आहे. सगळीकडे डोकेच डोके दिसत आहेत. ही शहरं माणसांच्या स्वार्थीपणाने आणि विभाजनाच्या मानसिकतेनं भरुन गेली आहेत. त्याबद्दल उत्तम कांबळे 'शहरांच्या सीमावर' या कवितेतून म्हणतात,

'दिवसाआड जमावबंदी
अक्सिडंड झोन
नो साऊंड, गो स्लो
वन वे रोड, संचारबंदी
विषम तारखांना नो पार्किंग
रस्त्यावरील माणसांचा महापूर
शिट्टीवर नाचवणारा शिपाई
ब्लॅक कमांडो, व्हाईट कॅट,
देवांची विटंबना,
माणसांची विटंबना'[५]

इथे समस्यांनी महानगराला ग्रासलं आहे. माणसे माणसांची विटंबना करत आहेत, मारत आहेत. देवांची विटंबना करुन धार्मिक दहशत निर्माण करत आहेत. रस्त्याला वेगवेगळे नियम आहेत. माणसांनाच राखणारे शिपाई आहेत. रस्त्याचे नियम तोडणारे माणसे आहेत. कधी जमावबंदी, तर कधी स्फोट आहे. शेवटी महानगर अशांत आहे.

माणसांना धावपळ केल्यानंतर आयुष्याची संध्याकाळ तर समाधानाची रहावी वाटते. पण तेही महानगरांमध्ये मिळणे कठीण आहे. घराच्या बाहेर पडलेला आपला माणूस सुखरुप घरी येईल याची खात्री नाही. कधी, कसा, केव्हा, कुठे, कशामुळे मृत्यू येईल हे सांगता येत नाही. अशा खडतर जीवनातील स्वप्नवत सुखाचा विचार काळसेकर हा 'आयुष्याच्या प्रत्येक संध्याकाळी' या कवितेतून करताना दिसतो तो म्हणतो,

'आयुष्यातल्या प्रत्येक संध्याकाळी नव्या नव्या रस्त्यांनी
स्वप्नांचे आरसे महाल उभे करीत जाणाऱ्या आमच्या
बिनकांबी व्यक्तित्वांना हवी असतात सदासर्वकाळ
फुले देणारी फुलझाडे घरासमोरच्या निनावी जागेत'[६]

आयुष्याची संध्याकाळ सुख देणारी असावी वाटते. नोकरीवरून येताना गाडीच्या खिडकीतून बाहेरचा निसर्ग, बाग पाहतो. तशी बाग जीवनात फुलावी याचे स्वप्न पाहतो. पण महानगराच्या या जीवनशैलीमध्ये स्वप्न स्वप्नच राहते. समस्येने ग्रासलेल्या महानगरामध्ये कधी काय होईल, हे सांगता येत नाही.

अशा प्रकारे महानगरीय कवीने आपल्या कवितेतून महानगराच्या चांगल्या व वाईट या दोन्ही बाजूचा वेध घेतला आहे. 'दुरून डोंगर साजरे' प्रमाणे खेड्यातल्यांना महानगराचं जीवन किती चागलं आहे असं वाटतं. पण तिथं गेल्यावरच तिथली भीषणता लक्षात येते. या भीषणतेचा वेध कवींनी घेतला आहे.

## संदर्भ सूची

१) संपादक डॉ.मा.मा.जाधव –शब्दरत्न, निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती १० जुलै २०१३, पृ.७९.
२) तत्रैव, पृ.८०
३) तत्रैव, पृ.८२
४) तत्रैव, पृ.८३
५) तत्रैव, पृ.८६–८७
६) तत्रैव, पृ.८४

❖❖❖

# कवी नामदेव ढसाळांची कविता : एक विद्रोह

प्रा. रेखा व्ही. इंगोले
मराठी विभाग प्रमुख
मा.सु.पा. कला, विज्ञान व कै.पां.ठा. वाणिज्य महाविद्यालय, मानोरा जि. वाशिम
E mail – rekhaingole02@gmail.com भ्रमणध्वनी ९४०४५४७२७८

## प्रस्तावना

मानवी संवेदनाचा आविष्कार म्हणजे काव्य असे म्हटले जाते. मराठीत संत वाङ्मय, पंडित काव्य, शाहिरी वाङ्मय आणि आधुनिक मराठी कविता असे कालखंडनिहाय काव्य प्रवाहाचे टप्पे मानले जातात. मराठी कवितेत दलित कवितेच्या रूपाने नवा कालखंड सुरु झाला. दलित कवितेने मानव मुक्तीसाठी वैचारिक लढा पुकारला दलित कवितेला प्रामुख्याने महान महात्मा जोतीराम फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा आहे.

माणूस शोधणाऱ्या वाङ्मयातील ललित शाखेचे साहित्यबीज हे सर्वप्रथम स्वतंत्र नि सृजनशील अंत:करणाच्या काव्यभूमीत लवकर रुजते. तिथेच ते पहिल्यांदा अंकुरते. दलित साहित्याचीही लागवण रानकाट्यांची कुंपणे तोडली जाऊन आविष्कार–स्वातंत्र्याची मोकळी झुळुक लागताच प्रथम काव्याच्या उद्यानातच झाली. प्रा.रा.ग. जाधव लिहितात, "दलित साहित्याचा जन्म स्वातंत्र्याच्या गर्भातून झाला. त्रीव भावना, उत्कट जाणिवा या नेहमीच काव्य भाषेतून प्रथम व्यक्त होतात आणि स्वातंत्र्याच्या जाणिवेइतकी तीव्रोत्कट जाणीव दुसरी कोणती असू शकेल? दलितांना ज्यावेळी पुरातन काळापासूनच्या प्रखर परतंत्रेची त्रीव कल्पना आली नि त्या परतंत्रतेचा नि:पात करण्याची अनावर पण न्याय्य आकांक्षा स्फुरली त्यावेळी उद्गार काव्य–भाषेतूनच उगवला." दलित कवितेत प्रामुख्याने दलित जीवनातील दु:खाचा काव्यात्मपूर्ण स्वर निनादतो आहे आणि संयत स्वरूपात विद्रोहपण आहे; परंतु आतापर्यंतचा विद्रोह सामाजिक पातळीवर ह्रदयस्पर्शी असला, तरी तो सर्वस्पर्शी रूप धारण केलेला नसून काहीसा व्यक्तिनिष्ठ पातळीवरून वावरताना दिसतो. हे सर्वस्पर्शत्वाचे मूलगामी विद्रोहरूप कवितेला पहिल्यांदा कोणी दिले असेल, तर ते श्री नामदेव ढसाळ या कवीने. एकूण मराठी काव्य जगतातच खळबळ माजवून देणारा अत्यंत सामर्थ्यवान, विद्रोही व बंडखोर कवी म्हणून नामदेव ढसाळ यांचे नाव मान्यता पावले आहे. त्यांच्या 'गोलपिठा'ने. मराठी कवितेचे पारंपरिक संकेत झुगारून आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही क्षेत्रात क्रांती घडवून आणली. मानवी विद्रोहाविरुद्ध अफाट असा विद्रोहाचा विस्तव या संस्कृतीच्या सडलेल्या अंगावर बेडरपणे झोकणारा, रूढीभंजन करणारा, अंगार ओकणारा असा हा बंडखोर कवी विद्रोह दलित साहित्याची एक प्रभावी प्रारंभशक्ती ठरावा.

नामदेव ढसाळांनी आयुष्याचा पुष्कळसा काळ विपरीत परिस्थितीशी झुंजत पुढे रेटला. मुंबईत टॅक्सी चालविली. टॅक्सी चालविताना व जीवन संघर्ष करताना त्यांना मुंबईच्या खऱ्या रंगिल्या दुनियेची, तिथल्या उघड्या नागड्या जिंदगीची आणि शापित विश्वाची खरी ओळख पटली. त्यातील वेदना आणि अनोखे जीवनदर्शन–म्हणजे ढसाळी कविता. या कवितेतून निर्माण होणाऱ्या उद्ध्वस्ततेने त्यांचे जीवन व्यापून टाकले आणि याच कवितेतून ढसाळ जातिप्रथेविरुध्द, परंपरेविरुध्द, सामाजिक अन्यायाविरुध्द आवाज उठवीत राहिले. ते म्हणत–'माझी कविता म्हणजे एक प्रकारे माझी कृतीच असते.'

ढसाळांनी लेखनाला सुरुवात केली तेव्हापासून तर मरणापूर्वीचे दोन दिवस पर्यंत लेखन करीत ते आपल्या या चिंतनरूप–कृतीला वाट करून देत होते. त्यांनी 'गोलपिठा' (१९७२), 'मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले' (१९७५), 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र:प्रियदर्शनी' (१९७६), 'तुही इयत्ता कंची' (१९८१), 'गांडू बगिचा' (१९८६), 'खेळ' (१९८३), 'या सत्तेत जीव रमत नाही' (१९९५), 'मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे' (२००५), 'तुझे बोट धरून चालतो आहे मी' (२००६), 'मी भयंकराच्या दारात उभा आहे' (२००७), 'निर्वाणा अगोदर पीडा' (२०१०), 'चिंध्यांची देवी आणि इतर कविता' (२०१२), इ. कवितासंग्रह प्रकाशित झाले असून जगण्यातले भीषण वास्तव आणि पारंपरिकतेला धक्का देणारी वेगळी भाषाशैली–यामुळे त्यांनी साहित्याला जबरदस्त धक्के दिले. त्याच प्रमाणे त्यांचे 'अंधारयात्रा' हे नाटक, 'हाडकी हाडवळ' व 'निगेटीव्ह स्पेस' सारख्या कादंबऱ्या आणि 'आंधळं शतक', 'आंबेडकरी चळवळ', 'सर्व काही समष्टीसाठी' व 'बुद्धधर्म: काही शेष प्रश्न' इ. विपुल वैचारिक लेखनही प्रकाशित आहे.

बा.सी. मर्ढेकरांच्या 'शिशिरागमा'नंतर मराठी कवितेत नवे वळण निर्माण करण्याचे महत्वपूर्ण काम 'गोलपिठा' ने केले. १९७१ मध्ये त्यांचा 'गोलपिठा' हा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. हा काव्यसंग्रह स्तरीकरण झालेल्या व्यवस्थेच्या संस्कृती चलनवलनांचा सर्वात तलस्पर्शी अविष्कार होता. 'जातवास्तव' आणि 'वर्ग वास्तव' यांचे बेलामालूम रसायन म्हणजे 'गोलपीठा' हा काव्यसंग्रह होय. प्रा. केशव मेश्राम म्हणतात –

"ढसाळांच्या पहिल्याच एन्ट्रीला अंधार टर्रकन फाटला. प्रस्थापित वटवाघुळे दचकली. त्यांना सर्वत्र उजेडच दिसला."

डॉ. आंबेडकरांनी जागृतीचा, प्रकाशाचा मार्ग दाखविला आणि कवीचे हात जागे झाले. त्याने पहिल्यांदा कवितेचे शस्त्र हाती घेतले. दलित कवी मनातील ही आग एक सामर्थ्यवान अभिव्यक्ती आहे. ती येथे विद्रोहाने नुसती सळसळत आहे.

''माण्सं भादरुन पेपरवेटमधी कुणी बंद केलीयंत?
माझ्या चेहऱ्या मोहऱ्यातंन गाणार धो धो गूंपाणी
माझा दरोबस्त अवयव। सडलेला वाटतोयना, तर मंजूर
तुम्ही तो अवश्य आर्ट गॅलऱ्यात ठेवा
वाटल्यास माझी आतडी काढून संगिनीला लटकवा
आदिम सूर्याला रडतांना पाहीन मी
शेवटचा कोसळताना पोट भरुन''

या कवितेतील दु:ख, प्रक्षोभ, जुगुप्सा व शूर मरणाची जिद्द रसिक मन कमालीची बैचनी निर्माण करते. दलित दु:खाचा हा जाळ मनाला घायाळ करणारा आहे. नामदेव ढसाळ म्हणतात, ''आमचे पूर्वज, आमचा बाप, पोथी, परंपरा आणि परमेश्वर यांच्या अंधाराचे ओझे पाठीवर घेऊन वाहून वाहून वाकून गेला आता अंधार यात्री होण्याचे आपण नाकारले पाहिजे. तसेच आता सूर्यफुलासारखे सूर्योन्मुख झाले पाहीजे.'' कवितेतून विद्रोहाचे अग्निबाण वर्षत कवी 'अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा' या कवितेत म्हणतो,

'अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा–
नरकाच्या कोंडवाड्यात । किती दिवस रहायच आम्ही?
सडत होतो आम्ही अगतिक किड्यासारखे आजपर्यंत
लक्तरात गुंडाळलेली आमची अब्रू गोलपिठ्यावर नागविणारांनो
तुमचा ऱ्हास जवळ आलाय... तुमच्या पापाचे । छिनाल घरफोडण्यासाठी
शब्द म्हणाले... अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा''

अशी ही पेटविणारी भाषा, 'अंधाराला उजेडाची भीती देणाऱ्या 'सूर्या' च्या साक्षीने कवीने आव्हान केले आहे.

अशा विराट विद्रोहाने पेटलेल्या कवीची झेप झंझावतासारखी झपाटणारी आहे. मनातील सगळी रग–धग, जळजळ, दु:ख, मळमळ त्वेष, क्रोध–चिड सारी कविने बेमूर्वतपणे कवितेतून अंगावर निखारे झोकवित तशी फेकली आहे. या कवीने एक 'दलित' म्हणून फार काही सोसले असावे. म्हणूनच सभोवतालच्या जीवनाची चाललेली होरपळ दैन्य दु:ख त्याला पाहवत नाही. शतकानुशतकांच्या छळामुळे, अन्याय, अत्याचारामूळे समाजमनात साचलेल्या चीड, क्रोध, प्रक्षोम आदी साऱ्या भावना अग्नि–ज्वाळांच्या पूर्ण फुललेल्या रूपात, तपशिलासह नि:संकोच, निर्भयपणे अतिप्रखर शब्दात त्याने व्यक्त केल्या आहेत.

''वर्ल्या आंगाला तुमी पाणी भरायचं
वाहव्वा वाहव्वा । कसा सोवळयान शिकवला जातोय
पाण्यालाही चातुर्वर्ण्य''

असे धर्म रूढीच्या सोवळ्यात व वर्णजातिभेदाच्या भोवऱ्यात गुरफटलेल स्वार्थी माणसाला 'मायेचे आलिंगन काय कळणार? म्हणून मग–'ती पाहा रे ती पाहा, मातीची अस्मिता आभाळभर झालीया! माझ्याही आत्म्याने झिंदाबादाची गर्जना केलीया।' ही गर्जना करून कवीला – 'रक्तात पेटलेल्या अगनित सूर्यांनो आता या शहराला आग लावीत चला' अशी अग्नी घोषणा केल्यावाचून रहात नाही.

नामदेव ढसाळ यांच्या कवितेच्या प्रस्तावनेत जी विजय तेंडूलकर लिहितात,

''ही बंडखोरी आत्माची आहे कंठाळी नाही वा बंडखोरीला कविते पुरते तरी राजकिय रंग नाहीत. ती मूलभूत स्वरुपाची म्हणून अस्सल आहे. ही अस्सलता घेऊन आलेली ढसाळांची कविता अधिकच तेजस्वी झाली आहे. कारण ती मानव्यासाठी अवतरलेली कविता आहे. तिच्यातून दु:खावलेली मानवता टाहो फोडून समाजाला न्याय

मागत आहे. न्यायासाठी झगडत आहे. स्वातंत्र्य, समतेचे, बंधुभावनेचे आवाहन करीत आहे. प्रत्येक कवितेतून माणूसपणाला आवाहन व आव्हानही आहे. म्हणूनच तिच्यातील विद्रोह तेजस्वी—सुंदर वाटतो ती सृजनासाठी म्हणून विधायक आहे. सुंदरपणे जगण्याचे स्वप्न जीवनाचे नवे आशयमूल्य देते. काव्यात्मकतेच्या श्रेष्ठ सौंदर्यमूल्यांच्याही आढळ कवितेतून होतो.

ढसाळांची 'पाणी' ही कविताच पहा —

'पाण्याला नैराश्य आणल्यानंतर
हातघाईवर येतो जीवन मरणाचा प्रश्न....
किती करणार तटबंदी पाण्याला....
पाण्याची कधीच संपत नसतात स्टेशन....
पाणी पाणमूल्याच्या पुढे धावत ....
नदी राखते जन्मसिद्ध हक्क माणसावरला...
पाण्यासारख सुंदर कर्तव्य दुसर कुठलच नस्त जगात...
मग सांगा पाण्यावाचून तडफडून मरणाऱ्यांनी काय बदलाव?
पाणी असतं सिध्दार्थासारख । पाणी असतं अशोक वृक्षासारखं
पाणी असतं तेजाबही''

अशा कितीतरी सुंदर सुंदर काव्यवचने 'पाणी' या दीर्घ कवितेत वाचायला मिळतात, त्यातून पाण्याचे एक समाजमन, एक दुर्दम्य दलित मन प्रभावीपणे व्यक्त होते. प्रा.जाधव 'पाणी' चा आस्वाद घेतांना लिहीतात, 'अर्पूवता, उत्कटता व काव्यमयता ही साहित्यातील सौंदर्याची लक्षणे 'पाणी' या काव्यात निश्चीतपणे उमटलेली आहेत. धर्मव्यवस्थेमुळेच दलित—अस्पृश्य जीवनाचा 'पाणी' हा प्रचंड काव्यविषय झालेला आहे त्या पाण्याचे सामाजिक जाणिवेतून कवितेने वेचलेले सौंदर्य मूलभूत आहे, हे खरेच त्यांच्या सगळयात — 'माणस भादरुन', 'जंताच्या माळा', 'त्यांची सनातन दया','रस्त्याच्या कडेकडेने', 'रांडकी पुनव', 'पाऊस कळा' इत्यादी वैशिष्टपूर्ण शिर्षकांच्या कवितातून द्रोहा विरुध्द पुरेसा विद्रोह पेरलेला आहे. त्या सर्व वास्तव जीवनातील दु:खक्षोभ, दाहकता नि क्रोध, चीडीचे फुत्कार आणि अमानुषतेवर केलेले एकेक ज्वलंत प्रहार आहेत.

'गोलपिठा' नावाने ओळखले जाणारे हे जग रात्रीच्या दिवसाचे, रिकाम्या किंवा अर्धभरल्या पोटांचे, मरणाच्या खस्तांचे, उदयाच्या चिंताचे, शरम आणि संवदेना जळून उरणाऱ्या मनुष्य देहांचे, असोशी वाहणाऱ्या गटारांचे, गटाराशेजारी मरणाची थंडी निवारीत पोटाशी पाय मुडपून झोपणाऱ्या तरुण रोगी देहांचे, बेकारांचे, भिकाऱ्यांचे, खिसेकापूंचे, बैराग्याचे, दादांचे आणि भडव्यांचे दर्ग्याचे आणि क्रुसाचे, कुरकुरणाऱ्या पलंगालगतच्या पोपडे गेलेल्या भिंतीवरल्या देवांचे, गांजाच्या खाटल्याचे — त्याच त्याच खाटल्यावरच्या कोपऱ्यात झोपलेल्या गोजिरवाण्या मुलांचे वगैरे नाना जीवन प्रत्यय व प्रसंग गुंफतांना ढसाळ सांगतात की इथला प्रत्येक हंगाम बेदर्दीच उफराट्या काळजाचा असतो. कवी नामदेव ढसाळांची कविता ही प्रत्येक पिळल्या जाणाऱ्या व्यक्तींची आहे या विषमतावादी व्यवस्थेने शोषीत, पीडीत दलितांची संस्कृती, स्वातंत्र्य हिरावून घेतले. दलितांना अन्नास मोताद केले, ज्ञानास मोताद केले, दलितांची संतती भिकेला लावली, दलितांची लुसलुसीत बाळे खडकावर आपटली म्हणून त्यांची कविता विद्रोहाचे रुप धारण करते कवितेतून सुडाच्या भावनेतून विद्रोह व्यक्त करताना ते म्हणतात,

''ज्यांनी लुबाडले आपल्याला
नि जे प्यायले आहेत जळवेप्रमाणे
आपले रक्त,
त्यांना नाही क्षमा आपल्या ठायी''

(मी भयंकराच्या दारात उभा आहे पृ. २६, पाब्लोच्या मरणाने आपण काय शिकलो?)

भूतकाळ आठवला की कवी नामदेव ढसाळ चिडतात; पण ही चिडचिड विवेकानं काबूतही ठेवतात. 'माणसाने' या कवितेत ते म्हणतात—

'नंतर उरल्या सुरल्यांनी कुणालाही गुलाम करु नये, लुटू नये
काळा गोरा म्हणून नये, तू ब्राम्हण, तू क्षत्रिय, तू वैश्य, तू शूद्र असे हीनवू नये
कुठलाही पक्ष काढू नये, घरदार बांधू नये, नाती न मानण्याचा
आयभैन न ओळखण्याचा गुन्हा करु नये
आभाळाला आजोबा अन् जमिनीला आजी मानून त्यांच्या कुशीत

गुण्या–गोविंदाने राहावे
चंद्र–सूर्य फिके पडतील असे सचेत कार्य करावे
एक तीळ सर्वांनी करंडून खावा. माण्सावरच सूक्त रचावे
माण्साचेच गाणे गावे माण्साने.''
('माण्साने, मी भयंकराच्या दारात उभा आहे. पृ. ६०)

कवी नामदेव ढसाळ ''माण्साने माणसाला गुलाम न करता, माणसामाणसात कोणताही भेद न करता, सर्वांनी एकत्र नांदावे, माणुसकीचे गीत गावे असा आशावाद व्यक्त करताना दिसतात.

## निष्कर्ष

भारताच्या प्राचीन इतिहासाची क्लेषकारक जाणीव त्यांच्या कवितेत व्यक्त होते. त्यांची कविता भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक शोषणाचा इतिहास व्यक्त करते. त्या अभिव्यक्तीतून त्यांची कविता शोषित–पीडितांच्या दलितांच्या उत्थानासाठी विद्रोही बनते. त्यांची कविता विशिष्ट वर्गीय हितसबंध जोपासणारे एक हत्यार बनते खरे परंतु हे हत्यार विवेकाचा स्वीकार करणारे असून माणसाने माणसावर सूक्त रचावे, माणसाने माणसाचे गाणे गावे असे सांगते. कवी नामदेव ढसाळ हे मराठी काव्य क्षेत्रातील महत्त्वाचे कवी आहेत.

## संदर्भ ग्रंथ सूची

१) विजय तेंडूलकर – 'गोलपिठा' प्रस्तावना
२) नामदेव ढसाळ – पाणी गोलपिठा
३) प्रा.रा.ग. जाधव – निळी पहाट
४) नामदेव ढसाळ – (माणसाने) गोलपिठा
५) प्रा.केशव मेश्राम – विद्रोही कविता (संपादन)
६) नामदेव ढसाळ – (अंधाराने सूर्य पाहिला) गोलपीठा
७) 'मी भयंकराच्या दारात उभा आहे' नामदेव ढसाळांची निवडक कविता, संपादन–सतिश काळसेकर
८) मराठी दलित कविता संपादक – बी रंगराव, प्रकाशन साहित्य अकादमी, २००४
९) अक्षर वैदर्भी २०१४

❖❖❖

# माहिती तंत्रज्ञान आणि मराठी भाषा

प्रा. नरेश कृ. महाजन
शिवरामजी मोघे महाविद्यालय, पांढरकवडा,
जि. यवतमाळ

आज माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाने सर्वच क्षेत्रे व्यापून टाकली आहेत. त्यामुळे ते दैनंदिन जीवनाचा भाग बनले आहे. दैनंदिन जीवनात येणाऱ्या समस्या व अडचणी यावर मात करण्यासाठी उपाय व आवश्यक माहिती ही या तंत्रज्ञानामुळे सहज व सुलभरित्या उपलब्ध होत आहे.

## माहिती संप्रेषण तंत्रज्ञान (CTC)

अंकाधिष्ठित (डिजिटल) स्वरूपातील माहितीचे एकत्रीकरण, साठवणूक, संपादन, व्यवस्थापन प्रक्रिया, सादरीकरण, आदानप्रदान व सुयोग्य वापर करण्याचे तंत्रज्ञान म्हणजे माहिती संप्रेषण तंत्रज्ञान. दळणवळणाच्या विविध साधनांच्या मदतीने योग्य माहिती योग्य त्या ठिकाणी जलद पोहचविण्यासाठी उपयोगात आणले जाणारे तंत्रज्ञान म्हणजे माहिती संप्रेषण तंत्रज्ञान होय. माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा उपयोग शिक्षणक्षेत्रात होऊ लागल्यामुळे शिक्षणाची प्रक्रिया आनंदी, जलद, सुकर व आकलनक्षम बनली आहे. अध्यापनात मनोरंजकता येऊ लागली आहे. माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या विकासामुळे जग एकदम जवळ आले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे संप्रेषणाची आधुनिक साधने होय. या साधनांच्या मदतीने जगाच्या दोन टोकाशी असणाऱ्या दोन व्यक्ती एकमेकांशी सहज संपर्क साधू शकतात. माहिती संप्रेषणासाठी वापरल्या जाणाऱ्या साधनांत मुख्यत्वे दूरध्वनी, भ्रमणध्वनी, ध्वनिमुद्रक, सी.डी.प्लेअर, आकाशवाणी दूरदर्शन, संगणक, दूरछाया, आंतरजाल, ई मेल, व्हीडीओ कॉन्फरन्सिग, कृत्रिम उपग्रहावर आधारित सेवा इत्यादींचा समावेश होतो.

## आंतरजाल (Internet)

जगातील अनेक संगणक एकमेकांना जोडून तयार केलेले संगणकाचे महाप्रचंड जाळे म्हणजे आंतरजाल होय. इंटरनेटच्या मदतीने संदेशवहनाचे काम जलद व कमी खर्चाचे झाले आहे. त्यामुळे जगाच्या कानाकोपऱ्यात असलेली माहिती आपणास सहज उपलब्ध होते. इंटरनेटचा वापर विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणात केला जातो त्यामुळे मानवी जीवनात आमूलाग्र बदल झालेला दिसून येतो. सर्व क्षेत्रे इंटरनेटने व्यापून टाकली आहे. इंटरनेटचा वापर हा आज प्रत्येक व्यक्तिच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. दळणवळण, संशोधन, नोकरीविषयक माहिती, पर्यटन, वैद्यकीय, संदेशवहन इ. क्षेत्रे मोठ्या प्रमाणात इंटरनेटने व्यापून टाकलेली आहेत. प्रत्येक क्षेत्रातील अद्ययावत माहिती केव्हाही, कोठेही अतिजलद गतीने उपलब्ध होते. शिक्षणक्षेत्रात विद्यार्थी, शिक्षक, व्यवस्थापन करणारे या सर्वांना इंटरनेटचा उपयोग होतो.

## मराठी भाषा व इंटरनेट

जागतिकीकरणाच्या या युगात शहरातीलच नव्हे ग्रामीण जीवनातही आवश्यक होत असलेला इंटरनेटचा उपयोग मराठी भाषा बोलणाऱ्या व्यक्तींनी सुध्दा स्वत:च्या विकासाठी करून घेतला पाहिजे. आजचा मराठी तरूण या तंत्रज्ञानापासून वंचित राहायला नको. मराठी समाजाची भाषा, अस्मिता जपण्याबरोबरच बहुसंख्य लोकांना सहजपणे तंत्रज्ञानाची ओळख होण्यासाठी इंटरनेटवर मराठी भाषेचा वापर होत आहे. त्यामुळे सद्या जगाच्या कानाकोपऱ्यात असणाऱ्या मराठी माणसांना इंटरनेटने एकत्र आणले आहे. आधुनिक जगाचे संवाद माध्यम असणाऱ्या सायबर विश्वात अगदी समर्थपणे संचार करून मराठीनेही 'माझा मऱ्हाटाचि बौलू कौतुके! परि अमृतातेही पैजा जिंके' हा संत ज्ञानेश्वरांनी व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरविला आहे. तुकारामांची गाथा, शाहिरी काव्य, कुसुमाग्रज, पु.ल.देशपांडे यांच्या पर्यंतची मराठी मनात घर करून बसलेली अनेक श्रद्धास्थाने इंटरनेटवर दिमाखाने झळकत आहे.

मराठी भाषा (देवनागरी लिपी) टंकलिखित करणे, मराठीतील माहिती जगातील सर्व संगणकांवर दिसणे याबाबत पूर्वी काही तांत्रिक समस्या होत्या. पण आता युनिकोड प्रणालीमुळे या सर्व समस्या सुटल्या आहेत. युनिकोड प्रणालीच्या माध्यमातून मराठीचे संगणकीकरण शक्य झाले आहे. म्हणजेच मराठी संगणकावर वापरणे व

मराठीतील माहिती आंतरजालावर उपलब्ध करून देणे सहज साध्य झाले आहे. मराठी पुस्तके व वर्तमानपत्रे आज इंटरनेटवर उपलब्ध आहेत.

## मराठी संकेतस्थळे

World Wide Web ला मराठीत ''माहितीचे जागतिक जाळे' असे म्हटले जाते. www मुळेच इटरनेटवर विविध प्रकारची माहिती एकत्र करणे शक्य झाले आहे. जगातील कोणतीही व्यक्ती या माहितीचा उपयोग करू शकते. विविध क्षेत्रातील विकासाची माहितीही संग्रहित केली जाते. www चे जाळे जगभर पसरले असल्यामुळे कोणत्याही ठिकाणाहून माहिती आपणास मिळते. त्यामुळे स्थलमर्यादा राहिली नाही. तसेच कोणत्याही क्षणी ही माहिती अतिशय जलद गतीने उपलब्ध होते. त्यामुळे काळाचे बंधनही राहिले नाही.

आज मराठी भाषेतही अनेक सकस संकेतस्थळे निर्माण होत आहेत. मराठी साहित्य, संस्कृती, महाराष्ट्राचा इतिहास, भूगोल, पर्यटन, प्रभावी व्यक्तिमत्त्वे इत्यादीविषयी माहिती देणारी अनेक संकेतस्थळे सध्या कार्यरत आहेत. १९९६ मध्ये डायनॅमिक फॉन्ट वापरून तयार केलेल्या 'मायबोली डॉट कॉम' या मराठीतील संकेतस्थळाने प्रथम मराठीतून संवाद घडवून आघाडी घेतली. मायबोली नंतर मनोगत, उपक्रम, मिसळपाव, माझे शब्द अशी अनेक संकेतस्थळे निर्माण झाली. २००९ च्या शेवटी 'मी मराठी' आणि २०११ मध्ये 'ऐसी अक्षरे' ही दोन संकेतस्थळे निर्माण झाली.नियमितपणे होणाऱ्या लेखन स्पर्धा हे या दोन्ही संकेतस्थळांचे वैशिष्ट्य आहे. नवीन पुस्तकांचा परिचय करून देण्यात 'मायबोली' आघाडीवर आहे. तर आंतरजाल या माध्यमाचे लोकशाहीकरण करण्याच्या दृष्टीने 'ऐसी अक्षरे' वर प्रतिसादांना श्रेणी देण्याची सुविधा आहे. याशिवाय मराठी माती, माय मराठी, मराठी विश्व, म मराठीतला, मराठी कट्टा अशी अनेक मराठी संकेतस्थळे आज निर्माण झालेली आहेत.

ऑनलाईन/मोबाईल बॅंकिंगच्या दृष्टीनेही त्यांचा प्रवास सुरू झाला आहे. मानबिंदू या संकेतस्थळाने यात पहिले पाऊल टाकले आहे. बरेचदा इंग्रजी शब्दांना चपखल मराठी परिभाषिक शब्द न आठवणे ही संकेतस्थळांवर मराठीत लेखन करताना येणारी अडचण असते. याकरिता विविध मराठी सकेतस्थळांवर विशेष चर्चा पाने निर्माण करून चर्चा केल्या जातात व शब्द भांडार, शब्दकोश यांचे माध्यमातून मराठी शब्दांचे संकलन होते. मराठी शब्दांना जनमानसात रूजवण्याचे प्रयत्न देखिल बरीच संकेतस्थळे करतात. मराठी संकेतस्थळांच्या माध्यमाने मराठी साहित्य सुद्धा जागतिक पातळीवर पोहचले आहे.

## इंटरनेटवर मराठी भाषेच्या समृद्धीसाठी....

- भाषा विकास व प्रसार होण्याच्या दृष्टीने संगणकावर व इंटरनेटवर मराठीचा वापर वाढणे, मराठी भाषेतील विपूल माहिती इंटरनेटवर प्रदर्शित करणे अतिशय महत्त्वाचे आहे.
- मराठी भाषेतील ग्रंथ, पुस्तके, नियतकालिके, हस्तलिखिते, कोशवाङ्मय इ. माहिती इंटरनेटवर प्रदर्शित करण्याचे छोटे—मोठे प्रकल्प एक भाषा विकासात्मक चळवळ म्हणून कार्यान्वित करण्याची आवश्यकता आहे. याबाबत सांस्कृतिक संस्था, प्रकाशन संस्था तसेच मराठी भाषा रसिक, वाचक, लेखक, संशोधक यांचा समन्वय साधून कल्पक उपक्रम राबवून अधिकाधिक मराठी साहित्य इंटरनेटवर प्रदर्शित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.
- आपले लेख, कथा, कविता व इतर साहित्य मराठी नोंदस्थळांची निर्मिती करून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचविण्याची गरज आहे.
- मराठी संकेतस्थळांना प्रोत्साहन व पाठबळ देण्यासाठी प्रत्येक सायबर कॅफेमध्ये, ग्रंथालयात या विषयीचे माहितीपत्रक व सूची ठेवून त्यांचा प्रसार करता येईल.

## समारोप

इंटरनेटवर मराठी भाषेची समृद्धी व तिच्या प्रसारात वृद्धी करण्यासाठी मराठी संगणकधारकांनी प्रत्येकवेळी नोंदस्थळे, संकेतस्थळे या माध्यमातून मराठी भाषेतील माहिती व साहित्य प्रदर्शित केले तर मराठी

भाषेच्या इंटरनेटवरील प्रसाराला गती येईल. नवचैतन्य मिळेल आणि इंटरनेटवरही माय मराठीची भरभराट झाल्याशिवाय राहणार नाही.

## संदर्भ साहित्य


१) सूचना सुरक्षा जागरूकता – सी.डॉक. प्रकाशन

२) इंटरनेट – डॉ. प्रबोध चौबे

३) माहिती तंत्रज्ञान – सुषमा गावंडे

४) www.maymarathi.com

५) www. marathi.com

६) माहिती संप्रेषण तंत्रज्ञान – प्रा.कल्पना माने


❖❖❖

# यशवंतराव चव्हाण यांनी रेखाटलेली व्यक्तिचित्रे : एक अभ्यास

प्रा. डॉ. ममता इंगोले (महल्ले)
भाषा विभाग प्रमुख
डॉ. एच.एन. सिन्हा महाविद्यालय, पातूर,
जि. अकोला, भ्रमणध्वनी: ९८२३३९२९५३

आधुनिक महाराष्ट्राचे निर्माते म्हणुन यशवंतराव चव्हाण सर्वदूर परिचित आहेत. एक मुत्सददी राजकारणी, उत्कृष्ट संसदपटू, कार्यक्षम मंत्री असे देशाच्या आणि राज्याच्या राजकीय जीवनात यशवंतराव चव्हाणांनी लक्षणीय कार्य केले. मुळात एक राजकारणी म्हणून यशवंतराव चव्हाणांची ओळख अधिक आहे. परंतु राजकारणापलीकडे जाऊन एक कलावंत म्हणूनदेखील यशवंतरावांनी ओळख निर्माण केली आहे. महाराष्ट्र संस्कृतीचा रास्त अभिमान, जनसामान्यांबद्दलची अकृत्रिम कळकळ, साहित्य कलेत रस घेणारी सौंदर्यलोलूप वृत्ती, विचारशीलता आणि साध्या, सोप्या मराठमोळी भाषाशैलीचा अंगिकार ही यशवंतराव चव्हाणांची गुणवैशिष्ट्ये होत. यशवंतराव चव्हाणांच्या राजकारणाने त्यांच्यातील इतर पैलूंना झाकून टाकले. ''......पण त्यांचे मूल्यमापन त्यांच्या राजकीय जीवनाच्या अनुषंगाने अधिक झाले आहे, त्यामुळेच त्यांच्यावर काहीसा अन्याय झाला आहे. राजकारणातील आवेश, अभिनिवेश, पूर्वग्रह त्या त्या काळाचे वातावरण या सर्वांमुळे राजकीय व्यक्तीचे मूल्यामापन वस्तुनिष्ठ व साक्षेपी नसते. पूर्वग्रहांच्या दाट छायेने राजकीय महापुरुषांचे अनेक सद्‌गुण झाकले जातात, किंवा त्यांचे धूसर दर्शन होते. अनेकदा राजकीय पुरुष त्यांच्या कमी महत्त्वांच्या गुणांनी प्रसिद्धी पावतात. म्हणुन राजकीय मापाने अशा अष्टपैलू व्यक्तीचे मूल्यमापन करणे तर्कदृष्ट व अशास्त्रीय आहे.'' (ऋणानुबंध २३५–६) हे विचार स्वत: यशवंतराव चव्हाणांनी तात्यासाहेब केळकरांच्या संदर्भात मांडले होते.

वरील विचार स्वत: यशवंतराव चव्हाणांनादेखील लागू पडणारे आहेत. यशवंतराव चव्हाणांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे मूल्यांकनदेखील अभ्यासकांनी अशाप्रकारे केले आहे. वाङ्मयीन संस्काराचे पाथेय जन्मभर कृतज्ञतापूर्वक मिरवणारे, उत्कटतेने अनुभव घेऊन तितक्याच प्रत्ययकारी शैलीत ते शब्दबद्ध करणारे, भाषेवर मनापासून प्रेम करणारे आणि साहित्याविषयी चोखंदळ जाणकारी बाळगणारे यशवंतराव चव्हाण राजकारणाइतकेच सहित्याच्या प्रातांत मुशाफिरी करणारे होते. 'साहित्याच्या क्षेत्रात माझी भूमिका नम्र रसिक वाचकाची आहे हे यशवंतराव चव्हाण आवर्जून वारंवार सांगत असत. असे असले तरी ते तेवढ्यापुरती ती मुळीच सिमित नव्हती त्यांचा मूळ पिंडच प्रतिभावंताचा होता. राजकारणाच्या धकाधकीत यशवंतराव चव्हाण शिरले नसते, तर कदाचित साहित्याच्या इतिहासात अजरामर ठराव्यात, अशा साहित्यकृती ते निर्माण करू शकले असते याची प्रचिती त्यांच्या प्रकाशित लेखनावरून व भाषणावरून येते.

ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबाचे घर ही वाङ्मयीन संस्काराच्या दृष्टीने प्रतिकुल परिस्थिती. ही परिस्थिती यशवंतराच चव्हाणांना लाभली होती, पण त्यांनी आपल्या सूक्ष्म संवेदनशीलतेच्या बळावर या प्रतिकुलतेवर मात केली. 'प्रतिभेचे देणे' त्यांना त्यांच्या आईकडून उपजत मिळाले होते. दळताना आईने म्हटलेल्या स्वरचित ओव्यांनी पहिला वाङ्मयीन संस्कार त्यांच्यावर केला होता. रामायण–महाभारताचे कथासार असणाऱ्या शेकडो ओव्या त्यांच्या आईने रचल्या होत्या. आईबरोबर ऐकलेली कथा कीर्तने, प्रवचने, पौराणिक आख्याने यांमधून त्यांचे भाषाभान सतर्क झाले. कृष्णा कोयनेच्या प्रितीसंगमाकाठचा सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध असलेल्या परिसराने त्यांच्यातील सर्जनशीलतेला खतपाणी घातले. या परिसराने त्यांच्या मनात निसर्गसौंदर्याची ओढ रुजविली. आपले 'ऋणानुबंध' हे पुस्तक त्यांनी कराडला समर्पित केले आहे. या पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेत त्यांनी कृष्णा कोयनेच्या या पाण्याने काही छंद लावले व काही श्रद्धा दिल्या असे नमूद केले आहे. 'कृष्णकाठ' हे त्यांचे आत्मचरित्र यशवंतराच चव्हाणांमधील प्रतिभासंपन्न साहित्यीकाची ओळख करुन देते. शिवनेरीच्या नौबती, सहयांद्रीचे वारे, युगांतर, विचारधारा, भूमिका आदी त्यांच्या भाषण संग्रहातून त्यांच्या वक्तृत्वशैलीची प्रचिती येते. 'विदेशदर्शन' या प्रवासवर्णनातून वेणुताईशी साधलेला पत्ररुपी जीवनसंवाद वाचायला मिळतो. एकूणच यशवंतराव चव्हाणांची वाणी आणि लेखणी साधीसुधी नव्हती ती एका श्रेष्ठ दर्जाच्या प्रतिभासंपन्न अशा थोर कलावंताची होती यात वादच नाही. फडके–खांडेकरांच्या युगात यशवंतराव चव्हाणांची पिढी वाढली होती. विशेषत: खांडेकरांच्या लेखनाचा त्यांच्या विचारांवर व भावनांवर खोल ठसा उमटला होता. प्रा.ना.सी. फडके यांनी यशवंतराव चव्हाणांमधील साहित्यिकाचा गौरव करताना यशवंतरावांच्या लिखाणाचा आस्वाद जेव्हा जेव्हा मी

घेतो तेव्हा तेव्हा माझ्या मनात येते यशवंतरावांच्या ठिकाणी जो श्रेष्ठ साहित्यिक आहे त्याचे पूर्ण कर्तृत्व प्रगट होत नाही, ही खेदाची गोष्ट म्हणावी लागेल. असे जरी असले तरी भावी काळात त्यांच्यावरच प्रचंड साहित्यनिर्मिती होईल, याबद्दल मला तिळमात्र शंका नाही.

यशवंतराव चव्हाणांमधील साहित्यिक खऱ्या अर्थाने अनुभवाचा असेल तर त्यांनी रंगविलेल्या व्यक्तिचित्रणांकडे नजर टाकणे आवश्यक आहे. त्यांच्या प्रतिभेचा मनोज्ञ आविष्कार त्यांनी रंगविलेल्या विविध व्यक्तिचित्रणामधून झालेला आढळतो त्यांनी रंगविलेल्या व्यक्तिचित्रणांमध्ये सर्वाधिक प्रभावी ठरली आहेत त्यांच्या मातोश्री 'विठाई' आणि पत्नी 'वेणूताई' यांची व्यक्तिचित्रे. कारण या दोन्ही व्यक्ती त्यांच्या 'जीवनाला आशय आणि आकार' देणाऱ्या होत्या. ठरवून न लिहिता प्रसंगोपात सहजरित्या ही व्यक्तीचित्रे रंगविल्यामुळे ती अधिक हृदयस्पर्शी झाली आहेत. 'आई' हा विषय भल्याभल्या प्रतिभावंताना झपाटून टाकणारा आहे माती व माता यांच्याशी एकरुप होणे आपला जन्मजात स्वभाव असल्याचे यशवंतराव चव्हाण अनेकवेळा मान्य करीत असत ते म्हणतात, ''तीर्थतूल्य मातेच्या दर्शनाने माझे अष्टसात्विक भाव जागे होतात. अंतर्मन निथळू लागते. पौर्णिमेच्या चंद्रातून अमृतबिंदू ठिबकावेत, अशी तिची प्रेमळ दृष्टी माझ्यावर वर्षाव करते आणि नकळत पायगत झालेल्या पापण्या, हृदयाच्या चौफाळ्यावरील पावले धुंडाळू लागतात. (कित्ता १२२)

मातृभूमी आणि आई विठाबाई यांच्याविषयी त्यांच्या मनात अपार आदर, प्रेम आणि भक्तिभाव होता. त्यांनी 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रात आईचं जे व्यक्तिचित्र रेखाटलं ते मनोवेधक आहे. 'माझी आई' शाळेत शिकली नव्हती पण शिक्षणाचे मोल ती मनोमन जाणत होती. आमच्या घरची परिस्थिती तशी गरिबीची असली, तरी संस्कारांनी आई श्रीमंत होती. ती आम्हाला सतत धीर देई पहाटे दहण दळताना....

'नका बाळांनो डगमगू
चंद्र सूर्यावरील जाईल ढगू'

ही दिलासा देणारी ओवी तिच्या मांडीवर झोपून ती कितीतरी वेळा ऐकली आहे. (कृष्णाकाठ)

वडिलांच्या माघारी एका खेड्यात मुलांना घेऊन राहणारी आई मनाने अतिशय मोठी आहे. छोट्या प्रसंगामधून मुलांना शिकविले पाहिजे ही तिची धारणा आहे तिचे शिकविणे म्हणजे माणुसकीच्या उदार मूल्यांचा उद्घोषच आहे. त्या पारंपारिक पद्धतीने वागत नाहीत. पारंपारिक मूल्यांचा मुलांवर संस्कार करीत नाहीत. विठ्ठल रामजी शिंदे जेव्हा त्यांच्या गावी आले आणि त्यांनी आईला सांगितले की, 'अस्पृश्यांची आणि सवर्णांची एकच पंगत झाली पाहिजे.' तेव्हा आई म्हणते, 'यशवंतरावांचे सर्व मित्र माझी मुलंच आहेत. मग ती कुठल्याही जातीधर्माची असोत'. चव्हाण आवर्जुन सांगतात, 'संपत्तीने नसली तरी संस्काराने आई श्रीमंत होती आणि ती श्रीमंती आम्हा मुलांपर्यंत पोचवण्याचा तिचा सतत प्रयत्न होता.' (ऋणानुबंध–३८) अशा या संस्कारशील मातेची शब्दारती करताना चव्हाण म्हणतात, ''मला आपल्या या सगळया प्रेमाला पोहोचविण्याचे श्रेय माझ्या अशिक्षित आईला आहे. आज दुनियेमध्ये काय चालले आहे, हयाचे तिला फारसे ज्ञान नाही. मी तिचा धाकटा मुलगा मुख्यमंत्री आहे. पण मुख्यमंत्री म्हणजे काय? हे आजही तिला माहीत नाही.... तिची पुण्याई, तिचा साधेपणा, तिचे प्रेम, तिने शिकविलेले चारदोन छोटे छोटे गुण हेच मला माझ्या जीवनामध्ये उपयोगी पडले आहेत.'' (सह्यांद्रीचे वारे – १९७)

'कवी यशवंतांना आईची आठवण झाली आणि घराघरातली आई जागी झाली' (युगांतर, २४६) या शब्दात कवी यशवंताचा गौरव करणाऱ्या चव्हाणांनी ज्या शब्दात आपल्या निरक्षर भोळया मातेचे ऋण व्यक्त केले आहे, ते यशवंतांच्या कवितेलाही मागे टाकणारे आहेत. स्वातंत्र्यलढ्यात त्यांना जेव्हा अटक झाली तेव्हा त्यांच्या एका शिक्षकाने सांगितले की, इंग्रज सरकारची माफी मागितली तर सुटका होऊ शकेल. गुरुजींनी केलेली माफी मागण्याची सूचना साफ उडवून लाऊन यशवंतराव चव्हाणावर स्वाभिमानाचा व ध्येयनिष्ठतेचा खोल संस्कार या आईने केला होता. सामाजिक प्रसंग असो की राजकीय ही आई अतिशय उदार, पुरोगामी, निर्भिड व मोठया मनाची आहे अशा आईचे व्यक्तिमत्व ते अनेक प्रसंगामधून  साकार करीत जातात. त्यांचे आपल्या आईवर निरतिशय प्रेम होते. जगात कुठेही असो, कुठल्याही प्रसंगात असो, त्यांना सतत आईची आठवण येत राहते. आपल्या आईने आपल्याला विचारांची श्रीमंती दिली, माणुसकी दिली आणि परिस्थितीच्या चक्रव्यूहातून बाहेर पडण्याचे शिक्षण अप्रत्यक्षरित्या दिले, हे चव्हाण अतिशय अभिमानाने नोंदवतात. त्यांच्या जन्माच्या वेळचे त्यांच्या आईचे बाळंतपण हे जीवावर बेतलेले होते, हे जेव्हा चव्हाणांना माहीत झाले तेव्हा ते अतिशय भारावून जाऊन लिहितात, 'पण आईच्या प्राणाची साक्ष म्हणून माझे नांव आहे हे कळल्यापासून आई हाच माझा प्राण बनला.' (ऋणानुबंध–३८)

चव्हाण तुरुंगात असतांना त्यांच्या आई त्यांना भेटायला येतात तेव्हा आईविषयीच्या भावना सहजपणे आविष्कारित झालेल्या दिसतात. ते म्हणतात 'आई' हा शब्दच असा आहे की, त्याच्या साध्या उच्चारानेसुध्दा मी भावनेने दुबळा बनतो, दादांच्या मृत्यूने आमच्या कुटुंबावरील संकटांचा एका अर्थाने कळस झाला होता. माझ्या डोळयांपुढे माझ्या आईची दु:खी, करुन मुर्ती उभी राहायची आणि मी अस्वस्थ होऊन जायचो.... मी जेलमध्ये आहे असे समजल्यावर नंतर कऱ्हाडहून आई मला भेटायला आली. मी जेलच्या प्रमुख अधिकाऱ्यांना विनंती केली की, मी जेव्हा माझ्या आईला भेटेन, तेव्हा तेथे कोणी हजर असता कामा नये. ती दु:खाने भरुन गेलेली आहे. तिला मोकळे व्हायचे आहे. म्हणून तेथे कोणी तिसरा माणूस असणे बरे नाही. तो जेलचा अधिकारी माणुसकी असणारा होता त्याने सांगितले की मी तशी व्यवस्था करतो मी जवळजवळ सहा महिण्यांनी आईला भेटत होतो. दादांच्या मृत्युचे दु:ख तिने आकांत करुन हलके केले. मी तिची समजूत घातली. माझी प्रकृती बरी आहे असे पाहून आईला त्यातल्या त्यात समाधान झाले आणि या दु:खात मी इतके दिवस भेटलो नव्हतो, ही जी माझ्या मनाला लागून राहिलेली टोचणी होती ती कमी झाली. १९६५ च्या युध्दाच्या धुमश्चक्रीत आईचे निधन झाले. तिच्या अस्थी गंगेत टाकतांना भूतकाळाचा एकमेव धागा झटकन तुटला असे चव्हाणांना वाटले.

चव्हाणांचे वडील हे चव्हाण पाच वर्षाचे असतानाच प्लेगच्या साथीने गेले. एक छत्र कायमचे नष्ट झाले. 'सह्याद्रीचे वारे' यात मराठवाड्यात भेटलेल्या म्हाताऱ्याची आठवण यशवंतराव चव्हाणांनी दिली आहे. एक म्हातारा एक एक रुपयाच्या दहा–पधंरा नोटांचा हार घेऊन त्यांच्या गाडीसमोर येतो आणि म्हणतो, 'तुझ्यासारखा पुत्र व्हावा अशी इच्छा होती. पण तुला खाऊला हे पैसे आणले आहेत,' हा प्रसंग सांगताना चव्हाण सहजपणे लिहून जातात, ''मी पितृवंचित आहे. लहानपणीच वडील वारले. पण या वयातही आपल्याला खाऊला पैसे द्यायला कुणीतरी आहे, या भावनेने माझे मन भरून आले. माझे अश्रु मी थांबवू शकलो नाही.'' या आठवणीतून यशवंतराव चव्हाणांचे मन कसे हळवे, प्रेमळ आणि पित्याविषयीच्या कृतज्ञतेने कृष्णाकोयनाप्रमाणे तुडूंब भरलेले होते हे लक्षात येते.

'एकमेकांच्या भावनांचा आदर करण्याची आणि एकमेकांना समजून घेण्याची वृत्ती एकमेकांना आयुष्यभर बांधून ठेवते. तसेच वैवाहिक आयुष्य त्याग आणि विश्वासाच्या पायावर टिकून असते. या विचारांचे प्रतिबिंब यशवंतराव चव्हाण–वेणूताई यांच्या सुखी संसारात दिसून येते. पत्नीच्या संदर्भात व्यक्त झालेल्या यशवंतराव चव्हाणांच्या भावना हिमखंडासारख्या आहेत दृष्यमात्र एकपट तर ८ पट अदृश्य. त्यांनी ताईचे व्यक्तिमत्व त्रोटकपणे रेखाटले असले तरी त्यांच्या मनातले खूप काही त्यांचे ते शब्द व्यक्त करून जातात. यशवंतराव चव्हाण व्यस्त सार्वजनिक जीवनात काहीसे दुर्लक्षित जीवन वाटयाला आलेल्या वेणूताईचे व्यक्तिमत्व किती परिपक्व आणि उदार होते हे फार कमी प्रसंगातून साहेबांनी रेखाटले आहे. देशभक्ताचा संसार म्हणजे 'सुळावरची पोळी' असते याची जाणीव अंगाची हळद निघण्यापूर्वीच ताईंना आली. स्वातंत्र्यासंग्रामाने जोर पकडला. साहेब त्यात सक्रिय त्यांच्याविरुध्द वारंट असल्यामुळे त्यांना भूमिगत राहून काम करावे लागे. साहेबांचा ठाव–ठिकाणा जाणून घेण्यासाठी पोलीस सतत वेणुताईचा अमानुष छळ करु लागले ताईनी तोंडातून ब्र न काढता हा छळ सहन केला.

सुखवस्तू घरातून आलेल्या वेणुताईंना कारावासाचे खडतर जीवन काही काळ कंठावे लागले आणि नंतरही त्या खडतरपणाने केलेल्या आरोग्याचा चोळामोळा त्यांना जन्मभर पुरला. त्यामुळे ताईविषयी बोलताना साहेबांचा सूर हळवा आणि अपराधी होतो. ते म्हणतात, 'नव्या संसाराची स्वप्ने रंगवण्याच्या वयात तिला तुरुंगाची हवा चाखावी लागली तीही तिने माझ्याशी लग्न केले, या एकाच अपराधाबद्दल मला जास्त वाईट वाटले, ते तिच्या लग्नानंतरच्या पहिल्याच कौतुकाच्या संक्रांतीवर. तुरुंगाची संक्रांत आली, म्हणून. पण तिने या निराशेचा कडवटपणा कधीही जिभेवर येऊ दिला नाही. (ऋणानुबंध–६७)

पत्नीने दिलेल्या साथीबद्दल साहेब कृतज्ञ आहेत. '१९४६ च्या निवडणुकीच्या यशानंतर मी माझ्या आईच्या पायाला स्पर्श करून नमस्कार केला. त्यानंतर अनेक महिलांनी येऊन मला ओवाळले. माझी पत्नी सौ. वेणूबाई हिनेही येऊन मला ओवाळले, तेव्हा माझे डोळे पाणावले. मी तिलाच ऐकू जाईल असे सांगितले, 'वेणूबाई या यशात तुझाही वाटा आहे.' ती किंचित हसली आणि म्हणाली, 'अशी वाटणी करायची नसते.' (कृष्णाकाठ–३०९) ताई गंभीर आजारी झाल्या हे कळताच साहेबांची घालमेल पुढील शब्दातून व्यक्त झाली, 'लग्न झाल्यापासून तिला सुखाचे दिवस असे दिसलचे नाहीत.' सतत मनस्ताप आणि काळजी. तिच्या संसाराची सुरुवातच अशी दु:खमय झालेली, त्यात तुरुंगवासाचा त्रास, माझ्या मोठया बंधूंचा मृत्यू, माझे मलाच अपराध्यासारखे वाटू लागले (कित्ता – ७१) जेव्हा दोन आत्म्यांच्या तारा जुळतात तेव्हा त्या व्यक्तीच्या

अस्तित्वाचीच नाही तर विचारांची चाहूल दुसऱ्याला लागते. या विचारांचा परिपाक म्हणजे यशवंतराव चव्हाण आणि वेणूताईचे वैवाहिक आयुष्य. कर्तबगार, कर्तृत्ववान, देशनिष्ठा, दूरदृष्टी ठेवून कीर्तीमान झालेल्या यशवंतराव चव्हाणांची यशोगाथा वेणूताईच्या त्याग सहकार्य निष्ठेनेच परिपूर्ण झाली आहे. ताईविषयी आपले मित्र विनायकराव पाटील यांच्याशी बोलताना साहेब म्हणतात, 'मी गृहमंत्री असतांना संसदेत प्रश्नोत्तराचा तास सुरु होता तेव्हाच बातमी आली की कऱ्हाडमध्ये जातीय दंगल उसळली होती. तो तास संपवून घरी आलो अन वेणूताईना विचारले, 'बातमी ऐकली का ?' त्यावर त्या उत्तरल्या, 'हो बातमी ऐकली आणि तुमची बॅग भरुन तयार आहे'. अनेकदा काहीही न बोलता मनातले भाव आम्ही ओळखतो. विनायकराव तुमच्या म्हणण्याप्रमाणे आम्ही Made for each other खरोखरच आहोत''.

वेणूताईच्या जाण्याने मात्र हा 'सहयाद्री खचला'. त्यांना कशातच रस वाटेनासा झाला. अशातच त्यांचा एक कार्यक्रम कुणीतरी टिळक–स्मारकामध्ये लावला. प्रास्ताविक, स्वागत झालं त्यांना ऐकायला म्हणून टिळक स्मारक गच्च भरलं होतं. यशवंतरावजी बोलायला म्हणून उभे राहिले आणि काय झालं कुणास ठाऊक, क्षणार्धात ते ऊर भरुन आले. सरसर त्यांचे डोळे वेणूताईंच्या आठवणीनं पाझरु लागले. दुसऱ्याच क्षणी ते एकच वाक्य कसं तरी बोलले, म्हणाले, 'माफ करा, मी बोलू शकणार नाही. तुम्ही शांतपणे निघून जाव' आणि भरलं सभागृह ओल्या नेत्री एक–एक करत शांतपणे बाहेर पडलं !

चव्हाणांच्या जडणघडणीत त्यांच्या आईचा जसा फार मोठा वाटा आहे तसाच त्यांच्या शेती करणाऱ्या मोठ्या बंधूंचाही आहे म्हणूनच त्यांना जगातल्या मोठेपणापेक्षा घरातले लहानपण अतिशय मोठे वाटते. आई, मोठे बंधू यांच्या बरोबरीने सगळे खेडे त्यांना अतिशय जवळचे वाटते. देवराष्ट्र आणि भोवतीचा परिसर साहेब जेव्हा साकार करतात तेव्हा त्यांच्या व्यक्तिमत्वाला प्रेमाचं भरतं येतं. सोनहिरा साक्षात होऊन जातो, त्या परिसरातील अनाम माणसं साकार होऊन जातात. कुलसूम दादीसारखी परधर्मीय स्त्रीही साकार होते. कुलसूम दादी ही केवळ प्रेमाचा वर्षाव करणारी स्त्री होती, हा विशेष साहेब सहजपणे प्रकट करून जातात. तिचा परिवार, तिची मराठी–उर्दू समिश्र भाषा, रोखठोकपणे, तिने बालवयात लावलेला लळा या सर्वाच्या वर्णनातून ती वाचकांसमोर मुर्तिमंत उभी राहते. या कुलसुम दादीचे संस्कारच त्यांना धर्माच्या पलीकडे घेऊन जातात. 'या व्यक्तिचित्रातून पन्नास वर्षापुर्वीच्या महाराष्ट्रातल्या एका खेडयात सामान्य जीवन जगणाऱ्या माणसांच्या दैनंदिन जीवनात (जातीधर्म वगैरेंची) तटबंदी कुठेही दिसत नव्हती, भासत नव्हती. माणुसकीची नाती रक्ताच्या नात्याइतकीच मजबूत आणि खरीखुरी जीवंत नाती होती हा मी जगलेला अनुभव आपल्याला सांगायचा होता, असे यशवंतराव चव्हाणांनी नमुद केले आहे'. (कित्ता ६) साहेबांच्या सहवासात ज्या ज्या व्यक्ती आल्या त्यांचे केंद्रवर्ती विशेष चव्हाण अतिशय सहजपणे सांगून जातात हा यशवंतराव चव्हाणांच्या लेखणीचा फार मोठा विशेष आहे.

साहेबांच्या राजकीय जीवनात अनेक व्यक्ति आल्यात. महात्मा गांधी, पं. नेहरु, राधाकृष्णन, काकासाहेब गाडगीळ, धनंजयराव गाडगीळ, बाळासाहेब खेर, मोरारजी देसाई, विठ्ठल रामजी शिंदे, नाना पाटील, अच्युतराव पटवर्धन, सरदार वल्लभभाई पटेल, लालबहादूर शास्त्री या प्रमुख व्यक्तीशिवाय इतर अनेक व्यक्ती त्यांच्या जीवनात आल्या. या व्यक्तींना साहेब आपल्यासमोर उभे करतातच परंतु तो त्यातला केंद्रवर्ती स्वभाव घटकाच्याच आधारे. खाडीलकर, केळकर, खांडेकर, माडखोलकर तसेच छत्रपती शिवराय, छत्रपती शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे या वंद्य विभूतीमत्वांविषयी साहेबांनी प्रसंगोपात लिहिले आहे. बऱ्याचदा त्यांनी सांगितलेले अनेक तपशील जुनेच असले तरी त्यांच्या लेखना–भाषणात संबंधित व्यक्तीविषयी एखादेच असे अन्वर्थक विधान यशवंतराव चव्हाण टाकतात की त्यातून त्या व्यक्तिमत्वाचे खास वैशिष्टय चपखलपणे श्रोत्यांपुढे, वाचकांपुढे उभे राहते किंवा काही ठिकाणी अशा एखाद्या समर्थक व्यक्तीगत आठवणीचा ओझरता उल्लेख यशवंतराव चव्हाण करतात आणि तेवढ्यामुळे त्या त्या व्यक्तिमत्त्वाचे सगळेपण अधोरेखित होवून जाते.

सामाजिक आणि राजकीय या दोन्ही पक्षांना एकत्र करणारे म. गांधी त्यांना युगप्रवर्तक वाटतात गांधीजींचे युगप्रवर्तकत्व सांगताना ते युगप्रवर्तकाची व्याख्या पुढीलप्रमाणे करतात, 'व्याकरणाचे जुने नियम तो जणू फेकून देतो. जुनी फुटपट्टी तो मोडून टाकतो, स्वत:च्या गायकीला साजतील असे नवीन स्वर आणि ताल बसवितो आणि नवे सूर आळवू लागतो'. (कित्ता–१३२) 'सुसंस्कृत ॠतुजा' हा नेहरुंचा विशेष त्यांना जाणवतो. राधाकृष्णन यांच्याबद्दल लिहितांना वॉशिंग्टनमध्ये भेटलेल्या एका साठ पासष्टवर्षीय वृध्दाची आठवण साहेबांनी सांगितलेली आहे, 'राधाकृष्णन यांच्या कधीतरी ऐकलेल्या भाषणावरुन कधीही न पाहिलेल्या गंगेचा ओघ कसा असेल याची कल्पना आली होती'. असे एक वाक्य उच्चारुन तो म्हातारा निघून गेला होता (कित्ता, १४२) ज्ञानी पुरुष म्हणून डॉ. राधाकृष्णन यांच्याकडे ते पाहतात. कठोर निर्णयक्षमता असणारे राजकारणी म्हणून लाल बहादूर

शास्त्री यांचे त्यांना मोल वाटते, 'शास्त्रीजी एखादे काम एखाद्यावर सोपवल्यानंतर त्यांच्यावर पूर्ण विश्वास टाकीत त्यांना हवे ते अधिकार देत. या त्यांच्या उमदेपणामुळे व मोकळेपणामुळे कामाला गती, हुरुप येत असल्याचे सांगून' साहेब लिहितात, (त्यामुळे)'माझ्यासारख्या दरबारी वृतती नसलेल्या माणसालाही काम करणे सोयीचे होई'. (कित्ता—१५९) धाडस आणि पराक्रम यांनी एकवटलेले नाना पाटील त्यांना जवळचे वाटतात. कणखर व्यक्तिमत्वाचे सरदार पटेल त्यांना मोहवितात तर सामाजिक सुधारणांचा ध्यास घेऊन राजकारणात पराभूत होणारे विठ्ठल रामजी शिंदे त्यांच्यावर खोल ठसा उमटवून जातात. शिद्यांना आपल्या गावी आणल्याची लहानपणची आठवण तर त्यांनी अनेक संदर्भात पुन:पुन्हा सांगितली आहे. हजार शब्दामधूनही व्यक्त होणार नाही असे या व्यक्तिमत्त्वांचे महात्म्य या छोट्या—छोट्या आठवणीतून मांडण्याचे कसब साहेबांना उत्तम साधले आहे.

शाहू महाराजांविषयीच्या लेखात, गोविंदराव टेंब्यांना 'शिवसंभव' नाटकाच्या वेळी आपल्या जवाहरखान्यातले खास शाही दागिणे वापरण्यासाठी छ.शाहूंनी दिले होते आणि ते नाटक बघतांना त्यात शिवजन्माचा प्रसंग येतो. तेव्हा शाहू महाराज भर नाटयगृहात आपल्या आसनावरुन उभे राहिले आणि त्यांनी नाटकातल्या शिवाजी महाराजांना लवून मुजरा केला (कित्ता, १७३) असे व्यक्तीचित्र रेखाटले आहे.

''पुण्याच्या बुद्धिवैभवाचे प्रतीक आणि महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाचे आधारस्तंभ'' असे तात्यासाहेब केळकरांचे वर्णन त्यांनी केले आहे. (कित्ता, २३५) एकेका मिताक्षरी वाक्यात संबंधीत व्यक्तीचे संपूर्ण व्यक्तिमत्व उजळून काढण्याची त्यांची हातोटी लक्षणीय होती. त्यांच्या मते डॉ.धनंजयराव गाडगीळ हे 'बहुजन हिताय बहुजन सुखाया या थोर तत्वाचे प्रतीक आणि तत्वचिंतक रचनाकार होते'. (कित्ता, १९४) ह.ना. आपटे 'हे राष्ट्रीय उष:कालाचे कादंबरीकार होते.' (कित्ता, २१२) तर 'भाऊसाहेबांच्या वाङ्मयात निदान मी कधी अमावस्या पाहिली नाही,..... हा चांदण्याचा लेखक आहे, प्रकाशाचा लेखक आहे.' या शब्दात ते खांडेकरांचा गौरव करतात. (कित्ता, २४३)

अशाप्रकारे, एखाद्या विधानातून, साभिप्राय विशेषणातून, परस्परांच्या अभिप्रायातून बाहय चित्रणातून तर कधी स्वभाववैशिष्टयांच्या अगर वृत्ती—प्रवृत्तीच्या चित्रणातून या व्यक्ती आपणांसमोर येतात. ही व्यक्तीचित्रणे कधी कधी त्रोटक स्वरुपातही आलेली आहेत त्यांच्या चित्रणाला येथे फारसा अवकाशही नाही परंतु ज्या मर्यादेत ते आपल्या समोर येतात, त्यातून त्यांचे घडणारे दर्शन मात्र जिवंत व अनुभवसंपन्न झाले आहे. आयुष्यात अविस्मरणीय ठरलेल्या अशा अनेक व्यक्तींचे व्यक्तिमत्व साहेबांना रेखाटायचे होते पण पुढे या ना त्या निमित्ताने काही मान्यवर व्यक्तीसंबंधी त्यांनी लिहिले असले, तरी जनसामान्यांमधल्या असामान्य व्यक्तिविषयी लिहिण्याचा, त्यांची व्यक्तित्व रेखाटण्याचा इरादा मात्र पूर्ण होऊ शकला नाही याबाबत ते हळहळ व्यक्त करतात.

साहित्यास्वादकाची भूमिका हीच आपली प्राथमिक भूमिका आहे असे चव्हाण म्हणत असले, तरी आणि ललित लेखन त्यांनी आयुष्यात फार पूर्वीच सोडून दिले असले, तरीही त्यांचे मन मात्र अखेरपर्यंत कलावंताचेच होते. निसर्गात रमणे, मन:पूर्वक एखादा अनुभव घेणे, भूतकाळाच्या कडूगोड आठवणीची प्रसंगोपात उजळणी करणे, लोकजीवनाच्या संजीवक संपर्काला प्रयत्नपुर्वक जोपासणे, बुध्दीइतकेच भावनेलाही तीक्ष्ण राखणे ही त्यांच्यातील कलावंत, साहित्यिकाचीच लक्षणे होती. त्यामुळेच त्यांनी रेखाटलेले एकेक व्यक्तित्व आपल्यासमोर साकार होते. आपल्या मनाची पकड घेते त्यांच्या प्रतिभेचा मनोज्ञ आविष्कार त्यांनी रंगवलेल्या विविध व्यक्तिचित्रामधून झालेल्या दिसतो. चव्हाणांनी व्यक्तिचित्रण रेखाटताना त्या त्या व्यक्तिमत्वातील मानवी स्वभावाच्या विविध पैलूचे दर्शन घडविले आहे. त्यांनी व्यक्तिमत्वातील गुणांना आणि स्वभावाला अतिशय स्वच्छपणे मांडले आहे. त्यामुळे ही व्यक्तिचित्रे आपल्याही ह्दयाच्या कोंदणात घट्ट रुतून बसतात.

## निष्कर्ष

१) यशवंतराव चव्हाणांवर बालपणी झालेल्या संस्कारामुळे तसेच आलेल्या वेगवेगळ्या अनुभवामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला जे परिमाणे मिळाली त्याचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष आविष्कार त्यांनी रेखाटलेल्या व्यक्तिचित्रणातून आढळतो.

२) व्यक्तिमत्त्वाच्या खास वैशिष्ट्यदर्शनाने, आठवणींनी व्यक्तिरेखेला उठावदार करणे हे यशवंतराव चव्हाणांचे कसब व्यक्तिरेखा जिवंत करतात.

३) एकेका मिताक्षरी वाक्याने संबंधित व्यक्तीचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व उजळून काढणे ही त्यांच्या व्यक्तिचित्रण रेखाटण्याचे कौशल्य लक्षणीय आहे.

४) प्रसंगवशात आलेला कौटुंबिक व्यक्तिचित्रण हे सहज ओघवत्या शैलीत आल्यामुळे ती अधिक हृदयस्पर्शी ठरली आहे.

५) काही ठिकाणी व्यक्तिमत्व रेखाटन त्रोटक वाटत असले तरी त्यांचे शब्दसामर्थ्य त्यांच्या मनातल्या गाभ्यातील त्या व्यक्तीचे व्यक्तिचित्र उजळून टाकते. उदा. वेणूताईचे व्यक्तिचित्रण.

६) साहेबांच्या अनुभवग्रहणाची आणि आविष्करणाची शैलीही सव्यसाची व संवदेनक्षम असल्यामुळे ही व्यक्तिचित्रण वाचकांच्या हृदयाला स्पर्शून जातात त्यांना आपल्याकडे खेचून घेतात.

## संदर्भ सूची


यशवंतराव चव्हाण यांचे लेखन व भाषणे

१) शिवनेरीच्या नौबती, संपा, गोविंद तळवलकर व अ ह. लिमये, भाषणसंग्रह, व्हीनस बुक स्टॉल, पुणे १९६१

२) सहयाद्रीचे वारे, भाषणसंग्रह, प्रकाशन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, १९६२

३) ऋणानुबंध, लेखनसंग्रह, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे, १९७९

४) कृष्णाकाठ, आत्मचरित्र खंड–१, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे, १९८४

५) युगांतर, भाषणसंग्रह, कॉटिनेंटल प्रकाशन, पुण,

६) Indian Foreign Policy, Winds of Change,Collecation of Addresses and Articales, Someaiya Publicatioans Pvt. Ltd. Bombay. 1973

७) बाबुराव काळे, यशवंतराव चव्हाण, चरित्र, ना. द. रेगे (प्रका.) मुंबई,१९५९

८) कृ. भा. बाबर, यशवंतराव चव्हाण,– व्यक्ती व कार्य, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६०

९) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.) यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ जन्मदिन सत्कार समिती, नागपूर, १९६१.

१०) रामभाऊ जोशी, यशवंतराव : इतिहासाचे एक पान, चरित्र, केसरी प्रकाशन, पुणे, १९७६.

११) Welles Hangen, After Nehru, Who? Rupert Hart-Davis, London, 1963

१२) T.V. Kundi Krishnan,Chavan and the Troubled Decade, Somaiya Publi-cations, Bombay, 1971

१३) D.B. Karnik, Y.B. Chavan : A Political Biography, United Asia Publishers, 1972

१४) विचारधारा, शिवनेरीच्या नौबती, सहयाद्रीचे वारे, युगांतर, भूमिका, ऋणानूबंध, कृष्णाकाठ, विदेश–दर्शन इत्यादी यशवंतराव चव्हाण यांची ग्रंथसंपदा.

१५) मी पाहिलेले यशवंतराव चव्हाण – संपा. डॉ. सरोजिनी बाबर

१६) यशवंतराव: राष्ट्रीय व्यक्तिमत्व – संपा. भा. कृ. केळकर

१७) महाराष्ट्राची मानचिन्हे – संपा: प्रा. एकनाथ साखळकर, डॉ. सुभाष भेंडे

१८) युगंधर नेते: यशवंतराव चव्हाण – संपा. प्रा.बा.ह. कल्याणकर

१९) वादळमाथा : राम प्रधान

२०) यशवंतराव चव्हाण: ना.धों. महानोर

२१) कृष्णाकाठचा माणूस – अरुण शेवते

२२) मराठी मातीचे वैभव: संपा. प्रा. उत्तम सूर्यवंशी

२३) यशवंतराव चव्हाण: विविधांगी व्यक्तिमत्व – वि. वि. पाटील

२४) यशोधन (यशवंतराव चव्हाण यांचे निवडक विचार संकलन – विनायक पाटील)

२५) शिल्पकार यशवंतराव चव्हाण – प्रा. डी. ए. माने

२६) सहयाद्रीचे हुंकार – संपा. प्रा. नारायण शिंदे

२७) लोकराज्य – मार्च २०१२

२८) यशवंतराव चव्हाण, राजकारण आणि साहित्य – भास्कर लक्ष्मण भोळे

२९) जनामनातील यशवंतराव – संपादन डॉ. नागनाथ हेगे


❖❖❖

# आदिवासी कवितेतील स्त्री चित्रण

प्रा. नितीन जगदिश टेकाम
आदिवासी सोसायटी, गोधणी रोड, यवतमाळ
ई मेल nitintekam123@gmail.com भ्रमणध्वनी ९६०४९४०४२४

१९ व्या शतकाच्या मराठी प्रवाहात वेगवेगळ्या साहित्य प्रवाहांनी आपला ठसा उमटवलेला दिसतो. साधारणत: १९६० च्या दरम्यान मराठीत ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य प्रवाह मराठी मनापर्यंत पोचले. जेव्हा एखादा साहित्य प्रवाह आपल्यापर्यंत पोचतो तेव्हा तो आपल्या बरोबर त्या, त्या समाज स्थितीबरोबर आपल्या जनमनाचे प्रश्न, समस्या आपल्या पर्यंत पोचवतात, त्या समीक्षेचे जेव्हा चळवळीत रूपांतर होते तेव्हा परिवर्तनाची ध्वजा फडकवीत असते. त्यातल्यात्यात स्त्रीवादी ही समीक्षा ती इतर चळवळीच्या तुलने अधिक वेगाने स्त्रियांच्या बाबतीत कायापालट करताना दिसते. स्त्रीवाद ही खरं तर एक राजकीय चळवळ आहे. आपल्या व्यक्तित्वाची जळणघडण कशी झाली आहे, त्याचा शोध घेण्यापासून ते आंतरराष्ट्रीय राजकारणापर्यंत स्त्रीवाद सर्वस्पर्शी आहे. १९६० नंतरच्या दशकात संपूर्ण जगात फैलावत गेलेली ही विचारप्रणाली आहे. स्त्रीवाद म्हणजे पुरुषांपासून फारकत घेऊन स्वत:चा सवता सुभा निर्माण करणे नव्हे. पण संस्कृतीच्या हजारो वर्षांच्या इतिहासाने स्त्रियांचे मानवपण नाकारून तिला जी पशुतुल्य अवस्था प्राप्त करून दिली, त्यातून बाहेर पडून आपले हक्क, अधिकार प्रस्थापित करून घेण्यासाठी निर्माण केलेले व्यासपीठ आहे. भारतात स्त्रीवादी लेखन होत असेल तरी मोजक्याच लेखिका स्त्रीवादी भूमिकेतून लेखन करताना दिसतात. स्त्रीवादी लेखन स्त्रियाच करतात असं नाही तर स्त्रीवादी दृष्टिकोण ठेऊन सुबोध जावडेकर, आकाश भाकिते याही लेखकांनीही स्त्री जाणिवांना उद्युक्त होऊन समर्थपणे स्त्री जीवनांचे चित्रण करू शकतात हे दाखवून दिले. त्यांचे प्रश्न, समस्या, शोषण, दु:ख समाजाच्या मन:पटलापर्यंत पोचवले. दलित स्त्रियांच्या जाणिवा उच्च वर्गीय स्त्रियांच्या तुलनेत फारसी वेगळी आहे. दलित स्त्रियांच्या साहित्यात व्यक्तिबरोबर समष्टीचे दर्शन आपोआप घडते. आदिवासी साहित्यातील स्त्रियांचे शोषण, पिळवणूक दुहेरी प्रकारची असते. त्यात एक म्हणजे जातीयवादातून व दुसरे म्हणजे स्त्री म्हणून वाट्याला आलेला लिंगवाद सहन करणाऱ्या स्त्रियांचे साहित्य हे अभ्यासण्याजोगे असते.

आदिवासी स्त्रियांच्या जाणिवा या वर्षोनुवर्षे जीवनमरणाचा अर्थ शोधत, नागरीसमाजापासून दूर डोंगरदऱ्या, रानावनात, काट्याकुट्यात, थंडी, ऊनवाऱ्याच्या जवळ, जंगलजिव्हाऱ्यात कोंडून आहे. आदिम समाजातील स्त्रियांचे प्रश्न, त्यांची ससेहोलपट, तिचं शोषण, पिळवणूक इतर समाजातील स्त्रियांच्या तुलनेत वेगळं आहे. सीतेपुढे एकच रेषा ओढली होती लक्ष्मणाने, पण जंगलजिव्हाऱ्यातील स्त्रियांना चारही बाजूंनी लक्ष्मणरेषा ओलांडाव्या लागतात. कित्येक प्रश्नांना सामोर जावे लागते. खऱ्या अर्थाने जिव्हाऱ्यातील स्त्रियांचे शोषण कुटुंबात तर होतेच, बाहेर पडल्यावर, मुलगी म्हणून जगताना आश्रमशाळेत गुरूर ब्रम्हा, मुलींच्या अब्रूंचे लचके ओढतो. जंगलातले कर्मचारी, सावकारही भर रस्त्यात स्त्रियांच्या शिलतेला काळीमा फासून आयुष्याची राखरांगोळी करतात. जंगलात फुललेल्या रानकळ्यांना, फुलांना ऐन तारुण्याच्या काठावर त्यांचा गळा कापताना दिसून येते. आदिवासी कवितेतील स्त्रियांचे प्रश्न, समस्येचा वेध कवी–लेखकांनी घेतलेला दिसतो, त्यात वाहरू सोनवणे “गोंधळ” (१९८७), प्रा.डॉ. विनायक तुमराम “रानगर्भातील जखमा”, “शतकातील आदिवासी कविता”, भुजंग मेश्राम “ऊलगुलान” (१९९०), उषाकिरण आत्राम “म्होरकी” (१९९७), प्रा. माधव सरकुंडे, कुसुम आलाम यांच्या काही कवितेतून स्त्री रेखाटलेली दिसते.

आदिवासी कवितेत “गोधड” या कवितासंग्रहात (१९८७) स्त्री हा चिंतनपर विषय आहे. जंगलजिव्हाऱ्यातील तिचे दिवसेन दिवस होणाऱ्या शोषणावर नेमके बोट ठेवतात. स्त्रीचं तरुणपण, म्हातारपण, चेटकीण म्हणून होणारी हेडसांड, एक पायातली वाहान, वस्तू समजून स्त्री देहाचा भोग, बलात्कार या अनेक रूपातील स्त्री आधोरेखित करताना म्हणतात,

“एक वस्तू अशी
तिला वाटते, घाटेत
सापडेल तिथं रोखाव
मनात आले तर मिठीत घ्यावं
हौस फिटली तर सोडून द्यावं

हाक नाही बोंब नाही”

खऱ्या अर्थाने पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांचं स्त्रीत्व बाटवलेलं दिसते. स्त्री–पुरुष समतेवर आधारित पुरुषा मधील माणुसकी जागविण्याची अपेक्षा दिसून येते. गोधळकार सोनवणे यांनी आपल्या “देवदासी” या कवितेत बाईकडे धर्मव्यवस्थने पाहण्याचा दृष्टीकोण कसा शोषित आहे हे सांगताना आपल्या कवितेत म्हणतात–

“एक मुलूख
तिथं देवाच्या नावावर मुली सोडतात
कोंबड्या बकऱ्यागत
तरुण होता होता बगलेत घ्यावे;
कोण पाहतो, घर नाही दार नाही
देवाच्या बकऱ्या त्या देवदासी म्हणतात त्यांना”

मुळात स्त्री देहाची तुलना पशू प्राण्याबरोबर केलेली दिसते. स्त्री देह केवळ भोगण्यासाठी, आनंदासाठी असतो, हा समाजवादी कावेबाज दृष्टिकोण सोनवणे दाखवून देतात. अशाच प्रकारच्या स्त्री जाणिवांचा वेध “रोजगार हमीच्या रांगेत”, “बाळंतीन बाई”, “घायल तस्वीर” या कवितेत घेतात. “घायल तस्वीर” या कवितेत छायाचित्रकार छायाचित्र काढण्यासाठी जंगलात जातो आणि त्या स्त्रीला हसण्याचा आग्रह धरतो, पण ती स्त्री आपल्या जन्मभराच्या दु:खाग्नीत डुबून असल्याकारणाने त्या दुखा:ला धक्का देणे कठीण असते. अशा प्रकारे तिच्या दु:खाची, प्रपंचाची ससेहोलपट टिपलेली आहे.

जंगलजिव्हाऱ्यातील स्त्री वेगवेगळ्या शोषणाची बळी पडताना दिसते. समाजात स्वत:ची ओळख मिळवू पाहणाऱ्या बाईला अजूनही स्वत:च्या हक्काचे घर नाही. नेसायला कपडे नाही, खायला अन्न नाही, शिक्षण नाही तरीही अशाही परिस्थितीत तिला आलेले आत्मभान जपतानाचे बाईमध्ये असणाऱ्या अनेक शक्यतांविषयी, सामर्थ्यांविषयी बोलताना ‘ऊलगुलान’कार भुजंग मेश्राम आदिवासी चळवळीतील स्त्री चे चित्रण करणारी “नागिन” ही कविता आहे.

“तिच्या विळ्याला दगड मिळत नाही
धार लावायला तिला सुचत नाही
स्वप्नाचे अंतराळ ती भटकते काजव्यात
तिच्या समोर वाढतयं गवत
गवताचं रान ती जाळणार म्हणते राब
नि करू म्हणते रस्ता
या गर्दीकाठावर आता उभा एक वारूळाचा महाल
खरंच तिला आपल्या विषाची कल्पना असेल काय?”

म्हणजेच स्त्रीचं व्यक्तित्व, सामर्थ्य कशात आहे याचा इशारा देताना दिसते. परंपरागत जीवन जगण्याच्या पद्धतीला मुठमाती देऊन परिवर्तनाचा मार्ग शोधण्यास प्रवृत्त करतात. वारूळाचा महाल बांधण्याचं सामर्थ्य, जिद्द तिच्या कडे आहे, हे दाखवून देतात. अशाच स्त्री जाणिवा डॉ. विनायक तुमरामही आपल्या कवितेत दाखवून देतात. डॉ. विनायक तुमराम आदिवासी साहित्य चळवळीचं प्रेरक व्यक्तिमत्व होय. यांच्या “शतकातील आदिवासी कविता” या ग्रंथात “आदिवासी माय” या कवितेत आदिवासी स्त्रीच्या आर्थिक, शारीरिक, सामाजिक शोषणाची व्यथा मांडताना दिसते. जिव्हाऱ्यातला रानमेवा बाजारात विकण्याच्या दरम्यान शेठ–सावकार, व्यापारी यांच्या विकृत, हावरट नजरांना सामोरे जावे लागते, बाजारातल्या गनगर्दीत ऐरे, गैरे नथ्थू खैरे तिचे शोषण कसे करतात हे दिसून येते. –

“केवळ शेरभर मिठासाठी दोन पायल्या चारोळ्या
अन छटाकभर जीरा, हळदीसाठी पायली मोहडबरी”

उषाकिरण आत्राम आदिवासी साहित्य चळवळीतील पहिल्या पिढीतील कवियत्री म्हणून ओळखल्या जाते, त्यांचा “म्होरकी” या काव्यसंग्रहात “पयसाची लाल आग व्हय”! या कवितेतून स्त्रीला परंपरेने जी चौकट निर्माण केली त्या चौकटीत आदिम स्त्रीत्वाचा स्वाभिमान तुडवला जातो आहे, म्हणूनच परंपरेची चौकट मोडण्याचा त्याचा त्याग करून नवरूप धारण करावे कारण–

“वाटेनं–जातेस तर समद्या डोमाले आग लागन
राणे! तुझ्यावर नजर सुधारलेल्या बापाची

तू रातराणी हावू नगं!
व्हशील तं—पळसाची लाल तांबडी आग व्हयं!"

असा विद्रोही लाल बावट्याचा शृंगार करण्यास सांगतात.

भारताला स्वातंत्र्य मिळून कितीक वर्षे पालटली तरीही या जिव्हाऱ्यातील वनपुत्राची रानोरान भटकंती चालूच, रोजीचा, रोटीचा सवाल रोजचाचं आहे, पण स्त्रियांना आतापर्यंत ही अंगभर वस्त्र नेसायला भेटत नाही, सांगायचे झाले तर कुसुम आलाम म्हणतात की "वस्त्र म्हणावे तर लंगोटी, स्त्रियांसही ना अंगभर साडी, छातीस चिकटती पोरे नागडी, बघे तयाला म्हणती संस्कृती!" भारतातील अर्धनग्न बाया पाहिल्या की स्वातंत्र्य म्हणजे अश्लील चेष्टाच वाटते. प्रा. माधव सरकुंडे यांनी आपल्या "शब्दसुरंग" या कवितेत म्हणतात—

"साहेब सिगारेट चुरगळ्यातगत
तरुणीचे स्तनाग्र चुरगळतो
ब्रॅडीच्या घोटाबरोबर तिचे तारुण्य चघळतो
तिच्या लाचार देहाशी मुक्तपणे खेळतो
मग आम्ही स्वातंत्र्य म्हणजे जबरदस्तीचा
संभोग म्हटलं
तर तुम्हाला वाईट वाटायला नको"

आदिवासीच्या दु:खाला व्यक्त करण्यासाठी शब्दसुरुंगानी निकामी करण्याच व्रत या कवितेत स्वीकारलेले दिसते. या स्वातंत्र्याने जंगलजिव्हाऱ्यातील जीवांची मांडीही झाकता आली नाही. भामरागडच्या स्त्रियांचं शोषण साहेबलोक कसे करतात, यावर ते प्रकाश टाकतात.

आदिवासी मुला—मुलींचे शिक्षण हे आश्रमशाळेत होतात, पण सरकारच्या शिक्षण व्यवस्थेचे तीन—तेरा वाजून धुमाकुळ माजतो. इथल्या स्त्रीशोषणाला, लैंगिक छळाला, विकृतीला या सर्वांच वासनाकेंन्द्र बनत जाते ती "आश्रमशाळा", हीच खंत आदिवासी कवी "आश्रमशाळा" या कवितेत मांडताना म्हणतात—

"हे तर ठरले आहे—नराधमाचे कुरण
आश्रमशाळा आदिवासी मुलांचे मरण
हे तर ठरले — अब्रू शोषणाचे सरण
आश्रमशाळा अत्याचार, अश्लीलतेचे तार
आई! आई! हे तर आदिवासी पिढीचे जीवंतमरण
रानांतले सावज दऱ्यातले नाग आणि वाघ बरे
पण शिकलेली माणसं, गुरू नाहीत ग बरे"

सर्वात पवित्र दान हे विद्येचे दान असतं या विद्येच दान करणाऱ्याला ईश्वरापेक्षा महान, मोठे लेखलं आहे, पण या व्यवस्थेचाच ईश्वरचं वासना विकृतिने पछाडलेला दिसतो अशा शाळेत मुलींचे भवितव्य अंधारत आहे. त्यांच जीवंतपणी मरण आहे, एकतर जंगलातले विषारी प्राणी बरे पण शिकलेले गुरू नाही खरे असा संवाद कविता करते.

अशीच कविता कुलुम आलामकार "बेडीबंद" या कवितेत स्त्रियांचे बाजारूपण कसं केले आहे सांगतात त्या रानावनात वावरताना रेलॉनृत्यात नाचूच—दमून या कवितेतील सखी पहाडाच्या पायथ्याशी मनोसोक्तपणे आघोंळ करतात अशा प्रसंगी स्त्री देहावर नजर चुकवून कॅमेरा रोखला गेला तर

"प्रत्येक आंबटशौकिनांच्या दिवाणखान्यात
नग्न होऊन बसशील पोस्टर रूपात
आणि बघे म्हणतील
व्वा! काय माल आहे!"

अशाप्रकारे स्त्री शरीर सौंदर्याच व्यापारिकरण, वस्तुकरण, आर्ट गॅलरीत बंदिस्त होईल म्हणून अज्ञानाला परंपरेला दारिद्र्याला विरोध करण्यास सांगतात.

आदिवासी साहित्यातील कविता सामाजिक बांधिलकी असलेल्या स्त्री दास्याचं दर्शन घडविणारी कहाणी करतांना दिसते. स्त्री हा चिंतनाचा विषय आहे कवितेत बऱ्याचश्या लेखकांनी प्रणयाचे चित्रण करण्याऐवजी स्त्रीच्या विविध समस्याचे, प्रश्नांचा विचार लेखकांनी केला आहे. कुटुंबात व समाजात स्त्रीचे स्थान काय? हा प्रश्न मांडलेला दिसतो. आदिवासी साहित्यात प्रत्येक कवितेत एक प्रश्न आहे त्या प्रश्नाचे उत्तर शोधायचे

असते. या प्रश्नामागे आदिवासी स्त्री चे होणार शोषण आहे, दु:ख आहे. त्या प्रश्नामागे स्त्रीला माणूस म्हणून स्वीकारले पाहिजे आणि आम्हाला माणसासारखं जीवन जगण्याचा अधिकार आहे अशी भूमिका आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची


१. स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि उपयोजन – डॉ. अश्विनी धोंगडे, दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्र.आ. ३१/०१/१९९३

२. आदिवासी साहित्य स्वरूप आणि समीक्षा – विनायक तुमराम, विजय प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १९९४

३. आदिवासी साहित्य एक अभ्यास – डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. १५/०८/२००९

४. शतकातील आदिवासी कविता – संपा. डॉ. विनायक तुमराम, हरिवंश प्रकाशन चंद्रपूर, प्र.आ. ०१/०८/२००३

५. महाराष्ट्रातील आदिवासी मराठी साहित्य एक शोध – डॉ. माहेश्वरी गावित, दास्ताने प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००८


❖❖❖

# ऐतिहासिक शहर पाटलीपुत्र

प्रा. एन. आर. ठवळे
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
मो.नं. ९४२०६८३११६ E mail: n.r_thawale@rediffmail.com

प्राचीन भारताची राजधानी पाटलीपुत्र हे शहर इ. स. पूर्व सहावे शतक ते इ. स. सहावे शतक म्हणजे जवळजवळ १२०० वर्षे भारताच्या राजधानीचे शहर होते. त्यामुळे ते एक महत्त्वाचे व मोठे शहरहोते. गंगा आणि शोन या नद्यांच्या संगमावर असून या शहराची स्थापना कशी झाली याबद्दल बौद्ध साहित्यात माहिती उपलब्ध आहे. मगध सम्राट अजातशत्रूचे आपल्या विरोधकांवर व शत्रूवर वचक निर्माण करण्यासाठी तिथे एक किल्ला बांधला. तिथेच पाटलीग्राम नावाचे लहानसे गाव होते. किल्ला बांधल्यामुळे त्या गावाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत गेले आणि एक मोठ्या शहरात त्याचे रूपांतर झाले. हा किल्ला संरक्षणाच्या दृष्टीने आणि राज्याच्या राजधानीच्या दृष्टीने उपयुक्त आहे असे वाटल्यावर सम्राट अजातशत्रूचा मुलगा उदायीने आपली राजधानी राजगृह या शहरातून पाटलीपुत्र येथे आणली. परिणामत: ह्या शहराचे महत्त्व अधिकच वाढले. नंदवंशाच्या राजधानीचे शहर पाटलीपुत्र हेच होते, त्यामूळे त्या शहराचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत गेले. नंद वंशाचा नाश करून चंद्रगुप्त मौर्याने मगध जिंकले त्यामुळे पाटलीपुत्रवर मौर्यांची सत्ता आली. हे प्राचीन भारतातील पहिले मोठे साम्राज्य होते. परिनामत: मौर्य काळात ते भारतातील सर्वात मोठे व महत्त्वाचे शहर म्हणून ओळखल्या जाऊ लागले.

चंद्रगुप्त मौर्याने सेल्यूकट निकटचे भारतावरील आक्रमण सिंधू नदीच्या काठावर अडवून त्याचा पराभव केला व त्याच्यासोबत तह करून बराच मोठा प्रदेश प्राप्त केला. त्या तहानुसार हे मेग्यास्थेनिस नावाचा ग्रीक वकील चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारात पाठवला होता. त्याने भारतातील वास्तव्यात इंडिका नावाचा ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथात त्याने भारतासह पाटलीपुत्र या शहराचे वर्णन केले. वास्तविक इंडिकाची मूळ प्रत आज हयात नाही; पण ग्रीकांच्या साहित्यात याबद्दल अनेक उल्लेख आहे आणि त्यावरून आपणास ही माहिती प्राप्त होते. तो लिहितो, शहराच्या भोवताल मोठा खोल व रूंद असा खंदक आहे आणि त्यात मोठ्या प्रमाणात पाणी भरून असते. त्यामुळे तो खंदक ओलांडून शत्रूला प्रवेश करता येत नसे. खंदकाच्या आत शहराकडील भागात शहराभोवती मोठा परकोट होता आणि त्याला ६४ दरवाजे होते. परकोटावरून दूरवर निरीक्षण करण्याकरिता ५७०९ बुरूज होते. परकोटावर विशिष्ट अंतरावर लहान लहान छिद्रे होती. जर शत्रूचे आक्रमण झालेच तर त्या छिद्राद्वारे धनुष्य बाणाचा मारा केला जात असे. शहरात शेकडो कारंजी, बगिचे, सुंदर इमारती, नाट्यगृहे इत्यादी सोई होत्या. संस्कृती, विद्या व केलेचे माहेरघर असलेले हे शहर म्हणजे इंद्राची अमरावती शोभत होते. तिला कुसुमपूर अथवा पुण्यनगरी असेही म्हटले जाते. चंद्रगुप्ताच्या राजवाड्याचे वर्णनसुद्धा मेग्यास्थेनिसने केले आहे. तो म्हणतो, राजमहाल शहराच्या मध्यभागी असून अत्यंत सुंदर आहे. महालाचे खांब सोन्याने मढविलेले होते. त्यावर सोनेरी वेली चढविल्या होत्या. चांदीचे पक्षी सुशोभित केले होते. राजवाड्याच्या आसपास सुंदर सरोवर व बगिचे होते. त्याचा दरबार अत्यंत भव्य असून तेथील फर्निचर अत्यंत महाग व मौल्यवान होते. सोन्याचांदीची सुंदर भांडी होती. राजा दिवसभर लोकांचे गाऱ्हाणे ऐकून न्यायदान करीत असे.

पाटलीपुत्र शहराचा कारभार ६ समित्यांद्वारे चालवला जात असे. प्रत्येक समितीत ५ सभासद असे.

१) औद्योगिक समिती :— ही समिती मजुरांचा दर ठरवत असे, मालाचे उत्पादन व विक्रिवर नियंत्रण ठेवत असे.

२) परकीयांवर देखरेख समिती :— ठेवण्यासाठी त्यांची राहण्याची व जेवण्याची व्यवस्था पाहण्याचे काम ती समिती करीत असे.

३) जन्म — मृत्यूची नोंद समिती :— ही समिती जन्म —मृत्यूची नोंद ठेवण्याचे काम करीत होती.

४) उद्योग व व्यापार समिती :— उद्योग व व्यापारावर नियंत्रण ठेवण्यासाठी ही समिती काम करीत असे.

५) बाजार नियामक समिती ही मालाची भेसळ, भाव व वजन मापावर नियंत्रण ठेवत असे.

६) करवसुली समिती शहरातील विविध कर वसूल करण्याचे काम ही समिती करीत असे.

वरील महत्त्वाच्या समित्यांशिवाय आरोग्य, स्वच्छता, दवाखाने, शांतता व सुरक्षीतता, पाणी पुरवठा इत्यादीसाठी विविध समित्या होत्या.

मौर्याकाळानंतर शुंग वंशाचे राज्य मगध साम्राज्यावर प्रस्थापित झाले. त्यामुळे पाटलीपुत्र शहर शुंगाच्या राजधानीचे शहर बनले. मौर्यवंशाचा शेवटचा सम्राट बृहद्रथचा खून त्याच्याच सेनापती पुष्यमित्र शुंगने केला व विश्वासघाताने राज्य बळकावले. पुष्यमित्राच्या काळात पाटलीपुत्र शहराला दोन परकोट होते कारण या काळात ग्रीकांच्या आक्रमणाचा वेग वाढला होता. अयोध्या, मथुरा ही शहरे त्यांनी जिंकली होती. त्यामुळे पाटलीपुत्रचे संरक्षण व्हावे ह्यासाठी पुष्यमित्र शुंगाने दुसरा परकोट बांधला. शुंगाच्या काळातही पाटलीपुत्र नगरीचे वैभव कायम असून भारतातील पहिल्या क्रमांकाचे मोठे शहर होते. शुंगाच्या राजवटीनंतर मगधावर गुप्तांचे साम्राज्य स्थापन झाले. या काळी चिनी प्रवासी फाहियान पाटलीपुत्रमध्ये आला होता. त्यावेळी या नगराचे वर्णन तो म्हणतो, या शहराची निर्मिती प्रत्यक्ष परमेश्वराने आपल्या हाताने केली आहे. राजवाड्याच्या दगडी भिती अत्यंत कौशल्यपूर्वक तयार केल्या होत्या. खांबावर सुंदर कलाकृती तयार केली होती. भारतीय नगरांमध्ये पाटलीपुत्र हे महानगर अत्यंत संपन्न होते. तेथील वैश्य (व्यापारी लोक) अत्यंत दानशूर होते. त्यांनी अनेक दानशाळा सुरू केल्या होत्या. त्या दानशाळेत निराधार, अनाथ, आंधळे, अपंग लोकांना दररोज जेवण प्राप्त होत असे. त्यांना कपडे—लत्तेसुद्धा दान दिले जाई. अनेक औषधालयातून औषधेही मोफत मिळत असे. देणगीदारांची नावे भिंतीवर लिहण्याची प्रथा त्या काळात होती.

पाटलीपुत्र शहरात गुप्त काळात रथयात्रा उत्सव मोठ्या प्रमाणात चालत असे. तो वैशाख अष्टमीला असे. रथ यात्रेत रथाला सुंदर सजवून त्यात देवदेवतांच्या प्रतिमा ठेवल्या जात त्यानंतर संपूर्ण शहरात रथयात्रा फिरून जेथून ही निघाली त्या जागी परत येत. या यात्रेत अनेक रथ सहभागी होत असे. या यात्रेत साधुसंत, संन्याशी व शहरातील लोक सहभाग घेत असे. अशा प्रकारची रथयात्रा अनेक मोठ्या शहरामध्ये गुप्तकाळात निघत असे. असे फाहियान म्हणतो. पाटलीपूत्रत गंगा नदीवर अनेक घाट होते. त्यात एकाचे नाव गौतमतीर्थ असे असून गौतमबुद्धाने या शहरातून सर्वात शेवटच्या फेरीत जेथून नदी ओलांडली त्या ठिकाणी जो घाट तयार झाला त्याला गौतम तीर्थ हे नाव रूढ झाले. विशाखादानाच्या मुद्राराक्षस नावाच्या नाटकातही या शहराचा उल्लेख आहे. तो म्हणतो या शहरावर नेहमी शत्रूची हल्ले होत असे त्यामुळे परकोटाच्या बाहेर हत्तीच्या झुंडी सोडल्या जात त्यामुळे शत्रू परकोटाजवळ येण्याचे धाडस करीत नसे. नगराच्या प्रवेश दारावर बाहेरील देशातील व्यापारी व नागरिकांजवळून तसेच स्वदेशातील नागरिकांकडून चुंगी कर वसूल केला जाई.

प्राचीन काळात ज्या काही महत्त्वाच्या घटना घडल्या त्या सर्व पाटलीपुत्र ह्या शहरात घडलेल्या दिसतात. कारण हे शहर १२०० वर्ष प्राचीन काळी भारताच्या राजधानीचे शहर होते. सम्राट अशोकाने चंद्रगुप्त दुसऱ्याच्या काळात या शहरात अनेक विद्वान लोक राहात होते. कालिदास, अमात्य हरिषेण, चंद्रगुप्त दुसऱ्याचा परराष्ट्रमंत्री वीरसेन हा व्याकरणकार ही होता. प्रसिद्ध गणिती आर्यभटाने या नगरात शिक्षण घेतले होते. कवी राजशेखर ने काव्यमीमांसा हे पुस्तक लिहिले. या नगरात पाणिनी व पतंजलीने अनेक वर्षे व्यतीत केले. व्यापारीदृष्ट्याही हे शहर अत्यंत महत्त्वाचे होते. दूरदुरून येथे माल आणला जाई. कारण येथे मोठी बाजारपेठ होती. लहान वस्तूची खरेदी —विक्री कवड्याच्या माध्यमातून होत असे तर मोठ्या वस्तू नाण्याच्या माध्यमातून होत असे. प्राचीन काळी या शहराचा चौफेर विकास झाला कारण त्याला भारतातील एक आदर्श नगर मानले जाई. मात्र सातव्या शतकात सम्राट हर्षवर्धनने आपली राजधानी कनोज (कान्यकुब्जला) स्थापन केल्यामुळे पाटलीपुत्र या नगरीचे महत्त्व हळूहळू कमी होऊ लागले. मात्र आधुनिक काळात बिहारची राजधानी पाटना म्हणून या शहराची भरभराट सूरू आहे. भारतातील एक महत्त्वाचे शहर म्हणून ते आजही ओळखले जाते.

## संदर्भ ग्रंथ

१) प्राचीन भारत इतिहास — सत्येकेतू विद्यालंकार
२) हमारे पुराने नगर — डॉ. उदयनारायण राय
३) ऐतिहासिक मानचित्रावली — शश्मिता राणी आखवेश
४) प्राचीन भारताची रूपरेषा — प्रा. वसंत भागवतकर
५) प्राचीन भारताचा इतिहास — प्रा. मा. म. देशमुख

❖❖❖

Dr. Bhau Mandavkar Research Centre

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र

इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ 445401

कार्यालय (07201) 226147, 226129, 226170, निवास (07232) 252975

<u>महा. स्थापना १९८३, नॅक ब श्रेणी प्राप्त</u>

मुख्य संपादक व प्राचार्य डॉ. पवन मांडवकर

भ्रमणध्वनी 9422867658 E mail : marathipradhyapak@gmail.com

संचालक व प्रकाशक प्रा. डॉ.सौ. वीरा मांडवकर 9403014885


---

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्रातर्फे 'RESEARCH JOURNAL OF INDIA' हे Multi disciplinary National Level Peer Reviewed संशोधनपर वार्षिक नियतकालिक १ ऑक्टोबर तसेच मराठी विषयाकरिता 'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका' या राष्ट्रीय पातळीवरील ISSN जर्नलचे प्रकाशन १ जानेवारी रोजी केले जाते. API मध्ये या नियतकालिकात प्रकाशित शोधनिबंधाचे कॅटेगरी ३ ए (नॉन रेफर्ड जर्नल्स बट हॅविंग आयएसएसएन नंबर) मध्ये १० गुण मिळतात. जर्नल इंदिरा महाविद्यालयाच्या www.indiramahavidyalaya.com या वेबसाईटवरही ठेवले जाते.

'RESEARCH JOURNAL OF INDIA' करिता कोणत्याही विषयाच्या प्राचार्य, प्राध्यापक, संशोधक छात्र व अभ्यासकांकडून कोणत्याही विषयावरील शोधनिबंध स्वीकारले जातात. तर 'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका' या वार्षिकासाठी मराठी साहित्य, संशोधन, संस्कृती, कला तसेच मराठी अध्ययन–अध्यापनाशी संबंधित विषयावर शोधनिबंध स्वीकारले जातात.

## शोधनिबंध पाठविण्याची पद्धत

१. शोधनिबंध संगणकीय टंकलेखन करून पेज साईज ए ४ मध्ये, मराठी व हिंदीसाठी फॉन्ट कृतिदेव ५० बोल्ड, फॉन्ट साईज १४, इंग्रजीसाठी टाईम्स न्यू रोमन, साईज ११, एमएस वर्ड २००७ मध्ये वरील आयडीवर ई मेल करावा. लेख टाईप करताना सिंगल स्पेसिंगमध्ये असावा व त्याची पीडीएफ करू नये. निबंध चारही बाजूंनी सव्वा इंच मार्जीन सोडून marathipradhyapak@gmail.com या आयडीवर ई–मेलने पाठवावा. पीडीएफ चालणार नाही.

२. निबंध शीर्षकाचा आकार मराठीसाठी २६, शीर्षकाखाली मध्यभागीच लेखकाच्या नावाचा आकार १६, त्याखाली लेखकाचे पद, महाविद्यालयाचे नाव, पत्ता, स्वतःचा मेल आयडी व भ्रमणध्वनी १४ आकारात असावे. अंतर्गत उपशीर्षकांचा आकार १८ असावा व ती डावीकडे असावीत. त्यापुढे कुठलेही चिन्ह नसावे. नाव व पत्त्याखाली लेखकाचा साहित्य, संशोधन इ. संदर्भात जास्तीत जास्त तीन–चार ओळीत परिचय पाठवावा.

३. शब्दमर्यादा २५०० किंवा अधिकतम ५ पेजेस आहे. ५ पेजेसच्या वर निबंध असल्यास प्रति पेज १०० रु. आकारले जातील. निबंध छापण्यासाठी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

४. शोधनिबंध लेखनाच्या आंतरराष्ट्रीय पद्धती पाळून त्याचा मूल्यात्मक व वाङ्मयीन दर्जा सांभाळला जावा. त्यात सारांश, बीजशब्द, प्रस्तावना, निष्कर्ष, संदर्भ यांचा समावेश करण्याचा प्रयत्न करावा. शुद्धलेखनाच्या चुका नसाव्यात.

५. 'RESEARCH JOURNAL OF INDIA' साठी १ सप्टेंबर तर 'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका' या वार्षिकाकरिता शोधनिबंध इ मेलने पाठविण्याची अंतिम तारीख १ डिसेंबर २०१५. मेल व्यवस्थित मिळाल्याची ९४२२८६७६५८ या भ्रमणध्वनीवर पाठविल्याच्या दुसऱ्या दिवशी खात्री करावी.

६. शोधनिबंध लेखकांसाठी प्रकाशन व वितरण शुल्क एका लेखकाकरिता रुपये सातशे (रु. ७००/–) व एकापेक्षा अधिक लेखकांकरिता रुपये नऊशे (रु. ९००/–) असून ते Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre या नावे बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा आझाद मैदान रोड, यवतमाळ, खाते क्र. 60175373000 मध्ये जमा करावे. बँकेचा IFSC code - MAHB0000047 हा आहे. बँकेत रक्कम जमा केल्याच्या दिवशी ९४०३०१४८८५ या भ्रमणध्वनीवर कळवावे.

❖❖❖

## Form IV
(See Rule 8)

Statement about ownership and other particular about the Journal

## Research Journal of India

1. Place of Publication - Dr. Bhau Mandavkar Research Centre, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401
2. Periodicity - Annual
3. Printer's Name - Seva Prakashan, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.)
4. Publisher's Name - Dr. Mrs. Veera Mandavkar
   Nationality - Indian
   Address - Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401
5. Editor's Name - Dr. Pavan Mandavkar
   Nationality - Indian
   Address - Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal

We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.



Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

**INDIRA MAHAVIDYALAYA**

KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401

☎ 07201-226170, 226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

e mail for Govt. & General : imvkalamb@yahoo.co.in

For University : indiram414@sgbau.ac.in

For Research centre : marathipradhyapak@gmail.com

Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC ACCREDITED WITH 'B' GRADE

Multi-Faculty College Estd. in 1983



| | | |
|---|---|---|
| Annual Subscription | - | Individual / Institutional / Single Issue ₹ 500/- |
| Account Details : Bank | - | Bank of Maharashtra |
| Branch | - | Azad Maidan Road, Yavatmal |
| IFSC code | - | MAHB0000047 |
| MICR coe | - | 445014001 |
| A/c No. | - | 60175373000 |
| Mode of Payment | - | By NEFT transfer or crossed Multi city cash at par Cheque or by Demand Draft of Nationalized Bank favorably Bank of Maharashtra payable at Yavatmal or by cash deposit in A/c in favour of Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre |



(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)



ISSN 2349-9370

9 772349 937002